Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्तिविज्ञान

गणेश हरी खरे
क्यूरेटर, भा. इ. सं. मंडळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या .....

पञ्जिका संख्या .....

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

26226
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED 1973
Initial

स्थान प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तक सं. ...
क्रम सं. ...
तिथि ...
गुरुकुल ग्रन्थालय कांगड़ी

यशोदा-चिंतामणि ट्रस्ट

पुरस्कृत ग्रंथमाला

क्र. ९ वर्ष १९३९

मूर्तिविज्ञान

ग. ह. खरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझीं पुस्तकें

प्रकाशित

श्रीक्षेत्र आळंदी

२२ पृष्ठें; ४ चित्रें; मूल्य २ आणे

श्रीविठ्ठल आणि पंढरपूर

६४ पृष्ठें; ७ चित्रें; मूल्य ६ आणे

याविषयीं Oriental Literary Digest म्हणतें ' We congratulate the author on the production of this 'scholarly and extremely useful guide which deserves to be translated into English and other vernaculars.'

मूर्तिविज्ञान

२५० पृष्ठें; ९४ चित्रें; मूल्य ३॥ रुपये

या पुस्तकांत शैव, वैष्णव, शाक्त, सौर, गाणपत्य, जैन इत्यादि धर्मपंथांतील अनेक मूर्तींची सांगोपांग व सचित्र माहिती दिली आहे.

संकल्पित

शिल्परहस्य

यांत मूर्तिपूजेच्या अनुषंगानें हिंदुस्थानांत उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या शिल्पपंथांचा काल, इतिहास, व्याप, लक्षणें, इत्यादि विषयांची शक्य तितकी विस्तृत, साधार, अनुभविक व सचित्र माहिती वाचावयास मिळेल.

संशोधकाचा मित्र

संशोधक व सामान्य जन यांस ऐतिहासिक साधनें तपासतांना येणाऱ्या अनेक अडचणींची सोडवणूक यांत करून दाखविली आहे.

मी लिहिलेलीं पण भा. इ. सं. मंडळानें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें मंडळाच्या स्वीयमालेचे यादींत समाविष्ट आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यशोदा-चिंतामणि ट्रस्ट पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ९ वर्ष १९३९

भारत इतिहास संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ३५

मूर्तिविज्ञान

२५० पृष्ठें व ९४ चित्रें

लेखक

गणेश हरी खरे

(क्यूरेटर, भा. इ. सं. मंडळ, पुणें.)

पांच

श. १८६१] मूल्य साडे तीन रुपये [इ. १९३९

भा. इ. सं. मंडळाचे सभासदास तीन रुपये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशक
गणेश हरी खरे
भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें २.

१	पुरस्कार	१
२	निवेदन	४
३	उपोद्घात	११
४	विषयानुक्रमणिका	२२
५	चित्रसूचि	२४
६	संदर्भ ग्रंथ	२६
७	भा. इ. सं. मंडळ–पुरस्करण	३१
८	ऋणस्मरण, शोध	३२
९	मुख्य भाग	१–२१२

मुद्रक
लक्ष्मण सखाराम केळकर,
जनार्दन सदाशिव लिमिटेडचा प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कार

मूर्तिविज्ञान या विषयावर श्री० खरे यांनीं लिहिलेलें प्रस्तुत पुस्तक मराठी वाचकांपुढें सादर करण्यास मला अत्यंत आनंद वाटत आहे. या विषयावर मराठींतच काय पण इतर देशी भाषांतून अशा तऱ्हेचें पुस्तक उपलब्ध नाहीं. यामुळें कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांच्या 'भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इतिहासा' करितां जिज्ञासूस मराठीचा अभ्यास करावा लागे त्याप्रमाणें निरनिराळ्या ग्रंथांतून प्रमुख प्रमुख देवतांचे कोणते प्रकार सांपडतात हें एखाद्या बंगाली किंवा हिंदुस्थानी संशोधकास पहावयाचें असेल तर या पुस्तकाचा आश्रय घ्यावा लागेल! बंगाली भाषेंत एकेका देवतेसंबंधीं—जसें गणेश, सरस्वती—स्वतंत्र पुस्तकें लिहिलेलीं आढळतात. बंगालमध्यें प्राचीन इतिहास व तत्संबंधीं साधनें यांचा व्यासंग ठेवणारे विद्वान् अधिक असल्यामुळें मासिकें, स्वतंत्र निबंध, इत्यादि रूपानें पुरातत्त्वाच्या सर्व अंगोपांगांविषयीं विचार बंगसाहित्यांत फार मोठ्या प्रमाणांत केला जातो. महाराष्ट्रांत ज्या थोड्या विद्वानांनीं या विषयाकडे जनतेचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे त्यांत श्री० खरे यांची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे.

या विषयाचा व्याप केवढा आहे तेंच पहा ना. मूर्ति म्हटल्या म्हणजे त्या हिंदु, बौद्ध व जैन अशा त्रिविध प्रकारच्या असूं शकतील. त्यापैकीं बौद्ध मूर्तिशास्त्रावर इंग्रजींत ग्रंथ आहेत; पण जैन मूर्तिशास्त्राचा सांगोपांग अभ्यास अजून झाला नसून त्यावर पुस्तकहि नाहीं. हिंदु मूर्तिशास्त्राविषयीं प्रमाणभूत ग्रंथ तंजावरचे महाराष्ट्रीय विद्वान् कै० गोपीनाथराव यांनीं प्रथम लिहून वाहवा मिळविली. या ग्रंथांत बरीच माहिती—विशेषतः दक्षिण भारतीय ग्रंथांतून मिळवून व दक्षिणेंतील अनेक मूर्तींचीं उदाहरणें—देऊन या विषयाचा ऊहापोह सचित्र केला आहे. उत्तर, पूर्व व पश्चिम भारतांतील उपलब्ध साहित्य व उदाहरणें मात्र तितक्या प्रमाणांत देतां आलीं नाहींत यांत नवल नाहीं. देशाच्या प्रत्येक भागांत, जुनीं मंदिरें नाहींशी झालीं तरी, जुन्या मूर्ति फार मोठ्या प्रमाणांत सांपडतात. त्या हळू हळू प्रकाशित होत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत; पण कित्येकांसंबंधीं ग्रांथिक उल्लेखहि सांपडत नाहींत किंवा अपुरे पडतात. अशा स्थितींत कै० गोपिनाथरावांचे ग्रंथ किंवा त्यानंतर ढाका येथील डॉ० भट्टशाली यांनीं लिहिलेलें पुस्तक हीं संशोधकास अपुरीं वाटतात यांत नवल नाहीं. सर्व देशभर किंबहुना बृहत्तर भारतामध्यें—म्हणजे जेथें जेथें हिंदु संस्कृति पसरली होती तेथें, जसें ब्रह्मदेश, सिंहल, जावा, कांबोडिया, सयाम इ० ठिकाणींहि—एकेका देवतेचीं जीं जीं रूपें आढळतात तीं संकलित करून त्यांचा सचित्र ऊहापोह करूं लागल्यास तें एक फारच प्रचंड कार्य होणार आहे; पण तें कोणी अंगावर घेईल किंवा नाहीं याबद्दल मोठीच शंका आहे. त्यांतल्या त्यांत संक्षेपानें कां होईना, प्रसिद्ध झालेलें वाङ्मय व प्राचीन ग्रंथ यांचा शक्य तो उपयोग करून सध्याचें कार्य श्री० खरे यांनीं पार पाडिलें याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

मूर्तिविज्ञान हा विषय तीन तऱ्हेनें प्रतिपादतां येईल. एक म्हणजे प्राचीन ग्रंथांतील वर्णनें किंवा ध्यानें समग्र जमवून ऐतिहासिक दृष्ट्या त्यांतील भेद वगैरे संबंधीं विवेचन करतां येईल. दुसरी म्हणजे निरनिराळ्या काळीं, भिन्न भिन्न प्रदेशांत एक एका देवतेच्या मूर्ति कसकशा सांपडतात त्यांचें वर्णन करून त्यांचे भेद विशद करावयाचे. तिसरा प्रकार म्हणजे ग्रांथिक व प्रत्यक्ष दोन्ही तऱ्हेच्या भेदांची शक्य तेथें जुळवणी करून ऐतिहासिक व तुलनात्मक पद्धतीनें मूर्तिशास्त्राची मांडणी करणें. यांपैकीं प्रत्येक प्रकाराचा श्री० खरे यांनीं थोडथोडा अवलंब केला असून ग्रांथिक वर्णनात्मक भाग विशेष चांगल्या तऱ्हेनें दिला आहे; आणि या भागाकरितां त्यांचें पुस्तक सर्व अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त वाटेल. प्रत्यक्ष उदाहरणांचे बाबतींत त्यांचा स्वतःचा अनुभव मर्यादित असला तरी शक्य तितके संदर्भग्रंथ जमवून त्यांनीं त्यांचा उपयोग केला आहे. प्रत्येक महत्त्वाची मूर्ति स्वतः पाहूं म्हटलें तर, सुखवस्तु व संपन्न माणसासहि कित्येक वर्षें लागतील ! मग अन्य व्यवसायांत निमग्न असणाऱ्याची गोष्टच राहूं द्या. याहून अधिक उदाहरणें व चित्रें देणें शक्य असलें तरी व्यवहार्य नव्हतें हें स्पष्ट आहे.

रा० खरे यांचे पुस्तकाविषयीं आणखी एक विशेष गुण सांगावयाचा म्हणजे त्यांनीं संक्षेपानें इतकी माहिती एकत्र ग्रथित केली आहे कीं, ती इंग्रजींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिहूं गेल्यास याहून दुप्पट ग्रंथविस्तार सहज होईल. मराठी भाषेंतील आधुनिक वाङ्मयामध्यें शास्त्रीय विषयावरील ग्रंथ फार कमी असतात. याचें कारण अशा ग्रंथांना मागणी बेताची असते. प्रस्तुत पुस्तकाचे बाबतींत हा अनुभव खोटा ठरून या ग्रंथाला पुरेसें उत्तेजन मिळाल्यास श्री० खरे व इतर संशोधक यांना पुरातत्त्वाच्या निरनिराळ्या शाखांसंबंधीं प्रमाणभूत व लोकोपयोगी ग्रंथ प्रकाशित करण्यास हुरूप येईल. महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र यांकडून ही आशा सफल होईल असा मला भरंवसा वाटतो.

दिल्ली
१९-३-३८

का. ना. दीक्षित,
डायरेक्टर जनरल ऑफ आर्किऑलॉजी
इन इंडिया.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

गेल्या ४–५ वर्षांत निरनिराळ्या नियतकालिकांत शिल्पावर लेख लिहीत असतां मूर्तिशिल्पांचीं वर्णनें वाचून आणि प्रत्यक्ष अथवा प्रतिमारूपानें तीं पाहून मनांत कल्पना आली कीं, या विषयावर मराठींत एकादें पुस्तक लिहिलें तर नावीन्यामुळें मातृभाषेच्या सेवेचें पुण्य तर लाभेलच; पण सामान्य जनांत शिल्पविषयाची माहिती प्रसृत केल्याचें श्रेयही मिळेल. कारण या विषयावर इंग्रजी, फ्रेंच, जर्मन इत्यादि भाषांत पुस्तकें असलीं तरी भाषेचा परकेपणा व पुस्तकांच्या जबर किंमती यामुळें हा विषय सामान्य लोकांपासून दूर राहात आला आहे.

वरील उद्देशानें कित्येक संस्कृत व अन्यभाषी पुस्तकें चाळून या विषयावर कांहीं लेख तयार केल्यामुळें त्यांस पुस्तकाचें रूप आलें; पण यामुळें एक महत्त्वाचा प्रश्न पुढें उभा राहिला.

हा विषय मनोरंजक असला तरी लोकांमध्यें त्याची आवड कमी असल्यानें पुस्तक खपण्याचें मान कमीच असणार हें ध्यानांत घेऊन कोणी प्रकाशक असलें पुस्तक छापावयास सहसा तयार होत नाहीं. त्यांतून मी एकादा प्रसिद्ध साहित्तिक असतों तरची गोष्ट वेगळी. पण तसेंही कांहीं नाहीं. तेव्हां माझ्या पुस्तकास कोण विचारणार ? म्हणून पुस्तक छापण्याचें रद्द करावें असा विचार मनांत आला. परंतु सुदैवानें यशोदाचिंतामणि निधीच्या विश्वस्तांनीं ३२५ रुपये पुस्तक प्रकाशनासाठीं देण्याचें मान्य केल्यामुळें थोडा हुरूप आला. पण हे पैसे यथानियम पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर मिळावयाचे होते व पुस्तकाच्या प्रकाशनास पुरेसेही नव्हते. मला तर फोटो मागविणें, ब्लॉक करणें इत्यादींसाठीं अगोदर पैसे पाहिजे होते. यामुळें पुन: विवंचना उत्पन्न झाली. पण माझे एक वेळचे शिक्षक श्री. गोविंदरावजी चोळकर व श्री. ज. र. उर्फ नानासाहेब धारपुरे यांच्या सहानुभूतीनें श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं दोनशें रुपये रोख देण्याची कृपा केली. तेव्हां ती विवंचनाही कमी झाली. इतक्यांत माझे पक्के सहा महिने सर्वस्वी भा. इ. सं. मंडळाच्या कामांत खर्च होण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुयोग आल्यामुळें ट्रस्ट व श्रीमंत यांच्या संमतीनें या पुस्तकाचें काम सहा महिने स्थगित झालें.

त्यानंतर पुन्हा पुस्तकाच्या कामास लागलों. आतां जास्त पैसे मिळाले होते; तेव्हां पुस्तकाचीं पानें मूळच्या संकल्पापेक्षां वाढवावीं असें ठरवून वाचन व टिपणें काढणें सुरू केलें. तेव्हां असें दिसूं लागलें कीं, पुस्तक चांगलें करावयाचें तर त्यांत पुष्कळ मजकूर व चित्रें घातलीं पाहिजेत आणि तसें करावयास पैसे अधिक पाहिजेत. याविषयीं काळजी व निराशा यांनीं इतकें बेजार केलें कीं, श्रीमंतांचे पैसे परत करावे व माझ्या हातून पुस्तक होत नाहीं असें यशोदाचिंतामणि ट्रस्टला कळवून मोकळें व्हावें असें मनानें घेतलें. पण माझ्या विनंतीवरून माझे पूर्वीचे विद्यार्थी व आतांचे मित्र श्री. चिंतामण गणेश काशीकर वाङ्मयपारंगत यांनीं कांहीं देवतांच्या वैदिक व शिल्पीय वर्णनांचीं टिपणें काढून माझ्या कामाचा बोजा हलका केला. याच वेळीं हिंदुस्थानच्या पुराणवस्तुसंशोधनखात्यास लिहून तेथून कांहीं मदत मिळूं शकते कीं काय हें पाहिलें. सुदैवानें तेव्हां परमपूज्य रा. ब. का. ना. दीक्षित हे त्या खात्याचे मुख्य बनले होते. त्यांनीं सर्वप्रकारें मदत करण्याचें आश्वासन देऊन माझ्या मागणीप्रमाणें व मिळूं शकले ते मिळून शंभरावर, त्यांचे खात्यांतील ब्लॉक विनामूल्य उपयोगासाठीं पाठवून दिले आणि आणखीही देण्याची तयारी दर्शविली. पण मजपाशीं असलेल्या पैशांतून आणखी ब्लॉक छापणें शक्य नव्हतें. यामुळें त्यांच्या या मदतीचा मला पाहिजे तितका उपयोग करून घेतां आला नाहीं याबद्दल वाईट वाटतें. पण माझा निरुपाय होता. रा. ब. दीक्षित यांनीं या बाबतींत येवढी मदत केली कीं, तीवांचून या पुस्तकास हल्लीचें स्वरूप येण्याची आशाच नव्हती. शिवाय त्यांनीं इतर कामांची निकड असतांही, वेळांत वेळ काढून या पुस्तकास पुरस्कार लिहिण्याचें कबूल केलें. या घटनांमुळें पुन्हा हुरूप येऊन पुस्तक पूर्ण केलें. आतां वाचक व अभ्यासू यांच्या हातीं आनंदानें तें देत आहें.

पुस्तक लिहिण्यास आरंभ करतांना कल्पना होती कीं, मूर्तींचीं ग्रंथिक व शिल्पीय वर्णनें, मूर्तिपूजेचा इतिहास, निरनिराळे शिल्पपंथ इत्यादींची अगदीं त्रोटक माहिती त्यांत द्यावी. पण तसें करतों तर कोणत्याच विष-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याची आवश्यक तेवढीही माहिती देतां आली नसती. शिवाय निरनिराळे शिल्पपंथ नीट विवेचावयाचे तर त्यास मथुरा, तक्षिला, लाहोर, कलकत्ता अशा दहापांच ठिकाणीं तरी जाऊन तेथील म्यूझियम्समधील शिल्पांचा अभ्यास करणें आवश्यक होतें. पण तें तर माझ्या हातून झालेलें नव्हतें. तसेंच पंथांच्या या त्रोटक विवेचनानेंच १००।१२५ पानें व्यापिलीं असतीं. तेव्हां तो विषय पुढील पुस्तकासाठीं राखून ठेवणें भाग पडलें व यांत मुख्यत: मूर्तिवर्णनाचा समावेश करून त्यासच पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला. पण हा विषय असा आहे कीं, त्यास सुमारें २०० पानांत पूर्णता येणेंच शक्य नाहीं. तरीही मी यांत माहिती किती खचून भरलेली आहे हें श्री. गोपिनाथराव यांच्या चतुर्भागात्मक १८०० पृष्ठांच्या व ३० रु. किमतीच्या ग्रंथाशीं किंवा १२५ पृष्ठांच्या व १० रु. किंमतीच्या भट्टाचार्यकृत इंडियन इमेजेस या पुस्तकाशीं प्रस्तुत पुस्तक ताडून पहावें म्हणजे ध्यानांत येईल.

दुसरी अशी कल्पना होती कीं, ५।५० गांवीं स्वत: हिंडून व श्रम करून जमविलेल्या अगदीं नवीन मूर्तिप्रतिमा या पुस्तकांत द्याव्या व पुस्तकास खूप नावीन्य आणावें. पण नोकरी सांभाळून तसें करणें शक्य दिसेना. शिवाय प्रवास व ब्लॉक यांसाठीं लागणारे पैसे यांची अडचण होतीच. तेव्हां तो विचार सोडून द्यावा लागला.

नंतर अशी कल्पना आली कीं, प्रत्येक मूर्तीचीं जितकीं ग्रंथिक वर्णनें मिळतील तितक्यांचें सार स्वतंत्रतेनें देऊन नंतर त्यांशीं जुळणारीं अथवा विरोधी मूर्तिशिल्पें वर्णावीं; पण प्रत्यक्ष कामाला लागल्यावर असें आढळून आलें कीं, तसें करावयाचें तर १००० पृष्ठें मजकूर, सुमारें ३००० रु. खर्च व ५ वर्षें मुदत इतक्या सर्व गोष्टी अवश्य होत्या. यामुळें तोहि विचार रहित करावा लागला. परदेशांतील मनोरंजक मूर्तींचे फोटो मागवून ते या पुस्तकांत घालावे असा एक विचार मनांत बरेच दिवस घोळत होता. पण पैशाच्या टंचाईमुळें तोहि मावळला. शेवटीं हातीं आलेल्या शिल्पग्रंथांतील वर्णनें व शक्य झालें तीं चित्रें घालून प्रस्तुत पुस्तक तयार केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांत प्रत्येक मूर्तीचें तीन भागांत वर्णन आहे. पहिल्या भागांत प्रास्ताविक माहिती, पुढील भागांत त्या मूर्तीचीं ग्रंथांतरीं आढळणारीं वर्णनें आणि शेवटच्या भागांत तिच्या कांहीं मनोरंजक शिल्पीय उदाहरणांची माहिती दिली आहे. प्रास्ताविकाच्या कांहीं भागास माझे मुख्य आधार मॅकडोनाल्ड यांचें वैदिक मायथॉलॉजी, श्री. वि. नि. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचा प्राचीन चरित्रकोश आणि कै. टी. ए. गोपीनाथराव यांचें एलेमेन्टस् ऑफ हिंदु इकोनोग्रफी हीं पुस्तकें होत; पण हीं पुस्तकें संख्येनें अगदीं थोडीं व सर्वसामान्य आहेत; यामुळें मी त्या भागांतील लिखाणास बहुधा आधार दिलेले नाहींत. खरें म्हटलें तर तो भाग अतिशय महत्त्वाचा व्हावयास पाहिजे; पण त्यास तौलनिक मूर्तिविज्ञानाचा व्यासंग पाहिजे. डॉ. गूलिक यांचा 'हयग्रीव' आणि मिस् बेटी हीमन यांचा 'गणेश' हीं अशा व्यासंगाचीं दोन उदाहरणें आहेत. पण तो होण्यास आवश्यक ती सामुग्री एकत्र मिळेल असें हिंदुस्थानांत एकादें तरी ठिकाण आहे कीं नाहीं याची शंका येते. तेव्हां त्या भागावर मला जोर देतां आला नाहीं.

ग्रंथिक वर्णनासाठीं अग्नि, पद्म, मत्स्य, मार्कंडेय, वायु, विष्णुधर्मोत्तर, अभिलषितार्थचिंतामणि, चतुर्वर्गचिंतामणि, वृद्धहारीतस्मृति, निर्णयसिंधु, धर्मसिंधु, अंशुमद्भेदागम, समरांगणसूत्रधार, शिल्परत्न, रूपमंडन, रूपावतार, शारदातिलक, मानसार, बृहत्संहिता, श्रीतत्त्वनिधि इत्यादि ५।२५ पुराण, धर्म, शिल्प, तंत्र, ग्रंथ मला अभ्यासावे लागले. या ग्रंथांना प्रायः सूची नाहींत. तेव्हां त्यांतील आवश्यक भागांच्या सूची कराव्या लागल्या[1]. या ग्रंथांची भाषा इतकी लवचीक, अनियमित व घोटाळयाची असते कीं, अर्थ करतांना सारखे अडथळे येतात. तेव्हां या बाबतींत इतरांप्रमाणें माझ्या हातूनही क्वचित् चुका झाल्या असण्याचा संभव आहे; पण त्यास उपाय नाहीं.

मूर्तींच्या उदाहरणांसाठीं पुराणवस्तुसंशोधन खात्याचीं निरनिराळीं प्रकाशनें, म्यूझियमांचे कॅटलॉग आणि या विषयावरील स्वदेशीय व पर

१ मूर्तींचा अभ्यास करणारांस या सूचींचा अतिशय उपयोग आहे. कोणी दाता भेटल्यास त्या छापून काढाव्या अशी इच्छा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशीय विविध भाषांतील पुस्तकें व नियतकालिकें पहावीं लागलीं. पैकीं वारंवार उपयोगांत आणलेल्या पुस्तकांची यादी 'संदर्भ ग्रंथ' या मथळ्याखालीं दिली आहे. बाकीचीं पुस्तकें पादटीपांतून निर्दिष्ट केलीं आहेत. याशिवाय जीं पाहिलीं पण उपयोगांत आणतां आलीं नाहींत अशींही कित्येक आहेत. या पुस्तकांत शेकडों ठिकाणीं मूर्तींचीं वर्णनें अपुरीं आणि कालपंथनिर्देश रहित अशीं आहेत. यामुळें प्रत्येक मूर्ती कोणत्या ग्रंथिक वर्णनाशीं नेमकी जुळते हें पाहणें—प्रयत्न करतों तरी—फारसें यशस्वी झालें नसतें. पण सामान्यतः येवढें सांगतां येईल कीं, दक्षिणेंतील मध्ययुगीन व अर्वाचीन मूर्ति कोणत्या तरी शिल्प किंवा तंत्र ग्रंथाशीं जुळत्या असतात; पण दक्षिणेंतील प्राचीन आणि उत्तरेंतील सर्वच मूर्तींच्या घडणींत पुष्कळ स्वातंत्र्य दिसून येतें.

पुस्तकाच्या सामान्य स्वरूपाबद्दल येवढें सांगितल्यावर त्यांतील वैशिष्ट्याबद्दल थोडा खुलासा करणें अवश्य आहे. यांत बौद्ध मूर्तीवर एकही प्रकरण नाहीं ही कित्येकांस मोठी उणीव वाटेल व एका दृष्टीनें ती आहेही. पण एक तर बौद्ध मूर्तिकांड खूप मोठें आहे आणि त्यावर डॉ. विनयतोष भट्टाचार्य यांचा एक उत्कृष्ट ग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध होऊन अजून फार वर्षें लोटलेलीं नाहींत. तेव्हां मी बौद्ध मूर्तिप्रकरण घालावयाचें म्हणजे त्याचे उतारेच करणें व्हावयाचें. शिवाय महाराष्ट्रांत बौद्ध मूर्ती इतक्या थोड्या व एकविध आहेत कीं, त्या सहज ओळखूं येतील. अजंठा वगैरे ठिकाणीं मुख्य भरणा जातककथांचा असून त्यांचा उलगडा करणें हा स्वतंत्र विषय आहे. तेव्हां मी एतद्विषयक प्रकरण घालण्याचें टाळलें.

मूर्तिविज्ञानावर कै. टी. ए. गोपिनाथराव यांचा 'हिंदु इकोनोग्रफी' नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. पण त्यांत परदेशीय मूर्तींचीं उदाहरणें दिलेलीं नाहींत. माझ्या पुस्तकांत तीं सांपडतील. मात्र या बाबतींत माझ्या हातून एक दोष न कळत घडला असण्याचा संभव आहे. परदेशी मूर्तींचीं वर्णनें मी ज्यांतून घेतलीं तीं पुस्तकें बहुतेक फ्रेंच, जर्मन, डच वगैरे भाषांत आहेत. या भाषा मला अवगत नाहींत. प्रो. वा. गो. परांजपे व प्रो. रं. द. वाडेकर हे मला शक्य ती मदत देण्यास तयार होते व मी थोडासा त्रास त्यांना दिलाही. पण पुढें अधिक शीण देण्याचा मलाच संकोच वाटूं लागला म्हणून त्यांची मदत घेण्याचें टाळलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थात् मी त्या पुस्तकांतील चित्रांचीं वर्णनें फक्त प्रतिमा पाहून त्यांवरून केलीं आहेत. पण पुष्कळ वेळां प्रतिमा स्पष्ट कल्पना देऊं शकत नाहीत, त्यासाठीं वर्णनेंच पहावीं लागतात. यामुळें कांहीं चुका झाल्या असण्याचा संभव आहे. तरीही अन्यदेशीय नमुन्यांची माहिती हें या पुस्तकाचें महत्त्वाचें वैशिष्ट्य आहे.

कै. गोपिनाथरावांच्या पुस्तकांत जैन मूर्तीवर प्रकरण नाहीं; पण महाराष्ट्रांत जैन मूर्ति पुष्कळ सांपडतात. यामुळें या पुस्तकांत तें प्रकरण घातलें आहे.

शिल्पावर मराठी भाषेंत माझ्या माहितीप्रमाणें एकही ग्रंथ नाहीं; हेंच पहिलें पुस्तक आहे असें दिसतें. कै. गोपिनाथरावांच्या ग्रंथाचा मला एकसारखा उपयोग होत राहिला तरी अनेक ठिकाणीं विवेचन, ग्रंथिक वर्णनें व उदाहरणें या बाबत हें पुस्तक त्यांचे ग्रंथाहून स्वतंत्र व सुधारलेलें आहे.

अनेक ग्रंथांच्या आलोडनानंतर लिहिलेल्या या पुस्तकांत माहिती खचून भरली असल्यास नवल काय ? हिचा उपयोग कसा व किती होतो तें पुस्तक नुसतें वाचून समजणार नाहीं. एकाद्या भव्य देवळांत जा व तेथील मूर्ती समजावून घेतांना हें पुस्तक कांहीं मदत करूं शकतें कीं नाहीं तें पहा. माझी खात्री आहे कीं, हें पुस्तक उत्तम तऱ्हेनें मार्गदर्शन करील. तसें झालें तरच माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मी समजेन. पण या पुस्तकांत कांहीं दोषही राहिले असतील. ज्यांना आढळतील त्यांनीं मला अवश्य कळवावे. नवीन आवृत्ति निघण्याचा सुयोग आल्यास त्याप्रमाणें सुधारणा करण्यास सोपें जाईल.

इंग्रजीमध्यें सध्यां देवतेची सर्वांगीण चर्चा करणारे मूल्यवान ग्रंथ बाहेर पडत आहेत. खरें म्हटलें तर अभ्यासपूर्वक एकेका देवतेवर एकेक प्रबंध लिहिला तरच तिची यथातथ्य कल्पना येईल. पण आमच्या वाचक व अभ्यासक वर्गाची सध्याची स्थिति अशी आहे कीं, यासारखें छोटें पण अनेक देवतांची थोडक्यांत संकलित माहिती देणारें पुस्तक खपण्याचीच रड; तेथें असलीं पुस्तकें खपावयाचीं नाहींत हें का सांगावयास पाहिजे ! नऊ महिन्यांपूर्वी मी 'श्रीविठ्ठल आणि पंढरपूर'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें पुस्तक पदरमोड करून प्रसिद्ध केलें; तें पुस्तक उत्कृष्ट व्हावें यासाठीं मी परिश्रम पुष्कळच घेतले आणि वर्तमानपत्रांनीं अभिप्रायही चांगले दिले; पण अजून शंभर प्रतींचा उठाव झालेला नाहीं. अशा परिस्थितींत संशोधनपर पुस्तक लिहिण्यास उत्साह कसा वाटावा? सामान्य सुशिक्षित जनतेनें अशा पुस्तकांकडे आपलेपणानें पाहिलें तरच संशोधन व संशोधनयुक्त संकलन हीं चालूं शकतील.

आतां फक्त आभार मानावयाचे राहिले. ज्यांच्या मदतीखेरीज हें पुस्तक प्रकाशित होणें प्राय: अशक्य झालें असतें त्यांचा निर्देश मदतीच्या कालानुक्रमानें ऋणस्मरण सदराखालीं स्वतंत्रतेनें केला आहे. ज्यांच्या साह्यामुळें वरील मदत मिळूं शकली पण जे या निवेदनांत अनिर्दिष्ट आहेत, तसेंच ज्यांनीं निरनिराळी मदत केल्याचें निवेदनांत जागोजागीं सांगितलें आहे त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. औंध येथील श्री. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनीं क्र. ६४–६८ व भा. इ. सं. मंडळानें क्र. ८ हे ब्लॉक छापण्यासाठीं दिले आणि रे म्यूझियमचे चालकांनीं क्र. ७३ चा फोटो घेण्यास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे. यशोदाचिंतामणि ट्रस्ट व श्रीमंत इचलकरंजीकर यांनीं पुस्तक प्रकाशनाची मुदत वारंवार वाढवून दिली याबद्दल त्यांचाही आभारी आहे. भा. इ. सं. मंडळाच्या सेवेंत आहे म्हणून खाजगी वेळांत कां होईना असले उद्योग करण्यास फावतें. अर्थात् मंडळाचें साह्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असें दोन्ही तऱ्हेनें झालें आहे. म्हणून मंडळाचा मी आभारी –नव्हे ऋणी–आहे व त्यांतून अंशत: उतराई होण्यासाठीं मंडळांचे सभासदांस पुस्तकाची किंमत थोडी कमी ठेवली आहे.

रामनवमी १८६१ ग. ह. खरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपोद्घात

मनुष्य जेव्हां रानटी स्थितींत होता, त्याला जमीनींतून पीक कसें काढावें हेंही समजत नव्हतें, फळें व कंदमूळें आणि स्वतःपेक्षां अशक्त प्राणी हेंच जेव्हां त्याचें अन्न होतें, गुहा, ढोली, झाडें हींच जेव्हां त्याचीं विश्रांतिस्थानें असत आणि दगडाशिवाय इतर हत्यारें त्यास अवगत नव्हतीं तेव्हां त्याची कला व ईश्वर यांविषयीं कांहीं कल्पना असेल कां? कृत्रिम उपायानें सामर्थ्य वाढवितां येतें हें मनुष्यास केव्हां कळलें असेल तें असो! तेव्हांपासून तो सामर्थ्यवर्धन व सुखोपभोग यांमागें एकसारखा लागला आहे; सजीव शत्रू व निसर्ग शत्रू या दोघांवर कुरघोडी करण्यासाठीं मनुष्य झटत असलेला दिसतो. या झटापटींत अनेक वेळां पाऊस, वीज, अग्नि, बर्फ इत्यादींनीं मनुष्याला तडाखे लगावले असतील. अशा वेळीं मनुष्य भांबावून असमर्थतेमुळें त्यांचीच परिहारार्थ प्रार्थना करूं लागला. त्यांलाच देव (आपला मदतनीस) समजूं लागला असावा. तेव्हां त्यानें देवाची त्रासदायक, भीतिदायक, नुकसान करणारा इत्यादी प्रकारें कल्पना केली असेल. नैसर्गिक संकटांतून कसें सुटावें हें न कळल्यामुळें त्यानें कित्येकदां या संकटरूपी देवांची प्रार्थना केली असतां काकतालीय न्यायानें त्याच्या संकटांचा परिहार झाल्यामुळें तेच देव दयाळू, मदत करणारे, ऐश्वर्य देणारे आहेत अशीही त्याची कल्पना झाली असेल. तात्पर्य मनुष्यास देवाच्या शिव व अशिव अशा दोन्ही कल्पना जवळ जवळ एकाच काळीं आल्या असण्याचा संभव आहे. देवाच्या रूपामध्येंही मनुष्याच्या कल्पनेनें दोन प्रकार मानले असतील. देवाच्या अशिव रूपांत अक्राळविक्राळ चेहरा, अनेक अवयव, विलक्षण शस्त्रास्त्रें, भयंकर मुद्रा व पवित्रे इत्यादिकांचा समावेश करून शिवस्वरूपांत सुंदर रूप, मनुष्यसदृश अवयव, अभयादि मुद्रा व भद्रादि आसनें, इत्यादींचा समावेश केला असावा. देवाच्या रूपांचीं मनानें कल्पना केली व तें रूप प्रार्थनेसाठीं किंवा अन्य कारणानें वारंवार आपल्याला आठवावें, आपल्यापुढें यावें असें वाटूं लागलें. तेव्हां मनुष्यानें माती, दगड, लाकूड इत्यादींचे पुतळे करण्यास व चित्रें काढण्यास, सुरवात केली असावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानांत असा काल केव्हां सुरू झाला याविषयीं विद्वानांत मोठा मतभेद आहे किंवा होता; पण इतर देशांतील सर्वांत जुन्या मूर्तींचे काल पाहिले व हिंदुस्थानचा जगाशीं असलेला प्राचीन संबंध लक्षांत घेतला, तर हिंदुस्थानांतील मूर्तिपूजा सुरू होण्याचा कालही फार जुना असला पाहिजे असें वाटूं लागतें.

अन्यदेशीय मूर्तिपूजा

इजिप्तमधील लोक तेथील २ ऱ्या वंशाच्या कारकिर्दीत (सुमारें ५३०० वर्षांपूर्वी) पद्धतशीरपणें देवांच्या मनुष्यसदृश आकृति बनवूं लागले. ॲस्सीरियामध्यें सांपडलेले सर्वांत जुने लेख देवासंबंधीं असून त्यांत देवांना व देवळांना अर्पिलेल्या बाबींचा उल्लेख आहे. हे लेख इ. स. पू. ४००० च्या सुमाराचे असावे. अर्थात् या वेळीं त्या देशांत मूर्तींचा प्रसार होता हें उघड आहे. बाबिलोनिया हा ॲस्सिरिया इतकाच जुना प्रदेश होता. यांतील धर्माचें मूर्तिपूजा व मूर्तिकांड हें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य होतें. या दोन्ही गोष्टींमध्यें, अवशेषांवरून सिद्ध होणाऱ्या या लोकांच्या सर्वांत जुन्या काळांत, चांगली प्रगति झाली होती असें दिसतें. या देशांतील सर्वांत जुने वसाहत करणारे लोक जे सुमेरियन ते मध्य आशियांतील डोंगराळ प्रदेशांतून आले होते. त्यांच्या संस्कृतींत मानवदेहधारी देव व त्यांचीं चित्रें किंवा पुतळे यांचा समावेश होई. ॲस्सिरियन लोकांचा धर्म व संस्कृति हीं तत्वतः बाबिलोनियन लोकांचींच अनुकरणें होतीं. इ. स. पूर्व १५ व्या शतकांत इश्तर देवतेची मूर्ती मोठ्या समारंभानें व विधिपूर्वक मेसॉपोटेमियांतून इजिप्तमध्यें नेली गेली व ती आज आपणास दाखवितांही येते. पॅलेस्टाइनमधील इस्रायल लोकांत जाहवेह (Jahweh)ची मूर्ती इ. स. पूर्व ८ व्या शतकापर्यंत निषिद्ध समजली जात नसे. जुन्या करारांत तसे शब्दही आहेत. चीनमध्यें इ. स. पू. १२०० च्या सुमारास मूर्ती होत्या असें दिसतें. तेथील बादशाह वू विक (इ पू. ११९८–११९४) यानें प्रथम देवतांच्या मूर्ती बनविल्या. ग्रीसमध्यें एजियन लोकांत मूर्तींचा प्रचार होता. इ. स. पूर्व ९०० च्या सुमारास रानटी टोळयांच्या हल्ल्यामुळें एजियन संस्कृतीचा नाश झाल्यावर हेलेनिक ग्रीक लोकांचा उदय झाला. यांचा धर्म व कला एजियन लोकांप्रमाणेंच असल्यामुळें त्यांमध्येंही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्तिपूजेचा जोरांत प्रचार होता. तात्पर्य हिंदुस्थानभोंवतीं व दूरवर जे अनेक प्राचीन देश आहेत किंवा होते त्या सर्वांत इ. स. पूर्वी शेकडों वर्षें मूर्तिपूजा प्रचारांत होती व विविध देवतांच्या मूर्ती बनविल्या जात एवढें निश्चित ठरतें.

हिंदुस्थानांतील मूर्तिपूजा

हिंदुस्थानांत मूर्तिपूजा केव्हां सुरू झाली या प्रश्नाला वादग्रस्त स्वरूप आलें आहे. एक काळ असा होता कीं, तेव्हां वैदिक संस्कृति ही सर्व हिंदुस्थानची एकच एक शुद्ध संस्कृति असें समजलें जाई. द्राविड भाषा व संस्कृति यांचा जास्त जास्त अभ्यास होऊं लागला तसतशी ही समजूत पालटून हिंदू संस्कृतींत द्राविड संस्कृतीचें पुष्कळ मिश्रण झालें असल्याचें आज मानण्यांत येतें. सध्यां गोंड, संताळ, कातकरी, मुंड वगैरे लोकांच्या राहणीचा अभ्यास सुरू आहे. याचें फलित म्हणजे या लोकांच्या संस्कृतीचाही हिंदू संस्कृतीवर थोडाबहूत परिणाम झाल्याचें मानण्यांत येतें. याशिवाय सिंधमध्यें मोहेंजोदडो येथें जे अवशेष सांपडले आहेत त्यांवरून तेथेंही एक संस्कृति होती व तिचाही हिंदू संस्कृतीवर परिणाम झाला असला पाहिजे हें उघड आहे.

या सर्व संस्कृतींपैकीं फक्त सिंधुसंस्कृतीचे प्राचीन अवशेष पदार्थरूपानें आपणांस पाहतां येतात. बाकीच्या संस्कृतींचे अवशेष नाहींत असें नाहीं; पण ते सर्व सिंधुसंस्कृतीच्या मानानें अलीकडचे आहेत. आकडयांत बोलावयाचें तर सिंधुसंस्कृतीचे अवशेष इ. स. पू. २५०० वर्षांच्या पलीकडचे आहेत; तर वैदिक संस्कृतीचे इ. स. पू. ५०० वर्षांपलीकडचे अवशेष अजून सांपडले नाहींत. आणि द्राविड संस्कृतीचे कालनिर्णायक अवशेष तर त्याहूनही किंचित् अलीकडचे आहेत. मुंड वगैरे संस्कृतीचे पदार्थरूप अवशेष या दोन्ही संस्कृतींहूनही अलीकडचे असले पाहिजेत.

याचा अर्थ असा नव्हे कीं, वैदिक संस्कृतीचे प्राचीन अवशेष नाहींत. अवशेष जरूर आहेत; पण ते ग्रंथिक आहेत. ग्रंथांतील वर्णनांवरून ते अनुमानावे आणि भाषेंत हुडकावे लागतात. यामुळेंच त्या संस्कृतीचें प्राचीन स्वरूप सामान्यत: विवादात्मक आहे. तेव्हां मूर्तिपूजा व मूर्ति यांचे अस्तित्वही वादयुक्त असणारच. तेव्हां प्रथम त्या विषयांत न शिरतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिंधुसंस्कृतीचे जे अवशेष सांपडले त्यांवरून तीमधील मूर्तिपूजेविषयीं काय म्हणतां येतें तें पाहूं.

सिंधुसंस्कृति व मूर्तिपूजा

मोहेंजोदडो येथील उत्खननासंबंधीं सर जॉन मार्शल व मॅके यांच्या संपादकत्वाखालीं दोन फार चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. यांत सिंधुसंस्कृतींतील लोकांच्या धर्माचें विवरण आहे. त्यांत माता, शिव, लिंग, योनी, वृक्ष इत्यादींना पवित्र मानलें आहे; येवढेंच नव्हे तर त्यांच्या दगड, धातू, माती वगैरेंत केलेल्या प्रतिकृति येवढ्या मोठ्या, चांगल्या व क्वचित् भक्तगणांनीं युक्त आहेत कीं, त्यांची देवता म्हणून पूजा निःसंशय होत असली पाहिजे. उ० माता, बहुतेक उभ्या व जवळ जवळ नग्न आहेत. त्यांच्या डोक्यास साधारणतः चंद्रकोरीच्या आकाराचें वस्त्र आहे. कर्णभूषणें शिंपल्याप्रमाणें व गालावर बांधलेलीं दिसतात. गळ्यांत गळपट्टी व लांब हार आहेत. कमरेस बंध किंवा पट्टा असतो. कांहीं मोकळ्या, तर कांहीं गरोदर, तर थोड्या मुलांसह आहेत. दक्षिणेंत माता देवतेस फार महत्त्व आहे. आर्य संस्कृतींत यांना इतकें महत्त्व नाहीं. प्रागार्य लोकांचीच ही देवता आहे. शिवाच्या मूर्तीचें स्वरूप असें—हा एका चौरंगावर आसनमांडी घालून, पायाचे तळवे एकमेकांवर ठेवून जमिनीस चिकटतील अशा तऱ्हेनें बसला असून हात योग्याप्रमाणें गुडघ्यावर ठेवण्याच्या उद्देशानें जवळ आणले आहेत. तोंडें व डोळे प्रत्येकीं तीन आहेत. डोक्यावर मध्यभागीं मुकूट असून दोन बाजूंस दोन शिंगें आहेत. प्रत्येक हातावर तीन मोठीं व मध्यें प्रत्येकीं चार अशीं आठ मिळून ११ कंकणें आहेत. देवाच्या गळ्यांत एकाखालीं एक लोंबणारे असे तिकोनी हार आहेत. कमरेस बंध असून लिंग व वृषण हीं बहुधा दिसत आहेत. म्हणजे मूर्ती नग्न आहे. किंवा कदाचित् तीं मेखलेचीं टोकें असूं शकतील. उजवीकडे वर वामावर्ती हत्ती, त्याखालीं सव्यावर्ति व झडप घालणारा वाघ आणि डाव्या बाजूस वर वामावर्ती गेंडा व त्याखालीं चवताळलेला म्हैसा आहे. चौरंगाखालीं एकमेकांविरुद्ध तोंडें फिरवलेले पण शिंगें जवळ आणलेले दोन हरीण आहेत. शंकरास पशुपति, महायोगी हीं नांवें असून त्याच्या दक्षिणामूर्ति अथवा योगदक्षिणामूर्ति या रूपांत त्याजवळ हरिणही दाख-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विलेले आढळतात. शंकरास एक, तीन, चार, पांच तोंडें असूं शकतात. त्यास तीन डोळे असल्याचें अनेक ठिकाणीं वर्णिलें आहे. तेव्हां ही मूर्ति शंकराची असली पाहिजे यांत शंका नाहीं. भक्तगण नमस्कार करीत असलेल्या आणखीही एकदोन योगमुद्रेच्या बहुधा एकमुखी मूर्ती आहेत. सहाव्या–सातव्या शतकांतील कित्येक पल्लव मूर्तींना शिंगें आहेत. तात्पर्य ही मूर्ति शिवाची असावीसें वाटतें. लिंग पुरुषेंद्रियासारखें काढलें आहे. त्यांत बराच स्वाभाविकपणा आणला आहे. योनी स्वाभाविक नसून वाटोळ्या दगडांत भोंक पाडलेली आहे. तिजवर लिंग नीट बसावें म्हणून तिचा वरचा भाग नागमोडी केला आहे. झाडें बहुधा पिंपळाचीं दिसतात.

वर जी माता, शिव, लिंग, योनी यांचीं वर्णनें दिलीं आहेत त्यांवरून येवढें दिसून येतें कीं, सिंधुसंस्कृतींतील लोक देवपूजक असून आपल्या आराध्य देवतांच्या ते लहानमोठ्या मूर्ती करीत. आतां या प्रागार्य लोकांच्या अनेक गोष्टींचा आर्यांनीं स्वीकार केल्याचें स्पष्ट आहे. लिंग, योनी, माता, शिव, वृक्ष वगैरे देवतांचा त्यांनीं स्वीकार केला असतां फक्त तद्बोधक मूर्तींचा त्यांनीं त्याग केला असेल हें संभवनीय दिसत नाहीं. तेव्हां निदान वेदकालांत म्हणजे शिव देवता वेदांत शिरली तेव्हां प्रागार्यांप्रमाणें आर्यांतही मूर्तिपूजा सुरू झाली असली पाहिजे हें उघड ठरतें.

सिंधुसंस्कृतीचे प्रत्यक्ष अवशेष सांपडले आहेत तसे व तितके जुने असे वैदिक संस्कृतीचे अवशेष अद्याप उपलब्ध झाले नाहींत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. त्या संस्कृतीच्या अति प्राचीन स्वरूपाचें ज्ञान आपणांस ग्रंथांवरून करून घ्यावें लागतें. या ग्रंथांतील माहिती देण्यापूर्वी प्रथम पुराणावशेष आपणांस कोठवर मागें नेतात हें पाहिलें पाहिजे.

मूर्तिपूजेचे पुराणावशेष

इ. स. आरंभीं हिंदुस्थानांत सर्वत्र मूर्तिपूजा प्रचारांत होती असें समजण्यास हरकत नाहीं. कारण त्या वेळेपासूनच्या अनेक मूर्ति पहावयास मिळतात. तत्पूर्वीच्या काळांतील मूर्ति फार मोठ्या प्रमाणांत पहावयास सांपडत नाहींत. याचा अर्थ पूर्वी मूर्ति नव्हत्या असा मात्र नव्हे. उ. लखनौ येथील लिंगोद्भवमूर्ति इ. स. पूर्व दुसऱ्या शतकांतील असावी असा अंदाज आहे. खारवेलाच्या हाथिगुंफा लेखांत त्यानें आपल्या १२ व्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यवर्षी नन्दानें पळविलेली कलिंगजिनमूर्ति पुन्हा प्रतिष्ठापित केल्याचें सांगितलें आहे.[1] ही गोष्ट इ. स. पूर्व १७५ च्या अगोदर झाली असली पाहिजे. कारण खारवेलाचा काळ इ. स. पू. २०० ते १७५ असा येतो.[2] बांकीपूर जिल्ह्यांत लोहाणीपूर येथें नुकत्याच कांहीं भग्न जिनमूर्ती सांपडल्या आहेत. त्यांवरील झिलई वगैरेंचा विचार करतां त्या मौर्यकालीन ठरतात असा कै. के. पी. जायस्वाल यांचा कयास आहे[3]. मौर्यकाल साधारणतः इ. सनापूर्वी ३५० ला सुरू होत असल्यानें ह्या मूर्ती इ. स. पूर्व ४००–३५० मधील असण्यास हरकत नाहीं. या मूर्ती जैनधर्मीय आहेत. याच सुमाराच्या कित्येक बौद्ध मूर्तीही सांपडतात. मग फक्त वैदिक मूर्ती तेवढ्याच कां नसाव्या? आजवर तशा सांपडल्या नसल्या तरी यापुढें सांपडणार नाहींत असें म्हणवत नाहीं. आपलेकडील उत्खनन फारच थोडें व बहुधा बौद्ध स्थानांचें झालें आहे. वैदिक स्थानांचें असेंच उत्खनन झाल्यास वैदिक मूर्तीही सांपडतील.

मूर्तिपूजा–वाङ्मय अवशेष

इ. स. पूर्वीचे वैदिक मूर्तींचे प्रत्यक्ष अवशेष जरी फार सांपडले नसले तरी मूर्ती असल्याबद्दल ग्रंथिक उल्लेख भरपूर आहेत. उ पातंजल महाभाष्यांत (इ. पू. १५०) शिव, स्कंद, विशाख, काश्यपप्रतिकृति, दीर्घनासिकी, तुंगनासिकी अशा मूर्तींचे उल्लेख आले आहेत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत शहराच्या मध्यभागीं अपराजित, अप्रतिहत, जयन्त, वैजयन्त, शिव, कुबेर, अश्विनौ देव, श्री, पृथ्वी, यांचीं मंदिरें बांधावीं असें सांगितलें आहे.

पाणिनीमध्यें 'अवक्षेपणे कन्,' 'इवे प्रतिकृतौ,' 'लुम्मनुष्ये,' 'जीविकार्थे चापण्ये,' अशीं सूत्रें आहेत. या सर्वांचा मिळून अर्थ असा आहे कीं, ज्या विकणें योग्य नाहीं, पण ज्या उदरनिर्वाहाकरितां केलेल्या असतात अशा प्रतिकृतींच्या बाबतींत कन् प्रत्ययाचा लोप होतो. अशा प्रतिकृति म्हणजे शिव, स्कन्द, विशाख यांच्या होत, असें पातंजल

१ एपिग्राफिया इंडिका खंड २० पृ. ८०. २ कित्ता पृ. ७७. ३ ज. बि. ओ. रि. सो. मार्च १९३७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाष्यकारांचें म्हणणें. देवांची विक्री करूं नये अशी फार प्राचीन काळापासूनची समजूत आहे. तेव्हां पाणिनीला शिवस्कंदविशाखादि देवमूर्ती अभिप्रेत असाव्या असा तर्क होतो. पण भाष्यकारांच्या स्पष्ट उक्तीवरून त्यांच्या कालांत म्हणजे इ. स. पूर्व २००–१५० च्या दरम्यान वैदिकांमध्यें मूर्ति प्रचलित होत्या हें निश्चित ठरतें. पाणिनीचे कालच्या मूर्तिपूजेसंबंधीं अनुमान खरें ठरण्यास भाष्यकाल व पाणिनिकाल यांमधील अवकाशांत मूर्तिपूजा प्रचलित होती हें दाखवितां आलें पाहिजे. व खोटें ठरण्यास त्या अवकाशांत मूर्तिपूजा प्रचलित नव्हती व पाणिनिकालीं मूर्तीखेरीज जीविकार्थ, अपण्य व प्रतिकृति अशा प्रकारच्या इतर वस्तु होत्या असें दाखवितां आलें पाहिजे. यापैकीं काय करतां येतें तें पाहूं.

महाभारतांत (इ. स. पू. २५०) वनपर्वाच्या ८२–८४ अध्यायांत महाकाल, धूमावती, त्रिशूलपाणि, शंखकर्णेश्वर, वामन, आदित्य, चंद्र, इत्यादी अनेक मूर्तींचे उल्लेख आहेत. भीमाचा लोखंडी व द्रोणाचार्याचा असे पुतळे केल्याच्या कथा आहेतच. तसेंच देवतांच्या प्रतिमा कापतात, हसतात, रक्त ओकतात, घामेजतात व कोलमडतात असेंही एके ठिकाणीं नमूद आहे. तेव्हां महाभारतकालीं मूर्तींचा प्रचार होता हें स्पष्ट आहे.

महाभारताच्या सुमाराची जी मनुस्मृति तीमध्यें देवतेचें पूजन, तिची छाया, तीस घालावयाची प्रदक्षिणा, तिचें सांनिध्य, तिचें देऊळ, तिचा भंग, इत्यादींचा उल्लेख आला आहे. देवतेची प्रतिमा असल्याशिवाय तिची छाया पडूं शकणार नाहीं व ती भंगली जाणार नाहीं हें उघड आहे. तेव्हां मनुस्मृतीच्या कालीं मूर्ती होत्या असें म्हणण्यास हरकत नाहीं.

गौतमधर्मसूत्रांत देवतेची अभिमुखता, तिचें देऊळ, तिचें सांन्निध्य, तिची पूजा; तीस घालावयाची प्रदक्षिणा, शालग्रामाचें पावित्र्य, गृहदेवता, इत्यादींचे उल्लेख आहेत. आपस्तंब धर्मसूत्रांतही जवळजवळ असेच उल्लेख आहेत. अर्थात् या सूत्रांच्या कालांत मूर्तिपूजा प्रचलित होती असें म्हणतां येतें.

बोधायन गृह्यशेषसूत्रांत मूर्तिपूजेविषयीं फारच महत्वाची माहिती आली आहे. यांत विष्णु, महापुरुष, रुद्र, दुर्गा, उपश्रुति, श्री, सरस्वती, ज्येष्ठा, विनायक या देवतांचे कल्प म्हणजे पूजाविधि सांगितले आहेत. त्यांत बहु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेक ठिकाणीं सुवर्णोपधान प्रतिकृति, प्रतिमेचें उत्थापन, तिचे डोळे, पाय, नाभिदेश, डोकें, सर्वांग, तिची स्थापना, प्रतिमास्थान, प्रतिसर बांधणें व सोडणें, कदम्बमयी किंवा बिल्वसारमयी श्री, विद्युद्गंधोशीरमय विष्णु, हस्तिमुखा ज्येष्ठा, हस्तिमुख विनायक, इत्यादी उल्लेख आले आहेत. तेव्हां या सूत्रकाळीं मूर्तिपूजेचा सर्रर्हा मोठ्या प्रमाणावर प्रचार होता असें समजण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

आश्वलायन गृह्यसूत्रांत गृहदेवता व वास्तुदेवता आणि त्याच्या परिशिष्टांत ग्रहप्रतिमा, वास्तुमूर्ति, प्रतिमा करण्याचे पदार्थ यांचे उल्लेख आले आहेत.

अथर्ववेदाच्या कौशिकसूत्रांत दैवतें नाचतात, पडतात, हसतात, गातात असें विधान आहे. हें विधान प्रतिमा असल्याशिवाय करतां येणार नाहीं.

निरनिराळ्या सूत्रांचीं परिशिष्टें त्यांस मागाहून जोडलीं असण्याचें संभवतें. पण सूत्रांच्या मुख्य भागांतच मूर्तींच्या कृत्यांचा उल्लेख असल्यामुळें सूत्रकालांत पूजेच्या मूर्ती होत्या हें निःसंशय. सूत्रकाल व पाणिनिकाल यांमध्यें फार अंतर नसल्यानें पाणिनिकालीं मूर्ति होत्या असें म्हटलें पाहिजे.

षड्विंश ब्राह्मणांत दैवतप्रतिमा हसतात, रडतात, नाचतात, फुटतात, खिन्न होतात, फुलतात असें सांगितलें आहे. शतपथ व तांड्य ब्राह्मणांत देवचोर या अर्थीं मलिम्लुच असा शब्द आला आहे. शतपथ ब्राह्मणांत पुरुषदेवतेची सुवर्ण प्रतिमा कशी करावी याबद्दल सूचना आहेत. त्याच ब्राह्मणांत इष्टिकांवर कोरावयाच्या रात्रि, कालदेव इत्यादि देवतांच्या आकृतींचे उल्लेख आहेत. तसेंच गार्हपत्यागारामधील देवाच्या संगतीनें झोपणें, देवांना जानवीं घालणें, कृत्तिवासा व पिनाकी शंकर, देवासमोर आहुती देणें, इत्यादि विधानांत देवप्रतिमा उघड उघड अभिप्रेत आहेत. शांखायन ब्राह्मणांतील 'तो इलेरु आवाहन करून स्नान घालतो, सूर्याचे हात मोडल्यामुळें त्यास दोन नवीन हात दिले' इत्यादि उल्लेख अर्थपूर्ण आहेत. तैत्तिरीय ब्राह्मणांत 'उद्गाता देवासमोर बसून..., अग्नि रथावर आहे, ते देव रथांत आहेत, होत्यानें उषेच्या दोन मूर्तींची पूजा करावी, सरस्वती, इडा व भारती यांच्या तीन मूर्ती, अहोरात्राधिदेवतेची मूर्ति, सुवर्णमय तीन देवता, अनेक मूर्तींचा निर्माता त्वष्टा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इत्यादि विधानें आलीं आहेत. ऐतरेय आरण्यकांत 'मी इंद्राचें शरीर तयार केलें' असा निर्देश आहे. तैत्तिरीय आरण्यकांत देवतांच्या वस्त्रांस पिवळा रंग देत, रुद्राचीं वस्त्रें शुभ्र असत, कश्यपपद्धतीनें केलेले सात सूर्य, विश्वकर्म्यानें तुम्हांस सूर्यमूर्ती द्याव्या, मूर्तिनिर्माता विद्वान् त्वष्टा, तू मूर्ति आहेस,' इत्यादि उल्लेख असून वैदिक यज्ञांमध्यें इष्टिकांवर देवतांच्या आकृति काढीत असें याच आरण्यकावरून म्हणतां येतें.

संहिता प्राय: प्रार्थनामय असल्यानें त्यांत मूर्तिशिल्पाचे उत्कृष्ट पुरावे सांपडण्याची अपेक्षा करणें योग्य नाहीं. तरीही देवतांच्या मानवी आकृति, त्यांचे अवयव, कपडे, आयुधें, वाहनें इत्यादींचीं वर्णनें भरपूर सांपडतात. अशीं कांहीं निरनिराळ्या मूर्तींच्या प्रस्तावांत मीं दिलीं आहेत. पण त्या शिवाय आणखी मिळण्यासारखीं आहेत. काठक संहितेमध्यें मूर्तींचा व्यापार करणाऱ्या देवल ऋषीचा उल्लेख आहे. मैत्रायणी संहितेंत कित्येक देवतांच्या गायत्री आल्या आहेत. त्यांत त्या देवतांचीं वक्रतुंड, दन्ती, हस्तिमुख, चतुर्मुख, पद्मासन, इत्यादि नांवें सांपडतात. हीं नांवें लाक्षणिक म्हणतां येणार नाहींत. वाजसनेयी संहितेंत तर मूर्तीविषयीं अनेक निश्चयात्मक उल्लेख आहेत. एके ठिकाणीं सूर्यास हिरण्यपाणि म्हटलें आहे; तर दुसरीकडे मूर्तिभंजक राक्षसांनीं त्याचे हात तोडल्यामुळें देवांनीं त्यास नवीन सोन्याचे हात बसविल्याचें सांगितलें आहे. शिवाय 'अग्नीचें शरीर लोखंड, रुपें किंवा सोनें याचें बनलें आहे, त्यास वाहक घेऊन जात आहेत, अहोरात्राधिदेवतेचीं सुंदर शिल्पें, प्रतिमा करणारा,' इत्यादि उल्लेख आहेत. तैत्तिरीय संहितेमध्यें यज्ञाच्या आधारासाठीं सुवर्णपुरुष केला जातो असें विधान आहे. पुराण व मूर्तिमंत अशा अग्नीला आम्ही शरण येतो असें सामवेदांत म्हटलें आहे. ऋग्वेदांत 'वरुणानें सुवर्णकवच घातलें असून त्याचे हेर त्याजभोंवतीं असतात, तो दृढ, तेजस्वी व सोनेरी हातांचा आहे, मी इंद्राला शंभर, हजार, दहा हजार यासाठीं तर सोडाच पण केवढ्याही संपत्तीसाठीं विकणार नाहीं' इत्यादि उल्लेख आहेत.

हे सर्व उल्लेख केवळ कविकल्पना आहेत असें वाटत नसल्यानें हिंदुस्थानांतील प्राचीन आर्यांत मूर्तिपूजा होती असें म्हटलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिल्पाचा उत्कर्षापकर्ष

प्राचीन कालीं जेव्हां आगम, शिल्प अथवा तंत्रग्रंथ तयार झाले नव्हते तेव्हां घडलेल्या मूर्ती फार उत्कृष्ट आहेत. त्या वेळीं शिल्पकार मनुष्य, प्राणी वगैरेंच्या रूपांचा अभ्यास करून त्यांना शक्य तितक्या नैसर्गिक रीतीनें शिल्प, चित्र इत्यादींत रेखाटण्याचा प्रयत्न करीत. कदाचित् हा ग्रीक शिल्पकलेच्या परिचयाचा परिणामही असेल. पण त्यामुळें त्यांच्या हातून उत्कृष्ट कलाकृति निर्माण झाल्या. पुढें मध्ययुगांत ती स्थिती राहिली नाहीं. प्रथम तंत्र व आगम ग्रंथ आकारास आले. त्यांत मूर्तींना अस्वाभाविक अवयवसंख्या दाखवावी अशाविषयीं नियम घालण्यांत आले. पुढें आगम व शिल्प ग्रंथांत अवयवांचीं तौलनिक प्रमाणें ठरविण्यांत आलीं. हीं कांहींशीं स्वाभाविक व बरींचशीं अस्वाभाविक अशीं आहेत. यांतच कवींनीं निरनिराळ्या अवयवांना ज्या उपमा दिल्या त्या तत्त्वतः खऱ्या आहेत असें समजून त्यांप्रमाणें अवयव रेखाटण्याचा प्रयत्न होऊं लागला. आणि शेवटीं ग्रंथिक नियम शिल्प्यानें पाळलेच पाहिजेत असा अलिखित कायदा होऊन बसला.

या सर्व परिस्थितीचा परिणाम शिल्पावर फार विलक्षण झालेला आढळतो. उ. प्राचीन शिल्पांत शरीर बांधेसूद; पिळदार असें दाखविलें तरी त्यांत ताठरपणा किंवा कडकपणा दिसणार नाहीं. छाती व पोट यांत एकदम विभाग न होतां छाती हळूहळू पोटांत विलीन झालेली आढळेल. स्त्रियांच्या बाबतींतही स्तनप्रदेश व पोट यांतील फुगीरपणा व कृशता हीं एकदम उठून दिसणार नाहींत. प्रत्येक अवयव अगदीं स्वाभाविक तऱ्हेनें हळूहळू कृश किंवा लठ्ठ झालेला आढळेल. नाक किंचित् बसकें व आखूड सांपडेल. ओठ थोडे जाड असतात. डोळेही फार लांब दाखवीत नाहींत. तोंड गोल असतें. हनुवटी उठून दिसली तरी शरीरशास्त्राच्या नियमाप्रमाणें असावयास पाहिजे त्याहून किंचित् लहानच वाटते. वस्त्रें अगदीं स्वाभाविक दाखवितात. त्याच्या निऱ्या; चुण्या, वगैरे फार कुशलतेनें खोदलेल्या असतात. वस्त्र अंगावर सहज पडल्यासारखें किंवा नेसल्याप्रमाणें वाटतें. दागिने असतात पण ते इतके कमी व योग्य ठिकाणीं कीं, ते खरोखरच शिल्पाची शोभा वाढविण्यास कारणीभूत होतात. मूर्तीच्या मुद्रा व आसनें हीं अगदीं सहज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतां घालतां येतील अशीं असतात; त्यांत वेढवपणा किंवा कठिणता आढळणार नाहीं. आयुधेंही अगदीं साधीं व निसर्गांत आढळतात तशींच खोदलेलीं असतात.

उलट जों जों अलीकडचीं शिल्पें पहावी तों तों डोक्यावर निरनिराळ्या प्रकारचे हिरेमाणकांनीं मढविलेले मुकूट आढळतील. डोळे खूप मोठे, वटबटीत व लांबच लांब असतात. चेहरा लांबट भासतो. नाकास धार आणलेली व शेंडा अणकुचीदार दाखवितात. ओठासही मधोमध कोन आणलेला असतो. हनुवटी अगदींच लहान व आंत वळलेली भासते. हात पाय इत्यादि अवयव लष्ठ दाखविले तरी त्यांत स्वाभाविक सौष्ठव आलेलें नसतें. छाती व पोट यांचा एकदम विभाग झालेला आढळतो. विशेषत: स्त्रियांचे स्तन व स्तनप्रदेश इतका उठावानें दाखवितात, पोट इतकें कृश कोरतात व जघनभाग पुन्हा इतका लष्ठ खोदतात कीं, त्यायोगें स्त्री सुंदर दिसण्याऐवजीं कुरूपच दिसते. सर्वांगावर बोजड दागिने इतक्या अजागळी पद्धतीनें घातलेले असतात कीं, ते घालण्याचा मुख्य हेतू जो सौंदर्यवर्धन तो मुळींच सिद्धीस जात नाहीं. अंगावर उत्तरीय बहुधा नसतें. अधरीयास मांड्यावर बऱ्याचशा चुण्या व पुढें घोटयापर्यंत लोंबणाऱ्या तिकोनी आकाराच्या निऱ्या दाखवितात. आयुधेंही दागिने, विस्तार व परिशेष यांनीं इतकीं कोंदाटलेलीं असतात कीं, त्यांचें खरें रूप चटकन ध्यानांतही येत नाहीं.

मुसलमानी अमलांत मूर्ती घडविणें मुहम्मदी धर्माविरुद्ध, येवढेंच नव्हे तर मूर्ति भग्न करणें हें धर्मविहित समजलें गेल्यानें त्या कालांत मूर्तिशिल्पास फार वाईट दिवस आले. अगोदरच शिल्पकलेचा ऱ्हास होत आला होता व मुहम्मदी अमलांत तीस आश्रय मिळण्याचा संभव नव्हता. यामुळें उत्तर हिंदुस्थानांत तरी ती मृतवत् झाली होती. दक्षिणेंत जीव धरून राहिली हें खरें. पण तिचा उत्कर्ष होण्याचा योग आला नाहीं. एवढेंच नव्हे तर तिचा चालू असलेला ऱ्हासही कोणी थांबवूं शकले नाहींत. इंग्रजी आमदानींत या कलेचें पुनरुज्जीवन होऊं पहात असलें तरी ती पाश्चात्य वळणावर जात आहे. तसें होणें बरें कीं वाईट हा अर्थात्च प्रश्न आहे. *

* या उपोद्घातांतील कांहीं भागास इइचा उपोद्घात हा एकच आधार आहे.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषयानुक्रमणिका

१ ब्रह्मा १–१४

प्रस्ताव १; ग्रंथिक वर्णनें ५; प्रत्यक्ष उदाहरणें ७.

२ विष्णु १४–८०

प्रस्ताव १४; **केशवादि चोवीस मूर्तिः** प्रस्ताव २३; त्यांचीं उदाहरणें २९; **अवतारः** प्रस्ताव ३३; ऋषभ ३५; कपिल–कल्कि ३६; कुमार–कृष्ण-दत्तात्रेय ३७; धन्वंतरी ३९; नरनारायण–नरसिंह ४१; नारद–परशुराम ४५; पृथु ४६; बलराम ४७; बुद्ध ४८; मत्स्यकूर्म ४९; मोहिनी–यज्ञ किंवा सुयज्ञ–राम ५०; वरदराज ५१; वराह ५२; वामन–त्रिविक्रम ५४; विठ्ठल ५७; व्यंकटेश–व्यास ५८; हयग्रीव ५९; हंस ६०; **संकीर्ण मूर्तिः** प्रस्ताव ६०; चतुर्मुख–विष्णु ६१; जलशायी ६६; धर्म–योगीश्वर ६९; लक्ष्मी नारायण ७०; वासुदेवपंचकः वासुदेव ७०; संकर्षण ७१; प्रद्युम्न–अनिरुद्ध ७२; सांब ७३; साधारण विष्णु ७३; यानकादि प्रकार ७८.

३ शिव ८१–१३४

प्रस्ताव ८१; लिंगे ८८; लिंगोद्भव ९२; **सामान्य मूर्तीः** चंद्रशेखर ९३; साधारण शिव ९६; सुखासन ९८; सोमास्कंद १००; **विशेष मूर्तीः** अनुग्रहमूर्ति १०१; अन्धकारसुरमर्दन १०३; अर्धनारीश्वर १०४; कंकाल-मूर्ति १०७; कल्याणसुन्दर १०८; गंगाधर ११०; गजासुरमर्दन १११; त्रिपुरान्तक ११२, दक्षिणामूर्ति ११३; नटराज ११५; पंचब्रह्म ११७; भिक्षाटन १२०; भैरव १२१; महाकाल–महेश्वर १२४; रुद्र १२६; लकुलीश १२७; वीरभद्र १२९; वृषवाहन–शरभ १३०; सदाशिव व महासदाशिव १३१; हरिहर १३२.

४ सूर्य आणि ग्रह १३४–१४७

प्रस्ताव १३४; ग्रंथिक वर्णनें १४०; उदाहरणें १४३.

५ स्कंद १४७–१५४

प्रस्ताव १४७; ग्रंथिक वर्णनें १४८; उदाहरणें १५३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६ गणेश १५४–१६६

प्रस्ताव १५४; ग्रंथिक वर्णनें १५९; उदाहरणें १६१.

७ जोड देव १६७–१६९

प्रस्ताव १६७; त्रिमूर्ति १६७; कृष्णकार्त्तिकेय–चंद्रार्कपितामह–ब्रह्मेशान जनार्दनार्क १६८.

८ देवी १६९–१८५

प्रस्ताव १६९; पार्वती १७१; भू १७३; महालक्ष्मी १७४; महिषमर्दिनीः प्रस्ताव १७५; दुर्गा १७६; महिषमर्दिनी १७९; श्री व लक्ष्मी १८०; सरस्वती १८३.

९ माता १८५–१९१

प्रस्ताव १८५; ग्रंथिक वर्णनें १८७; उदाहरणें १९०.

१० दिक्पाल १९१–१९९

प्रस्ताव १९१; ग्रंथिक वर्णनें १९४; उदाहरणें १९८.

११ चोवीस तीर्थंकर २००–२०७

प्रस्ताव २००; ग्रंथिक वर्णनें २०१; उदाहरणें २०५.

१२ आसनें, मुद्रा, आयुधें, अलंकार, इत्यादि २०८–१२

आसनें २०८; मुद्रा २०९; आयुधें, अलंकार इत्यादि २११.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रसूचि

१ ऐहोळी–विजापूर, ब्रह्मा
२ ऐहोळी–विजापूर, ब्रह्मा
३ डंबळ–धारवाड, ब्रह्मा
४ जिअनगर–बोग्रा, ब्रह्मा
५ चंदेरी–ग्वालेर, ब्रह्मा-शिव–वराह
६ पागन–ब्रह्मदेश, ब्रह्मा
७ इंडियन म्यूझियम–कलकत्ता, दशावतार
८ भा. इ. सं. मंडळ–पुणें, धन्वंतरी
९ सरीशदाह–२४ परगणा, नरसिंह
१० मनोरा–मध्यभारत, नरसिंह
११ तुमैन–ग्वालेर, बलराम
१२ घेंजन–गया, बुद्ध
१३ नालंदा–बहार, बुद्ध
१४ बज्रजोगिनी-डाक्का, मत्स्यावतार
१५ ग्वालेर किल्ला, कूर्मावतार
१६ जोड देऊळ–बंगाल, त्रिविक्रम
१७ अवंतिपूर–काश्मीर, विष्णु–चतुर्मुख
१८ अवंतिपूर–काश्मीर, विष्णु–चतुर्मुख
१९ कैथळ–कर्नाळ, विष्णु-चतुर्मुख
२० रंगपूर–बंगाल, विष्णु-चतुर्मुख
२१ ऐहोळी–विजापूर, जलशायी
२२ ऐहोळी–विजापूर, अनंतासन
२३ मथुरा-म्यूझियम, योगीश्वर विष्णु
२४ नालंदा–बहार, विष्णु
२५ रंगपूर–बंगाल, विष्णु
२६ साभर-डाक्का, विष्णु
२७ रायनल्लूर–तंजावर, श्रीनिवास
२८ दिनाजपूर-बंगाल, विष्णु–श्री–सरस्वती
२९ मोहेंजोदडो-सिंध, लिंगें व योनी
३० मोहेंजोदडो–सिंध योगीश्वर शिव
३१ उनकोटी-बंगाल, चतुर्मुख लिंग
३२ खोह–नागोद (मध्य भारत) एकमुख लिंग
३३ जावा, चतुर्मुख लिंग-ब्रह्मा
३४ जावा, चतुर्मुख लिंग-विष्णु
३५ जावा, चतुर्मुख लिंग-शिव
३६ जावा, चतुर्मुख लिंग-सूर्य
३७ लाखामंडल–देहरादून, आलिंगन वीणाधर शिव
३८ बदामी-विजापूर, उमामहेश्वर
३९ महाबलिपुरम्–चिंगलपुट, सोमास्कंद
४० गोकाक–बेळगांव, महेश्वर
४१ बिकानेर, उमामहेश्वर
४२ शाहपूर–राजशाही, सदाशिव
४३ गया, कल्याणसुंदर शिव
४४ राजशाही, कल्याणसुंदर शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४५ बहार, हरिहर
४६ वैथीश्वरन कोविल-तंजावर, गंगाधर
४७ राजगृह-पाटणा, शिव
४८ धारासुरम्-तंजावर, अर्धनारीश्वर
४९ तिरुवेंगोडु–तंजावर, भिक्षाटन शिव
५० काशीपूर–बकरगंज, तांडव शिव
५१ मद्रास, तांडव शिव
५२ तिरुपनन्थल-तंजावर, ऊर्ध्व–तांडव शिव
५३ खिचिंग–ओडिसा, भैरव
५४ खिचिंग ओडिसा, रुद्र
५५ भुमरा–मध्यभारत, सूर्य
५६ हांसी–हिसार, सूर्य
५७ कोनारक–पुरी, सूर्य
५८ जोरा–बोग्रा, सूर्य
५९ डाक्का, सूर्य
६० चिदंबरम्–दक्षिण अर्काट, सूर्य
६१ रणोद–ग्वालेर, कार्त्तिकेय
६२ परशलूर–तंजावर, कार्त्तिकेय
६३ मद्रास म्यूझियम, कार्त्तिकेय
६४ मद्रास म्यूझियम, गणपति
६५ ग्वालेर–संस्थान, नृत्य गणपति
६६ नेपाळ, हेरंब
६७ तुन-ह्यु-आंग-चीन, गणपति
६८ एन्देर-चिनी तुर्कस्थान, गणपति
६९ पागन–ब्रह्मदेश, गणेश व गवांपति
७० पेशावर म्यूझियम, त्रिमूर्ति
७१ बदामी–विजापूर, महिषमर्दिनी
७२ भुमरा-मध्यभारत, महिषमर्दिनी
७३ रे म्यूझियम–पुणें, पार्वती
७४ महास्थान–बोग्रा, चंडी
७५ महाबलिपुरम्–चिंगलपुट, श्री
७६ हावेरी–धारवाड, सप्तमाता
७७ मद्रास म्यूझियम, माहेश्वरी
७८ जाजपूर–कटक, वाराही
७९ जाजपूर–कटक, इंद्राणी
८० जाजपूर–कटक, चामुंडा
८१ गंजिगट्टि–धारवाड, अष्ट दिक्पाल
८२ राजगृह–पाटणा, ऋषभनाथ
८३ राजगृह–पाटणा, ऋषभनाथ
८४ राजगृह–पाटणा, नेमिनाथ
८५ अनकाई–नाशिक, तीर्थंकर
८६ खंडगिरी–पुरी, बाराभुजी
८७ देऊळभिडा–बांकुरा, पार्श्वनाथ
८८ मथुरा म्यूझियम, चतुर्मुख जिन
८९ पागन–ब्रह्मदेश, बुद्ध
९० नालंदा–बिहार, त्रैलोक्यविजय
९१ विक्रमपूर–डाक्का, पर्णशबरी
९२ कोनारक–पुरी, गंगा
९३ मुद्रा व मुकुट
९४ अलंकार व आयुधें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संदर्भ ग्रंथ

अचि: अभिलषितार्थचिंतामणि; म्हैसूर युनिव्हर्सिटी; ओरिएंटल लायब्ररी पब्लिकेशन्स, संस्कृत सीरीज क्र. ६९; भाग १; म्हैसूर; इ. १९२६. यांतील बहुतेक वर्णनें शिल्परत्नांत जशींच्या तशीं घेतलीं आहेत.

अॅचंस्टे, अॅ. चं. स्टे: अँटिक्विटीज ऑफ दि चंबा स्टेट.

अपु: अग्निपुराण; आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावली क्रमांक ४१; पुणें; इ. १९००.

अभे: अंशुमद्भेदागम; आनन्दाश्रम संस्कृत ग्रंथावली क्रमांक ९५; काश्यपशिल्पम् म्हणजेच अंशुमद्भेदागम. मी कांहीं ठिकाणीं इहिइमधील उतारे उपयोगांत आणिले आहेत. यांतील निदान शंकराच्या विविध-रूपांचीं वर्णनें शिल्परत्नांत जशींच्या तशीं घेतलीं आहेत.

आगम: या पुस्तकांत उत्तरकामिकागम, पूर्वकारणागम, वैखानसागम, सुप्रभेदागम इत्यादि आगम ग्रंथांचा उपयोग केला आहे. मला हे ग्रंथ छापील किंवा हस्तलिखित रूपांत पुण्यांतील कोणत्याहि संस्थेंत पहावयास मिळाले नाहींत; तेव्हां या ग्रंथांचे बाबतींत मी सर्वस्वी कै.टी.ए. गोपिनाथ-राव यांनीं आपल्या 'इलेमेंट्स् ऑफ हिंदू इकोनोग्रफी' या ग्रंथांत उतारे दिले आहेत त्यांवर अवलंबून राहिलों आहे. याशिवाय मंत्रमहार्णव, मंत्रमहोदधि, मंत्ररत्नाकर, क्रियाक्रमोद्योत या ग्रंथांतील म्हणून माहिती दिली आहे तीही वरील ग्रंथांतूनच घेतली आहे.

आपु: आदित्यपुराण; इहिइ व चचि यांमधील उतारे.

आसे एसियातिका: व्हॉ. ४= Les Sculptures Chames au Muse'e de Tourane; व्हॉ. ८= L' art Javanais dans Les Muse'es de Hollande et de Java; व्हॉ. १२= Les Collections Arche'ologiques du Muse'e National de Bangkok; व्हॉ. १६= Les Collections Khmeres du Muse'e Albert Sarraut a Phnom Penh. हे ग्रंथ आंग्लेतर भाषेंत असल्यानें यांतील माहिती केवळ चित्रांवरून दिली आहे. चुका झाल्या असण्याचा संभव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसइऑरि : आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ॲन्युअल रिपोर्ट्स इ. १९०२-१९३५.

आसइवेस : प्रोग्रेस रिपोर्ट ऑफ दि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया वेस्टर्न सर्कल; पहिला आंकडा वर्षाचा व दुसरा पानाचा.

आसइबसऑरि, आसऑबर्मा: वरच्याप्रमाणें; पण बर्मा सर्कल.

इइ: इंडियन इमेजेस्; व्रिंदावन सी. भट्टाचार्यकृत; भाग १; थॅकर स्पिंक आणि कंपनी; कलकत्ता व सिमला; इ. १९२१.

इ. बु. ब्रॅ. स्क. डा. म्यू.: इकोनोग्रफी ऑफ बुद्धिस्ट ॲंड ब्रॅह्मॅनिकल स्कल्प्चर्स इन दि डाक्का म्यूझियम.

इहिइ : इलेमेंट्स् ऑफ हिंदू इकोनोग्रफी; टी. ए. गोपिनाथरावकृत; २ खंड; लॉ प्रिंटिंग हाउस मद्रास; इ. १९१४ व १९१६. या ग्रंथांतील सुमारें १५० उतारे चतुर्वर्गचिंतामणि व श्रीतत्त्वनिधि यांतून घेतल्याचें उघड दिसतें. पण त्यांचा योग्य असा निर्देश न केल्यामुळें श्री. गोपिनाथराव यांनीं ५।५० तंत्रशिल्पग्रंथ स्वतः पाहिल्याचा भास उत्पन्न झाला आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

ईइस्कूमिस्क: ईस्टर्न इंडियन स्कूल ऑफ मिडीव्हल स्कल्प्चर्स; रा. दा. बानर्जीकृत; इ. १९३३

उका: उत्तरकारणागम; आगम पहा.

उकामि : उत्तरकामिकागम; आगम पहा.

ए. मा., एशि. माय. एशियाटिक मायथॉलॉजी; आक्यां व इतर कृत.

एमोबिओ : एन्शंट मोन्युमेंट्स् ऑफ बिहार ॲंड ओरिसा.

केबीजीकडब्ल्यूजेबी ((KBGKWJB) Koninklijk Bataviaasch Genootschap Van Kunsten En Wetenschappen, Jaarboek.

क्रिया : क्रियाक्रमोद्योत; आगम पहा.

चाचि : चतुर्वर्गचिंतामणि; हेमाद्रिकृत; बिब्लिओथिका इंडिका सीरीज व्हॉ. १, दानखंड, इ. १८७३; व्हॉ. २ पार्ट १, व्रतखंड, इ. १८७८. पहिला आंकडा व्हॉल्यूमचा व दुसरा पानाचा. या दोन खंडांत मूर्तींचीं शेकडों वर्णनें आलीं आहेत. मी तीं सर्वच उपयोगांत आणूं शकलों नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चाआ : चालुक्यन आर्किटेक्चर; आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, इंपीरियल सीरीज, व्हॉल्यूम ४२, इ. १९२४.

जेआरएएस् (JRAS) जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी.

देपु : देवीपुराण.

धासि : धर्मसिंधु; यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित प्रकाशित; पुणें; इ. १९११.

निसि : निर्णयसिंधु; सुंदरमल्ल संतुराम प्रकाशित; मुंबई; इ. १८९२.

पपु : पद्मपुराण; आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावली, दुसरा भाग; पुणें; इ. १८९४.

पूका : पूर्वकारणागम; आगम पहा.

बीईएफईओ (BEFEO) : Bulletin de l'Ecole Francaise d'Extreme Orient.

बुइ : दि इंडियन बुद्धिस्ट इकोनोग्रफी; विनयतोष भट्टाचार्यकृत; ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस; इ. १९२४.

बृसः बृहत्संहिता; वराहमिहिरकृत; जगन्मित्र प्रेस रत्नागिरी; इ. १८७४.

ब्रगॉव : ब्रॅहमॅनिकल गॉड्स ऑफ बर्मा; युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता; इ. १९३२.

भाइसंमंत्रै : भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक; वर्ष व पृष्ठ.

मपु : मत्स्यपुराण; आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावली क्र. ५४; पुणें; इ. १९०७. यांतील व अचिमधील बहुतेक वर्णनें तत्त्वतः एक असल्यानें अचिनें उसनवारी केली असें वाटतें.

ममहा : मंत्रमहार्णव; आगम पहा.

ममहो : मंत्रमहोदधि; आगम पहा.

मर : मंत्ररत्नाकर; आगम पहा.

मापु : मार्कंडेयपुराण.

मासा : मानसार; प्रो. प्रसन्नकुमार आचार्य यांनीं प्रसिद्ध केलेलें इंग्रजी भाषांतर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिटेडे : मिडीव्हल टेंपल्स ऑफ दि डेक्कन; आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, इंपीरिअल सीरीज, व्हॉल्यूम ४८; इ. १९३१.

मेऑसइ : मेमॉइर्स ऑफ दि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया क्र. १–४७.

मेतः मेरुतंत्र; इइ, इहिइ व श्रीनि या पुस्तकांत आलेले उतारे.

रूपाः रूपावतार; **रूमः** रूपमंडन; भारत इतिहास संशोधक मंडळांत असलेलीं हस्तलिखितें; चंद्रचूड व कळमकर संग्रह. यांतील अनेक वर्णनें चचि (विशा), अचि, मपु, विध, अभिधानचिंतामणि वगैरे ग्रंथांतून घेतलेलीं दिसतात. हीं दोन्ही कलकत्ता संस्कृत सीरीजमधें क्र. १२ या पुस्तकांत आलीं असून मी त्या पुस्तकांचाही उपयोग केला आहे. हस्त लिखितांत कांहीं चांगलीं पाठांतरें व थोडेसे जास्त श्लोक आहेत.

वरीसोम्यूकः राजशाही येथील वरेन्द्र रीसर्च सोसायटीच्या म्यूझियम-मधील पुराणावशेषांचा कॅटलॉग; इ. १९१९.

विधः विष्णुधर्मोत्तर; व्यंकटेश्वर प्रेस, मुंबई; आणि स्टेला क्रॅमरिश कृत इंग्रजी भाषांतर; कलकत्ता युनिव्हर्सिटी प्रेस; इ. १९२८. इहिइ-मध्यें **विध**चे म्हणून दिलेले बहुतेक उतारे चचिमधून घेतलेले दिसतात.

विशाः विश्वकर्मशास्त्र; चचिमध्यें दिलेले या ग्रंथांतील उतारेच मी प्रमाण धरले आहेत. मूळ ग्रंथ मला पहावयास मिळाला नाहीं. इहिइमध्यें विशाचे म्हणून दिलेले सर्व उतारे चचिमधूनच घेतलेले दिसतात.

वृहास्मृः वृद्धहारीतस्मृति; आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावली, क्र. ४८, स्मृतीनां समुच्चयः; पुणें; इ. १९२९.

शातिः शारदातिलक; काशी संस्कृत सीरीज क्र. १०७; इ. १९३४. याचा मी मनसोक्त उपयोग करूं शकलों नाहीं. फार उशीरा हातीं आला.

शिरः शिल्परत्न; त्रिवंद्रम् संस्कृत सीरीज, क्र. ९८, भाग २ रा, त्रिवंद्रम्; इ. १९२९; यांतील कित्येक वर्णनें अभे व अचि यांमधून घेतलीं आहेत.

श्रीनिः श्रीतत्त्वनिधि; वेंकटेश्वर प्रेस, मुंबई; शक १८२३. कै. टी. ए. गोपिनाथराव यांनीं इहिइमध्यें कित्येक निरनिराळ्या ग्रंथांतील म्हणून दिलेले उतारे वस्तुतः या एकाच ग्रंथामधून घेतले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीप्रम्यूकॅ : श्रीनगर (काश्मीर) येथील प्रतापसिंघ म्यूझियमचा कॅटलॉग.

ससू : समरांगणसूत्रधार; गायकवाड ओरिएंटल सीरीज, क्र. ३२, खंड दोन; बडोदें; इ. १९२५.

साइइगॉगॉ : साउथ इंडियन इमेजेस ऑफ गॉडस् ॲड गॉडेसेस.

सुभे : सुप्रभेदागम; आगम पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

भा. इ. सं. मंडळ

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(पुरस्करण)

आमच्या भा. इ. सं. मंडळांतील संरक्षक रा. ग. ह. खरे यांचा व्यासंग बहुविध आहे. त्यांच्या व्यासंगाला शक्य तितकें प्रोत्साहन मंडळाकडून मिळतें. परंतु मंडळाचें आर्थिक सामर्थ्य मर्यादित असल्यामुळें आणि व्यासंग हा बहुभक्षक असल्यामुळें रा. खरे यांनीं रचिलेलें 'मूर्तिविज्ञान' आमची व त्यांची उभयतांची इच्छा असतांहि स्वीय ग्रंथमालेंत समाविष्ट करतां आलें नाहीं. पुढें रा. खरे यांनीं आर्थिक साहाय्यासाठीं बाहेर प्रयत्न केला आणि निराश न होतां आपला संकल्प पूर्ण केला हें त्यांस खरोखर भूषणावह आहे. 'मंडळांतील नाणीं' या विषयावरील पुस्तक रा. खरे यांचेंच आहे. तें पुस्तक किंवा रा. खरे यांचें 'मध्ययुगीन इतिहासाच्या साधनांचे खंड' इत्यादि जें शोधसाहित्य मंडळाचें द्वारां प्रकाशित झालें व प्रतिदिनीं होत आहे त्यावरून रा. खरे यांचा बहुविध अभ्यास सर्वांच्या परिचयाचा झालेला आहे. नाणीं, ताम्रपट, शिलालेख तसेंच फर्मानें व कागदपत्र इत्यादिकांचें वाचन रा. खरे आज कित्येक वर्षें करीत आहेत. त्यांचा मूर्तिशास्त्राचाहि व्यासंग चालू असतो; आणि मंडळांत तीहि एक शाखा अल्प प्रमाणावर त्यांच्या प्रयत्नांनीं चालू झाली आहे. रा. खरे यांचे परिश्रम व विद्याव्यासंग सर्वथा उत्तेजनार्ह आहेत. हिंदुस्थान सरकारच्या पुराणवस्तु–संशोधन खात्याचे संचालक आणि भा. इ. सं. मंडळाचे एक आजीव सदस्य राव. ब. काशीनाथपंत दीक्षित हे मूर्तिशास्त्राचे तज्ज्ञच आहेत. त्यांनीं रा. खरे यांच्या ग्रंथाचें स्वागत केलें आणि पुरस्कार केला तेव्हां या ग्रंथाची योग्यता आणखी वर्णिली पाहिजे असें नाहीं. या ग्रंथांत ९४ उत्तम प्रतिमा मुद्रित केल्यानें ग्रंथाचें महत्त्व निःसंशय वाढलें आहे. आमचीं प्राचीन देवळें आणि त्यांतील शेंकडोशें मूर्ति आम्ही भक्ति भावानें पहात असतों. पण डोळस अशा शास्त्रीय दृष्टीनें त्यांचें अवलोकन करण्याची पात्रता आमच्या डोळ्यांत असतेच कोठें ? रा. खरे यांचा ग्रंथ या कामीं अत्यंत साहाय्यक होईल. य. चिं. ट्रस्ट व भा. इ. सं. मंडळ या उभय संस्थांनीं मिळून हा ग्रंथ पुरस्कृत केला आहे. प्रत्येक जिज्ञासूनें हा संग्रहीं ठेवण्यासारखा आहे.

चैत्र शुद्ध ११।१८६१ }

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऋण-स्मरण

(१) यशोदा-चिंतामणि ट्रस्टनें या पुस्तकाचे प्रकाशनासाठीं ३२५ रुपये दिले.

(२) श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं याच कार्यासाठीं २०० रुपये दिले.

(३) श्री० राव बहादुर काशिनाथ नारायण दीक्षित डायरेक्टर जनरल ऑफ आर्किऑलॉजी इन इंडिया यांनीं आपल्या खात्यांतील शंभरावर ब्लॉक उपयोग करण्यासाठीं विनामूल्य दिले. पैकीं क्र. १, २, ४, ५, ६, ७, ९-४५, ४७, ५०, ५१, ५३-५९, ६१, ६९-७२, ७४, ७५, ७८-८०, ८२-९२ मिळून ७४ ब्लॉक मी छापूं शकलों. क्र. ३, ४६, ४८, ४९, ५२, ६०, ६२, ६३, ७६, ७७, ८१ या चित्रांचे फोटो मूलतः रा० ब० दीक्षित यांच्या आर्किऑलॉजी खात्यामधील आहेत. ते छापण्यास त्यांनीं परवानगी दिली.

ग्रंथकर्ता या मदतीबद्दल उपर्युक्त सर्वांचा अतिशय ऋणी आहे.

शोध

१७ पृष्ठावर टीपेची रेघ २५ व्या ओळीखालीं पाहिजे.

७८ पृष्ठावर चौथ्या ओळीखालीं यानकादि प्रकार मथळा घाला.

१७६ पृष्ठावर शेवटच्या परिच्छेदावर दुर्गा मथळा घाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ ब्रह्मा

प्रस्ताव

ब्राह्मणी संस्कृतीच्या आजकालच्या स्वरूपांत ज्या सात देवतांना अतिशय महत्व आहे त्यांपैकीं ब्रह्मा ही एक आहे. यास ब्रह्मा, आत्मभू, स्वयंभू, हिरण्यगर्भ, पितामह, धाता, विधाता, स्रष्टा, विरिंचि, विश्वसृक्, विधाता, विधि, विश्वकर्मन्, प्रजापति, लोकेश, परमेष्ठी, सुरज्येष्ठ, अब्जयोनी, कमलासन, चतुरानन इत्यादि अनेक नांवें आहेत[1]. यांपैकीं ब्रह्मन् हें वास्तविक जगाचें आदिकरण आहे. पण तें अतर्क्य व कांहीं न उत्पन्न करतांच असतें. ब्रह्मा सर्व सृष्टीला उत्पादितो. म्हणून ब्रह्मन् शब्द पुल्लिंगी बनवून ब्रह्मयास लावला गेला. किंवा प्रथम पुल्लिंगी ब्रह्मा शब्द असून नंतर त्याच्या पलीकडची स्थिती दाखविण्यासाठीं ब्रह्मन् असा नपुंसकलिंगी शब्द बनविला गेला असेल. आत्म–स्वयंभू शब्द ब्रह्मयास कोणी उत्पन्न केलें नाहीं; तो आपोआप झाला असें दर्शवितात. हिरण्यगर्भ शब्द तो प्रथम हिरण्यरूप होता असें सांगतो. पितामहादि शब्द ब्रह्मयानें ही सर्व सृष्टी उत्पन्न केली, तिचा नियामकही तोच; अर्थात् तीमध्यें सर्वांत श्रेष्ठ तोच आहे हें स्पष्ट करतात. अब्जयोनी, कमलासन, व चतुरानन हे शब्द तो विष्णुनाभीपासून निघालेल्या कमलामध्यें उत्पन्न झाला व तेथेंच बसला असून त्यास चार तोंडें आहेत असें सांगतात. अर्थात् येथें त्यास गौणत्व दिलेलें आढळतें.

ब्रह्मदेवाच्या कल्पनेंत श्रुतिस्मृतिपुराणादि ग्रंथांची रचना होत असतां बदल कसा होत गेला हें पाहणें मनोरंजक आहे. वैदिक वाङ्मयांत सृष्टिकर्त्या देवतांना ब्रह्मा हें नांव नव्हतें; येवढेंच नव्हे तर त्या देवताही निरनिराळ्या होत्या असें दिसतें. पण त्या सर्वांचे गुण जवळजवळ एकसारखेच असल्यामुळें पुढें त्या सर्व कल्पनांचें एकीकरण करण्यांत आलें. हें एकीकरण कसें झालें तें समजून येण्यासाठीं त्या देवतांचे थोडक्यांत वर्णन येथें देतों.

---

१ अमरकोश १ स्वर्वर्ग १६; ३ नानार्थवर्ग ५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्वकर्मन् व प्रजापति : ऋग्वेदांत विश्वकर्म्याचीं दोन सूक्तें आहेत. विश्वकर्मन् हा शब्द विशेषणत्वानेंहि उपयोजिला आहे. उ. वाजसनेयि संहितेंत प्रजापतीला विश्वकर्मन् हें विशेषण लावलें आहे. तो सर्वसाक्षी आहे. त्याला हात, पाय, डोळे, मुख इ. अवयव चारी बाजूंना आहेत. हेंच पुराणांतील चतुर्मुख ब्रह्म्याचें कदाचित् मूल स्वरूप असावें. त्याला पंखहि आहेत. वाचस्पति हें एक त्याचें विशेषण आहे. मूलतः विश्वकर्मन् हें सूर्य देवतेचें विशेषण असावें. सूर्य कांहीं अंशीं सृष्ट्युत्पादक असल्यानें त्यास हें विशेषण लावणें योग्यच आहे. ब्राह्मणग्रंथांत विश्वकर्मन् व प्रजापति हे एकच आहेत. ऋग्वेदांत प्रजापतीचें स्वतंत्र सूक्त नाहीं. कांहीं ठिकाणीं प्रजापती हा शब्द इतर देवतांच्या विशेषणत्वानें आला आहे. परंतु कांहीं उल्लेखांवरून ती एक स्वतंत्र देवता असल्याचें दिसून येतें. संतति देण्याबद्दल इतर देवतांबरोबर प्रजापतीचें आवाहन केलें आहे. ऋग्वेदांतील एका सूक्ताचे शेवटच्या मंत्रांत प्रजापति हा शब्द आला आहे. हें सूक्त सृष्ट्युत्पत्तिविषयक आहे व प्रजापतीनें सर्व सृष्टि निर्माण केली असें तेथें सांगितलें आहे; यामुळें सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवालाही प्रजापति हें नांव मिळालें असावें. पण या ठिकाणीं प्रजापति ईश्वर होय. त्या सूक्ताच्या इतर सर्व मंत्रांत ईश्वराची कल्पना व्यक्त करण्याकरितां 'क'—कोण हें प्रश्नार्थक सर्वनाम योजलें आहे. कस्मै देवाय हविषा विधेम ? आम्ही कोणत्या देवाला हवि अर्पण करावा ? असा प्रत्येक मंत्रांत प्रश्न विचारला आहे. प्रजापतीला, हें त्याचें उत्तर आहे. अर्थात् 'क' हें कांहीं ठिकाणीं प्रजापतीचें विशेषण म्हणून आलें आहे. यामुळें यजुर्वेदांत आणि वेदोत्तर वाङ्मयांत क हें प्रजापतीचें किंवा ब्रह्मदेवाचें पर्यायनाम बनलें असावें. सूत्रग्रंथांत प्रजापति आणि ब्रह्मा हे समानवाचक आहेत. मैत्रायणी संहितेंत प्रजापतीची एक कथा आली आहे. प्रजापतीच्या मनांत आपल्या कन्येविषयीं वासना उत्पन्न झाली. तिनें हरिणीचें रूप घेतल्याबरोबर हाही मृग झाला. यामुळें संतप्त होऊन रुद्रानें त्याच्यावर बाण रोखला. त्यावेळीं, 'तूं मला मारणार नसशील तर मी तुला पशूंचा राजा करीन' असें प्रजापतीनें त्याला वचन दिलें. हीच कथा निरनिराळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लहानमोठे फरक होऊन ब्राह्मण ग्रंथांतूनही आली आहे'. ऋग्वेदाच्या दोन सूक्तांतील कांहीं मंत्र या कथेच्या मुळाशीं असावे असा तर्क आहे. ऋ. १०. १२१ या सूक्तांत **हिरण्यगर्भ** हा ईश्वरवाचक शब्द एकदां आला आहे. अथर्ववेदांत आणि ब्राह्मण ग्रंथांत तो शब्द अनेक वेळां आला आहे. तैत्तिरीय संहितेंत हिरण्यगर्भ आणि प्रजापति हे एकरूप दाखविले आहेत. वेदोत्तर वाङ्मयांत हिरण्यगर्भ हें ब्रह्म्याचें एक पर्यायनाम झालें.

पुराणांत ब्रह्म्यानें सर्व सृष्टि उत्पन्न केली असें सांगून त्यासाठीं प्रथम त्यानें प्रजापति उत्पन्न केले असल्याचें म्हटलें आहे. हे त्याचे मानसपुत्र होत. प्रजोत्पादन हा त्याचा मूळ हेतु असल्यामुळें त्यानें आपल्या सर्व पुत्रांना प्रजा निर्माण करावयास सांगितलें. म्हणून त्यांना प्रजापति म्हणतात. या प्रजापतींची संख्या व त्यांचीं नांवें भिन्नभिन्न पुराणांतून भिन्नभिन्न सांगितलीं आहेत. अशा रीतीनें ब्रह्मदेव हा सर्व पृथ्वीचा आजा झाल्यामुळें त्यास **पितामह** हें नांव मिळालें; ब्रह्मा शतरूपा, सावित्री ब्रह्माणी, सरस्वती इत्यादी नांवें असलेल्या आपल्या मुलीशीं रत झाला. हिचें सुंदर रूप पाहण्यासाठीं ब्रह्मदेवास चारी दिशांस चार आणि वर एक अशीं पांच तोंडें उत्पन्न झालीं. यास गायत्री नांवाची आणखी एक स्त्री होती, इत्यादी माहिती आली आहे. शैव व वैष्णव पंथीयांनीं आपल्या इष्ट देवतेचें सर्वश्रेष्ठ महत्त्व प्रतिपादण्यासाठीं यास गौणत्व देण्याचा प्रयत्न केला आहे. विष्णूला आदिकारण समजून त्याच्या नाभिकमलांतून ब्रह्मा उत्पन्न होणें किंवा शंकरानें कांहींना कांहीं कारणानें याचें पांचवें मस्तक तोडून टाकणें या गोष्टी अशा पैकींच होत.

सारांश, वैदिक विश्वकर्मा, प्रजापति, हिरण्यगर्भ व क आणि पौराणिक ब्रह्मा यांमध्यें (१) प्रथमच प्रजा उत्पन्न करणें (२) स्वतःच्या मुलीशीं रत होणें किंवा तिला स्वतःची बायको बनविणें (३) त्याचें सर्व बाजूंस पाहूं शकणें अथवा त्यास चार किंवा पांच बाजूंस तोंडें असणें इत्यादी बाबींत साम्य असल्यामुळें उपर्युक्त वैदिक देवता व पौराणिक ब्रह्मा हीं

---

१ उ. ऐतरेय ब्राह्मणांत प्रजापति आपल्या द्यौ व उषा या दोन कन्यांशी रत झाला असें सांगितलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकरूप होऊं शकतात व केलीं गेलीं.

अशा रीतीनें ब्रह्मा सृष्टिकर्ता असल्यामुळें त्यास मध्ययुगाच्या अंतापर्यंत फार महत्त्व होतें. मुसलमानांच्या प्रवेशानंतर हें महत्त्व कमी झालें असें दिसतें. पुराणांतील यानें लिंगाच्या आद्यंताचा शोध लागला म्हणून खोटेंच सांगितलें किंवा यज्ञदीक्षेच्या वेळीं त्याची बायको सावित्री ही लज्जेमुळें लव कर आली नाहीं म्हणून यानें रागावून गायत्री नांवाची दुसरीच एक स्त्री आणविली; यामुळें सावित्रीनें रागानें शाप दिला इत्यादि कथा हा अपूज्य कसा झाला तें सांगतात. पण या कथांची रचना झाल्यावर किती तरी काळ ब्रह्मा पूज्य होता. तेव्हां तो अपूज्य होण्याचीं हीं कारणें खरी नव्हत असें वाटतें.

आजकालच्या जमान्यांत याची कोणी पूजा करीत नसले किंवा त्याच्या नांवें देवळें बांधीत नसले तरी मुसलमानपूर्वकालीं तशी स्थिति नव्हती. तेव्हां इतर देवळांतून तर त्याची पूजा होईच. पण हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं खास त्याचीं म्हणूनही कित्येक देवळें होतीं. १५ व्या शतकांत रचलेल्या रूपमंडनांत त्याच्या परिवार देवतांचेंही वर्णन आहे. तेव्हां कदाचित् तोंपर्यंत ब्रह्मदेवाचें महत्त्व टिकून होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. खेडब्रह्म, ईदर, दुदाही, वसंतगढ, महाबलिपुरम् हीं त्यांपैकीं कांहीं स्थानें होत[1].

या देवळांत मुख्य मूर्ति अर्थात् ब्रह्मदेवाची असणार. गर्भगृहाच्या गणेशपट्टीवर—देऊळ ब्रह्मदेवाचें असल्यास—ब्रह्मदेव अथवा त्याचें वाहन हंस काढला असणें शक्य आहे. शिवाय गणेशपट्टीच्या वर जर ब्रह्मेशान जनार्दन शिल्पें असेल तर त्यांतही ब्रह्मदेव महत्त्वपरत्वें मध्यें किंवा बाजूस काढलेला आढळतो[2]. भिंतीच्या आंतील अथवा दर्शनी बाजूचे कोनाडे, खांब, कठडे, विश्रामस्थानांच्या टेकण्या यांवर इतर देवतांप्रमाणें ब्रह्माही उभा अथवा बैठा खोदलेला आढळेल.

ब्रह्मदेवाच्या जशा एकेकट्या मूर्ती आढळतात तसा तो संयुक्त मूर्तीतही आढळतो. उदाहरणार्थ त्रिमूर्ती अथवा ब्रह्मेशानजनार्दन आणि चतुर्मुख किंवा ब्रह्माविष्णुमहेशार्क या शिल्पांत त्याचा समावेश झालेला आहे. या

१ आसइअॅरि १९०६–७ पृ. १७४-७५. २ मूचि ५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्तींत त्यास इतरांच्या बरोबरीचें स्थान आहे. पण कित्येक विष्णु, शिव, व बुद्ध यांच्या शिल्पांत त्यास गौण स्थान दिलेलें आढळतें. उ. देव विष्णुला शरण जाऊं लागले म्हणजे ब्रह्मदेवास पुढें करतात किंवा शिवपार्वतीच्या लग्नांत ब्रह्मा पुरोहित बनतो. पण जेव्हां तो बुद्धाच्या संगतीनें येतो तेव्हां त्यास केवळ वैदिक देव म्हणूनच सेवकाचें काम देऊन गौणत्व आणिलेलें असतें.

ग्रंथिक वर्णनें.

ब्रह्मदेवासंबंधीं ग्रंथिक वर्णनें मला अग्निपुराण[1], अभिलाषितार्थ चिंतामणी[2], अंशुमद्भेदागम[3], आदित्यपुराण[3], पद्मपुराण[4], बृहत्संहिता[5], मत्स्य पुराण[6], मानसार[7], रूपमंडन[8], विष्णुधर्मोत्तर[9], शारदातिलक[10], शिल्परत्न,[11] समरांगणसूत्रधार[12], सुप्रभेदागम[3], इत्यादी ग्रंथांमध्यें आढळलीं असून त्यांचा सारांश येथें देण्याचा यत्न करतों.

अचि: पांढरा; हंस किंवा कमलावरील लांब दर्भासन; चार हात व त्यांत (१) वरमुद्रा (२) स्रुव (१) कमंडलु (२) स्रुव; चार तोंडें; पुढें चार वेदधारी; रत्नकुंडलें व कृष्णाजिन यांसह; पुढें तुपाचें भांडें; उजव्या बाजूस सरस्वती, डावीकडे सावित्री, भोवतीं ऋषि. अपु: रंग ?; हंस; हात ? पण त्यांत (१) अक्षमाला (२) स्रुक्, (१) कमंडलु (२) तुपाचें भांडें; लांब दाढी; उवा: सावित्री; डावा: सरस्वती. अभे:पिवळा; कमलावर बसलेला अथवा उभा; चार हात व त्यांत (१) अक्षमाला व दर्भ (२) स्रुक् व स्रुव, (१) कमंडलु व कुश (२) आज्यस्थाली व कुश; किंवा (२, ३) वरचे हात अभय व वरद मुद्रांचे आणि (१, ४)खालच्यापैकीं डावा मेढ्रमूलावर व उजवा त्याजवर; अगर याच दोन हातांत अनुक्रमें कमंडलु व अक्षमाला; उवा: सरस्वती; डावा: सावित्री; चार तोंडें; जटामुकुट, कृष्णाजिन, जानवें, करगोटा, पांढरें वस्त्र, कुंडलें

---

१ अ. ४९।१४. २ प्रकरण ३।१।७५४. ३ इहिइ २ खंड बी २४३. ४ पातालखंड अ. ७८।४३. ५ अ. ५८।४१. ६ अ. २६०।४०. ७ अ. ५१ पृ. ७१. ८ पा. १० आ. ९ अ. ४४।४; ४६।१; ६३।१; ७१।१२. १० पटल ३।६६. ११ अ. २५।३६,१२३. १२ अ. ७७।२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इत्यादींनी युक्त. **आपुः**विध २ प्रमाणें. **चाचिः** विधप्रमाणें. **पपुः** रंग व वाहन ?; हात? पण त्यांत (१) दंड (२) कमंडलु (३) माला (४)?; चार तोंडें. **बृसः** रंग ?; कमलासन; हात ? पण त्यांत (१) कमंडलु (२,३,४)?; चार तोंडें. **मपुः** शुभ्र; हंस किंवा कमलासन; चार हात व त्यांत (१) स्रुव (२) स्रुव, (१) कमंडलु (२) दंड; चार तोंडें; पांढरी वस्त्रें, मृगचर्म, जानवें; बाजूस तुपाचें भांडें व चार वेद; उबाः सरस्वती; डाबाः सावित्री. **मासाः** पिवळा; वाहन ?; चार हात व त्यांत वरद, अभय, कमंडलु, माला, स्रुक्, स्रुव, या वस्तु; चार तोंडें; जटामुकुट; बाजूस सरस्वती व सावित्री. **रूपा, रूमः** पुढें पहा. **विधः** [१] **ब्रह्माः** शुभ्र; बद्धपद्मासन; सात हंसांचा रथ; चार हात व त्यांत (१,४) योगमुद्रा, (२,३) अक्षमाला, कमंडलु; डोळे ध्यानामुळें मिटलेले; जटा, शुभ्राशुभ्र कृष्णाजिन; चार तोंडें. [२] **प्रजापतिः** पद्मासन; चतुर्मुख; डाव्या मांडीवर सुवर्णी, मालाधारी सावित्री.[३] **लोकपाल ब्रह्माः** हंस वाहन व चार तोंडें नसावीं; बाकी ब्रह्मदेवाप्रमाणें; चार हात व त्यांत (१) माला (२) पुस्तक (३) कमळ (४) कमंडलु; बरोबर चतुर्मुख सावित्री. [४] **विश्वकर्माः**दोन हात व त्यांत (१) संदंश (संदर्श) (२) ?. **विपुः** विध १ प्रमाणें. **शातिः** शुभ्र ?; हंस; चार हात व त्यांत कलश, अक्षमाला, वरद, अभयमुद्रा; शुभ्रवस्त्रें, किरीट. **शिरः** [१] अचिप्रमाणें. [२] पिवळा; वाहन ?; हात ? पण त्यांत (१) पलाशदंड (२) अक्षमाला (३) कमंडलु (४) कमळ; चार तोंडें; तांबुस जटा. **ससूः** तांबडा; वाहन?; हात ? पण त्यांत (१) अक्षसूत्र (२) वरमुद्रा ?, (१) दंड (२) कमंडलु; स्थूलांग; शुभ्र वस्त्रें व कृष्णाजिन यांनीं युक्त; चार तोंडें. **सुभेः** रंग व वाहन ?; चार हात व त्यांत (१) कमंडलु (२) अक्षमाला; चार तोंडें; तांबड्या जटा; डाबाः सावित्री.

विष्णूच्या चार हातांत शंखचक्रगदापद्म हीं चारच आयुधें भिन्न क्रमानें दिलीं असतां एका विष्णूच्या चोवीस मूर्ती होतात. तद्वत् ब्रह्मदेवाच्या चार हातांतील चार आयुधांच्या भिन्नभिन्न क्रमानें त्याचींही एकापेक्षां अधिक रूपें कल्पिलीं गेलीं होतीं कीं काय न कळे. विधमध्यें ब्रह्मा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रजापति, लोकपाल व विश्वकर्मा अशीं ब्रह्मदेवाचीं चार रूपें सांगितलीं असून रूपा व रूम यांत विश्वकर्मा, कमलासन, विरंचि अथवा पितामह आणि ब्रह्मा अशा चारांचीं केवळ आयुधभिन्नत्वामुळें होणारीं चार भिन्न रूपें वर्णिलीं आहेत तीं अशीं—

विश्वकर्मा=(१) अक्षसूत्र (२) पुस्तक (३) कमंडलु (४) स्रुक्.
कमलासन = (१) अक्षसूत्र (२) स्रुक् (३) पुस्तक (४) कमंडलु
पितामह = (१) अक्षसूत्र (२) पुस्तक (३) स्रुक् (४) कमंडलु.
ब्रह्मा = (१) पुस्तक (२) अक्षसूत्र (३) स्रुक् (४) कमंडलु.

अशा तऱ्हेनें चोवीस मूर्तीही बनूं शकतील; पण प्रत्यक्ष बनविल्याचीं उदाहरणें मात्र आढळांत नाहींत. या चार रूपांपैकीं विश्वकर्मा प्रकारास तीन डोळे व कपाळावर चंद्रकोर दाखविण्यास सांगितलें आहे.

प्रत्यक्ष उदाहरणें

मंगळवेढें येथील महादेवाच्या विहिरीच्या मधल्या टप्प्यावर व डाव्या बाजूस जणूं यासाठींच बांधलेल्या कमानीमध्यें ही मूर्ती आहे. ही सुमारें पांच फूट उंच व उभी असून हिच्या चार हातांत अनुक्रमें अक्षमाला, स्रुक्, वेद (नक्षीची पट्टी अर्थात पोथीची संरक्षक), कमंडलु या चार वस्तु आहेत. मूर्तींचीं तीन डोकीं दिसणारीं व चौथें लुप्त आहे. मधल्या तोंडास दाढी दाखविली आहे. मूर्तीच्या उजव्या अंगास सूक्ष्मरूपी स्त्री अर्थात सावित्री खोदली असून तिजजवळ सव्यमुख हंस आहे. डाव्या अंगास खुजा पुरुष किंवा गण खोदला आहे. हातांतील आयुधें, दाढी व हंस या लक्षणांवरून प्रस्तुत मूर्ति ब्रह्मदेवाची असल्याविषयीं शंका राहात नाहीं[1]. मद्रास म्यूझियममधील मूर्ती उभी असून तिच्या सर्व तोंडांना दाढी आहे आणि हातांत अनुक्रमें अक्षमाला, स्रुव, पाश व कमंडलु या वस्तु आहेत[2]. कुंभकोणम् व तिरुवोरियूर येथील मूर्तीच्या तोंडांस दाढी नसून हात अभयमुद्रा, अक्षमाला, कमंडलु, कट्यवलंबित अशा तऱ्हेचे आहेत[3]. ऐहोळे (कोंटगुडि) येथील दोन ब्रह्मदेव मूर्तींपैकीं एक कम-

१ माझा मंगळवेढ्याचा प्रवास—मराठा ता. ८।३।३६. २ इहिइ खंड २ प्र. १४३।२. ३ कित्ता प्र. १४७।१ व १४३।१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लावर ललितासन घालून बसलेली, दाढीविरहित व तीन हातांत अक्षमाला, पाश, कमंडलू या वस्तू घेतलेली आणि चौथा हात अभयमुद्रेचा असलेली आहे. तिच्या उजव्या बाजूस हंस अंशतः दिसत आहे. दुसरी मूर्ती कमलस्थ हंसावर दोन्हीकडे पाय सोडून बसलेली असून तिच्या चार हातांत अनुक्रमें अक्षमाला, कमल, कूर्च, कमंडलु या वस्तू आहेत[1]. सोपारा (ठाणें) येथील ब्रह्मदेवाची मूर्ती उभी असून तिची तीन तोंडें दिसणारीं व एक लुप्त आहे. पैकीं मधल्या तोंडास दाढी आहे. हिच्या चार हातांत अनुक्रमें अक्षमाला, चौकोनी पळी, स्रुक्, पोथी आणि कमंडलु अशा चार वस्तु आहेत. हिच्या उजव्या अंगास एक स्त्री व एक पुरूष असून डाव्या अंगास हंस व स्त्री अशा दोन आकृति आहेत. पैकीं दोन स्त्रिया म्हणजे सरस्वती व सावित्री या असाव्या[2]. श्री. गोपिनाथराव यांनीं आपल्या पुस्तकांत, आर्किऑलॉजीच्या वेस्टर्न सर्कलच्या खात्यास मिळालेल्या एका मनोरंजक मूर्तीचें वर्णन व चित्र दिलें आहे. ही मूर्ती उभी, तीन तोंडें दृश्य असलेली, जटाधारी पण दोन हातांची अशी आहे. हिचा उजवा हात नमस्कारमुद्रेचा असून डाव्या हाताचा तळ प्रेक्षकांकडे करून मधल्या बोटाशिवाय बाकीचीं बोटें मिटवून घेतलीं आहेत[3]. अंबरनाथ येथील ब्रह्मदेवाची मूर्ती ललितासनी, नलिकामुकुटी व चार हाती असून त्यांत अनुक्रमें अभयहस्तासह माला, स्रुक्, पुस्तक, आलिंगन अशा वस्तू व मुद्रा आहेत. याच्या मधल्या तोंडास दाढी आहे आणि डाव्या मांडीवर सावित्री बसली आहे[4]. पण मी स्वतः अंबरनाथ येथें गेलों असतां मला तेथें मंडपामधील नैऋत्येच्या खांबावर पश्चिमाभिमुख जी ब्रह्मदेव मूर्ती आढळली ती वरच्यापेक्षां मनोरंजक आहे. ही उभी व हिच्या चार हातांपैकीं फक्त एक हात शाबूत असून त्यांत पळी स्पष्ट दिसत आहे. पण तोंड एकच व त्यास दाढी दाखविली आहे. पळी व दाढी या

---

१ चाआ प्र. १७।३; २१।२; मूचि १, २. २ इहिइ खंड २ प्र. १४५, ३ इहिइ खंड २ प्र. १४८; हीमूर्ती सध्या कराची म्युझियममध्यें आहे. ४ मिटिडे प्र. ६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मा

ऐहोळे– विजापूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मा

ऐहोळे– विजापूर

२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लक्षणांवरून मूर्ति ब्रह्मदेवाची आहे याविषयीं शंका रहात नाहीं. अवंतिपूर येथें सांपडलेली ब्रह्मदेवाची मूर्ती उभी, एकमुखी, त्रिभंग, दाढीमिशा असलेली व दोन हातांची अशी आहे. पैकीं उजवा हात उचलून व डोक्यापाशीं नेऊन उताणा केला आहे आणि डावा हात पसरलेला आहे. हीस मुकुट, हार, मेखला, उदरबंध वगैरे अलंकार आहेत[1]. साई (चंबा) येथील झऱ्यावर असलेल्या शिलापट्टावरील ब्रह्मदेवाची मूर्ती उभी, एका तोंडाची, दाढी असलेली व हंसवाहिनी आहे. हिच्या खालीं लेखच असल्यामुळें ओळखीविषयी शंका राहात नाहीं[2]. सेवाडी (जोधपूर) येथील ब्रह्मदेवास माला आणि कमंडलु धारण करणारे दोनच हात आहेत. खेडब्रह्म येथील ब्रह्मदेवाच्या तीन मूर्तींच्या हातांत वस्तु सर्व सामान्य असल्या तरी त्यांचीं वाहनें मात्र नंदी, घोडा व विष्णू अशीं आहेत[3]. डंबळ येथील दोड्ड बसप्पा देवालयांतील ब्रह्मा उभा, मुकुटयुक्त पांच मस्तकांचा, दाढीविरहीत, अंगावर भरपूर दागिने असलेला आहे. याचे खालचे दोन हात बहुधा भग्न व वरच्या हातांत अनुक्रमें वज्र? व उत्पल या वस्तू आहेत. पायांपाशीं उजवीकडे कमलधारी भक्त व डाव्या अंगास सव्यावर्ति पण वाममुख हंस आहे. देवाच्या मागें प्रभावळ आहे. यास पांच मस्तकें आहेत हें याचें वैशिष्ट्य आहे[4]. पेड्डुमुडियम् येथील शिलापट्टावरील ब्रह्मदेवाचीं तीन तोंडें स्पष्ट व एक लुप्त आहे. तिन्ही डोक्यांस मिळून एकच मुकूट आहे. कोणत्याही तोंडास दाढी नाहीं. गळ्यांत जानवें आहे. हात दोनच असून ते मांडीस चिकटलेले आहेत. उजव्या हातांत पोथी सारखी कांहीं वस्तू असावीसें वाटतें. कमरेस धोतर असून त्याचा सोगा पुढें सुटलेला आहे[5]. आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या १९०६-०७ सालच्या रिपोर्टात ब्रह्मदेवाचीं कित्येक मनोरंजक उदाहरणें दिलीं आहेत त्यांपैकीं दोन येथें नमूद करतों. एक ब्रह्मा कमलावर बसलेला आहे. त्याचीं तीन तोंडें स्पष्ट व दाढीवालीं

१ आसइऑरि १९१३–१४ पृ. ४६ प्र. २७ ए. या मूर्तिविषयीं निश्चय नाहीं. २ ऑ. चं. स्टे. पृ. २३३ प्र. ३४ ए. ३ आसइऑरि १९०६–०७, पृ. १७४–७५. ४ चालुक्यन आर्किटेक्चर पृ. १०५ प्र. १३०, मूचि ३. ५ आसइऑरि १९०८–०९ पृ. ६७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. डोक्यास निरनिराळे पण एकमेकाशीं सांधलेले असे तीन पत्रमुकुट असून चार हातांपैकीं पहिला आशीर्वादमुद्रेचा असून बाकीच्या तिहींत अनुक्रमें पुस्तक, पुस्तक, कमंडलु या वस्तू आहेत[१]. थरपारकर जिल्ह्यांत मिळालेल्या ब्रह्मदेवाच्या मूर्तीस पूर्वी चार मस्तकें (सध्यां नव्हे) होतीं आणि पुस्तक व माला अथवा कमंडलु या वस्तू धारण करणारे दोन हात आहेत[२]. ओसिया येथील ब्रह्मा उभा, एकमुखी व श्मश्रुयुक्त आहे. त्याच्या चार हातांपैकीं वरच्या दोन हातांत अनुक्रमें माला व पुस्तक या वस्तू असून खालचे दोन्ही हात गणांच्या मस्तकांवर ठेविले आहेत[३]. जिअनगर (बोग्रा) येथील ब्रह्मा सव्य ललितासन घालून बसला असून त्याच्या चार हातांपैकीं पहिला तुटला आहे आणि बाकींच्या चार हातांत अनुक्रमें दुधारी पळी, दंड व कमंडलु या वस्तू आहेत. डोक्यास जटामुकुट व हनुवटीस दाढी दाखविली असून अंगावर कुंडलें, वस्त्र, जानवें, कडीं, तोडे, मेखला वगैरे अलंकार व वस्तू आहेत. दोन्ही बाजूस प्रत्येकी एक चतुर्मुख ब्रह्माणीची मूर्ती असून बैठकीवर मध्यभागीं हंस व बाजूस भक्त आहेत. हिची ढब, मुद्रा, घडण, विश्वपद्म, इत्यादींवरून ही १३ व्या शतकांतील असावी असें वाटतें[४].

मध्यआशियांतील संशोधनांत ब्रह्मदेवाचीं दोन नमूद करण्यासारखीं चित्रें आढळलीं आहेत. दोन्ही रेशमी वस्त्रावर काढलीं असून दोन्ही बौद्ध अवलोकितेश्वराच्या संगतीनें आलीं आहेत म्हणजे त्यांस गौण स्थान आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. एकास चौरस काळें शिरोवस्त्र असूनं नमूनेदार लांब पण अरुंद चिनी दाढीमिशा व कल्ले आहेत[५]. दुसऱ्या चित्रांत ब्रह्मदेवास लांब, पायघोळ व रुंद बाह्या असलेला अंगरखा, पांढरा आंतील सदरा (याची कॉलर गळ्यावर उभी), अशा तऱ्हेचा चिनी कचेरी पोषाख घातला आहे. त्याचें डोकें उघडेंच पण काळ्या केसांचे दोन झुबके वर असलेलें आहे. यांतच एक सोन्याचीफणी असून तीखालून निघालेल्या केसांच्या बटा आगवळांसह पाठीवर पडलेल्या आहेत. ब्रह्मदेवानें गुडघे टेकले असून त्याच्या हातांत शेंदरी कमळांचें तबक आहे[६].

---

१ पृ. १७१, आकृति १.२ पृ. १७३-७४. ३ आसइॲरि १९०८-०९, पृ. १०६. ४ आसइॲरि १९२५–२६ पृ. १५३ प्र. ६० मूचि४. ५ सेरिंदिया पृ. १०७६ ch, lvi, ००१४. ६ कित्ता पृ. १०७८ ch, lvi, ००१९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



३ डंबळ–धारवाड ब्रह्मा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



४ जिअनगर-बोग्रा ब्रह्मा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मदेशांतील रंगून व पागन म्यूझियममधील मूर्ति भिन्न कालाच्या पण एकाच नमुन्याच्या आहेत. प्रत्येकीस दाढीरहित तीन तोंडें (वस्तुतः चार), जटामुकुट व चार हात आहेत. दोहोंचेही दोन हात अंजलिमुद्रेचे आहेत[1]. पागन येथील नानपाया देवालयांत खांबावर काढलेली ब्रह्मदेव मूर्ती कमलावर अर्धपर्यंकासन घालून बसली असून तीस तीन तोंडें आहेत. तोंडांस दाढी नाही; पण डोक्यांवर तिघांना मिळून एकच जटामुकुट आहे. हात दोन असून त्यांत सनाल कमलें आहेत. खांद्यावर जानवें आहे. शरीर थिलथिलित दाखविलें आहे. ब्रह्मदेवाच्या भोवतीं सर्वत्र कमळाच्या वेलींचा विस्तार दाखविला आहे. ही मूर्ती बौद्ध देवालयांत सापडल्यानें तीस महत्व आहे[2]. याच गांवीं थनमझी देवळांत एक ब्रह्मदेवाचें चित्र आहे. यांत हा राक्षसमुखें असलेल्या आसनावर खुरमांडी घालून वामावर्ती बसला आहे. यास एकास एक लागून चार पाय, एकावर एक अशा दोन डोळ्यांच्या दोन जोड्या, एकास एक लागलेलीं दोन नाकें व दोन ? हात आहेत. भुवयांमध्यें उभ्या गंधाचा दुरेघी अवशेष आहे. डोक्यास भोवतालीं सहा पण छोटे आणि मध्यें एकच पण मोठा असे सात शंकू असलेला मुकुट आहे. प्रत्येक हातांत शंक्वाकृति फूल असून डोक्याभोवतीं प्रभावलय व केसांची वीरगुंठी आहे. पार्श्वभूमींत सर्वत्र वेलींचा विस्तार आहे. मूर्ती ब्राह्मणी पण कांबोडियन संस्कार झालेली आहे. हिचा काळ इ. स. १०५७ पूर्वीचा आहे हें मात्र निश्चित[3]. पागन येथील आनंद देवालयात चतुर्मुख व उभ्या अशा ब्रह्मदेवाचें एक शिल्प असून तेथें तो बुद्धाच्या डोक्यावर छत्री धरून उभा असल्याचें दाखविलें आहे[4]. येथें अर्थात् ब्रह्मदेवास बुद्धाचा छत्रधारी चाकर बनविलें आहे.

कोक ख्मुम् येथील ब्रह्मदेवाची मूर्ती साधी मांडी घालून बसलेली, एकमुखी, जटामुकुट व कुंडलें यांनीं युक्त असून तिच्या चार हातांपैकीं डाव्या खालच्या हातांत कोणती वस्तू आहे हें समजत नाहीं. उजवा

३ ब्रॅ. गॉ. व. पृ. ६५–६ आ. २८,२९.२ कित्ता पृ. ६६ आ. ३०; मूचि६; आसइॲरि १९०७–८ पृ. ३५ प्रप ९ ए. ३ आसऑवर्मा १९१७-१८परिच्छेद ६१ प्रप २; हिला ब्रह्मदेव कां म्हणावयाचें बरें ? ४ आसइॲरि १९१३–१४ पृ. ७९ प्र.३२ आ. १४ व १५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खालचा वरद मुद्रेचा आहे आणि उरलेल्या दोन हातांत माला व कमल या वस्तू आहेत[1]. नोम पेन येथील मूझियममध्यें असलेल्या उभ्या ब्रह्मदेवमूर्तीचें वैशिष्ट्य हें आहे कीं, ती सुटी खोदली असून तिची चार तोंडें चार दिशांस झालेलीं आहेत. तिचे हात व पाय हे मात्र विच्छिन्न आहेत[2]. तोरेन म्यूझियममधील ब्रह्मा उभा, सव्यगतिक, पण सन्मुख आहे. त्याचा डावा पाय पुढें व उजवा मागें आहे. त्याचीं तीन तोंडें व ८ हात सुव्यक्त आहेत. पैकीं ४, ५, ६, या हातांत कोणत्या वस्तू आहेत हें समजत नाहीं. सातवा विच्छिन्न आहे. पहिला जवळ असलेल्या भक्तानें घेतलेल्या भाड्यांत आहे. दुसऱ्या व तिसऱ्या हातांत बहुधा खड्ग व पाश या वस्तू आहेत. आठवा हात पालथा व छातीशीं लावला आहे. दोन्ही अंगास दोन मोरचेलधर व एक भक्त अशीं तीन मनुष्यें आहेत[3].

अंकोर थोम जवळच बँटे देई व कुटीश्वर अशीं दोन देवळें आहेत. त्यांच्या उत्तरेस सुमारें ६०० फुटावर ब्रह्मदेव व विष्णु यांच्या देवळांचे अवशेष सांपडले आहेत. त्यांत मिळालेली ब्रह्मदेवाची मूर्ती उभी असून तिला चार हात आहेत. हातांमध्यें कोणत्या वस्तू आहेत व तोंडें (बहुधा ४) किती आहेत हें जरी स्पष्ट नसलें तरी तिचा मुकुट पार्शी लोक एक उंच वाटोळी टोपी घालतात ती सारखा आहे हें विशेष आहे. ही मूर्ति नवव्या शतकांतील आहे[4].

जावा मधील एक ब्रह्मदेवाची मूर्ती बैठ्या, मानवदेही हंसावर आरूढ झाली असून तिचे पाय हंसाच्या हातावर ठेवल्याचें दाखविलें आहे. ब्रह्मदेवाचीं चार तोंडें चार दिशांस असून त्याच्या आठ हातांत प्रत्येकीं कांहींना कांहीं वस्तू आहे. सामान्यत: ब्रह्म्याच्या मूर्तीमागें दगडाची पाठ-संलग्न असल्यामुळें तिचें चौथें तोंड दिसत नाहीं. पण येथें मूर्ती सुटी असल्यानें तिचीं चारही तोंडें व आठ हात पृथक्पणें पाहतां येतात[5].

---

१ B E F E O खंड ३५ अंक १ पृ. १४९–५० प्रप २९. २ आर्स एसियातिका व्हा. १६ प्रप २४।२ कदाचित् प्रप २८।१. ३ कित्ता व्हॉ. ४ प्रप१७ क्र. ४५।१. ४ ॲन्युअल बिब्लिऑग्रफी ऑफ इंडियन आर्किऑलॉजी व्हॉ. ५ प्र. ४ सी. ५ आर्स एसियातिका व्हॉ. ८ प्रप ३।१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जावामधील दुसरी ब्रह्मदेव मूर्ती उभी असून तिची तीन तोंडें दिसत आहेत. सर्वांना जटामुकुट असून मधल्यास मिशा व दाढीही आहे. मूर्तीस चार हात आहेत पण ते सर्व भग्न झाले आहेत. निदान पुढचे भग्न झाले असून मागचे अस्पष्ट आहेत. यांच्या बाजूस बहुधा दोन स्त्री-मूर्ती होत्या, पण त्याही भग्न झाल्या आहेत. अंगांवर दोन कंठे, माला, जानवें, मेखला, अंगद, गुडघ्यापर्यंत लांब हार, श्रीवत्स, उपरणें, इत्यादि दागिने व वस्त्रें आहेत[1].

मूसी गुमे मध्यें ब्रह्मदेवाच्या मूर्ती आहेत त्यांपैकीं एक एकावर एक ठेवलेल्या पांच कमळांवर सव्य ललितासन घालून बसली असून तिला दाढी विरहित पांच तोंडें व दहा हात आहेत. पैकीं दोन हात भग्न आहेत, दोहोंत त्रिशूल व नाग या वस्तू आहेत आणि बाकीच्या सहा हातांतील वस्तू चित्रा-वरून स्पष्ट कळून येत नाहींत[2]. दुसरी मूर्ती वाममुखी व वाममुखी मोरा-वर बसली असून तिच्या दोन हातांत मिळून धनुष्य बाण आहेत. तिच्या मागें हातांत कांहीं अनोळखी वस्तू धारण करणारी एक उभी स्त्री आहे[3].

ब्रह्मदेवाची बौद्धधर्मांत कशी अवहेलना केली आहे हें एकदोन उदाहरणें देऊन येथें विशद करतों. 'प्रसन्नतारा' देवतेच्या वर्णनांत तिच्या एका हातांत ब्रह्मदेवाचें मस्तक असावें, ती डाव्या पायानें इंद्र, उजव्या पायानें उपेंद्र (विष्णु) आणि दोहोंमध्यें रुद्र व ब्रह्मा यांना तुडवीत असल्याचें दाखवावें म्हणून सांगितलें आहे. याच देवतांना मार म्हणून संबोधिलें असून ती यांचा नाश करतें असेंहीं विधान आहे[4]. दशभु-जसित मारीची व उभयवराहानन मारीची ह्या दोघीही त्यास तुडवीत अस-ल्याचें दाखवावें म्हणून सांगितलें असून उभयवराहानन मारीची व वज्र-सरस्वती यांच्या हातांत ब्रह्मदेवाचें मुंडकें द्यावें असेंही विधान आहे[5]. विद्युज्ज्वाला कराली चार मारांना (ब्रम्हा, विष्णू, शिव, इंद्र) तुडवीत

१ आसइऑरि १९२४–२५ पृ. १२५ प्रप ३६ सी. २ एशियाटिक मायथॉलॉजी–आक्याँ आणि इतर कृत पृ. १०१ आ. २. ३ सदर पृ. ११६ आ. ८. या आकृतीस वरील पुस्तकांत ब्रह्मा म्हणून संबोधिलें असलें तरी मला ती मूर्ती कामाची असावी असें वाटतें. ४ बुइ १३९ प्रप ३८ डी. ५ कित्ता ९९, ९८, १५२ प्रप ३१ बी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्याचें व एका हातांत ब्रह्मदेवाचें मुंडकें धरीत असल्याचें दाखवावें म्हणून साधनांत वर्णन आहे[1].

२ विष्णु

प्रस्ताव

देवतासप्तकांपैकीं विष्णू ही एक देवता आहे. शिवाखेरीज याच्या इतकें महत्व असलेली दुसरी देवता नाहीं. विष्णु यांत मूळ धातू विश् गतिमान् असणें हा आहे. वेदांतील त्याचें वर्णन या अर्थाला अनुरूप असेंच आहे. विष्णूच्या चोवीस प्रसिद्ध नांवांशिवाय त्यास वैकुंठ, स्वभू, दैत्यारि, पुंडरीकाक्ष, गरुडध्वज, पीतांबर, शार्ङ्गी, विष्वक्सेन, चक्रपाणि, चतुर्भुज, देवकीनंदन, शौरि, श्रीपति, वनमाली, बलिध्वंसी, कंसाराति, विश्वंभर, कैटभजित्, विधु, श्रीवत्सलांछन इत्यादी नावें असल्याचें अमरकोशांत सांगितलें आहे[2]. यांतील बहुतेक नांवें विष्णूचें मानुषरूप व अवतारकृत्यें यांना अनुलक्षून असलीं तरी बरींच त्यानें देवांसाठीं असुरनाश केल्याचीं निदर्शक आहेत. या देवतेचा प्रत्यक्ष वेदांत उल्लेख असल्यानें तिच्या वैदिकत्वाविषयीं शंका नाहीं. मात्र तिचें आजचें परिणत रूपच वेदकालीं होतें असें समजण्याचें कारण नाहीं. तिच्या कल्पनेंतही उत्क्रांति होत गेली आहे. कशी ती येथें थोडक्यांत पाहूं या.

ब्राह्मणी ग्रंथांतील पौराणिक वाङ्मयांत जरी विष्णु या देवतेचें स्थान उच्च आहे, तरी ऋग्वेदांत तिचें स्थान तसें नाहीं. तथापि ऋग्वेदांतही, विष्णु-देवतेच्या सूक्तसंख्येवरून तिला जेवढें महत्व असावेंसें वाटतें, त्याहून तें निःसंशय जास्त आहे. विष्णूचीं विस्तृत पावलें, त्याचा भव्य आकार आणि तारुण्य हे विष्णूच्या मानवी स्वरूपाचे विशेष होत. विष्णु तीन पावलें टाकतो हें त्याचें प्रमुख वैशिष्ट्य आहे. 'उरुगाय' विस्तृत चाल-

१ बुइ ८२. २ प्रथमकांड स्वर्वर्ग १८–२२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णारा, आणि ' उरुक्रम ' विस्तीर्ण पावलें टाकणारा हीं त्याचीं मुख्य विशेषणें आहेत. विष्णु एका पावलानें सर्व पृथ्वी आणि दुसऱ्या दोहोंनीं अनुक्रमें अंतरिक्ष व आकाश व्यापतो; या तीन पावलांपैकीं दोन पावलें मनुष्यांना दिसतात; तिसरें अत्युच्च पाऊल मनुष्याचे दृष्टीच्या अगर पक्ष्यांचे दृष्याच्या पलिकडे आहे. आकाशांत एखाद्या डोळ्याप्रमाणें असणारें विष्णूचें अत्युच्च पाऊल फक्त दानशूरच ? पाहूं शकतो. देवांनाही तेथें आनंद होतो; त्या ठिकाणीं एक मधाचा झरा आहे. हें अत्युच्च स्थान आपल्या तेजानें खाली चमकत असतें; इंद्राचेंही निवासस्थान तेंच आहे. त्या ठिकाणीं पुष्कळ शिंगांच्या व जलद चालणाऱ्या गाई (मेघ) आहेत. सारांश गतिमत्त्व हें विष्णूचें वैशिष्ट्य आहे. हीच गोष्ट त्याच्या एष, एवया, एवयावद् इत्यादि इतर विशेषणांवरूनही दिसून येते. नियमितपणा हें त्याचें दुसरें वैशिष्ट्य आहे. तीन पावलांनीं विश्व आक्रमितांना विष्णु ठराविक नियमानुसार चालतो; तसेंच चार नांवें (ऋतु) असलेल्या आपल्या नव्वद घोड्यांना (दिवस) एखाद्या चक्राप्रमाणें विष्णु गतिमान् बनवितो असें एके ठिकाणीं वर्णिलें आहे. यांत चार ऋतूंचे आणि ३६० दिवसांचें वर्ष अभिप्रेत दिसतें. अथर्ववेदांत एके ठिकाणीं यज्ञावर उष्णता आणि प्रकाश पाडण्याबद्दल विष्णूला विनविलें आहे. विष्णूचें तोडलेलें शिर म्हणजे सूर्य होय असें ब्राह्मणग्रंथांत म्हटलें आहे. वेदोत्तर वाङ्मयांत विष्णूचें एक शस्त्र जें चक्र तें सूर्याप्रमाणें असल्याचें वर्णन केलें आहे. अग्नीप्रमाणें तेजस्वी असणारा पक्ष्यांचा राजा गरूड हें त्याचें वाहन आहे. सुपर्ण आणि गरुत्मन् हीं गरुडाचीं नांवें आहेत. हीं दोन्ही विशेषणें ऋग्वेदांत सूर्याला लाविलेलीं आहेत. वेदोत्तर वाङ्मयांत वर्णिलेलें विष्णूच्या वक्षःस्थळावरील कौस्तुभरत्न सूर्यच होय असें प्रो. कून यानें स्पष्ट केलें आहे. तात्पर्य, निसर्गाचें एक अंग म्हणून विष्णूचें वर्णन ऋग्वेदांत केलें नसलें तरी सूर्य हेंच त्याचें मूल स्वरूप असावें. मात्र या ठिकाणीं सूर्याचें सामान्य स्वरूप विवक्षित नसून, आपल्या विस्तृत पावलांनीं सारें विश्व व्यापणाऱ्या गतिमान् तेजोगोलाचे मूर्तीकरण अभिप्रेत आहे. विष्णूचें अत्युच्च पाऊल हें त्याचें निवासस्थान आहे. सूर्य हा अत्युच्च स्थानीं स्थिर असतो अशी कल्पना होणें स्वाभाविक आहे. यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यास्काच्या निरुक्तांत अत्युच्च स्थानाला विष्णुपद असें नांव दिलेलें आहे. ' गिरिष्ठा ' पर्वतावर असणारा आणि ' गिरिक्षित् ' पर्वतावर राहणारा हीं विष्णूचीं विशेषणें याच कल्पनेशीं संबद्ध आहेत. अशा प्रकारच्या वर्णनावरूनच तैत्तिरीय संहितेंत विष्णूला पर्वतांचा स्वामी असें म्हटलें आहे. सारांश, आतांपर्यंत विष्णूचें जें वर्णन केलें तें लक्षपूर्वक वाचलें तर असें दिसेल कीं, विष्णू शब्दानें सूर्य जिचें मुख्य प्रतीक अशी प्रकाशाभिमानी देवता येथें विवक्षित आहे. यामुळें द्वादशादित्यांत विष्णू या नांवाचा एक आदित्य अंतर्भूत केला गेला. विष्णूनें तीन पावलें कां टाकिलीं ? असुरवधाचे कामीं विष्णूचें इंद्राशीं सख्य असल्याचें ऋग्वेदांत म्हटलें आहे. ब्राह्मणांत देव आणि असुर हे परस्परांचे विरोधक आहेत. परंतु ऋग्वेदांतल्याप्रमाणें ब्राह्मणांतील देव नेहमींच विजयी होतात असें नाही; तर पुष्कळ वेळां पराजितही होतात. अशा वेळीं श्रेष्ठत्व संपादण्याकरितां त्यांना कांहीं तरी युक्तीचा आश्रय करावा लागे. ऐतरेय ब्राह्मणांत असें सांगितलें आहे कीं, इंद्र आणि विष्णू असुरांशीं लढण्यांत गुंतले असतां त्यांनीं असुरांशीं असा करार केला कीं, विष्णू तीन पावलांत जितकी भूमी व्यापील तितकी त्या दोघांच्या मालकीची व्हावी. त्याप्रमाणें विष्णूनें सृष्टि, तेज व वाणी यांवर आक्रमण केलें. देवांवर विजय संपादन केल्यानंतर असुरांनीं पृथ्वीची वाटणी कशी केली याची हकीकत शतपथ ब्राह्मणांत आली आहे. देवांनीं विष्णुस्वरूपी यज्ञाला पुढें केलें आणि पृथ्वींत आपला हिस्सा मागण्याकरितां ते असुरांकडे आले. वामनावतारी विष्णु जेवढ्या भूमीवर राहील तेवढी देवांना देऊन टाकण्याचें असुरांनीं कबूल केलें. विष्णू हा आकारानें यज्ञाएवढा होता. देवांनीं विष्णूसह यज्ञ केला आणि सगळी पृथ्वी मिळविली. असुरांना शंका येऊं नये एवढ्याकरितां विष्णूच्या वामनावताराची योजना केली होती. येथें आपणांस इतिहासपुराणांत विस्तारानें वर्णिलेल्या वामन व त्रिविक्रम अवतारांचें व यज्ञरूपाचें बीज पहावयास मिळतें.

विष्णू सोम प्याला आणि इंद्रानें सांगितल्यावरून त्यानें वराहाच्या (वृत्राच्या) १०० म्हशी (?) आणि उकळलेलें दूध पळविलें. त्याबरोबर इंद्रानें पर्वताच्या (मेघाच्या) पलीकडून त्या भयानक वराहाचा वध केला. तैत्तिरीय संहितेंत ही कथा वाढविली आहे. संपत्ति लुटणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका वराहानें असुरांची संपत्ति सात डोंगरांच्या पलीकडे नेऊन ठेवली. इंद्रानें कुश नांवाचें गवत मूठभर उपटून तें डोंगरांच्या मधून फेंकलें आणि त्या वराहाला मारलें. विष्णूनें देवांना देण्याकरितां यज्ञांतील हवि म्हणून त्याला उचलून नेलें'. अशा रीतीनें देवांना असुरांची संपत्ति मिळाली. या हकीकतींत विष्णूच्या वराहावताराचें मूळ आहे असें म्हणतां येत नसलें तरी येथें वराहाला महत्त्व आलेलें स्पष्ट दिसतें. पण शतपथ ब्राह्मणांत याच वराहानें पाण्यांतून पृथ्वी उचलल्याचें नमूद आहे. हा पृथ्वीचा उद्धारक वराह प्रजापतीचेंच एक रूप आहे असें तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे. यामुळें मात्र रामायण, महाभारत आणि पुराणें यांत पृथ्वी उचलणाऱ्या या वराहाची दशावतारांत गणना केली गेली असावी असें दिसतें. दशावतारांपैकीं आणखी दोन अवतारांचीं बीजें ब्राह्मणग्रंथांत आढळतात. तथापि त्यांचा विष्णू देवतेशीं कांहीं संबंध नाहीं. शतपथ ब्राह्मणांतील मनूला जलप्रलयांतून वाचविणारा मत्स्य हा प्रजापतीचें स्वरूप आहे असें महाभारतांत म्हटलें आहे. तोच पुराणांत विष्णूचा अवतार झाला आहे. शतपथ ब्राह्मणांत प्रजोत्पत्ति करूं इच्छिणारा प्रजापति आद्य जलतत्वांत संचार करणारें कासव बनतो आणि जलप्रलयांत नाहींसे झालेले अनेक पदार्थ पुनः प्राप्त करून देतो.

सारांश, विष्णूचें मुख्य काम लोकांस संकटमुक्त करणें हें असल्यानें या तिन्ही कथांत विष्णूचा उघड संबंध नसला तरी त्या त्याजवर लादल्या जाऊन त्यांतील वराह, मत्स्य व कूर्म हे विष्णूचेच अवतार होत असें पौराणिक मानूं लागले.

यज्ञस्वरूपी विष्णू यज्ञाचें यथार्थ ज्ञान असल्यामुळें देवांचा प्रमुख कसा झाला आणि धनुष्याच्या योगानें तोडलें गेलेलें त्याचें शीर सूर्य कसें बनलें याची कथा शतपथ ब्राह्मणांत आली आहे. या कथेस तैत्तिरीय

१ विष्णूचें इंद्राशीं सख्य आहे. वृत्रवधाचें कामीं तो इंद्राला साहाय्य करतो. विष्णुसह इंद्र सोम पितो. विष्णूनें तीन पात्रांत पिळलेला सोमरस इंद्र पितो. विष्णू व इंद्र यांचें हें असें सख्य पाहून पौराणिकांनीं विष्णूस इंद्राचा धाकटा भाऊ व उपेंद्र बनविलें असावें.

मू. २. .....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरण्यकांत अशी पुरवणी जोडली आहे कीं, अश्विनौनीं यज्ञाचें शीर जागच्या जागीं बसविलें आणि आतां संपूर्ण यज्ञ करूं शकणाऱ्या देवांनीं स्वर्ग जिंकला. विष्णूच्या यज्ञावताराच्या कल्पनेचें मूळ या कथेंत असावेसें दिसतें. पुराणांत यज्ञास घोड्याचें शिर बसविलें गेलें असें सांगितलें असल्यानें हयग्रीव अवताराचें मूळही याच कथेंत आहे असें म्हणतां येतें.

तात्पर्य, प्रकाशरूप विष्णू लोकांना संकटांतून मुक्त करीत असल्यामुळें तो सृष्टीचा पालनकर्ता आहे; सूर्य हें त्याचें चिन्ह अथवा गरूड हें त्याचें वाहन आहे[१]; लोकांना संकटमुक्त करण्यासाठींच त्यानें मत्स्य, कूर्म, वराह, वामन, त्रिविक्रम, यज्ञ व हयग्रीव हे अवतार धारण केले इत्यादी कल्पनांचें मूळ आपणास वैदिक वाङ्मयांत पहावयास मिळतें. पौराणिक वाङ्मयांत या कथांची वाढ होऊन कित्येक नवीन अवताराचे स्वामित्वही विष्णूकडेच गेलें. बुद्ध व कल्कि हे अशांपैकीं अगदीं अलीकडचे होत. परशुराम, राम, कृष्ण, इत्यादी यांच्या थोडे पूर्वीचे आहेत.

---

१ येथें वाहन व आयुधें यांविषयीं माझी कल्पना स्पष्ट मांडतों. हीं दोन्ही मूलतः चिन्हें अथवा लांछनें होतीं. उदाहरणार्थ, गरुत्मन् अथवा सुपर्ण अर्थात् सूर्य हें प्रकाशरूप विष्णुदेवतेचें चिन्ह आहे. पक्ष्यांप्रमाणें सूर्य आकाशांत सर्वांत उंच व जास्त चालतो किंवा उडतो म्हणून त्यास गरुत्मन् किंवा सुपर्ण व पक्षांचा राजा म्हटलें. सूर्य चक्राकार असल्यानें सूर्यचक्र हेंही विष्णूचें चिन्हच म्हटलें पाहिजे. हळूहळू पक्षांचा राजा पक्षिवर्गांतीलच पाहिजे म्हणून एका विशिष्ट पक्षाला गरूड म्हणूं लागले. विष्णूला मनुष्यरूप दिल्यावर गरुडाला त्याचें वाहन बनविलें व सूर्यचक्राचें नुसतें चक्र होऊन तें विष्णूचें आयुध झालें. पशुपतीचें चिन्ह रेड्यापेक्षां बैल म्हणणेंच जास्त चांगलें. पण तोच बैल पशुपतीस मानवरूप दिल्यावर त्याचें वाहन बनला. पार्वती पर्वतसंबद्ध आहे हें समजण्यास वन्य पशूंचा राजा सिंह याच्या इतकें चांगलें चिन्ह दुसरें नाहीं. तेव्हां पार्वतीस मानवी रूप प्राप्त झाल्यावर सिंह हा तिचें वाहन बनणें ओघानेंच आलें. ब्रह्माचें शुद्ध स्वरूप लक्षांत घेऊन हंस—तितकाच शुद्ध व स्वच्छ असल्यानें—त्याचें चिन्ह ठरविलें. पण ब्रह्म अथवा ब्रह्मा यांला मानुष रूप मिळाल्यावर हंस साहजिकच त्याचें वाहन बनला. चिन्हें किंवा लांछनें यांचीं वाहनें बन-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विष्णूच्या निरनिराळ्या अवतारांचा, सामान्य रूपांचा आणि रूपमंडनादि शिल्पग्रंथांतून त्रैलोक्यमोहन, अनंत, वैकुंठ, विश्वरूप वगैरे आणखी कित्येक रूपें सांगितलीं आहेत त्यांचा यथावकाश पुढें विचार होईल. येथें मला येवढें निदर्शनास आणावयाचें आहे कीं, वैदिक वाङ्मयांत इंद्र व वरुण या देवतांच्या मानानें विष्णूस गौण स्थान असतां त्याचें माहात्म्य वाढत जाऊन एके काळीं शिव व विष्णु यांमध्यें त्यांचे भक्त व त्यांनीं काढलेले पंथ यांमुळें मोठी स्पर्धा उत्पन्न झाली होती. आज ती स्पर्धा मावळली असली तरी संस्कृत समाजांत विष्णूसच सर्वांत मोठें स्थान मिळालें आहे. शिवानुयायी संख्येनें जास्त भरतील. पण सभ्यतेच्या बाबतींत सामान्यतः वैष्णव जास्त पुढारलेले आहेत असें मानावें लागेल. याचें कारण समजून घेण्यास डोकें फार खाजविण्याची जरूरी नाहीं. वैष्णवांतील रामानुज, माध्व, वल्लभ, भागवत, इत्यादि पंथ व शैवांतील लाकुलीश, कापालिक, अघोर, नाथ, इत्यादि पंथ यांची तुलना केल्यास असें दिसेल कीं, सभ्यतेची कल्पना जसजशी उत्क्रांत होत गेली, तसतसा वरील शैवपंथांविषयीं—त्यांतील ओंगळ आचारांमुळें—सामान्य लोकांतही वाढता तिटकारा उत्पन्न होऊं लागून ते पंथ रोडावूं लागले. आजही या पंथांना अनुसरणारे लोक आहेत; पण ते आपले आचार शाक्तांप्रमाणें बहुधा गुप्तपणें करतात. बहुसंख्य

ण्याची प्रक्रिया जैन तीर्थंकरांच्या मूर्तींवरून अधिक चांगली ध्यानांत येते. प्रथम प्रथम जैन तीर्थंकरांना कोणतींच विशिष्ट लांछनें नव्हतीं. पुढें अनेक तीर्थंकर मूर्तींना तींच तीं एक किंवा दोन लांछनें दाखवूं लागले. पुढें तीं लांछनें बैठकीवर काढूं लागले. कांहीं तीर्थंकरांचीं लांछनें प्राणी असल्यामुळें व ते बैठकीवर कोरल्यामुळें त्यांना अज्ञानी लोक वाहनेंच म्हणूं लागले आणि हल्लींही म्हणतात. पण चंद्र, धर्मचक्र, नाग, वाहनें बनणें शक्य नसल्यानें या वस्तू पाहिल्या म्हणजे इतर प्राणीही वाहनें नसून चिन्हें अथवा लांछनें आहेत ही गोष्ट मनास पटल्यावांचून राहात नाहीं. सुपार्श्व आणि पार्श्व या तीर्थंकरांच्या डोक्यांवर नेहमीं पांच किंवा सात फणा असलेल्या नागाचें छत्र असतें. हें वास्तविक त्यांचें लांछन आहे. पण एका अडाणी चितारयानें हा नाग जणूं वाहन असें समजून एका चित्रांत पार्श्वनाथाच्या बैठकीवरच काढला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शैव फक्त शिवाची निरनिराळ्या पण मुख्यतः लिंगरूपांत पूजा करतात. हे लोक समाजाच्या खालच्या थरांतील असल्यानें शैव मत हल्लीं तरी वैष्णव मतापुढें फिकें पडलें आहे.

विष्णू ही अशा रीतीनें फार महत्त्वाची देवता असल्यानें तिची पूजा भारत व बृहद्भारत या दोहोंमध्येंही मोठ्या प्रमाणांत सुरू होती. हजारों ठिकाणीं या देवतेचीं स्वतःचीं देवळें आहेत. ज्या देवळांची मुख्य देवता इतर कोणी असते तेथेंही हिच्या साधारण व अवतार मूर्ती बसविलेल्या किंवा हिज-संबंधींच्या निरनिराळ्या पौराणिक कथा खोदलेल्या आढळतील. देऊळ हिचेंच असल्यास तेथें गाभाऱ्यांत तर विष्णू असतोच; पण गणेशपट्टीच्या मध्यभागीं विष्णू किंवा गरूड खोदतील. शिवाय त्या पट्टीच्या वर असलेल्या पट्टीवर दोन्ही बाजूस ब्रह्मेशानादि देव खोदून मध्यें विष्णूचें एखादें रूप दाखवितात. देवळांतील छतें, कोनाडे, भिंती, खांब, तुळया, इत्यादीं-वर अनेक विष्णुमूर्ती किंवा विष्णुकृत्यें आढळतात.

विष्णूच्या देवळांत जर त्याचा परिवार स्थापन करावयाचा असेल तर तो कमी जास्त प्रमाणांत करतां येतो. तदनुसार त्याचे अधमाधम, अधम-मध्यम, अधमोत्तम, मध्यमाधम, मध्यममध्यम, मध्यमोत्तम, उत्तमाधम, उत्तममध्यम व उत्तमोत्तम असे नऊ भेद केले आहेत. सर्वांत उत्कृष्ट जो उत्तमोत्तम परिवार तो एकांत एक असलेल्या सात चौकोनांनीं व १३५ देवतांनीं होतो. त्याचें विस्तृत वर्णन कै. गोपिनाथरावांनीं केलें आहे तें जास्त माहितीसाठीं पहावें[1]. देऊळ जर विष्णुपंचायतनाचें असेल तर त्याजबरोबर इतर चार देवतांचीं लहान देवळें खालीं दाखविलेल्या दिशांस असतात[2].

पूर्व

उत्तर	२ शंकर ३ गणेश १ विष्णु ४ देवी ५ सूर्य	दक्षिण

पश्चिम

१ इहिइ व्हॉ. १ भाग २ परिशिष्ट ए. २ धर्मसिंधु–य. गो. दीक्षित प्रत–पृ. २५६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रूपमंडनांत विष्णूच्या देवळांत विष्णूचींच निरनिराळीं रूपें स्थापन करावयाचीं असल्यास मुख्य देवळांत केशव, वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध, दशावतारांसह जलशायी किंवा वराह यांपैकीं कोणाची तरी मूर्ती बसवून भोवतीं पूर्वादि दिशांच्या क्रमानें नारायण, जनार्दन, पुंडरीकाक्ष, पद्मनाभ, गोविंद, माधव, मधुसूदन, विष्णू यांच्या मूर्ती बसवाव्या असें सांगितलेंआहे'. अशा तऱ्हेनें विष्णूचा परिसर तीन प्रकारांनीं शोभवितां येण्यासारखा असला तरी पहिला व तिसरा हे प्रकार क्वचित् आढळतात. दुसऱ्या प्रकाराचा मात्र सर्वत्र प्रचार—निदान महाराष्ट्रांत तरी—आहे.

पुढें जे अनेक अवतार वर्णन केले आहेत त्यांपैकीं कित्येकांचीं आजही मुख्य देवता म्हणूत देवळांतून पूजा होते. कित्येकांची आज होत नसली तरी मध्ययुगांत निश्चयानें होत असे. उ. वराह, त्रिविक्रम, बलराम, हयग्रीव, इत्यादी. पण हंस, मत्स्य, कूर्म, कल्कि, इत्यादी कांहीं अवतार असे आहेत कीं, त्यांची पूर्वीही मुख्य देवता म्हणून पूजा होत असे कीं नसे याविषयीं शंकाच आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांना त्या वेळीं अस्तित्वच नव्हतें. त्यांचें अस्तित्व अवश्य होतें; पण मुख्य देवता मानण्या इतकें त्यांस महत्त्व नव्हतें. देऊळ एखाद्या अवतारांचें असेल तर तेथें त्याचीच मुख्य देवता म्हणून पूजा होणार हें उघड आहे. पण तसें नसेल तर कोनाडे, गणेशपट्ट्या, तुळया, टेकण्या, छतें इत्यादींवर अवतार व त्यांचीं कृत्यें खोदलेलीं आढळतील. कधीं कधीं दशावतारांचे पट्टही खोदलेले आढळतात. पुष्कळ वेळां मुख्य मूर्तीच्या प्रभावळीवर नक्षी म्हणून मत्स्यादि कल्क्यंत अवतार खोदलेले असतात.

विष्णुमूर्तीचे साधारण व अवतार असे दोन मोठे वर्ग पडून त्यांतही केशवादि २४ व तदितर आणि दशावतार व दशावतारेतर असे उपवर्ग पडतात. मूर्ती कोणत्याही प्रकारची असली तरी ती एकटी अगर सामान्यतः

१ रूम ८ आ; रूपा २३ अ मध्येंहि असेंच वर्णन आहे.

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लक्ष्मी नांवाची एक स्त्री अथवा श्री व भू किंवा श्री व सरस्वती अशा दोन स्त्रिया यांसह असते. पैकीं श्री व सरस्वती स्त्रिया दाखविण्याची पद्धत प्रायः उत्तर हिंदुस्थानांत आणि विशेषतः त्याच्या पूर्वभागांत आढळते. श्री व भू किंवा एकटी श्री विष्णूबरोबर दाखविण्याची पद्धत मात्र सर्वत्र चालू आहे. विष्णु बैठा किंवा निजता असेल तेव्हां त्यास सामान्यतः एकच पत्नी असते व ती त्याच्या मांडीवर असेल किंवा डाव्या उजव्या अंगास असेल. विष्णू उभा असल्यास त्याची बायको किंवा बायका बहुधा सूक्ष्म रूपानें काढतात. विष्णु उभा किंवा निजता असेल तर त्याचें वाहन गरूड त्याच्या स्त्रियांप्रमाणें पायांच्या बाजूस दाखवितील. पण बैठा असल्यास तो बहुधा गरुडावर बसलेला असेल किंवा क्वचित् बैठकीवर गरूड खोदलेला असेल. विष्णू जेव्हां केशवादि मूर्तींपैकीं असतो तेव्हां त्यास फक्त चारच हात असतात. इतर रूपांत त्यास दोन, चार, सहा, आठ किंवा अधिक हात असूं शकतात.

विष्णूच्या एकेकट्या मूर्ती सांपडतात तसे त्याचे पट्टही मिळतात. या पट्टांचे बहुधा नऊ भाग करून मधोमध विष्णूची मूर्ती काढतात. त्याच्या वरच्या अंगास श्री, खालच्या अंगास गरूड, उजव्या अंगास लक्ष्मी, डाव्या अंगास सरस्वती आणि बाकीच्या भागांत विद्याधर, नर्तकी, वगैरे मूर्ती खोदतात. या पट्टांच्या मागचे बाजूस दशदली कमल काढून प्रत्येक दलांत विष्णूच्या दशावतारांपैकीं एक एक खोदलेला असतो.

	श्री	
ल	वि	स
	ग	

हे पट्ट दगडाचे किंवा धातूचे केलेले असतात. यांची स्पष्ट कल्पना बाजूच्या आकृतीवरून येईल. हे पट्ट बौद्ध किंवा जैन पट्टांप्रमाणें बहुधा दान करण्यासाठीं केलेले असावेत'.

शंकराची ज्याप्रमाणें लिंगरूपांत पूजा होते तशी विष्णूची शालिग्राम रूपानें पूजा करतात. मात्र ती लिंगपूजेप्रमाणें फार मोठ्या प्रमाणावर होत

१ इ. बु. ब्रॅ. स्क. डा. म्यू. पृ. ८९–९३ प्रप ३५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. विशेषतः शालिग्रामावर देऊळ बांधलेलें कोठें आढळत नाहीं. तरीही पुराण व शिल्प ग्रंथांतून शालिग्राम कोठून आणावे, त्यांची परीक्षा कशी करावी, शालिग्रामांचे आकार, त्यांवरील चक्रें, रेघा, भेगा, रंग इत्यादींचे गुणदोष, रंगावरून तो विष्णूचें कोणतें रूप ठरतो, यांचें पुष्कळ विस्तृत विवेचन केलेलें सांपडतें[1].

ब्रह्मदेवाप्रो विष्णूचीही बौद्ध मूर्तिप्रकरणांत अवहेलना केली आहे. कशी तें उदाहरणें देऊन सांगतों. प्रसन्नतारा उजव्या पायानें उपेंद्रास तुडवीत असल्याचें दाखवावें म्हणून सांगितलें आहे[2]. वज्राज्वालानलार्क विष्णू व लक्ष्मी यांना तुडवीत असल्याचें दाखवावें[3] आणि हरिहरिहरिवाहनोद्भव लोकेश्वर सिंहावर बसलेल्या गरुडस्थित विष्णूवर आरूढ झालेला असावा म्हणून विधान आहे[4]. शिवाय दशभुजसितमारीची व उभयवराहानन-मारीची या दोन्ही देवता विष्णूस पायाखालीं तुडवितात म्हणून नमूद आहे[5]. जैन मूर्तिकांडांतही कधीं कधीं वैदिक मूर्तींची अवहेलना केलेली आढळते. उ. मथुरा म्यूझियममध्यें थोडे वर्षांपूर्वी समाविष्ट केलेल्या ऋषभनाथाच्या मूर्तींचे दोन्ही बाजूंस बलराम व विष्णू यांची चाकर म्हणून योजना केल्याचें दिसून आलें आहे[6].

केशवादि चोवीस मूर्ती

हें विष्णूचें अगदीं सामान्य वर्णन झालें. आतां प्रत्येक वर्गाचा विस्तृत विचार करूं या. त्यासाठीं प्रथम केशवादि चोवीस मूर्ती घेतों. या वर्गातील मूर्तीस चारच हात असतात. पण शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें अदलून बदलून देण्यानें २४ मूर्ती केल्या आहेत. गणितामध्यें एक अगदीं साधा नियम आहे कीं, निरनिराळे १, २, ३, ४, ५ इत्यादि आकडे घेऊन

१ रूम ६; रूपा १६ अ. २ बुइ पृ. १३९ प्रप ३८ डी. ३ कित्ता पृ. १४५. ४ कित्ता पृ. ४४ प्रप २३ ए, बी. ५ कित्ता पृ. ९८, ९९. ६ ॲन्युअल बिब्लिऑग्रफी ऑफ इंडियन आर्किऑलॉजी इ. १९३४ पृ. १५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचे किती संख्याप्रकार होतील असें विचारलें तर त्या संख्येंत आकड्यांचीं जितकीं स्थानें तितक्यांचा आपसांत गुणाकार केला असतां जो आकडा येईल तितके तिचे प्रकार होतील असें समजावें. उ. ५२८ ही संख्या तींत ३ आकडे असल्यानें (३×२×१=) ६ तऱ्हांनीं मांडतां येईल. तद्वत् ४५६७ ही संख्या (४×३×२×१=) २४ प्रकारांनीं मांडतां येईल. हेंच तत्व २४ मूर्तिप्रकारांच्या मुळाशीं आहे.

केशवादि चोवीस मूर्तींच्या आयुधांचा क्रम वर्णन केलेला मला अग्निपुराण[1], पद्मपुराण[2], हेमाद्रिकृत चतुर्वर्गचिंतामणि[3], धर्मसिंधु[4], वृद्धहारीतस्मृति[5], निर्णयसिंधू[6], रूपमंडन[7], तंत्रसार[8], अभिलषितार्थचिंतामणि[9], शिल्परत्न[10] व श्रीतत्वनिधि[11] या ग्रंथांत आढळला. पैकीं रूपमंडन, तंत्रसार, निर्णयसिंधू आणि अभिलषितार्थचिंतामणि यांतील वर्णन एकरूप असल्यानें फक्त अभिलषितार्थचिंतामणींतील वर्णन विचारांत घेतलें असतां चालेल असें वाटतें. या सर्व ग्रंथांतील वर्णनांची नीट कल्पना येण्यासाठीं तीं कोष्टकरूपानें पुढें देतों. या कोष्टकाचे बाबतींत ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत त्या अशा—(१) श = शंख, च = चक्र, ग = गदा, प = पद्म. (२) मूळ ग्रंथांपैकीं कांहींत दक्षिणाधःकरक्रमानें[12] तर कांहींत दक्षिणोर्ध्वकरक्रमानें[13] हीं वर्णनें आलीं आहेत. उदाहरणार्थ, अग्निपुराण, हेमाद्रि, वृद्धहारीतस्मृति, रूपमंडन व अभिलषितार्थचिंता-

१ अध्याय ४८ श्लोक १–१२. २ पातालखंड ७८।१७–२७. ३ व्हॉ. २ भाग १ पृ. ११४. ४ पृ. २५६. ५ अ. २।७९; १०।११०. ६ पृ. २७५. ७ पा. ५ अ; रूपा १५ आ. ८ अ. १ श्लोक २३।२९. ९ प्रकरण ३।१।७२६–३३. १० पटल २३।४२. ११ पृ. ५०. १२ म्हणजे प्रथम उजवा खालचा हात, नंतर उजवा वरचा, पुढें डावा वरचा व शेवटीं डावा खालचा. १३ म्हणजे प्रथम उजवा वरचा, नंतर डावा वरचा, पुढें डावा खालचा व शेवटीं उजवा खालचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मणि यांत दक्षिणाधःकरक्रम सांगितला आहे; तर पद्मपुराण, धर्मसिंधु, निर्णयसिंधु[1] आणि तंत्रसार या ग्रंथांत दक्षिणोर्ध्वकरक्रम सांगितला आहे. अर्थात् येथील कोष्टकांत सर्वांचा दक्षिणाधःकरक्रम साधावा येवढयासाठीं आवश्यक तो फरक केला आहे. उ. दुसऱ्या प्रकारच्या ग्रंथांत केशवाची सारणी सर्वत्र 'शचगप' अशी आहे ती मी या कोष्टकांत 'पशचग' मांडली आहे. म्हणजे शेवटचें अक्षर प्रथम आणलें आहे. अर्थात् सर्वांचा अभिप्राय बरोबर उतरविला आहे. आकृतींवरून ही कल्पना जास्त चांगली ध्यानांत येईल म्हणून येथें आकृतीच देतों. २श —|— ३च १श —|— २च
या आकृती स्पष्ट दाखवितात कीं,क्रम १प —|— ४ ग ४ प —|— ३ ग
सांगण्याची पद्धत निराळी असली तरी अभिप्रेत अर्थ एकच आहे. (३) धर्मसिंधूकारांनीं दिलेली केशवादि चोवीस मूर्तींची माहिती निर्णयसिंधूमधून घेतली आहे. निर्णयसिंधूंत बोपदेवाचें म्हणून जें सूत्र दिलें आहे त्यांत केशवादि नांवांचा क्रम 'केविगोवादापुहृपे प्रजाच्युक्रममात्रिना वाधोनृहसनिश्रीप' असा आहे. यांतील पहिला वा म्हणजे वासुदेव व दुसरा वा म्हणजे वामन असा अर्थ धर्मसिंधूकारांनीं केला आहे. पण यामुळें धर्मसिंधूंतील वामन व वासुदेव यांच्या सारण्यांत—इतरांशीं ताडून पाहिल्या तर—उलटापालट झालेली दिसते. म्हणून मी पहिला वा म्हणजे वामन आणि दुसरा वा म्हणजे वासुदेव असें धरलें आहे. अर्थात् मी वामन व वासुदेव यांच्या निर्णयसिंधूंतील म्हणून दिलेल्या सारण्या इतरांशीं जुळत्या अतएव जास्त बरोबर आहेत. निर्णयसिंधूंत बोपदेवाच्या सूत्राचें विवरण करतांना अगदीं शेवटीं 'अत्र मूलं

---

१ निर्णयसिंधूच्या कोंहीं प्रतींत दक्षिणाधःकरक्रम सांगितला आहे; पण ती स्पष्ट चूक आहे. कारण तसें समजलें तर निर्णयसिंधूचा इतरांशीं प्रत्येक सारणींत विरोध येईल. उदाहरणार्थ, सर्व जण केशवाची सारणी 'पशचग' अशी देतात. पण निर्णयसिंधूंतील वरील पाठ खरा मानल्यास त्याच्या मतानें केशवाची सारणी 'शचगप' अशी येईल. इतर सारण्याही अशाच विरुद्ध येतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हेमाद्रौ ज्ञेयम् ' असा शेरा आहे. यावर टीप देतांना चौखंबा सीरीजमधील निर्णयसिंधूच्या आवृत्तींत बहुधा हेमाद्रीचे म्हणून चतुर्विंशतिमूर्तिवर्णनाचे श्लोक उतरले आहेत. पण ते आणि चतुर्वर्गचिंतामणींत हेमाद्रीनें सिद्धार्थ-संहितेंतले म्हणून दिलेले श्लोक आमूलाग्र भिन्न आहेत.(४) केशवादि नांवांच्या क्रमांत मतभेद दिसतो. उ. अग्निपुराण व तंत्रसार यांत दामोदर, वासुदेव, संकर्षण आणि अच्युत, उपेंद्र, जनार्दन असा क्रम आहे; तर वृद्ध-हारीतस्मृति, अभिलषितार्थचिंतामणि, पद्मपुराण, श्रीतत्वनिधि व धर्म-सिंधू यांत दामोदर, संकर्षण, वासुदेव आणि अच्युत, जनार्दन, उपेंद्र असा क्रम आहे. निर्णयसिंधू, रूपमंडन आणि हेमाद्रि यांत विशिष्ट क्रम नाहीं. (५) वृद्धहारीतामध्यें प्रथम १२ मूर्तींचे रंग व आयुधें सांगून नंतर २४ मूर्तींचे रंग व आयुधें दिलीं आहेत. शिल्परत्नामध्यें पहिल्या बारा मूर्तींचे फक्त रंग दिले आहेत. श्रीतत्वनिधीमध्यें पांचरात्रांतील आयुधक्रम व रंग आणि पद्मपुराणांतील फक्त रंग उध्दृत केले आहेत. (६) या मूर्तींबरोबर लक्ष्मी असेल तर त्या जोड्यास मूर्तिभेदानुसार लक्ष्मीकेशव, लक्ष्मीनारायण, लक्ष्मी वासुदेव, लक्ष्मीनरसिंह इत्यादी नांवें देतात.

वरील गोष्टी ध्यानांत ठेवून आपण सारण्यांकडे पाहिलें तर काय दिसेल ? पद्मपुराणांत उपेंद्र, जनार्दन व हरि आणि हेमाद्रींत केशव व कृष्ण यांबद्दल सारण्याच दिलेल्या नाहींत. अग्निपुराणांत माधव व प्रद्युम्न आणि पद्मनाभ व हरि, पद्मपुराणांत केशव व प्रद्युम्न, हेमाद्रींत त्रिविक्रम व अधोक्षज, तसेंच वृद्धहारीतामध्यें केशव व जनार्दन, अशा प्रत्येक जोडीस एकच सारणी दिली आहे. उलट, चतुर्वर्गचिंतामणि व पाठभेदामुळें अग्निपुराण यांत अनुक्रमें विष्णु व श्रीधर या मूर्तींस प्रत्येकीं दोन सारण्या आल्या आहेत आणि वृद्धहारीतांत वासुदेवाच्या दोन सारण्या मिळतात. सारांश, अभिलषितार्थ-चिंतामणि व निर्णयसिंधु यांतील सारण्याच काय त्या पूर्ण निर्दोष आहेत. शिवाय एकांतील सारण्या दुसऱ्याशीं सर्वांशीं जुळतही नाहींत. यासाठीं इतक्या सारख्या देणें भाग पडलें आहे. आतां सारणींचा तक्ता देऊन त्यांचा कसा उपयोग होतो तें दाखवितों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

केशवादि चोवीस नांवें	अग्निपुराण	पद्मपुराण	चतुर्वर्ग चिंतामणि	धर्मसिंधु	वृद्धहारीत स्मृति	अ. चिंतामणि
१ केशव	पशचग	**पशचग**	—	पशचग	**पशचग**	पशचग
२ नारायण	शपगच	शपगच	**पशगच**	शपगच	शपगच	शपगच
३ माधव	**गचशप**	गचशप	गचशप	गचशप	गचशप	गचशप
४ गोविंद	चगपश	चगपश	चगपश	चगपश	चगपश	चगपश
५ विष्णु	गपशच	गपशच	गपशच[1]	गपशच	गपशच	गपशच
६ मधुसूदन	**शचपग**	चशपग	चशपग	चशपग	चशपग	चशपग
७ त्रिविक्रम	पगचश	पगचश	**पगशच**	पगचश	पगचश	पगचश
८ वामन	शचगप	शचगप	शचगप	**गशचप**	शचगप	शचगप
९ श्रीधर	पचगश[2]	**गचपश**	पचगश	पचगश	पचगश	पचगश
१० हृषीकेश	गचपश	**पचगश**	गचपश	गचपश	गचपश	गचपश
११ पद्मनाभ	**शपचग**	**चपशग**	शपचग	शपचग	शपचग	शपचग
१२ दामोदर	पशगच	पशगच	**पचगश**	पशगच	पशगच	पशगच
१३ वासुदेव	गशचप	**पचशग**	गशचप	**शचगप**	गशचप[3]	गशचप

१ दुसरी सारणी **शगपच**. २ दुसरा पाठ पचशार्ङ्गश. ३ दुसरा पाठ **गशपच**.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

केशवादि चोवीस नांवें	अग्निपुराण	पद्मपुराण	चतुर्वर्ग चिंतामणि	धर्मसिंधु	वृद्धहारीत स्मृति	अ. चिंतामणि
१४ संकर्षण	गशपच	गशपच	गशपच	गशपच	गशपच	गशपच
१५ प्रद्युम्न	**गचशग**[४]	**पशचग**	चशगप	चशगप	चशगप	चशगप
१६ अनिरुद्ध	चगशप	चगशप	चगशप	चगशप	चगशप	चगशप
१७ पुरुषोत्तम	चपशग	चपशग	चपशग	चपशग	चपशग	चपशग
१८ अधोक्षज	पगशच	पगशच	**पगशच**	पगशच	पगशच	पगशच
१९ नरसिंह	चपगश	चपगश	**चपश**[५]	चपगश	चपगश	चपगश
२० अच्युत	गपचश	गपचश	गपचश	गपचश	गपचश	गपचश
२१ उपेंद्र	शगचप	—	**पगचश**	शगचप	शगचप	शगचप
२२ जनार्दन	पचशग	—	पचशग	पचशग	**पशचग**	पचशग
२३ हरि	**शपचग**	—	शचपग	शचपग	शचपग	शचपग
२४ श्रीकृष्ण	शगपचं	शगपच	—	शगपच	शगपच	शगपच

४ ग ऐवजीं प पाहिजे. ५ यापुढें ग पाहिजे.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदाहरणें

या कोष्टकांतील मूर्तींचें उदाहरण म्हणून भारत इतिहास संशोधक मंडळांतील एका मूर्तीचें वर्णन येथें देणें योग्य आहे. या मूर्तीच्या उजव्या बाजूच्या खालच्या हातांत शंख आहे. उजव्या बाजूचा वरचा फुटून गेला आहे; पण त्या हातांत पद्म असावें असें वाटतें. कारण कमलाच्या दांड्याचा वेढा हाताच्या शाबूत असलेल्या भागास दिसत आहे. डाव्या बाजूच्या वरच्या हातांत गदा आहे व खालचा हात लक्ष्मीस आवरून धरीत आहे. म्हणून खालच्या डाव्या हातांत चक्र आहे असें समजण्यास हरकत नाहीं. खालच्या हाता शेजारीं काढलेली आकृति चक्राचीच आहे हें मेआसइ क्र. २५ प्रप. १३ बी या चित्रावरून उघड होत आहे. यामुळेंही उजव्या बाजूच्या वरच्या हातांत कमळ होतें असें वाटतें. विष्णूच्या हातांत दक्षिणाधःकरक्रमानें गदा, पद्म, शंख, चक्र, हीं आयुधें असतात. येथें शंख, पद्म, गदा, चक्र, हा क्रम आहे. हा क्रम हेमाद्रीशिवाय इतरांच्या मतानुसार नारायणाच्या हातांत असणाऱ्या आयुधांचा आहे. हेमाद्री वरील क्रमानें आयुधें धारण करणारी मूर्तीच देत नाहीं. तेव्हां माझ्या मतें ही मूर्ती नारायणाची आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ही नारायणाची मूर्ती उडत्या गरुडावर उजवा पाय खालीं सोडून व डाव्या पायाची मांडी घालून तीवर लक्ष्मीस घेऊन बसली आहे. डाव्या पायाची मांडी व उजवा पाय खाली सोडला असल्यास त्या ठेवणीस ललितासन हें नांव आहे. नारायणानें डाव्या हातानें लक्ष्मीस आवळून धरलें आहे. लक्ष्मीनें आपला उजवा हात नारायणाच्या गळयाभोंवतीं टाकला आहे. अशा ठेवणीस आलिंगन मुद्रा म्हणतात. लक्ष्मीच्या डाव्या हातांत अनोळखी वस्तू (कमळ ?) आहे. तेव्हां या जोड मूर्तीस लक्ष्मीनारायण हें नांव मी देईन. हिच्या दोन्ही अंगास हात जोडलेले दोन उपासक आहेत. या मूर्तीच्या बाबतींत टी. ए. गोपीनाथराव यांनीं आपल्या Elements of Hindu Econography या पुस्तकाच्या २ ऱ्या व्हाल्यूममध्यें दिलेले विश्वकर्मशास्त्र व रूपमंडन या दोन ग्रंथांतील उतारे तुलना करण्यालायख असून त्यांपैकीं फक्त पहिल्या ग्रंथांतील उतारा पुढें देतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लक्ष्मीनारायणौ कार्यौ संयुक्तौ दिव्यरूपिणौ ।
दक्षिणस्था विभोर्मूर्तिर्लक्ष्मीमूर्तिस्तु वामतः ॥
दक्षिणः कण्ठलग्नोऽस्या वामहस्तस्सरोजभृत् ।
विभोर्वामकरो लक्ष्म्याः कुक्षिभागे स्थितस्सदा ॥
... ...
सिद्धिः कार्या समीपस्था चामरग्राहिणी शुभा ।
कर्तव्यं वाहनं सव्ये देवाधोभागगं सदा ॥
शंखचक्रधरौ तस्य द्वौ कार्यौ पुरुषौ पुरः ।
वामनौ हारकेयूरकिरीटमणिभूषणौ ॥
उपासकौ समीपस्थौ प्रभोर्ब्रह्मशिवात्मकौ ।
रशनां योगपट्टं च शिखामंजलिमास्थितौ ॥

वर वर्णन केलेली मूर्ती जरी या उताऱ्याप्रमाणें हुबेहूब नसली तरी मूर्ति व वर्णन यांत पुष्कळ साम्य आहे हें नाकबूल करतां येत नाहीं.

पुण्याजवळच पर्वतीच्या टेकडीवर नानासाहेब पेशव्यांनीं बांधलेलें एक विष्णूचें देवालय आहे. यांतील मूर्तीच्या हातांतील आयुधांचा क्रम सहेतुक आहे किंवा सहजगत्या राहिलेला आहे हें मला ठाऊक नाहीं. पण तो क्रम विष्णूच्या हातांतील आयुधांच्या क्रमाप्रमाणें नाहीं. या मूर्तीच्या उजव्या खालच्या हातांत गदा, उजव्या वरच्या हातांत चक्र, डाव्या वरच्या हातांत शंख व डाव्या खालच्या हातांत (हाताच्या तळावर) पद्म आहे. आतां वर दिलेल्या कोष्टकांत गचशप या सारणीचीं मूर्ती कोणती हें पाहिलें तर—एकमतानें माधवाच्या मूर्तीचा क्रम वरीलप्रमाणें येत असल्यामुळें—उपर्युक्त विष्णूची म्हणून म्हटली जाणारी मूर्ती शास्त्रतः माधवाची ठरेल. थोरले माधवराव यांच्या नांवावरून माधवाची मूर्ति बसविण्याची कल्पना सुचली कीं काय हें पाहिलें पाहिजे.

याच पर्वतीच्या टेकडीवरील देवदेवेश्वराच्या भोंवतीं असलेल्या पंचायतनापैकीं ईशान्येस असलेली व विष्णूची म्हणून समजली जाणारी मूर्तीही शास्त्रतः विष्णूची नाहीं. या मूर्तीच्या उजव्या खालच्या हातांत (= तळ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातावर) कमळ, उजव्या वरच्या हातांत चक्र, डाव्या वरच्या हातांत शंख व डाव्या खालच्या हातांत गदा आहे. म्हणजे या मूर्तीच्या हातांतील आयुधांची सारणी पचशग अशी झाली. आतां वरील कोष्टकांत ही सारणी जनार्दन या नांवापुढें आहे. वृद्धहारीतस्मृतीमध्यें या सारणीची मूर्तीच नाहीं आणि जनार्दन व केशव यांची सारणी एकच म्हणजे पशचग अशी आहे. अर्थात् ही मूर्ती जनार्दनाची झाली. नानासाहेब पेशव्यांना जनार्दन नांवाचा एक भाऊ होता त्याच्या नांवावरून ही मूर्ति तयार करण्याची कल्पना सुचली नसेल ना ?

पारनेर (जि. नगर) येथील नारो बाबाजी अभ्यंकर यांच्या विठोबाच्या देवळाच्या जोत्यास टेकवून कांहीं मूर्ती उभ्या केल्या आहेत त्यांत एक विष्णुमूर्तिही आहे. तिच्या उजव्या वरच्या हातांत शंख, उजव्या खालच्या हातांत पद्म, डाव्या वरच्या हातांत चक्र व डाव्या खालच्या हातांत गदा आहे. याशिवाय उजव्या बाजूस गरूड असून डाव्या बाजूस स्त्री (लक्ष्मी ?) आहे. ही मूर्ती उभी आहे. आतां वर दिलेल्या कोष्टकाप्रमाणें या मूर्तीचा विचार केला व पशचग ही सारणी कोणत्या मूर्तीस येते हें पाहिलें तर ती केशवाची आहे असें ठरेल. वृद्धहारीताप्रमाणें हीच मूर्ति—केशव व जनार्दन यांची सारणी वृद्धहारीतांत एकच असल्यामुळें—जनार्दनाचीही ठरेल; पण तसें ठरविण्यास इतरांचा स्पष्ट विरोध आहे. लक्ष्मीनारायणः ही मूर्ती लातूर येथें गांवाबाहेर सिद्धेश्वराच्या देवळांत आहे. ही गरुडावर बसलेली असून हिच्या डाव्या मांडीवर एका हातांत महालुंग घेतलेली व दुसरा हात विष्णूच्या खांद्यावर टाकलेली अशी लक्ष्मी आहे. विष्णूच्या हातांत क्रमानें शंख, कमल, गदा हीं तीन आयुधें असून चौथा हात मोडला आहे. हा आयुधक्रम नारायण या मूर्तीचा असल्यामुळें हीस आपण लक्ष्मी—नारायण असें म्हणूं. माधव : ही मूर्ती लातूर येथेंच गांवाबाहेरील भीमाशंकराच्या एका लहानशा देवळांत आहे. हिच्या उजव्या अंगास उभा गरूड व डाव्या अंगास उभी चौरीधर स्त्री आहे. हिच्या चार हातांत अनुक्रमें गदा, चक्र, शंख, कमल अशीं आयुधें आहेत. आयुधांचा क्रम पाहतां ही मूर्ती माधवाची ठरते. हरी व केशवः मंगळवेढें गांवाबाहेर तुकाईच्या देवळाजवळ बाहेरच्या अंगास आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंडोबाचे देवळाच्या गाभाऱ्यांत शिरतांना डाव्या अंगच्या बाजूस अशा दोन ठिकाणीं दोन उभ्या चतुर्भुज विष्णुमूर्ती आहेत. पहिल्या मूर्तीच्या शेवटच्या तीन हातांत चक्र, कमलकलिका, गदा या वस्तू असून पहिला हात भग्न आहे. या मूर्तीच्या पायापाशीं उजव्या बाजूस लहान लक्ष्मी आहे. दुसऱ्या मूर्तीच्या चार हातांत कमल, शंख, चक्र, गदा या वस्तू असून पावलाच्या उजव्या बाजूस गरूड व डाव्या बाजूस लक्ष्मी अशा दोन लहान मूर्ती आहेत. वरील तक्त्याप्रमाणें पहिली मूर्ती हरीची ठरून दुसरी केशवाची म्हणतां येईल'. लक्ष्मीकेशव : याचें देऊळ रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूण तालुक्यापैकीं विवली या गांवीं आहे. मूर्ती काळ्या पाषाणाची आहे. हिचे उजव्या बाजूच्या खालचे हातांत कमल आहे; उजव्या वरच्या हातांत शंख, डाव्या वरच्या हातांत चक्र व खालच्या हातांत गदा आहे. या मूर्तीच्या उजव्या खालच्या बाजूस एक चौरीधर स्त्री आहे. ही मूर्ती सारणीप्रमाणें केशवाची ठरते व हल्लीं तीस–कडेस लक्ष्मी असल्यानें–लक्ष्मी केशव असेंच म्हणतात. खटाव (सातारा) येथें जवळ जवळ अशीच मूर्ती आहे. फरक इतकाच कीं, उजवा खालचा हात अभयमुद्रेचा व तळहातावर कमळ काढलेला आहे आणि देवाच्या पाठीमागें एक प्रभावळ असून तीवर मत्स्यादि कल्क्यन्त दशावतारांचीं चित्रें काढिलीं आहेत. मात्र नेहमीच्या क्रमाविरुद्ध परशुरामाचे अगोदर रामास स्थान दिलें आहे. हातांतील आयुधांच्या क्रमाचा विचार केला तर हीही केशवाची ठरेल. पण तिला सध्यां नारायणाची मूर्ती म्हणतात हें खरें.

वरील सर्व विवेचन वाचून एखाद्यास असें वाटेल कीं, मध्ययुगांत लोक विष्णुमूर्तींच्या बाबतींत खरोखरच इतका बारकावा पहात होते कीं ग्रंथकारांची बौद्धिक कसरत आहे ही सर्व ? पण असा संशय घेण्याची जरूरी नाहीं. मी वर ज्या मूर्ती वर्णन केल्या त्यांपैकीं कित्येक अर्वाचीन आहेत व कित्येक मध्ययुगीन मूर्तीवर दुर्दैवानें लेख नाहींत. पण जमखंडी संस्थानांतील कुंदगोळ गांवीं मराठी शाळेच्या जोत्यास जुन्या देवळांतील ज्या कित्येक मूर्ती आणून बसविल्या आहेत त्यांपैकीं दोन विष्णुमूर्तीवर वामन आणि

१ मराठा ता. ८।३।३६ चा अंक पृ. १०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



५ चंदेरी–ग्वालेर ब्रह्मा–शिव–वराह

६ पागन– ब्रह्मदेश ब्रह्मा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दशावतार

इंडियन म्यूझियम–कलकत्ता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जनार्दन अशीं प्रत्यक्ष नांवेंच घातलीं आहेत'. तसेंच विजयनगर येथील विठ्ठलस्वामीचे देवळाच्या नैऋत्य कोपऱ्यांतील सभामंडपांत 'शंखरुशण' नांव असलेली एक विष्णुमूर्ती पडली आहे[२]. यामुळें वरील भेद केवळ ग्रंथिक होते कीं काय या शंकेस जागाच रहात नाहीं.

अवतार

विष्णुमूर्तींचा दुसरा वर्ग म्हणजे त्याचे अवतार होत. हे अवतार सामान्यतः दहा समजत असले तरी ग्रंथांतरीं हे कधीं १८ तर कधीं २२ म्हणून सांगितले असून क्वचित् ही संख्या आणखीही वाढविली जाते. तसेंच या संख्यांची पूर्ती करण्यासाठीं ज्या नामावली दिल्या आहेत त्यांमध्येंही फरक आहे. उ. मत्स्यपुराणानें यज्ञ, नरसिंह, वामन, दत्तात्रेय, मांधातृ, परशुराम, राम, वेदव्यास, बुद्ध, कल्कि असे दहाच अवतार सांगितले असले तरी त्यांच्या नांवांत व मत्स्यादि सामान्य नामावलींत फरक आहे'. शिवाय देवदैत्यांचीं भांडणें बारा झालीं असें त्यांतच विधान असल्यानें त्यास बारा अवतार अभिप्रेत होते कीं काय अशी शंका येते[३]. विष्णुधर्मोत्तरांत सर्व अवतारांचें एकत्र परिगणन केलें नसलें तरी हंस, मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, त्रिविक्रम, परशुराम, राम, बलराम, कृष्ण, व्यास, दत्तात्रेय, पृथु, मोहिनी, कपिल, हयग्रीव, नरनारायण, धन्वंतरि अशा एकोणिसांचीं रूपें कशीं असावीं हें त्यांत सांगितलें आहे[४]. पैकीं वामन व त्रिविक्रम हे एकच समजलें तरी निदान १८ अवतार विष्णुधर्मोत्तराला अभिप्रेत आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. यांत बुद्ध व कल्कि यांचा उल्लेख नाहीं हें ध्यानांत घेण्याजोगें आहे. भागवतांत एके ठिकाणीं क्रमानें कुमार, वराह, नारद, नरनारायण, कपिल, दत्तात्रेय, यज्ञ किंवा सुयज्ञ, ऋषभ, पृथु, मत्स्य, कूर्म, धन्वंतरि, मोहिनी, नरसिंह, वामन, परशुराम, वेदव्यास, राम, बलराम, कृष्ण, असे वीस अव-

१ मराठा ता. १६।२।३६ चा अंक. २ विजयनगर स्मारक ग्रंथ—मराठी आवृत्ति पृ. ३५६. ३ अ. ४७।२३७. ४ हें विधान मी सर्व पुस्तक पाहून केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तार झाले आणि बुद्ध व कल्कि असे दोन व्हावयाचे मिळून बावीस अवतार सांगितले आहेत[1]. तर दुसरे ठिकाणीं दिलेल्या नामावलींत इतरांबरोबर हयग्रीव, वरदराज (गजेंद्रमोक्षक), हंस हीं नांवें देऊन नारद, मोहिनी हे अजी गाळले आहेत आणि बलराम व कृष्ण एक करून संख्या बावीसच ठेविली आहे[2].

प्रत्यक्ष शिल्पांत क्वचित् कृष्णाची जागा बलरामास दिलेली आढळते. उ. कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियममध्यें असलेल्या दशावतारपट्टामधें कृष्णाच्या जागीं बलराम खोदला आहे हें त्याच्या हातांतील नांगर, मुसळ या आयुधांवरून व डोक्यावर असलेल्या नागफणांच्या छत्रावरून उघड होतें[3].

गीतेमधील 'परित्राणाय साधूनां' हा प्रसिद्ध श्लोक अवतारकल्पनेच्या बुडाशीं आहे. या श्लोकांत साधूंचें परित्राण, दुष्कृतांचा नाश व धर्माची स्थापना या तीन गोष्टी प्रत्येक अवतार करीत असतो किंवा ज्याच्या हातून या तीन उत्कटत्वानें सिद्धीस गेल्या त्यास अवतार म्हणण्यास हरकत नाहीं, म्हटलें गेलें व म्हणावें असें सांगितलें आहे. पण ही कल्पना अवतारत्व ठरविण्याची कसोटी बनविल्यास वर अवतारांची यादी दिली आहे तीमधील हंस, कुमार किंवा पुरुष, नारद, ऋषभ, व्यास, बुद्ध यांना अवतार कां म्हणावें याचा नीट उलगडा होत नाहीं. हयग्रीव, नरनारायण, कपिल, यज्ञ, पृथु, धन्वंतरि यांच्या अवतारत्वाविषयीं संशय येतो. इतर अवतारांविषयीं चिंतनीय असा खुलासा करणाऱ्या कथा तरी निदान आहेत. कोणताही अवतार घेतला तरी त्याची हकीकत सांगणाऱ्या अनेक कथा उपलब्ध

---

१ प्रथम स्कंध तिसरा अध्याय श्लोक १६–२५. २ दुसरा स्कंध ७ वा अध्याय. ३ ईइस्कूमिस्क प्रप ४९ ए. ह्या पट्टांत आणखीही कांहीं वैशिष्ट्यें असल्यानें त्याचें चित्र मुद्दाम या पुस्तकांत दिलें आहे (क्र. ७). यांत मत्स्य व कूर्म प्राणिरूपानें, वराह व नरसिंह अर्धमनुष्यरूपानें आणि पुढील सर्व मनुष्यरूप दाखविले आहेत. वामन द्विभुज व छत्रधारी असला तरी खुजा व मोठ्या पोटाचा नाहीं. वामनानंतर बाणांचा भाता व बाण यांसह द्विभुज राम असून रामानंतर परशुधारी व कटिहस्त असा द्विभुज परशुराम आहे. बुद्ध बौद्धमूर्तिकांडानुसार काढला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतात. त्या केव्हां केव्हां विसंवादीही असतात. कांहीं अवतारांच्या कथा जर नीट ध्यानांत घेतल्या तर असें दिसतें कीं, एकाच नांवाच्या दोन तीन थोर व्यक्ती होऊन गेल्या असतात; पण त्यांचा इतिहास बराच जुना होऊन गेल्यामुळें त्यांचें पृथक्त्व लोपून सर्व कथा त्या एकाच व्यक्तीवर लादल्या जातात व तिच्या वाट्यास पुष्कळ महत्कृत्यें येऊन ती अवतार बनते. धन्वंतरि व व्यास हे या बनावाचीं दोन चांगलीं उदाहरणें आहेत. समुद्रांतून नुसता अमृतकुंभ घेऊन बाहेर येणें हें कोणीही अवतारी कृत्य समजणार नाहीं. पण कोणी धन्वंतरि सर्पविषचिकित्सेंत कुशल असल्यानें त्यानें हजारों सर्पदष्ट माणसांचे प्राण वाचविले असतील, आणखी कोणी धन्वंतरि वैद्यविद्येच्या—तत्व व उपयोग या—दोन्ही अंगांत प्रवीण असल्यानें त्याचाही जयजयकार झाला. पण हे सर्व पुराण्या जमान्यांतील असल्यानें सर्वांचें एकीकरण केलें गेलें. अशा रीतीनें पूर्वीचे अनेक धन्वंतरि आज एकरूप बनले आहेत. व्यासाचीही तीच हकीगत आहे. वेदांची व्यवस्था लावणारा व्यास, पुराणें, भागवत, जय इत्यादी सांगणाऱ्या व्यासाहून निराळा असावा. पण आज हे दोनच काय पण आणखीही एक दोन मिळून एकच व्यास बनविला आहे. दुसऱ्या कांहीं अवतारांच्या बाबतींत असेंच झालें असण्याचा संभव आहे. पण त्या सर्वांचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. येथें आपणांस त्यांच्या मूर्ती कशा कराव्या व केल्या आहेत हेंच पहावयाचें आहे. यामुळें पुढें माहिती देतांना मत्स्यादि कल्क्यन्त जे सर्वज्ञात अवतार त्यांच्या कथा गाळून फक्त अपरिचित अवतारांचीं वर्णनें त्यांजविषयींच्या कथांच्या सारासह देत आहे.

ऋषभ

हा नाभि राजा व मेरुदेवी किंवा सुदेवी यांचा मुलगा; यानें सर्वाश्रमांत श्रेष्ठ असा मार्ग दाखविला किंवा जडयोगाचें आचरण केलें; हा शांतेंद्रिय व मुक्तसंग होता; असें याचें थोडक्यांत वर्णन आहे. भागवताच्या ५ व्या स्कंधांतील ४—६ अध्यायांत याची कथा दिली असून कारण नसतां अर्हत् म्हणजे जैन धर्मातील आचार वस्तुतः याच्याच आचारांचें अनुकरण होय असें सांगितलें आहे. यावरून असें वाटतें कीं, बुध्दाप्रमाणेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जैनांचा आदि तीर्थंकर ऋषभदेव याचा अवतारांत समावेश करण्याचा हा प्रयत्न असावा. बुद्धविषयक प्रयत्न जसा बऱ्याच अंशानें सिद्धीस गेला तसा हा मात्र यशस्वी झाला नाहीं असें दिसतें. याच्या शिल्पीय वर्णनासाठीं तीर्थंकरांवरील लेख पहावा.

कपिल

गीतेमध्यें 'सिद्धानां कपिलो मुनिः (अहं)' असें अवतार–कथन प्रकरणीं वचन आहे (१०।२६). तेव्हां कपिल तपस्वी व सिद्ध (अचाट दैवी सामर्थ्याचा) असला पाहिजे. कपिल पाताळांत तप करीत असतां सगरपुत्रांनीं त्याला त्रास दिला; पण त्यानें रागानें पाहतांच ते भस्म झाले ही कथा प्रसिद्ध आहे. भागवतांत सांख्यशास्त्रप्रणेता कपिल हाच अवतार मानला आहे. पण सगरकथेंत दुष्टविनिग्रह असल्यानें तिचाच अवतारत्वाशीं संबंध लावणें युक्त आहे. एके काळीं सांख्यशास्त्र निंद्य होतें; पण आज तसें नाहीं. तरीही केवळ प्रणेता म्हणून अवतार समजणें योग्य दिसत नाहीं. वाल्मिकी रामायणाच्या उत्तरकांडांत कपिलानें रावणास हतबल केल्याचें वर्णन आहे. पण तें कांडच प्रक्षिप्त आहे असें समजतात. तेव्हां त्यामधील कथेवर आपण जोर देतां कामा नये.

विध (चचि २।१२०): पिंगट; वाहन ?; पद्मासन; चार हात व ते (१,४) योगमुद्रा व त्यांवर वट; (२,३) शंख, चक्र; जटामुकुट; लठ्ठ खांदे; मृगाजिनधारी; दाढी व जानवें; ध्यानी डोळे; हाच प्रद्युम्न. **वैन** (१।५४): पांढरा; वाहन ?; आठ हात व त्यांत (१) अभयमुद्रा (२) चक्र (३) तलवार (४) नांगर (१) कमरेवर (२) शंख (३) पाश (४) दंड; तांबडी वस्त्रें; सावित्रीयुक्त; पूर्वेकडे तोंड.

कल्कि

अपु [१] (४९।९): रंग ?; वाहन ?; हात ?; धनुष्य, भाता; म्लेच्छोत्सादी ब्राह्मण. [२] रंग ?; अश्व; हात ?; पण त्यांत खड्ग, शंख, चक्र, गदा. **पांचरात्र** (चचि १।३२८): विधप्रो. **रूम** (६ आ): रंग ?; घोडा; हात ?; तरवार उगारलेला. **विध** (चचि २।११९): रंग ?; घोडा; दोन हात; तरवार उगावलेला; क्रुद्ध; म्लेच्छोच्छेदी. **वैन** (१।४९): रंग ?;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्वमुख; नरदेह; हात ?; चक्र, शंख, तरवार, ढाल. श्रीनि(पृ. ५५): विधप्रो; फक्त रंग पांढरा.

कुमार

सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार असे चार ब्रह्मदेवाचे पुत्र होते. यांनीं अखंड ब्रह्मचर्यव्रतानें राहून तप केलें आणि नष्ट झालेल्या अद्वैत मार्गाचें पुनरुज्जीवन केलें किंवा सांख्यायनास भागवत सांगितलें म्हणून त्यांची अवतारांत गणना झाली असें भागवतांत सांगितलें आहे'. हे नेहमीं ५।६ वर्षांच्या मुलांप्रमाणें दिसतात असें यांचें वर्णन एके ठिकाणीं आलें असून शिल्पग्रंथांत यांचीं रूपें कशीं करावीं याविषयीं माहिती दिल्याचें मला कोठें आढळलें नाहीं

कृष्ण

विष्णूचा कृष्ण हा एक महत्त्वाचा अवतार आहे. या अवतारांत जितकीं अलौकिक कृत्यें विष्णूनें केलीं तितकीं दुसऱ्या कोणत्याही अवतारांत झालेलीं नाहींत. यामुळें त्याची या अवतारांतील रूपेंही पुष्कळ आहेत. शिवाय कृष्ण म्हणजेच वासुदेव हें समीकरण असल्यानें वासुदेव सदराखालीं जीं वर्णनें आहेत तीं याचींच होत; पण त्यांतल्या त्यांत बालकृष्ण, गानगोपाल, कालियमर्दन, गोवर्धनधारी, इत्यादि त्याचीं प्रसिद्ध रूपें आहेत. केवळ कृष्णाचें वर्णन विधमध्यें (८५) आलें असून त्यांत तो सावळा व चक्रधर असावा आणि त्याच्या बाजूस नीलकमलधारी व गोरी रुक्मिणी आणि सुंदर व गरुडवाहिनी सत्यभामा असावी असें, तसेंच चचिमध्यें (२।११९) गोपाल, वेणू वाजविणारा, सांवळा, दोन हात, असें आणि श्रीनिमध्यें (पपु ५५) सावळा, दोन हात व त्यांत (१) शंख (२) चक्र, असें वर्णन आहे.

दत्तात्रेय

महारोगानें पीडिलेल्या कौशिक ऋषीस मांडव्यानें सूर्योदयापूर्वी मरण्याचा शाप दिला असतां त्याच्या पतिव्रता स्त्रीमुळें तो मेला तर नाहींच; पण सूर्य

१ स्कंध १ अ. ३; २।७; ३।७, ८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उगवेनासा झाल्यामुळें चराचर व देव भीतिग्रस्त झाले. तेव्हां त्या स्त्रीस प्रसन्न करण्यासाठीं ब्रह्माविष्णुमहेशांनीं अत्रिपत्नी अनसूयेची आराधना केली. तिनें आपल्या प्रभावानें कौशिकास जिवंत ठेवून कौशिकपत्नीस प्रसन्न केलें व सूर्योदय करविला. देव प्रसन्न झाले व अनसूयेच्या इच्छेप्रमाणें ब्रह्मेशानजनार्दनांनीं तिच्या पोटीं दत्तरूपानें जन्म घेतला. देवदैत्यांचें भांडण लागलें असतां देव पळून दत्तात्रेयाच्या आश्रमांत आश्रयासाठीं आले. दैत्य पाठलाग करीत आश्रमांत घुसले. तेथें दत्तात्रेयाची सुंदर पत्नी लक्ष्मी हिला पाहतांच त्यांनीं देवांचा पाठलाग सोडला व लक्ष्मीस डोक्यावर बसवून घेऊन जाऊं लागले. तोंच देवांनीं दत्तात्रेयाच्या साह्यानें त्यांशीं युद्ध करून त्यांचा पराभव केला व लक्ष्मीही परत आली. मार्कंडेय पुराणांत अशी कथा आहे (अ. १६–१८). तसेंच अत्रिऋषीनें पुत्रप्राप्तीसाठीं उग्र तप केल्यामुळें त्याच्या मस्तकांतून त्रैलोक्यदाहक ज्वाला उत्पन्न झाल्या. त्यांची शांति होण्यासाठीं देवत्रयीस अनसूयेच्या पोटीं जन्म घ्यावा लागला अशी ही कथा आहे. दोन्ही ठिकाणीं विष्णूच्या अंशाचा पुत्र तोच दात्तात्रेय आहे. दोन्ही कथांत विष्णूचें देवत्राणाचें अवतारकार्य अनुस्यूत आहे हें सांगावयास नकोच. याच्या चरित्राविषयीं ज्या निरनिराळ्या हकीकती आहेत त्यांवरून हा एखाद्या गुप्त पंथाचा चालक असावा असें वाटतें. शैवांत ज्याप्रमाणें लाकुलीश, कापालिक, अघोर, नाथ, इत्यादी कमीजास्त प्रमाणांत गुप्तमार्गी, घोर व लौकिकदृष्ट्या अनाचारी, तांत्रिक क्रियामय, हटयोगप्रधान पंथ आहेत, त्याप्रमाणें किंवा शाक्तांच्या वामाचारी मार्गासारखें या पंथाचें स्वरूप असावें. अर्थात् हा वैष्णव पंथ होय. इतर मार्गाप्रमाणें याचें ध्येयही आत्मज्ञानाचा अनुभव हेंच आहे. एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी हे याच मार्गाचे अनुयायी होते असें दिसतें. याची निरनिराळ्या ग्रंथांतून जीं ध्यानें वर्णिलीं आहेत तीं, या मार्गाच्या ध्येयास अनुरूप अशींच आहेत. मला याचीं उणीपुरीं फक्त तीनच वर्णनें मिळालीं असून त्यांचा सारांश येथें देत आहे.

अपु (४९।२७): रंग ?; वाहन ?; दोन हात; पण त्यांत ?; डाव्या मांडीवर श्री. **दत्तात्रेयकल्प** (श्रीनि पृ. ६०): पांढरा; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) व्याख्यान–मुद्रा (२) कमळ (३) कमळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) गुडघ्यावर ठेवलेला; अर्धे मिटलेले डोळे. विध (८५।८३): वाल्मीकिरूप=जटांनीं जणूं न दिसणारा; लठ्ठही नव्हे, कृशही नव्हे.

दत्तात्रेयाचीं प्राचीन शिल्पें माझ्या तरी चांगलीशीं ध्यानांत येत नाहींत. कै. गोपिनाथराव यांच्या मतें ब्रह्माविष्णुमहेश एकमेकाच्या संगतीनें काढणें हा दत्तात्रेयमूर्तीचा एक प्रकार होय. योगीश्वर विष्णू काढून त्याच्या आसनावर हंस, गरूड व नंदी अशीं तिन्ही वाहनें दाखविणें हा दुसरा प्रकार आहे आणि तिसरा प्रकार म्हणजे ब्रह्माविष्णुमहेशांचें संयुक्त रूप करून खोदणें हा होय[1]. मला हें मत नीटसें पटत नाहीं. यामुळें मी ब्रह्माविष्णुमहेश या मूर्तीचें स्वतंत्र वर्णन दिलें आहे. तीन देव जवळजवळ काढण्यानें दत्तात्रेय अभिप्रेत होईल असें वाटत नाहीं. दुसऱ्या प्रकारचें फक्त एक उदाहरण येथें देतों. ही दत्तात्रेयमूर्ती बदामी येथें असून ती योगासनी आहे. हिच्या वरच्या दोन हातांत चक्र व शंख या वस्तू आहेत आणि खालचे दोन्ही हात मांडीवर एकावर एक उताणे, डावा खाली व उजवा वरती अशा तऱ्हेनें, ठेविले आहेत. मात्र उजव्या हाताची व्याख्यानमुद्रा आहे. बैठकीवर डावीकडून उजवीकडे अनुक्रमें गरूड, नंदी व हंस असे तिन्ही प्राणी आहेत. दत्तात्रेय हा विष्णूचा अंश आहे; तेव्हां ही मूर्ती विष्णूच्या अंशाची म्हणण्यास गरुडास निदान मध्यस्थानीं खोदावयास पाहिजे होतें. या मूर्तीच्या प्रभावळीवर मात्र मत्स्यादि कल्क्यंत दशावतार खोदले आहेत.[2]

धन्वंतरि

देवदैत्यांनीं अमृतासाठीं समुद्रमंथन केलें असतां जीं चौदा रत्नें निघालीं त्यांपैकीं अमृतपूर्ण कुंभ घेतलेला धन्वंतरि हा एक आहे. पण येवढ्यानें त्यास भागवतांत अवतारत्व कसें दिलें गेलें तें समजत नाहीं. ब्रह्मवैवर्तांत सर्पदेवता मनसा व धन्वंतरि यांची कथा आहे तीवरून तो सर्पविषचिकित्सेंत प्रवीण होता असें दिसतें. सर्पविष प्राणहारक असल्यानें सर्प हे एक प्रकारें राक्षसच होत. तसेंच निरनिराळे रोग हेही वरील अर्थानें राक्षसच. धन्वंतरीच्या कथांवरून तो वैद्यविद्यापारंगतही असावा असें दिसतें. तेव्हां त्याजपाशीं अमृतघट असणें, त्याचे सर्पविषावरील उतारे व त्याचे

१ इहिइ खंड १।२५२. २ इहिइ खंड १।२५४ प्रप ७३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगहारक उपाय या तिन्ही गोष्टीमुळें त्याच्या ठिकाणीं अवतारत्व कल्पिलें असावें असा तर्क आहे. केवळ क्षीरसमुद्रांतून तो अमृतकुंभासह बाहेर आला येवढ्यावरून त्यास अवतार समजणें युक्त नाहीं.धन्वंतरीचीं ग्रंथिक वर्णनें आढळलीं तीं पुढें दिलीं आहेत. ससूमधील वर्णन इतकें अशुद्ध आहे कीं, मला तरी त्यांतून कांहीं अर्थ काढतां आला नाहीं. कोणास काढतां आल्यास पहावा.

भाग (८।८।३१) : सावळा; पिवळीं वस्त्रें; अमृतपूर्ण कलशधारी. **मपु** (२५१।५) : अमृतपूर्ण कमंडलुधारी. **विध** (७३।४१) : दोन्ही हातांनीं अमृताचा कलश धरणारा; सुरूप. **विपु** (१।९।३६) : मपुप्रमाणें. **शिर** (२३।१३,१४,३६) : [१] तेजस्वी; चार हात व त्यांत (१) कमल (२) अभयमुद्रा (३) अमृतघट (४) शस्त्रयंत्र; पीत वस्त्र. [२] निळा; हात ?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र (३) जळू (४) अमृताचा रत्नजडित कुंभ; पीत वस्त्र; डोक्यास पातळ वस्त्र; तेजस्वी. [३] दोन हात व त्यांत (१) अमृतघट (२) जळू; प्रकाशवलयी; मनोहर. **ससू** (७७।४७):अनर्थक.

ज्यांना निश्चयानें धन्वंतरी म्हणतां येईल अशा मूर्ती माझ्या माहिती प्रमाणें कोठें नाहींत किंवा जास्त बरोबर बोलावयाचें म्हणजे ग्रंथिक वर्णनांशीं अंशतः कां होईना जुळेल अशी मूर्ती माझ्या आढळांत नाहीं. मात्र मी ज्यांना धन्वंतरीच्या मूर्ती म्हणतों अशा दोहोंचीं वर्णनें येथें देतों. पहिली मूर्ती भारत इतिहास संशोधक मंडळांत आहे. हिच्या डोक्यावरें प्रथम तीन फण्यांचा व त्याखालीं पंधरा फण्यांचा असे दोन नाग आहेत; शिवाय केसांचे झुबके आहेत. तोंड हसरें, हनुवटीस दाढी आणि पोट किंचित् मोठें व वळी पडलेलें आहे. याच्या डाव्या हातांत नाग आहे व उजवा हात भग्न असला तरी त्यांत बटवा असावा असें वाटतें. कारण जणूं खांद्यावर टाकलेल्या बटव्याच्या तोंडाचा पुढचा भाग धरलेला दिसत आहे. मुठीच्या खालीं बटव्याचा मेरुमणि व त्यांतून बाहेर आलेलीं दोऱ्यांचीं टोकें सुव्यक्त आहेत'. दुसरी मूर्ती खुजी, कुरळ्या केसांची, उभी,

१ मूचि ८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९ सरीशदाह २४ परगणा
नरसिंह

धन्वंतरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



१० मनोरा–मध्यभारत नरसिंह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डाव्या हातांत नाग व उजव्या हातांत औषधांनीं ठासून भरलेली पिशवी या वस्तू घेतलेली आहे[1].

नरनारायण

हे धर्माचे मुलगे. यांनीं आत्मशांतीसाठीं अतिशय घोर तपश्चर्या केली. इंद्रानें यांच्या तपाचा भंग करण्याचा प्रयत्न केला; पण तो साधला नाहीं. यांनीं दंभोद्भव नांवाच्या एका गर्विष्ट अहंमन्य सार्वभौमास कसें पराजित केलें ती कथा उद्योगपर्वांत आली आहे (अ. ९६). त्या कथेचें देवी-भागवतांतील प्रल्हादकथेशीं बरेंच साम्य आहे. पण दंभोद्भवकथेंत अवतारत्वाचें जसें बीज (दुष्टनिग्रहरूपानें) आढळतें तसें प्रल्हादकथेंत आढळत नाहीं. यांचीं २।३ ग्रंथिक वर्णनें पुढें देत आहे.

अपु (४९।१३): नारायण=अनिरुद्ध. **चाचि** (१।२८४): नारायण: निळा; चार हात व त्यांत डावे हात (१) शंख (२) चक्र; उजवा हात (३) महापद्म (गदा पद्म ?); डाव्या बाजूस वीणाधर श्री; उजव्या बाजूस पद्मधारी मुष्टि. **मभा** (शाप): तेजस्वी; जटामंडल; चार वृषण; ६० दांत; ८ सुळे. **विध** (७६।२): नर=हरि: सावळा; दोन हात व त्यांत अक्षमाला. नारायण = कृष्ण: निळा; चार हात व त्यांत अक्षमाला. दोहोंना सामान्य: कृष्णाजिन; जटामंडलें; अष्टचक्र रथ; एक पाय रथांत व एक पाय गुडघ्यावर. नरनारायणांमध्यें फलांनीं युक्त बदरीवृक्ष ?[2]. **शिर** (२३।२): पिवळा; कमलासन; हात ?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र; केयूर, किरीट, मकरकुंडलें, हार.

नरसिंह

सामान्य-आचि (३।१।७४२): [१] नील, शुभ्र, पीत, रक्त ?; वाहन ?; आठ हात व त्यांत (१, ८) खड्ग व ढाल घेतलेल्या हिरण्यकशिपूचें

---

१ या दोन्ही मूर्तींचीं वर्णनें व त्यांवरील चर्चा यांसाठीं पहा भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष १६ अंक ४ पृ. ९७ आणि आर्किऑलॉजीच्या वेस्टर्न सर्कलचा १९१९-२० सालचा प्रोग्रेस रिपोर्ट पृ. ८८. २ दोहोंमध्यें बदरीवृक्ष असल्यास ते एकाच रथांत बसूं शकणार नाहींत. मग प्रत्येकास स्वतंत्र रथ कल्पावा लागेल. कां बदरी नांवाची कोणी स्त्री आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोट फाडणारे (४, ५) आतडयांच्या माळा धारण करणारे (२, ३) चक्र, कमळ (६, ७) गदा, शंख; सिंहमुख. [२] शुभ्र; बैठा; दोन हात; पण त्यांत ?; सिंहमुख. [३] रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत (१) चक्र (२) कमल (३) गदा (४) शंख; हात आजानु लंब; सिंहमुख. **अपु** (४९।४,१७): [१] रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत चक्र, गदा; डाव्या मांडीवर राक्षस, त्याची छाती फाडणारा (बहुधा दोन हातांनीं), तोंड पसरलेला. [२] रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत (२, ३) शंख, चक्र (१, ४) विदारित महासुर. **पांचरात्र** (चचि १।३२८, श्रीनि पृ. ५४) : लाल; हात ?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र (३,४) डाव्या मांडीवरील राक्षसाची छाती फाडणारे; सिंहाचें मुख; मनुष्याचे अवयव; भयंकर दाढा: लळलळणारी जिव्हा; वाटोळे डोळे; आयाळ; आलीढासन; लठ्ठ छाती. **मपु** (२५९।२,२६०।३१): रंग ?; सिंहासन; आठ हात; पण त्यांत ?; फक्त खड्ग व ढाल धारण करणाऱ्या दैत्यास फाडणारा; राक्षसः आंतडीं बाहेर आलेला, रक्त ओकणारा, कधींकधीं युद्ध करणारा आणि दमलेल्या राक्षसांकडून भय दाखविला जाणारा. **रूपा–म** (२० आ, ६ आ): रंग ?; वाहन ?; सिंहमुख; मोठया दाढा; वाकडया मांडया; हिरण्यकशिपूस दोन हातांनीं फाडणारा. **विध** (७८।१२): [१] नील; आलीढ; सिंहासन; हात ? ; पण त्यांत शंख, कमल; गुडघ्यावर असलेल्या हिरण्यकशिपूस नखांनीं फाडणारे हात; गदांवर दोन हात; ज्वालांचें आयाळ; हिरण्यकशिपुः नील. [२] नील; वाहन ?; हात ?; पण त्यांत शंख, चक्र, गदा, पद्म; सर्व हत्यारांसह पण अलंकाररहित. **शिर** [१] (२३।७): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) शंख (३,४) बहुधा मांडीवर घेतलेल्या दैत्यास फाडणारे. [२] (२३।९): नाभीखालीं तांबडा व वर पांढरा; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) शंख (३) पाश (४) अंकुश (५) वज्र (६) गदा. विक्राळ तोंड. [३] (२५।११७): अचिप्रमाणें. **ससू** (७७।३९): रंग ?; वाहन ?; भयानक.

केवल–वैन (इहिइ १।३३): रंग ?; उत्कुटिकासन; पद्मपीठ; चार हात व त्यांत (२,३) शंख, चक्र (१,४) गुडघ्यावरून पुढें.

गिरिज–वैन (इहिइ १।३२): [१] धवल; सिंहासन; सव्य ललितासन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चार हात व त्यांत (१) अभय (२) शंख (३) चक्र (४) कमरेवर किंवा मांडीवर; तांबडें वस्त्र; करंड मुकुट. उजवीकडे श्री: सव्य ललितासन; डाव्या हातांत पद्म, उजवा हात आसनावर; गोरी. डावीकडे भू: वाम ललितासन, उजव्या हातांत उत्पल, डावा हात आसनावर; श्याम. [२] रंग ?; वाहन ?; वाम ललितासन; हात ?; पण त्यांत (१) उजव्या गुडघ्यावर सोडेप्रमाणें उजवा हात (२) डावा हात मांडीवर (३) शंख (४) चक्र; देवीसह.

यानक-वैन (इहिइ १।३६): रंग ?; शेषाच्या मांडीवर; शेषाचे पाच फणे डोक्यावर; चार, आठ किंवा सोळा हात; त्यांत शंख, चक्र; दैत्यवधी.

स्थौण-वैन (इहिइ १।३४): श्वेत; सिंहासन; सव्य ललितासन; चार हात व त्यांत (१) अभय किंवा दान (२) शंख (३) चक्र (४) छातीवर; तीक्ष्ण दाढा; रक्त वस्त्र; उजव्या बाजूस श्री, नारद; डाव्या बाजूस प्रल्हाद, भू; अष्ट दिशांस लोकपाल.

विदरण-शिर (२३।८): लाल; अनेक बाहूंनीं दैत्यास फाडलेला.

हिरण्यकशिपूला फाडणाऱ्या नरसिंहमूर्ती पुष्कळ आहेत. पण केवल व यानक नरसिंहाच्या मूर्ती लोकांच्या सहज ध्यानांत येत नसल्यानें त्यांचें वर्णन येथें प्रथम देतों. पेड्डु मुडियम् येथील प्रसिद्ध शिलापट्टांत असलेला नरसिंह उभा, दोन हातांचा व ते मांडीस लावलेला, जानवें, कंठा, मुकुट, मणिबंध इत्यादि अलंकार असलेला व धोतर नेसलेला आहे. या नरसिंहाच्या शिल्पांत हिरण्यकशिपूचा मागमूसही नाहीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे[1] एका गुप्तकालीन मुद्रेवर काढलेला नृसिंह सन्मुख व सव्य ललितासन घालून उंच सिंहासनावर बसला आहे. त्याचा उजवा हात उद्धृत व डावा कमरेवर आहे.[2] चंबा संस्थानांतील एक नृसिंहमूर्ति भद्रासनी व चार हातांची आहे. खालचे दोन हात, पंजे एकावर एक ठेवून, तोंडापाशीं व वरचे दोन हात, पंजे आंत वळवून, खांद्यांजवळ नेलेले आहेत[3]. केवल नरसिंहाची हळेबीडु येथील मूर्ती मनोरंजक आहे. ती सिंहासनावर उत्कु-

१ ऑसइऑरि १९०५-०६ पृ. १३० प्रप ५२।१. २ कित्ता १९१३-१४ पृ. १३३ प्रप ४६।१०१. ३ अॅचंस्टे प्रप ८ बी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिकासन घालून बसलेली असून पायांच्या नडग्या व कमर योगपट्टानें आवळून टाकिली आहेत. हिच्या वरच्या दोन हातांत अनुक्रमें चक्र व शंख हीं आयुधें असून खालचे हात गुडघ्यावरून खालीं सोडलेले आहेत. मूर्तीच्या उजव्या डाव्या अंगास लक्ष्मी व गरूड यांच्या मूर्ती आहेत[1]. जवळजवळ अशाच तऱ्हेची मूर्ती मद्रास म्यूझियमचे धातुमूर्तीच्या कॅटलॉगमध्यें दाखल आहे. फक्त हींत गरूड व लक्ष्मी यांचा अभाव आहे.[2] बादामी येथील केवल नरसिंह उभा व चतुर्भुज आहे आणि त्याच्या तीन हातांत अनुक्रमें कमल ?, चक्रपुरुष ?, शंखपुरुष ?, असून चौथा हात उभ्या गदेच्या दांडयावर ठेवला आहे. याच्या वरच्या बाजूस गंधर्वमिथुनें व लक्ष्मी इत्यादि व्यक्ती असून पायांच्या दोन्ही अंगास एक गण व गरूड आहेत[3].

यानक नरसिंहाचें सामान्य उदाहरण वेरूळमधील गुहांत पहावयास सांपडतें. यांत अष्टभुज नरसिंह हातांतील आयुधें उगारून हिरण्यकशिपूवर धाऊन जाऊन त्यास पकडीत आहे असें दाखविलें आहे. पण दुर्दैवानें ही मूर्ती अस्पष्ट व भग्न झाली आहे[4]. हीहून उत्कृष्ट मूर्ती मध्यभारतामध्यें मनोरा येथें आहे. ही प्रत्यालीढासनी असून चार हातांपैकीं डाव्या खालच्या हातानें कोलमडणाऱ्या हिरण्यकशिपूचें पोट फाडीत असून, डाव्या वरच्या हातांत चक्र धारण करीत आहे. हिच्या उजव्या हातांत कोणत्या वस्तू आहेत हें समजत नाहीं. उजव्या पायाखालीं आणखी एक राक्षस तुडविला गेला आहे. दागिन्यांची कमतरता, स्वाभाविक ढब, वगैरेवरून ही मूर्ती मध्ययुगाच्या आरंभीची समजण्यास हरकत नाहीं.[5]

सामान्य नृसिंह मूर्तीचीं उदाहरणें पाहिजे असल्यास तीं अशीं— विक्रमपूर (ढाक्का) येथील नरसिंह मूर्ती विश्वपद्मावर डाव्या पायानें राक्षसास तुडवीत प्रत्यालीढासनानें उभी असून आपल्या खालच्या दोन हातांनीं मांडीवर घेतलेल्या हिरण्यकशिपूचें पोट फाडीत आहे. त्या वरच्या दोन हातांनीं हिरण्यकशिपूचे पाय व शेंडी धरली आहे. त्याही वरचे

१ इहिइ खंड १ प्रप ४२. २ प्रप ५।१, २. ३ मेआसइ क्र. २५ प्रप १८ ए; पृ. ३७. ४ इहिइ खंड १ प्रप ४४; आसवेइ व्हॉ. ५ प्रप २२।१. ५ मेआसइ क्र. २३ प्रप २८ बी; मूचि १०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन हातांपैकीं एकांत जंत्रिया व दुसऱ्याची तर्जनीमुद्रा आहे. या मूर्तीस सिंहासारखे आयाळ काढिलें आहे हें योग्यच ठरतें. विश्वपद्माखालच्या बैठकीवर गरूड, शिवलिंग, बहुधा नग्न स्त्री, इत्यादि आकृति आहेत. मूर्तीचा सुंदर आविष्कार, प्रमाणबद्ध मांसलता, पायांची कृशता इत्यादींचा विचार करतां मूर्ती मध्ययुगाच्या प्रथम पादांतील खास असावी असें वाटतें[1]. सरीशदाह (२४ परगणा) येथील नरसिंह किंचित् बसला असून आपल्या चार हातांपैकीं खालच्या दोन हातांनीं मांडीवर घेतलेल्या हिरण्यकशिपूचें पोट फाडीत आहे व वरच्या दोन हातांत अनुक्रमें चक्र व शंख या वस्तू धारण करीत आहे. विस्फारित डोळे, आठ्या पडलेलें कपाळ, मोठ्या मिशा, आयाळाचीं दोन वर्तुळें, लठ्ठ अवयव, कंठा, अंगद, कटक, साखळ्या, आंगठ्या असे मेजके दागिने व स्वाभाविक नि रागीट मुद्रा या सर्वांवरून मूर्ती निदान ७ व्या ८ व्या शतकांतील ठरते. हिच्या दोन्ही बाजूस अनुक्रमें चौरीधर श्री आणि वीणाधर सरस्वती असून नरसिंहाच्या डाव्या पायाखालीं राक्षस व त्याखालीं असलेल्या विश्वपद्माच्या दोन्ही अंगास भक्त आहेत[2].

नारद

भागवतांत एके ठिकाणीं याचें अवतारांत परिगणन केलें आहे. गीतेंतही 'देवर्षीणां च नारदः' असें विधान आहे. पण नेमक्या कोणत्या नारदाविषयीं वरील उल्लेख असावा बरें? कारण नारद पुष्कळ झाले असें वाटतें. भागवतांत यानें सात्वत तंत्र उपदेशिलें हें त्याचें अवतारकर्म सांगितलें आहे. याचे स्वरूपाविषयीं शिल्पशास्त्रांत फारसे उल्लेख नाहींत. आधुनिक चित्रांत हा बहुधा तुंबरूच्या संगतीनें व वीणा घेऊन गात असलेला दाखविला जातो. फक्त नयसग्रहांत याच्या हातांत अक्षमाला व कमंडलु या वस्तू द्याव्या आणि डाव्या खांद्यावर वीणा असावा म्हणून सांगितलें आहे.[3]

परशुराम

अपु (४९।५): रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत (१, ४) धनुष्य, बाण

१ ईइस्क्रमिस्क प्रप ४६ ए. २ आसइॲरि १९२६–२७ पृ. २०९ प्रप ४३डी; मूचि ९. ३ चचि २।१०९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२, ३) खड्ग, परशु. **पांचरात्र** (चत्रि १।३२८): परशुधारी; लाल डोळे झालेला. **विध** (८५।६१): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत परशु; कृष्णाजिन. **वैन** (१।३९): लाल; वाहन ?; दोन हात व त्यांत (१) परशु (२) उद्देशहस्त; जटामुकुट; श्वेत वस्त्र; जानवें; सर्व अलंकार. **श्रीनि** (पृ. ५५) पांचरात्राप्रमाणें; डोळ्यांचा अनुल्लेख. **ससू** (७७।४०): रंग ?; वाहन ?; हात २, ४, ८; त्यांत शंख, चक्र, गदा.

पागन येथील परशुराम उभा व दोन हातांचा आहे. पैकीं उजवा हात खालीं सोडलेला पण ऊर्ध्वमुख सोटा घेतलेला आणि डावा हात कुऱ्हाडीच्या दांड्यासह छातीपाशीं आहे. मान मात्र डाव्या खांद्यावर कुऱ्हाड असल्यामुळें उजवीकडे किंचित् झुकली आहे[1].

पृथु

वेन नामक राजाच्या दुष्ट वागणुकीमुळें प्रजेचा अतिशय छळ होऊं लागला. महर्षींनीं त्यास अनेक वेळां नीट वागण्याचा उपदेश करूनही तो ताळ्यावर आला नाहीं; तेव्हां त्यांनीं त्यास ठार केलें. पण राजा नाहींसा झाल्यानें अराजक माजून तिकडूनही प्रजेचा छळ होऊं लागला. तेव्हां ऋषींनीं वेनापासून यास उत्पन्न केलें व राजा बनविलें. यानें पृथ्वीवर प्रथमच कृषिविद्या सुरू केली. त्यापूर्वी लोक गोपालवृत्तीनें राहात असावे असें दिसतें. अथर्ववेद व ब्राह्मणग्रंथ यांत याच्या राज्याभिषेकाची व त्याच्या परिणामांची कल्पना आहे. राज्याभिषेककथेवरून असें वाटतें कीं, पृथुपूर्वी केवळ बलिष्ठ मनुष्य स्वतःच्या सामर्थ्यानें राजा बने; लोकांच्या किंवा निदान विद्वानांच्या संमतीचीही अपेक्षा नसे. पण तसें झालें असतां तो दुराचरणी निघूं शके. प्रजेच्या किंवा विद्वानांच्या संमतीनें राजा झाल्यास तो तसा बनूं शकणार नाहीं; एवढेंच नव्हे तर राजा दुष्ट बनल्यास नवीन राजा स्थापन करण्याचा प्रजेस किंवा तीमधील जाणत्यांस अधिकार आहे येवढी गोष्ट या कथेंतून स्पष्ट कळते. तें कांहींही असो; लोकांचें अराजकापासून रक्षण व्हावें व ते सुखांत रहावे या हेतूनें त्याची उत्पत्ति झाली व तें कार्य त्यानें उत्तम केल्यामुळें त्याची अवतारांत गणना

१ आसइऑरि १९१२ पृ. १३७ प्रप ७९ सी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११ तुमैन–ग्वालेर बलराम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२ घेंजन—गया बुद्ध



१३ नालंदा—चतार बुद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली गेली असावी असें वाटतें. विधमध्यें (८५।६०) याचें स्वरूप चक्रवर्तीप्रमाणें असावें म्हणून सांगितलें आहे. हेंच याचें अत्यंत स्वाभाविक वर्णन होय. शिवाय जेथें जेथें वैन्य पृथूची कथा येईल तेथें तेथें याचें वर्णन सांपडण्याचा संभव आहे.

बलराम

बलराम हा कृष्णाचा थोरला भाऊ. यानेंही असुरांचा नाश करण्याचीं कृत्यें केलीं असल्यानें याची अवतारांत गणना झाली आहे. याचीं कांहीं ग्रंथिक वर्णनें येथें दिलीं आहेत. पण संकर्षण हें बलरामाचेंच रूप असल्यानें याचीं आणखी इतर वर्णनें संकर्षण प्रकाराखालीं सांपडतील. दशावतारपरिगणनांत क्वचित् कृष्णाऐवजीं बलराम घेतला जातो हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

अपु [१] (४९।६): रंग ?; वाहन ?; दोन हात व त्यांत (१) गदा (२) नांगर. [२] (४९।१२): रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत (१) चक्र (२) मुसळ (३) नांगर (४) शंख. **वृस** (५८।३६): गौर; वाहन ?; हात ?; पण त्यांत नांगर; कुंडलें. **रूम** (६ आ): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत नांगर व मुसळ. **विध** (८५।७२): गौर; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) नांगर (२) मुसळ; निळें वस्त्र; मदिराक्षी; कुंडलें. **वैन** (१।४४): श्वेत; वाहन ?; दोन हात व त्यांत (१) मुसळ (२) नांगर; रक्त वस्त्र; जटा; उजवीकडे रेवती: गोरी; पुष्पवस्त्र; उजव्या हातांत कमळ, डावा हात पसरलेला. **श्रीनि** (पृ. ५५): पांढरा; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) हल (२) मुसळ किंवा (१) नांगर (२) मद्यपात्र. **ससू** (७७।३६): रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत (१) चक्र (२) मुसळ; निळें वस्त्र.

तुमैन (ग्वाल्हेर) येथील बलराम सात फण्यांच्या एका नागाखालीं पायघोळ धोतर नेसून उभा असून त्यास असलेल्या दोन हातांत अनुक्रमें मुसळ व नांगर या वस्तू आहेत. डोक्यास रुमाल व त्यावर मोराच्या पिसांचा तुरा असून कंठा, हार, मेखला, मणिपट्ट, उपरणें इत्यादी दागिने व वस्त्रें आहेत. डोळे विस्फारित व मुद्रा कांहींशीं त्रासिक आहे[1].

---

१ आसइॲरि १९१८-१९ प्रप १३ ए; मूचि ११.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्ध

अपु (४९।८):गौर; पद्मस्थ; हात?; परंतु त्यांत (१) वरद (२) अभय; लांब कान; शांतात्मा, वस्त्रयुक्त. **पांचरात्र** (चचि १।३२८) : विधप्रमाणें **वृस** (५८।४४): रंग ?; पद्मस्थ; हात ?; पद्मांकित हात व पाय; प्रसन्न भाव; आखूड केस. **रूम** (६ आ): लाल; पद्मासन; दोन हात; दागिने व केस काढलेला; रक्त वस्त्र; ध्यानी. **विध** (चचि २।१।११९) : रंग ?; पद्मासन; दोन हात; रक्तवस्त्र; खांद्यावर चीवर; ध्यानी. **श्रीनि** (पृ. ५५): विधप्रमाणें.

घेंजन येथील बुद्धमूर्ती मांडी घालून अनुक्रमें भूमिस्पर्श व योग मुद्रांनीं बसली आहे. हिची दृष्टी अधोगामी व डोळे ईषदुन्मीलित आहेत. हिच्या डोक्यास मुकूट, गळयांत दोन कंठे, डाव्या खांद्यावरून व उजव्या बगलेंतून गेलेलें उपरणें, धोतर हे दागिने व वस्त्रें आहेत. मूर्ती फारच सुंदर आहे.[1] जौलियान (तक्षिला) येथील बुद्ध बैठा व ध्यान किंवा योग मुद्रेचा आहे. त्याच्या डोक्यावर उष्णीष अथवा कपाळावर ऊर्णा नाहीं. दोन्ही खांद्यावर मिळून उपरणें पांघरलें आहे व ठिपक्यांनीं कुरळे केस दाखविले आहेत. वस्त्र, ओठ, नाक, कान, पापण्या, बाहुली, कपाळ व हात यांवर तांबडा रंग दिला आहे. भुवया, बुबुळें व केस यांस काळा रंग दिल्याचे अवशेष आहेत.[2] नालंदा येथील उभी बुद्ध मूर्ती अंगावर पायघोळ व अत्यंत तलम वस्त्र घेतलेली आहे. हिचा उजवा हात अभयमुद्रेचा असून डाव्या हातांत कांहीं वस्तू घेतली आहे. डोक्यावर उष्णीष, कपाळावर ऊर्णा व डोळे अर्धोन्मीलित असल्यानें मूर्ती सुंदर दिसते.[3] बुद्धाचें ब्रह्मदेशांत पागन येथें सांपडलेलें शिल्प फार मनोरंजक आहे. त्यांत गरुडावर ठेवलेल्या कमळामध्यें विष्णू पद्मासन घालून बसला असला तरी त्याच्या डोक्यास मुकूट नाहीं. चेहरा ब्रह्मदेशीय बुद्धमूर्तीसारखा आहे. कानाच्या पाळ्या लांब आहेत व बुद्धधर्मीय श्रमणाप्रमाणें डोक्यास शिरोवस्त्र आहे. हात मात्र चार असून त्यांपैकीं उजवा खालचा छातीपाशीं धरला आहे. या व डाव्या वरच्या हातांतील वस्तू ओळखत नाहींत. उजव्या वरच्या हातांत चक्र व डाव्या खालच्या हातांत गदा अशा वस्तू आहेत[4].

१ एमोबिओ पृ. ४४ चि. २७; मूचि १२. २ मेआसइ क्र. ७ प्रप १९ ए. ३ एमोबिओ चि. ५९; मूचि १३. ४ ब्रॅगॉब पृ. ३८ चि. १३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४ वज्रजोगिनी–डाक्का मत्स्यावतार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



१५ ग्वालेर किल्ला कूर्मावतार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मत्स्यकूर्म

अवतारांपैकीं मत्स्य व कूर्म यांच्या आकृति मासा व कासव यांच्या सारख्याच काढाव्या असें बहुतेक सर्व शिल्पग्रंथांत सांगितलें आहे. फक्त पांचरात्रांत (चचि १।३२८, श्रीनि पृ. ५४) मत्स्य व कूर्म यांना प्रत्येकीं अनुक्रमें गदा व शंख धारण करणारे दोन हात आणि मनुष्य अथवा ते ते प्राणी यांसारखे पाय असावे म्हणून सांगितलें आहे. तसेंच विधमध्यें जनार्दनाचें एक रूप शृंगयुक्त मत्स्य असें सांगून शिवाय मत्स्यावताराचें वर्णन केलें आहे (अ. ८५). पण प्रत्यक्ष मूर्ती पाहिल्या तर त्यांत बहुधा खालचा भाग मत्स्य व कूर्म यांचा दाखवितात आणि वरचा भाग चतुर्भुज विष्णूचा असतो. यांचीं शिल्पें सहज ओळखू येत असल्यानें त्यांचीं जास्त उदाहरणें देण्याची जरूरी नाहीं. फक्त एक दोन येथें देतों.

वज्रयोगिनी (डाक्का) येथील मत्स्यावताराच्या शिल्पांत विष्णूच्या कमरेखालचा भाग माशाचा असून ऊर्ध्वांग चतुर्भुज आणि कमल (भग्न पण बहुधा), चक्र, गदा व शंख या वस्तू धारण करणारें आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूंस अनुक्रमें लक्ष्मी व सरस्वती यांच्या मूर्ती असून बैठकीच्या दर्शनी भागावर मध्यें गरूड व बाजूंस भक्तदांपत्य आहे. मूर्तीचा आविष्कार व आराखड्याचा कडकपणा लक्षांत घेतां मूर्ती मध्ययुगाच्या तिसऱ्या पादांत पडेल असें वाटतें[1]. ग्वालेरच्या किल्ल्यांत सांपडलेल्या कूर्मावतार शिल्पांत नागफणाधिष्ठित कासवाच्या पाठीवर मेरूची रवि असून तिजपुढें मांडी घालून बसलेला विष्णू आहे. रवीस वासुकीच्या दोरीनें वेढिलें असून देव व दानव तिचें एकेक टोक धरून घुसळीत आहेत. येथें विष्णूनें कूर्म व मानव अशीं दोन्ही रूपें घेतल्याचें दिसतें[2]. कमान (राजपुताना) येथील भग्न दशावतारपट्टामध्यें व सामान्यतः सर्व दशावतारपट्टांत कूर्मावतार कूर्मरूपीच काढलेला आढळतो[3].

---

१ ईइस्कूमिस्क प्रप ४८ बी; आसइऑरि १९२४–२५ पृ. १५४ प्रप ४० बी; मूचि १४. २ प्रोरिआसइवेस १९१८–१९ प्रप २४; मूचि १५. ३ कित्ता व मूचि ७.

मू. ४. .....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोहिनी

देव व दैत्य यांनीं अमृतासाठीं समुद्रमंथन केलें असतां अमृतकुंभासह धन्वंतरि बाहेर आला. तेव्हां तें अमृत कोणी घ्यावयाचें याविषयीं वाद उत्पन्न होऊन दैत्यांनीं तें पळविलें. पण तें कोणी कोणी घ्यावे याविषयीं त्यांच्या-मध्यें भांडणें सुरू झालीं. इकडे देवांच्या प्रार्थनेवरून विष्णूनें मोहिनीचें (सुंदर स्त्रीचें) रूप घेऊन दैत्यांना भुरळही पाडली व अमृत देवांना मिळवून दिलें. ही मोहिनी अवताराची प्रसिद्ध कथा आहे. या कथेंत दैत्यनिग्रह हें अवताराचें तत्त्व अनुस्यूत आहे. येथें विष्णूचें स्त्रीरूप विवक्षित आहे हें वाच-कांच्या लक्षांत येईल. या रूपाचीं ग्रंथिक वर्णनें—समुद्रमंथनाची कथा अत्यंत लोकप्रिय असल्यानें—अनेक ठिकाणीं आलीं आहेत. पैकीं एक दोनच येथें देतों.

भाग (८।८।४१): उत्पलश्याम; सुंदर, तरूण, रंगीत वस्त्र नेसलेली, दागिन्यांनीं युक्त इ. **मपु** (२५१।७): अतुल स्त्रीरूप. **विध** (८५।५९): सर्वभूषणयुक्त; हातांत अमृतघट घेतलेली.

यज्ञ किंवा सुयज्ञ

भागवतांत याचें नांव एके ठिकाणीं यज्ञ तर दुसरे ठिकाणीं सुयज्ञ असें दिलें आहे. सुयज्ञानें लोकत्रयाचें दुःख हरण केलें हेंच त्याचें अवतारकर्म. मपुमध्यें यज्ञ धर्मापासून उत्पन्न झाला असें सांगितलें आहे; तर भागवतांत तो रुचि आणि आकूति यांचा मुलगा म्हणून विधान आहे. मपुमधील यज्ञ मनुष्यरूप नसून वैदिक क्रियारूप आहे; तेव्हां तो अवतार कसा म्हणावयाचा ? मनुष्यरूप यज्ञ किंवा सुयज्ञ याचें कोठें शिल्पीय वर्णन आलेलें नाहीं. क्रिया-रूप यज्ञाचें वर्णन मात्र दोन तीन ठिकाणीं आलें असून त्यासाठीं दिक्पाल सदराखालीं अग्नीची माहिती पहावी.

राम

आचि (३।१।७३७) : रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) शर (२) चाप. **अपु** (४९।६): [१] रंग ?; वाहन ?; दोन हात व त्यांत (१) चाप (२) शर. [२] रंग ?; वाहन ?; चार हात ? व त्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१) चाप (२) शर (३) खड्ग (४) शंख. **पांचरात्र** (चचि १।३२८): आजानुबाहु, बाण व धनुष्यधारी. **रूपा** (२० आ), **रूम** (६ आ): श्याम; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) शर (२) चाप. **विध** (८५।६२, चचि २।११८): रंग ?; वाहन ?; हात ?; राजचिन्हांनीं युक्त; मुकुटविरहित; भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न वगैरेसह. **शिर** (२३।२९): [१] श्याम; वीरासन; हात ?; पण त्यांत (१) ज्ञानमुद्रा (२) गुडघ्यावर; कमलहस्ता विद्युद्वर्णी सीता. [२] श्याम; वीरासन; कल्पवृक्षाखालीं शुभ्र मंडपांत; पुष्पक विमानामध्यें. हात ?; सीतेसह; व्याख्याता हनुमान; भरतादिसह. [३] रंग ?; सिंहासन; सीता; सुग्रीवादि वानरगण; पराशर, विश्वामित्रादि मुनी सह; रत्नकिरीट व कुंडलें. [४] श्याम; वाहन ?; डावीकडे सीता, पुढें मारुति, मागें लक्ष्मण, बाजूस शत्रुघ्न व भरत; आग्नेयादि दिशेस सुग्रीव, विभीषण, अंगद, जांबवंत. [५] रंग ?; वाहन ?; हात ?; डाव्या मांडीवर सीता; डावा हात आलिंगनमुद्रेचा व सीतेच्या डाव्या स्तनावर; उजवा हात चिन्मुद्रेचा; सेवा करणारा मारुति. **श्रीनि** (पृ.५५): विधप्रमाणें. **ससू** (७७।४०): रंग ?; वाहन ?; दोन, चार किंवा आठ हात व त्यांत शंख, चक्र, गदा.

वरदराज

पुराणांतील गजेंद्रमोक्षाची कथा प्रसिद्ध आहे. गजेंद्राची नक्राच्या तावडींतून सुटका करून त्यास वर दिल्यामुळें विष्णूस वरदराज हें नांव पडलें. याचीं ग्रंथिक वर्णनें क्वचित् असलीं तरी प्रत्यक्ष शिल्पें दक्षिणेंत विशेषत: म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा यांत पुष्कळ आढळतात. उ. कै० गोपिनाथराव यांनीं आपल्या पुस्तकांत दिलेलीं वरदराजाचीं दोन्ही उदाहरणें म्हैसूर व मद्रास इलाख्यांतील आहेत.[1] पण मद्रासकडे चतुर्भुज विष्णूच्या वरच्या दोन हातांत चक्र व शंख या वस्तू आणि खालचे दोन हात अनुक्रमें वरद व कटिहस्त या मुद्रांचे असतील किंवा खालचा डावा गदेवर असेल तर त्यास वरदराज संबोधण्याचा प्रघात आहे. वरदराजाच्या या प्रकाराचीं दोन उदाहरणें मद्रास म्यूझियममधील धातुमूर्तींचा कॅटलॉग प्रसिद्ध झाला आहे त्यांत पहावयास सांपडतात.[2]

१ इहिइ खंड १ पृ. २६८ प्रप ८०. २ पृ. ६,६८; प्रप २।३,४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वराह

सामान्य–आचि (३।१।७३८): [१] रंग ?; दोन पाय व ते (१) कासवाच्या पाठीवर (२) शेषावर; चार हात व त्यांत (१) कमरेवर (२) गदा (३) दाढेनें उचललेली, कोपरावर बसलेली, नीलोत्पलधारी पृथ्वी (४) कमळ; डुकराचें तोंड. [२] मोठ्या शरीराचा डुक्कर; तीक्ष्ण दाढा वगैरे. **अपु** (४९।२,१८): [१] रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) गदा (२) चक्र (३) शंख (४) लक्ष्मी किंवा कमळ; लक्ष्मी डाव्या कोपरावर बसलेली; भूदेवी आणि शेष एकेका पायापाशीं; वराह विकल्पानें मनुष्यरूप. [२] रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत ?; पाणितले (पादतले ?) शेष व पृथ्वी; लक्ष्मी असतां धरा पायापाशीं; खुजा. **चचि** (२।११६): विध १ प्रमाणें. **पांचरात्र** (चचि १।३२७): पिंगट; चार हात; डावे कोपरावर श्री; पायापाशीं भू व अनंत; मनुष्याचे अवयव; डुकराचें तोंड; थोडा लठ्ठ. **मपु** (२५९।२,२६०।२८): रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत (१) कमरेवर (२) कमळ (३) गदा (४) डाव्या कोपरावर अथवा दाढेवर उत्पलयुक्त व विस्मय वदनी धरणी; दोन पाय व ते (१) कासवावर (२) नागेंद्रावर; लोकेशांनीं स्तूयमान. **रूपा** (२० आ): श्याम; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) गदा (२) कमळ; दाढेवर पृथ्वी; वराहाचें तोंड. **रूम** (६ आ): श्याम; वराहाचें तोंड; दाढेवर पृथ्वी. **विध** (७९): [१] रंग ?; आलीढ; शेषावर; चार हात व त्यांत (१) चक्र (२) गदा (३) शंख व भूदेवी (४) कमळ; किंवा भूदेवी दाढेवर; शेष=चार हात व त्यांत (१) अंजलि (४) अंजलि (२) नांगर (३) गदा; फणे, वराहमुखाकडे पाहणारा, इत्यादि. [२] रंग ?; वाहन ?; हात ?; चक्रानें हिरण्याक्षास मारीत आहे; हिरण्याक्षानें भाला उगारला आहे. [३] रंग ?; वाहन ?; हात ?; पण दोन हातांनीं पृथ्वीस नेत आहे. [४] राक्षसांमध्यें नृवराह किंवा वराहरूप धरून पृथ्वीस आधार देत आहे. **वैन** (इहिइ १।२९): **आदिवराह**: श्याम; वाहन ?; चार हात व त्यांत (१) शंख (२) चक्र; उजवा पाय शेषावर व त्या पायाच्या मांडीवर (पृथ्वी; उजव्या हातांत) पृथ्वीचे पाय; डाव्या हातानें पृथ्वीला धारण करणारा; मुखानें (नाकानें) तिला हुंगणारा; पृथ्वीः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंजलिहस्त; पसरलेले पाय; पुष्पवस्त्र; श्याम. **शिर** (२५।११२): [१] अचिप्रमाणें. [२] (२३।१०): डोकें ते पाय अनुक्रमें पांढरा ?, निळा, तांबडा, पांढरा, पिवळा हे रंग; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) शंख (३) तलवार (४) ढाल (५) गदा (६) शक्ति (७) वर (८) अभय; दाढेवर पृथ्वी. [३] (२३।११): श्याम; उगारलेले दोन हात; दाढेवर पृथ्वी. **श्रीनि** (पृ. ५४): पांचरात्राप्रमाणें. **ससू** (७७।३९) रंग ?; वाहन ?; भयानक.

प्रलय-वैन (इहिह १।३०): नील; सिंहासन; सव्य ललितासन; हात ?; पण त्यांत (१) उजवा अभय (२) शंख (३) चक्र (४) डावा हात मांडीवर; पीतवस्त्र; पृथ्वीः सव्य ललितासन; डावा हात उत्पल, उजवा हात आसनावर.

यज्ञ-वैन (इहिइ १।३२): श्वेत; सिंहासन; चार हात व त्यांत (१) शंख (२) चक्र; सव्य ललितासन; पीतवस्त्र; उजवीकडे श्रीः पीत; सव्य ललितासन; उजवा हात आसनावर, डाव्या हातांत कमळ; डावीकडे भूः श्याम; वाम ललितासन; उजवा हात उत्पल, डावा हात आसनावर.

मत्स्यकूर्माप्रमाणें वराहाचीही केवल पशुरूप व अर्धमनुष्यरूप शिल्पें सांपडतात. पैकीं पशुरूप वराह अगर भूवराह याचीं शिल्पें लखनौ, एरण, चांदपूर, बिल्हारी, खोह वगैरे अनेक ठिकाणीं असून त्यांपैकीं फक्त लखनौ म्युझियम मधील वराहाची माहिती येथें देतों. हा चार पायांवर उभा व तोंड थोडें वर केलेला आहे. उजवा पाय किंचित् पुढें असून त्याच्या लगतच पण पुढें कृतांजलि व सात नागफणे डोक्यावर असलेला ऊर्ध्वांग शेष आहे. त्याच पायापाशीं पण किंचित् आंतल्या अंगास उजव्या हातांत चौरी घेतलेली स्त्री उभी आहे. तिचा डावा हात सध्यां भग्न आहे; पण पूर्वी तो वराहाच्या तोंडावर असावा असें वाटतें. वराहाच्या सर्वांगावर निरनिराळ्या देवता, दशावतार, द्वारपाल वगैरेंचीं रूपें खोदलीं आहेत. नाकपुडीपाशीं आणि सुळे व कान यांवर प्रत्येकीं एक भग्न स्त्रीमूर्ती आहे'.

---

१ मेआसइ क्र. ११ पृ. १३ प्रप ३।१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाबलिपुरम् येथील नृवराहमूर्ती ध्यानांत घेण्यासारखी आहे. सामान्यतः वराहाचा डावा पाय शेषाच्या डोक्यावर असून भूदेवी त्याच्या डाव्या कोपरावर अधिष्ठित व उजव्या हातावर पाय ठेवलेली असते. पण येथें सर्वच तपशील याच्या अगदीं उलट आहे. या मूर्तीचा उजवा पाय शेषाच्या डोक्यावर, उजव्या कोपरावर भूदेवी बसलेली आणि डाव्या हातानें पायांस आधार दिलेली आहे[1]. नालंदा येथील वराहमूर्ती आलीढासनी व डावा पाय शेषाच्या हातावर ठेवलेली असून तिचे चार हात कटिहस्त, गदा, शंख, चक्र, या वस्तू व मुद्रा धारण करणारे आहेत. डाव्या वरच्या हाताच्या कोपरावर पृथ्वी बसलेली दाखविली असून उजव्या पायाशीं अंजलिहस्त नागी खोदली आहे. याचे अंगावर कुंडलें, कंठा, अंगद, कडीं, जानवें, हार, मेखला व तीखालीं वस्त्र, साखळ्या हीं वस्त्राभरणें आहेत. याचें तोंड वराहासारखें दिसत नाहीं; पण विष्णूचीं आयुधें, पृथ्वी, शेष, यांवरून तो वराह आहे असें समजावयाचें आहे. सांध्यांना दाखविलेले कोन, अवयव-रेखेची सरलता, तोंड वगैरे वरून हें शिल्प मध्ययुगाच्या उत्तर कालांतील असावें असा कयास होतो[2]. झिल्ली (मुर्शिदाबाद) येथील वराह आलीढासनी व नागीच्या हातावर डावा पाय ठेवलेला आणि चार हातांत अनुक्रमें गदा,चक्र,पद्म ? व शंख धरीत असून अंगावर नालंदा मूर्तीप्रमाणेंच दागिने आहेत. डोक्यास शंक्वाकृति मुकुट असून तोंड मारुतीप्रमाणें दिसत आहे. पण शेषशेषी, दोन पायांमध्यें असलेला वराह व पृथ्वी यांवरून हा वराहावतार असल्याचें ठरतें. ही मूर्ती नालंदापेक्षां थोडी चांगली असली तरी मध्ययुगाच्या उत्तर भागांतच पडते[3].

वामन

सामान्य–अचि(३।१।७३५): हिरवा; वाहन ?; हात ?; कमंडलू, छत्र; कृष्णाजिन, जानवें, कुंडलें, शेंडी, खुजा, मनोहर, ब्राह्मण. **अपु** (४९।५, १८):रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) छत्र(२) दण्ड. **पांचरात्र** (चचि १।३२८): कमंडलु व छत्रधारी. **मपु** (२५९।२): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) छत्रिका (२)कमंडलु; दीनमुख. **रूपा** (२० अ): अचि

१ मेऑसइ क्र. ३३ पृ. ३१ प्रप २१ ए. २ ईइस्कूमिस्क प्रप ४५ सी. ३ कित्ता प्रप ४५ इ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणें. **रूम** (६ आ): श्याम; वाहन?; हात ?; पण त्यांत (१)दण्ड(२) कमंडलु; लष्ठ, शेंडी. **विध** (८५।५३): श्याम; वाहन ?; हात ?; दंड; अभ्यासोत्सुक, कृष्णाजिन, खुजा, लष्ठ. **वैन** (१।३६): रंग ?; वाहन ?; दोन हात व त्यांत (१) छत्र (२) दंड; कौपीनधर, शिखा, पुस्तक, मेखला, उपवीत, कृष्णाजिन, पवित्रक; बालरूप. **शिर** (२५।१११) : रंग ?; वाहन ?; हात ?; कमंडलु ,छत्र, कृष्णाजिन, जानवें, कुंडलें, शेंडी, खुजा, मनोहर. **श्रीनि** (पृ. ५५):पांचरात्राप्रमाणें. **ससू** (७७।३९): रंग ?; वाहन ?; भयानक.

दधिवामन-पांचरात्र (श्रीनि पृ. ४९): गौर; दोन हात व त्यांत (१) सोन्याचें भांडें (२) दहिभात (३) अमृत; रमेसह. **शाति** (१५।६०): गौर; दोन हात व त्यांत (१) शुद्धजलयुक्त सोन्याचा तांब्या (२) दहिभाताचें भांडें; काळेभोर केस.

त्रिविक्रम

अचि (३।१।७५१): रंग ?; वाहन ?; हात ?; डाव्या पायानें पृथ्वी व उजव्या पायानें आकाश आक्रमणारा; वरच्या पायाजवळ दीन दृष्टीचा वामन आणि जवळ धनुर्धारी बलि व तो बांधला जात आहे. **मपु** (२६०।३६): रंग ?; वाहन ?; हात ?; पाय बाजूस; हात वर; खालीं छत्री व कमंडलु घेतलेला दीनमुख वामन आणि झारी (भृंगारक) घेतलेला व गरुडाकडून बांधला जात असलेला बलि. **विध** (८५।५५): श्याम; वाहन ?; हात ?; पण त्यांत दण्ड, पाश, शंख, चक्र, गदा, पद्म; पैकीं शंख वाजवीत असतांच्या स्थितींत; ऊर्ध्वमुख. **वैन** (१।३७): [१] रंग ?; वाहन ?; आठ हात व त्यांत चक्र, शंख, गदा, शार्ङ्ग, नांगर. [२] श्याम; वाहन ?; चार हात व त्यांत (१) अभय किंवा चक्र (२) वरद किंवा शंख; पसरलेला डावा हात; उजवा पाय ताठ आणि डावा पसरलेला व ऊर्ध्व केलेला; रक्त वस्त्र; पाठीमागें कल्पवृक्ष, इंद्राचें छत्र?, दोहोंमागें चामरधारी वायु व वरुण, त्यांवर उजवीकडे सूर्य, डावीकडे चंद्र, तसेंच सनक व सनत्कुमार; पसरलेल्या पायावर तो धुणारा ब्रह्मा; पाणी म्हणजे शुभ्र गंगा; बेंबीजवळ अंजलिहस्त शंकर; पायामागें नमुचि; डाव्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायामागें नमुचीला मारणारा गरूड; उजवीकडे वामन; त्यामागें गोरा, सपत्नीक, हातानें कलश उचलणारा बलि; त्यांवर भेरी वाजविणारा जांबवंत. शिर (२५।१२१): अचिप्रमाणें; फक्त वामन व बलि यांचा अभाव.

वामन हाच अवतार समजला गेला असला तरी तो बहुधा त्रिविक्रमाच्या संगतीनेंच आढळतो. त्याचीं स्वतंत्र शिल्पें क्वचितच आढळून येतात. तेव्हां अशा एका शिल्पाचें प्रथम वर्णन देऊन नंतर त्रिविक्रमाची शिल्पें वर्णितों. पुरापारा (डाक्का–ढाक्का म्यूझियम) येथील वामनमूर्ती विश्वपद्मावर उभी असून तिच्या चार हातांत वर, गदा, चक्र व शंख या मुद्रा व वस्तू आहेत. बाजूस श्री व सरस्वती आणि बैठकीच्या दर्शनी भागावर मध्यें गरूड व बाजूंस ३ भक्त आहेत. डोक्यावरील शंक्वाकार मुकुट, उरोबंध, मोठें पोट, स्थूल व खुजे अवयव, अपुरें जानवें इत्यादि लक्षणांवरून ही मूर्ती वामनाची आहे असें दिसतें. एरवीं केवळ आयुधक्रमांचा विचार करतां ही मूर्ती त्रिविक्रमाची ठरावयास पाहिजे. मूर्तीची ढब लक्षांत घेतां ही मध्ययुगाच्या शेवटची असावी असें वाटतें.[1] बादामी, बहुधा वेरूळ व महाबलिपुरम् येथील त्रिविक्रम अष्टभुज आहे. त्याच्या हातांत तलवार, गदा, बाण, चक्र, शंख, सूचिमुद्रा, ढाल, धनुष्य हीं आयुधें व मुद्रा असून सूचीमुद्रेसमोर राक्षसाचें (राहू ?) डोकें आहे. बादामी व वेरूळ येथील मूर्तीच्या पायाखालीं छत्रीधर वामन, उदक सोडणारा बलि, त्यास मना करणारा शुक्र व बलीची बायको इत्यादि व्यक्ती आहेत. पण वेरूळ येथील मूर्ती थोडी भग्न झाली आहे. महाबलिपुरम् मूर्तीच्या भोवतीं वामनादींच्या ऐवजी नमुचि, जांबवंत, ब्रह्मा, शिव, सूर्य, चंद्र, इत्यादि व्यक्ती आहेत आणि सूचीमुद्रेसमोर ब्रह्मदेव व उजवा वरचा हात मोकळा आहे. या तिन्ही अर्धचित्रांत बादामीचें शिल्प सर्वोत्कृष्ट आहे असें मला वाटतें[2]. सामान्यतः त्रिविक्रमाचा डावा पाय उचललेला दाखवितात; पण वेलूर व नुग्गेहळ्ळि येथील होयसळ शिल्पांत डावा पाय ताठ उभा असून उजवा पाय वर उचललेला आहे. या दोन्ही मूर्तींना चार हात

---

१ इंडिस्क्रिप्टिस्क प्रप ४७ ए. २ मेआसइ क्र. २५ प्रप ९ ए, १६ ए बी, पृ. १८, ३२; कित्ता क्र. ३३ पृ. ३१ प्रप २१ बी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असून त्यांत अनुक्रमें पद्म, गदा, चक्र, शंख या वस्तू आहेत. या दोन्ही चित्रांत बली, वामन इत्यादि गैरहजर असून त्यांऐवजीं दोहोंतही त्रिविक्रमाचा पाय धुणारा ब्रह्मदेव व पायांपासून निघणारी गंगा यांच्या आकृति आहेत; बेलूर शिल्पांत याशिवाय उजव्या डाव्या अंगांस गरूड व आणखी कोणी यांच्या आकृती आहेत; तर नुग्गेहळ्ळि शिल्पांत फक्त डावीकडे—मला वाटतें—लक्ष्मीची आकृति आहे'. या दोन्ही मूर्तींत—आवश्यक नसतांनाही—चतुर्विंशतिमूर्तिप्रकारांतील त्रिविक्रमाचा आयुधक्रम दाखविला आहे. जोड देऊळ (डाक्का) येथील त्रिविक्रममूर्ती चतुर्भुज आणि अनुक्रमें चक्र, बाजूस गदा, शंख व कमलकलिका (हृदयापाशीं) धारण करणारी असून तिचा डावा पाय आकाशांत ठेवण्यासाठीं उंच केला आहे. याच पायाच्या खालीं चौपाईवर बहुधा बळी व त्याची बायको बसली असून समोर छत्रधारी वामन उभा आहे. त्रिविक्रमाच्या अंगावर नेहमीच्या अलंकारांशिवाय शंक्वाकार मुकुट आहे. मूर्तीची एकंदर ढब बरी असून रुबाब मोहक आहे[2]. बिहारमधील त्रिविक्रममूर्तीच्या बैठकीचे दर्शनी भागावर खांबास बांधलेला घोडा दाखविला आहे हें तिचें एक वैशिष्ट्य आहे[3].

विठ्ठल

पुंडलीक किंवा पुंडरीक याच्या भक्तीसाठीं विठ्ठलाचा अवतार झाला हें महाराष्ट्रांत आबालवृद्धांना माहीत आहे. याची शिल्पग्रंथीय वर्णनें आढळत नसलीं तरी प्रत्यक्ष शिल्पें दक्षिणेंत पुष्कळ आहेत. पैकीं तिहींचीं वर्णनें येथें देतों. पंढरपूरच्या विठोबाची मूर्ती उभी असून तिनें आपले दोन्ही हात कमरेवर ठेविले आहेत. याच हातांत अनुक्रमें कमलनाल व शंख या वस्तू आहेत. हिच्या डोक्यास उंच फेझ टोपीवजा व अगदीं साधा मुकुट असून कानांतील मकरकुंडलें खांद्यावर आधारलेलीं आहेत. ही मूर्ती संतांनीं वर्णन केल्याइतकी नयनमनोहर खास नाहीं[4]. याहून किंचित् जुनी

१ इहिइ खंड १।११७ प्रप ५२।३ व ५३. २ ईइस्क्रमिस्क प्रप ४७ सी; मूचि १६. ३ सदर, प्रप ४७ डी. ४ हीवरील विस्तृत विवेचनासाठीं माझें थोडे दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेलें 'श्री विठ्ठल आणि पंढरपूर' हें पुस्तक पहावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्ती अहोबलम् येथें आहे. ही दर्शनी भागावर कमल काढलेल्या एका बैठकीवर कमरेवर हात ठेऊन उभी असून हातांत पुन्हां अनुक्रमें शंख व कमलनाल या वस्तू आहेत. अंगावर निरनिराळे दागिने आणि डोक्यावर उंच टोपीवजा व नक्षीदार मुकुट आहे. पण सर्वांत सुरेख मूर्ती तिरुपती येथील होय. ही सिंहासनावर ठेवलेल्या कमळामध्यें उभी असून कमळामुळें हिचे जवळजवळ गुडघ्यापर्यंतचे पाय दिसेनासे झाले आहेत. हिचेही दोन्ही हात कमरेवर आहेत. पण उजवा हात उताणा असून त्यावर कमळ काढलें आहे आणि डाव्या हातांत शंख दिला आहे. हिच्या डोक्यावर मुकुट, गळ्यांत हार, जानवें, कानांत मकरकुंडलें, कमरेस मेखला इत्यादि दागिने असले तरी मूर्ती अर्ध नग्न दिसते[1].

व्यंकटेश

यालाच उत्तर हिंदुस्थानांत बालाजी असें म्हणतात. तिरुपति येथील व्यंकटेश अतिशय प्रसिद्ध आहे. शैव व वैष्णव हे दोघेही प्रस्तुत मूर्ती आपल्या देवतेची आहे असा दावा करतात. याचें कारण तेथील मूर्ती हरिहराची असणें हें होय असें कै. गोपिनाथरावांचें म्हणणें आहे. त्यांच्या मताप्रमाणें या मूर्तीच्या उजव्या हातावर शिवाचें चिन्ह भुजंगवलय असलें तरी त्याच्या वरच्या दोन हातांत शंख ? व चक्र या वस्तू असून खालचे हात अभय व कटिहस्त मुद्रांचे आहेत. तेव्हां आयुधांवरून ही मूर्ती निश्चयानें हरिहराची म्हणतां येत नाहीं[2]. बालाजी व्यापारी लोकांत अतिशय प्रिय आहे. त्याची मूर्ती पशचग प्रकारची असून मारुति व गरूड यांनी युक्त असते.

व्यास

व्यासाचें मुख्य कार्य वेदांची व्यवस्था लावणें हें असून गौण कार्य मत्स्य, जय, भागवत वगैरे ऐतिहासिक व पुराण ग्रंथ रचणें हें होय. पण यास अवतार म्हणण्याजोगें कार्य कोणतें हें नीट ध्यानांत येत नाहीं.

---

१ साउथ इंडियन इमेजेस ऑफ गॉडस् अँड गॉडेसेस पृ. ६१ चि. ४० व पृ. ६० चि. ३९. २ इहिइ खंड १।२७०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरनिराळ्या वेळीं एकाच नांवाच्या अनेक मनुष्यांनीं वेगवेगळीं कार्यें केलीं असतां त्यांच्या कालादींचा घोटाळा होऊन तीं सर्व कार्यें एकाच्याच नांवावर कशीं समाविष्ट होतात याचें व्यास हें उत्तम उदाहरण आहे. याचे संबंध अनेक ठिकाणीं आले असल्यानें याचीं वर्णनेंही अनेक सांपडतील; पण विधमधील वर्णन अत्यंत स्वाभाविक असल्यामुळें तें येथें उध्दृत करतों.

विध (८५।६५): काळा, पिंगट; कृश, अतिशय जटा; बरोबर सुमंतु जैमिनी, पैल, वैशंपायन हे चार शिष्य.

हयग्रीव

वैदिक वाङ्मयांत ' अग्नि, इंद्र, यज्ञ व वायु यांनीं एक सत्र आरंभिलें असतां मिळालेलें दैवी यश यज्ञानें एकट्यानेंच बळकाविलें. तेव्हां बाकीच्या तिघांनीं युद्ध करून युक्तीनें त्याचें डोकें उडविलें व पुन्हां सांधविलें अशी कथा असून तिजवर याच्या जन्माची पौराणीक हकीकत आधारलेली दिसते. तींत फरक येवढाच झाला आहे कीं, हें शीर सांधतांना मनुष्याऐवजीं घोड्याचें डोकें उपयोगांत आणल्यानें हा हयग्रीव झाला. याचीं अवतारकृत्यें हयग्रीव दैत्यास ठार करणें व मधुकैटभांना मारून वेद परत आणणें हीं होत. याच्या श्वासोच्छ्वासांतून वेद बाहेर आले असें एके ठिकाणीं विधान आहे. यास पूर्वरूप प्राप्त झाल्याचेंही एका कथेंत सांगितलें आहे. पण तसें झाल्यास यास हयग्रीव म्हणून संबोधतां येणार नाहीं. हयग्रीवाचीं दोन तीन ग्रंथिक वर्णनें येथें देतों.

अ ु (४९।२६): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र (३) गदा (४) वेद; डावा पाय शेषावर, उजवा पाय कासवावर. घोड्याचें तोंड; **चाचि** (२।१२०): विधप्रमाणें. **पांचरात्र** (श्रीनि पृ. ४८): चार हात व त्यांत (१) शंख (२) अक्षमाला (३) पुस्तक (४) व्याख्यानमुद्रा. **विध** (८०): पांढरा; पृथ्वीच्या हातांवर पाय; आठ हात व त्यांत (१) शंख (२) चक्र (३) गदा (४) पद्म (५–८) देहधारी वेदांच्या डोक्यांवर; घोड्याचें तोंड; निळीं वस्त्रें; संकर्षणाचा अंश. **शाति** (१५।७५): पांढरा; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) शंख (३,४) गुडघ्यावर;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घोड्याचें तोंड. शिर (२३।१५): पांढरा; रत्नसिंहासन; घोड्याचें तोंड; व्याख्यानमुद्रा; शिष्यांस शास्त्रप्रतिपादन. श्रीनि (पृ.४८) [१] पांच रात्राप्रमाणें. [२] पांढरा; कमलासन; हात ?; पण त्यांत (१) व्याख्यान मुद्रा (२) शंख (३) चक्र (४) पुस्तक.

हयग्रीवाच्या दोन मूर्ती नुग्गेहळ्ळि येथें लक्ष्मीनरसिंह देवालयांत आहेत. पैकीं एक राक्षसास तुडवीत आलीढासनानें उभी आहे. हिचें तोंड सव्यावर्ति असून हीस विधप्रमाणें आठ हात असले तरी त्यांत गदा, बाण, चक्र, तलवार, शंख, ढाल, धनुष्य व कमल या वस्तू आहेत. हिचा विशेष म्हणजे ही उभी असलेल्या पट्टावर हयग्रीव हा शब्द कानडी लिपींत खोदला आहे. दुसरी विश्वपद्मावर पद्मासन घालून बसली असून हिच्या चार हातांत अनुक्रमें ज्ञान, अक्षमाला, चक्र ?, फळ किंवा शंख या मुद्रा व वस्तू आहेत. हिजवरही कानडी हयग्रीव शब्द आहे[1].

हंस

सनकादिकांनीं आपला पिता ब्रह्मदेव यास तत्वज्ञानाविषयीं शंका विचारल्या. त्या ब्रह्मदेवास निरसतां येईनात. तेव्हां ब्रह्मदेवानें ईशचिंतन करतांच परमेश्वरानें हंसरूपानें प्रगट होऊन शंकांचा निरास केला अशी भागवतांत कथा आहे (स्कं. ११ अ. १३). शंकानिरसन हेंच याचें अवतारकार्य. याचें रूप हंसासारखें असावें असें फक्त विधमध्यें (अ. ८५।५८) सांगितलें असून श्रीतत्वनिधिमध्यें (पृ. ४९) हंसमूर्तीचें ध्यान आलें आहे तरी तेथें तो विष्णुरूप म्हणजे शुक्लवर्णी, दोन हातांत शंख व चक्र धारण करणारा अणि प्रियेसह असा सांगितला आहे.

संकीर्ण-मूर्ति

विष्णूमूर्तीच्या तिसऱ्या वर्गांत केशवादि चोवीस व मत्स्यादि अवतार या सोडून बाकीच्या मूर्तींचा समावेश होतो. यांत मुख्यतः त्रिमुख किंवा चतु-

१ डॉ. गूलिककृत हयग्रीव पृ. २१ प्रप १।१, २; ज्यास पूर्वेकडील सर्व देशांत हयग्रीवाची कल्पना कशी, किती व केव्हां प्रसृत झाली हें पहावयाचें असेल त्यानें हें पुस्तक अवश्य पहावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



१६ जोड देऊळ-बंगाल त्रिविक्रम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



१७ अवंतिपूर-काश्मीर विष्णु-चतुर्मुख

१८ अवंतिपूर-काश्मीर विष्णु-चतुर्मुख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख विष्णु, वासुदेवचतुष्टय, जलशायी, लक्ष्मीनारायण, साधारण विष्णू, इत्यादि मूर्ती येतात. अशा सर्व मूर्तींचा या भागांत आपण क्रमानें विचार करूं या.

चतुमुख-विष्णु.

विष्णूमूर्तींचा हा एक महत्त्वाचा प्रकार आहे. यांत विष्णूस मूर्ती सुटी असेल तर चार व मूर्ती अर्धचित्र असेल तर तीन तोंडें दाखविलेलीं असतात. ब्रह्मदेवास चार तोंडें असतांनाही ज्याप्रमाणें अर्धचित्रांत त्याचीं तीनच तोंडें सामान्यतः दिसतात तद्वत् येथेंही होतें. आजपर्यंत या प्रकारचीं बहुतेक शिल्पें काश्मीर व त्याच्या आसपासचा प्रदेश यांतच सांपडलीं आहेत व यांचीं ग्रंथिक वर्णनें सर्व औत्तर आहेत. यावरून असें वाटतें कीं, ह्या मूर्तींची कल्पना बहुधा उत्तरेंतच निघाली असावी. या प्रकारांत अनंत, त्रैलोक्यमोहन, विश्वरूप, वैकुंठ अशा चार मूर्ती येतात. तेव्हां त्यांचीं ग्रंथिक वर्णनें प्रथम देऊन नंतर या प्रकारांत मोडण्यासारखीं कांहीं उदाहरणें नमूद करतों.

अनंत'-रूपा (२२ अ): रंग ?; गरूड; बारा हात व त्यांत (१) गदा (२) तलवार (३) चक्र (४) वज्र (५) अंकुश (६) वरद (१) शंख (२) ढाल (३) धनुष्य (४) कमळ (५) दंड (६) पाश; तीन तोंडें व तीं समोरचें पुरुषाचें, उजवें नरसिंहाचें व डावें वराहाचें अशीं. **रूम** (८ अ): रूपाप्रमाणें; फक्त चार तोंडें आणि चौथें मागें व स्त्रीचें. **विध** (६५): [१] शुभ्र ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) गदा (२) पद्म (३) शंख (४) नांगर. अनेक फणा व मधल्यावर पृथ्वी; निळें वस्त्र. [२] नृवराह पहा.

त्रैलोक्यमोहन-अपु (४९।१९): रंग ?; गरूड; आठ हात व त्यांत (१) चक्र (२) शंख (शर ?) (३) मुसळ (४) अंकुश (१) शंख (२) धनुष्य (३) गदा (४) पाश; पद्म व वीणा यांसह अनुक्रमें लक्ष्मी व सरस्वती.

---

१ रूपा व रूम यांतील वर्णनें विशेष आहेत. नेहमीं अनंत म्हणजे शेष व बलराम हा शेषाचा अवतार; यामुळें दोघांमध्यें कांहीं साम्य असतें. विधमधील वर्णन मात्र शेषाचें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रूपा व रूम (२२ आ, ८ अ): रंग ?; गरूड; सोळा हात व त्यांत (२) गदा (३) चक्र (४) अंकुश (५) बाण (६) भाला (७) चक्र (८) वरद (९) मुद्गर (१०) पाश (११) शार्ङ्ग (१२) शंख (१३) कमळ (१४) कमंडलु (१५) शिंग (१,१६) योगमुद्रा; चार तोंडें व तीं अनंताप्रमाणें; फक्त मागचें कपिलाचें म्हणजे ऋषीचें ?. **विध'** (४४।९): सावळा; गरूड; आठ हात व त्यांत (१) बाण (२) चक्र (खड्ग ?) (३) मुसळ (४) अभयमुद्रा (१) ढाल (२) नांगर (३) शंख (४) वरमुद्रा; चार तोंडें व तीं (१) सौम्य (२) नारसिंह (३) कापिल (४) वाराह; पिवळीं वस्त्रें; छातीवर कौस्तुभ.

विश्वरूप–अपु (४९।११): रंग ?; वीस हात व त्यांत (१) चक्र (२) तलवार (३) मुसळ (४) अंकुश (५) पट्टा (६) मुद्गर (७) पाश (८) शक्ति (९) शूल (१०) बाण (१) शंख (२) धनुष्य (३) गदा (४) पाश (५) तोमर (६) नांगर (७) परशु (८) दंड (९) सुरी (१०) ढाल; चार तोंडें. **रूपा व रूम** (२२ अ, ८ अ): रंग ?; गरूड; वीस हात व त्यांत (१) पताका (२) नांगर (३) शंख (४) वज्र (५) अंकुश (६) बाण (७) चक्र (८) महाळुंग (९) वरमुद्रा (१०) योगमुद्रा (१) पताका (२) दंड (३) पाश (४) गदा (५) तलवार (६) उत्पल (७) शिंग (८) मुसळ (९) पुष्पमाला (१०) योगमुद्रा. रूपामध्यें नर, नरसिंह, शूकर अशीं तीन तोंडें; रूममध्यें नर, नरसिंह, स्त्री किंवा श्री व वराह अशीं चार तोंडें. **विध** (८३): [१] अनेक रंग; वाहन ?; प्रथम चार तोंडें; नंतर महेश्वराचीं पांच तोंडें; पण ईशानमुखाऐवजीं ब्राह्मी मुख; यांचेवर व बाजूंस रेषेंत आणखी देवांचीं तोंडेंही अंशतः असावीं; सर्वांना खाणारा; अनेक हात व त्यांत आयुधें व मुद्रा. [२] वैकुंठा-प्रमाणें. **शिर** (२३।४५): सामान्य वर्णन : जसें बहुविध अलंकार, अनेक आयुधें, इत्यादि.

---

१ मी हें वर्णन त्रैलोक्यमोहनाचें असावें असें गृहीत धरलें आहें. मूळांत कोणतेंच नांव दिलेलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैकुंठ-रूपा व रूम (११ आ, ७ आ): रंग ?; गरूड; आठ हात व त्यांत (१) गदा (२) तलवार (३) बाण (४) चक्र (१) शंख (२) ढाल (३) धनुष्य (४) कमळ; चार तोंडें व ती रूमतील विश्व-रूपाप्रमाणें. **विध** (८५): रंग ?; गरूड; हात ?; पण त्यांत (१) कमल (२) गदा (३) चक्र (४) शंख ?; चार तोंडें व तीं (१) सौम्य (२) उजवें नारसिंह (३)भयानक = ऐश्वर्य (४) बहुधा वाराह.

काश्मीरमध्यें अवंतिपूर येथील उत्खननांत सांपडलेली विष्णुमूर्ती उभी असून तिला चार तोंडें आहेत. पैकीं समोरचें तोंड पुरुषाकृती, उजव्या अंगचें नरसिंहाकृति, मागचें राक्षसाचें आणि डाव्या अंगचें वराहाकृति आहे. या मूर्तीच्या वरच्या उजव्या हातांत पद्म व डाव्या हातांत शंख या वस्तू असून खालचे उजवा व डावा हे हात अनुक्रमें चौरीधर स्त्री व पुरूष यांच्या डोक्यांवर ठेवले आहेत. दोन पायांच्या मध्यें भूदेवी काढली आहे. ही जणू आश्चर्यानें विष्णुमुखाकडे पहात असून हिच्या हातांवर विष्णु उभा असल्याचें भासतें[1]. अवंतिपूर येथील उत्खननांत अशा आण-खीहि मूर्ती सांपडल्या आहेत; पण त्या हिच्या इतक्या पूर्ण नाहींत.[2]

श्रीनगर (काश्मीर) येथील प्रतापसिंघ प्रदर्शनगृहांत अशा आणखीं मूर्ति आहेत. पैकीं एकीस मनुष्य, नरसिंह, राक्षस व वराह अशीं चौघांची चार तोंडें आहेत. हात चार आहेत; पण दुर्दैवानें त्यांतील दोन तुटलेले दिसतात. बाकी दोहोंपैकीं उजवीकडच्या हातांत कमळ असून डावीकडचा हात त्याच अंगास उभ्या असलेल्या एका मूर्तीच्या डोक्यावर आहे. उजव्या अंगचा व पायांचा खालचा अरा भाग तुटून गेला आहे. मागील मूर्तीचा विचार करतां या मूर्तीच्या उजव्या अंगास एक गण असून त्याच्या डोक्यावर उजवा हात ठेवला असेल व दोन्ही पायांमध्यें प्रथमतः पृथ्वीची मूर्ती असेल असें वाटतें[3]. दुसऱ्या मूर्तीच्या डोक्याचा भाग तुटला असला तरी बाकी सर्व भाग शाबूत आहे. हीही मूर्ती उभी आहे. हिच्या चार

---

१ आसइऑरि १९१३-१४ पृ. ४५ प्रप २८ बी, सी; मूचि १७ व १८.
२ कित्ता पृ. ५२ क्र. ३ ते ९; पृ. ५३ क्र. १७; जयपूर अंदर कोठ येथेंही अशाच प्रकारच्या मूर्ती आहेत (पहा कित्ता १९१५-१६ पृ. ६६).
३ श्रीनगर प्रतापसिंघ म्युझियम कॅटलॉग पृ. ४९ Aa२१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातांपैकीं दोन्ही बाजूंचा एकएक हात बाजूस असलेल्या मूर्तीच्या डोक्यावर असून बाकीच्या दोन हातांपैकीं उजव्या हातांत कमलकलिका व डाव्या हातांत शंख आहे. दोन्ही पायांमध्यें पृथ्वीदेवी असून तिच्या हातांवर विष्णु उभा असल्याचा भास होत आहे. तसेंच भूदेवी विष्णूकडे आश्चर्यमुद्रेनें पहात आहे असें दिसतें[1].

काश्मीरांतील मार्तंडाच्या देवळांत ज्या दोन विष्णुमूर्ती आढळतात त्याही अशाच प्रकारच्या आहेत. फरक इतकाच कीं, त्यांना प्रत्येकीं आठ हात आहेत. त्या भिंतींत असल्यानें त्यांचीं तीनच तोंडें दिसतात; चौथें म्हणजे राक्षसाचें तोंड दिसूं शकत नाही. पण या मूर्तीचेही खालचे दोन हात चौरीधरांच्या डोक्यावर असून प्रत्येकीच्या दोन्ही पायांमध्यें भूदेवी काढली आहे. इतर हात मात्र दुर्दैवानें तुटले असल्यानें त्यांत कोणत्या वस्तू होत्या हें समजत नाहीं[2]. मन्नूर (कांग्रा) येथील अवशेषांत दोन थोड्या विद्रूप झालेल्या मूर्ति सांपडल्या असून त्या तीन तोंडांच्या विष्णूच्या असाव्या–कारण त्यांस उजवें तोंड नरसिंहाचें, मधलें मानवी म्हणजे साधारण विष्णूचें आणि डावे वराहाचें आहे–असें वाटतें[3]. मथुरा म्यूझियममध्यें एक याच नमुन्याची मनोरंजक विष्णुमूर्ति आहे. हिला तीन तोंडें आहेत. त्यांपैकीं दर्शनी मनुष्याचें आणि उजव्या व डाव्या बाजूंचीं अनुक्रमें नरसिंह व वराह यांचीं आहेत. या मूर्तीस चार हात होते; पण वरचे दोन भग्न असून खालचे दोन्ही हात पुरुषगणांच्या डोक्यांवर आहेत; शिवाय त्यांत शंख व चक्र हीं दोन आयुधेंही आहेत.[4] चंबा

१ श्रीप्रम्यूकें पृ. ५१ Ac ४४. २ऑसइअरि १९१५–१६ पृ. ६२. ३ कित्ता पृ. ४६; मला वाटतें येथें विष्णूस चौथेंही तोंड आहे असें धरलें पाहिजे. कारण या मूर्ती अर्धचित्र असल्यानें चौथें तोंड काढतां येणार नाहीं. ४ कॅटलॉग ऑफ दि आर्किऑलॉजिकल म्यूझियम ॲट मथुरा पृ. १०० डी २८; येथें या मूर्तीस तीनच तोंडें असल्याचें सांगितलें आहे. या कॅटलॉगमध्यें मूर्तीचीं वर्णनें देतांना कोणत्या हातांत कोणती वस्तू आहे याचा पृथक्त्वानें निर्देश केलेला नाहीं हें मोठें दुर्दैव होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२० रंगपूर-बंगाल विष्णु-चतुर्मुख

१९ कैथळ-कर्नाळ विष्णु-चतुर्मुख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



जलशायी

ऐहोळे-विजापूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्थानांतील भूरिसिंघ म्यूझियममध्यें तीन तोंडांच्या-किंवा खरें म्हटलें तर चार तोंडांच्या–दोन विष्णुमूर्ति आहेत. पैकीं एकीच्या डाव्या मांडीवर लक्ष्मी असून विष्णु स्वतः गरुडावर बसलेला आहे. आयुधांपैकीं फक्त गदा स्पष्ट आहे. तरी पण त्यास चार हात असावे असें दिसतें[1]. दुसरी मूर्तीही गरुडावरच बसली आहे. पण तिच्या मांडीवर लक्ष्मी नाहीं आणि वरच्या दोन हातांत अनुक्रमें चक्र व शंख या वस्तू असून खालचे दोन हात छोट्या गणांच्या डोक्यावर आहेत. प्रत्येक गणाच्या एका हातांत चौरी व दुसऱ्या हातांत गदा अशा वस्तू आहेत[2]. प्रत्येक मूर्तीचें मधलें तोंड विष्णूचें, उजवें नृसिंहाचें व डावें वराहाचें आहे.चंबा संस्थानांतील साहो गांवची विष्णुमूर्ती तीन तोंडांची (वस्तुतः चार तोंडांची) म्हणजे विष्णु, नरसिंह व वराह यांचीं तोंडें असलेली आहे. ही मूर्ती उभी असून हिच्या दोन पायांमधून लक्ष्मी जणूं वर येत आहे असें दाखविलें आहे. हिच्या उजव्या वरच्या हातांत कमळ व डावा भग्न आहे. खालचे दोन्ही हात चौरीधर स्त्रियांच्या डोक्यावर ठेवलेले आहेत[3]. काश्मीर व आसपासचा प्रदेश यांमध्यें केवळ सामान्य विष्णूलाच तीन तोंडें दाखवितात असें नव्हे तर शेषशायीसही तीन तोंडें दाखविल्याचें आढळतें. उदाहरणार्थ साल्ही (चंबा) येथील झऱ्यास लावलेल्या शिलापट्टावर अशी मूर्ती आहे[4]. कैथल येथील मूर्ती उभी असून तिचे पाठीमागचे दोन हात गदा व चक्र या आयुधपुरुषांच्या डोक्यांवर आणि पुढल्या दोन हातांत सनाल कमल व शंख या वस्तू आहेत. विष्णूच्या अंगावर किरीट, कुंडलें, कंठा, खूप लांब हार, अधरीय, मेखला, इत्यादि दागिने व वस्त्रें आहेत. दोन पायांमध्यें बहुधा भूदेवी असावी; पण ती स्पष्ट दिसत नाहीं. विष्णूस सौम्य, नारसिंह व वाराह अशीं तीन तोंडें असल्याचें नमूद आहे. अर्धचित्रत्वामुळें चौथ्या तोंडाचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं[5]. रंगपूर (बंगाल) येथील एका

१ कॅटलॉग ऑफ दि भूरिसिंघ म्यूझियम ॲट चंबा पृ.३ए९. २ सदर पृ.७ ए ३५. ३ अँचंस्टे पृ. २४८ प्रप ३९ ए; अशाच कांहीं मूर्ती लाहोर येथील पंजाब म्यूझियममध्यें असल्याचें नमूद आहे. ४ सदर पृ. २१७–८ प्रप ३१ ए. ५ आरइअॅरि १९२२-२३ पृ. ८९ प्रप ५ डी; मूचि १९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चतुर्मुख विष्णूच्या ऊर्ध्वांगावर मुकुट, कुंडलें, कंठा, माळ, जानवें वगैरे दागिने असून पुढील तोंड विष्णूचें, डावीकडचें वराहाचें व उजवीकडील भग्न पण बहुधा सिंहाचें आहे. या मूर्तीस चुकीनें हरिहर असें नांव दिलें गेलें आहे. पण ती या वर्गांतच घातली पाहिजे.'

जलशायी

विष्णूचें आणखी एक लोकप्रिय रूप जलशायी, शेषशायी, अनंतशायी इत्यादि पर्यायनामें असलेलें होय. पृथ्वी दुष्ट लोकांच्या भारानें टेकीस आली म्हणजे ती गाईचें रूप घेऊन देवांच्यासह ब्रह्मदेवाला पुढें करते व सर्वजण भगवंतास शरण जातात. शरण्य देव बहुधा शेषशायी भगवान असतो. अशा तऱ्हेनें हा सर्वश्रेष्ठ, शक्तिमान व त्राता असल्यानें त्याचें हें रूप फार प्रिय आहे. याच्या नाभीपासून निघालेल्या कमलांत ब्रह्मा उत्पन्न झाला. नाभिकमळामुळें यास पद्मनाभ असेंही नांव दिलें जातें. जलशायी अथवा अनंतशायी मूर्ती वास्तविक निजलेल्या असाव्या व त्याप्रमाणें बहुतेक असतात. पण कांहीं ठिकाणीं या मूर्ती बसलेल्याही आहेत. अशा वेळीं त्यांच्या बेंबींतून कमळ निघालेलें नसतें; अर्थात् ब्रह्माही नसतो. क्वचित् निजलेल्या मूर्तींच्या ठिकाणींही कमलस्थित ब्रह्मा नसतो. ऐहोळी येथें अशा कांहीं मूर्ती आहेत. तेव्हां या मूर्तींना अनुक्रमें अनंतशायी व अनंतासन हीं नांवें द्यावीं असें वाटतें. यांचीं ग्रंथिक व शिल्पीय वर्णनें अशीं—

अपु (४९।२४): रंग ?; वाहन ?; डाव्या कुशीवर निजलेला; एक पाय श्रीच्या हातांत; बेंबींतील कमलावर ब्रह्मदेव; त्रिनेत्र; विमलादींनीं स्तुत. **चचि** (१।२३६;२।१२२) व **रूपा** (२१ आ): विध १ प्रमाणें. **रूम** (६ आ): रंग ?; शेषावर निजलेला; हात ?; पण डोक्याखालीं उजवा हात; डाव्या हातांत फूल; नाभिकमलांत ब्रह्मा; मस्तकापाशीं श्री; पायापाशीं भू; दोन्ही बाजूंस मधु व कैटभ आणि निधिअस्त्र इत्यादींचीं रूपें. **विध** (८१।२, ८५।४९): [१] रंग ?; पाण्यामध्यें अनेक फणायुक्त शेषावर निजलेला; चार हात व त्यांत (१) गुडघ्यावर (२) बेंबीवर (३) डोक्याखालीं (४) संतानवृक्षाची मंजरी घेतलेला; एक पाय शेषावर; दुसरा लक्ष्मीच्या मांडीवर;

१ आसइऑरि १९२९–३० प्रप ३६ सी; मूचि २०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाभिकमलावर ब्रह्मा; कमलाच्या नालास बिलगलेले मधु व कैटभ हे राक्षस; शेषाजवळ मनुष्यरूप आयुधें. [२] शेषावर बसलेला; चार हात; पण ते मोकळे; त्याजवळ मनुष्यरूप गदा व चक्र; डाव्या मांडीवर लक्ष्मी.

वैन (इहिइ १ सी ६१): तांबूस; शेषावर सव्य किंवा वामललितासन; चार हात व त्यांत (१) शंख (२) चक्र (३) उजवा हात शेषावर (४) डावा हात गुडघ्यावर पसरलेला; डोक्यावर पांच अगर सात फणा; उजव्या अंगास भृगु व ब्रह्मा; डाव्या अंगास मार्कंडेय व शंकर.

ऐहोळी येथील अनंतशायी अथवा जलशायी फणायुक्त शेषावर निजला असून त्याच्या उजव्या दोन हातांजवळ अतिशय साधीं चक्र व गदा हीं आणि डाव्या हातांपाशीं शंख व सपत्र कमल हीं ठेविलीं आहेत. शिवाय उजव्या बाजूस कमरेच्या खालच्या भागाजवळ दोन स्त्रिया व एक भक्त अशीं तीन माणसें आहेत. ऐहोळी येथीलच अनंतासनमूर्ती फणांचें छत्र केलेल्या शेषावर बसली असून तिचा उजवा खालचा हात उजव्या गुडघ्यावर व डावा हात डाव्या मांडीवर ठेवला आहे. वरच्या उजव्याडाव्या हातांत चक्र व शंख या वस्तू आहेत. विष्णूच्या दोन्ही अंगास वरचे बाजूस दोन सोपायन स्त्रिया असून खालचे बाजूस दोन सोपायन व नमस्कारमुद्रेचे भक्त आहेत'. जलशायीचें शिल्पाच्या दृष्टीनें अत्यंत सुंदर उदाहरण देवगढ येथील अर्धचित्र मूर्तीचें देतां येईल. हिचे दोन भाग आहेत. खालच्या दालनांत पांच पुरूष व एक स्त्री अशीं द्वारपालादि माणसें आहेत. वरच्या दालनांत चतुर्भुज विष्णु शेषाच्या आंथरुणावर डाव्या कुशीवर पहुडला असून उजव्या पायापाशीं बसलेली लक्ष्मी तो पाय हातांत घेऊन चेपीत आहे. तिच्या पाठीमागें एक स्त्री आहे. कदाचित् ती कोणी दासी असावी. याच पायाच्या गुडघ्यापाशीं कोणी सर्पकंठ मनुष्य उभा आहे. मात्र तो शंकर नव्हे. अगदीं वरच्या बाजूस क्रमानें हंसवाहनी ब्रह्मा, गजवाहनी इंद्र, कमलावर बसलेला चतुर्मुख ब्रह्मा, वृषारूढ शिवपार्वती व आणखी कोणी मनुष्य अशा आकृती आहेत. ब्रह्मा ज्या कमलावर बसला आहे तें विष्णूच्या नाभीपासून निघालेलें नाहीं हें मात्र ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. विष्णूच्या गळ्यांत दोन कंठे व एक लांब हार, डोक्यास किरीट व कानांत कुंडलें, मनगटांत

१ मूचि २१,२२; चालुक्यन अर्किटेक्चर प्रप १७।२,२१।१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडीं, एका हाताच्या करंगळींत आंगठी व कमरेस मेखला येवढे दागिने आहेत. ब्रह्मदेशांत सांपडलेल्या शेषशायी किंवा जलशायी मूर्तींचे कांहीं विशेष आहेत. त्या मूर्ती शेषावर निजलेल्या असतातच असें नाहीं. कमलनाल जलशायीच्या बेंबीपासून जसा निघालेला दाखवितात तसा पाठींतून निघालेलाही असतो. आपल्याकडे कमलावर फक्त ब्रह्मा बसलेला दाखवितात. पण ब्रह्मदेशांतील मूर्तींत बेंबीपासून एक अथवा अधिक कमलनाल निघतात अथवा एका कमलनालास बेंबीपासून कमीजास्त अंतरावर तीन फाटे फुटतात. त्या प्रत्येक फाट्यास एक कमळ असतें व त्यांवर अनुक्रमें ब्रह्मा, विष्णु, महेश हे पद्मासन किंवा अर्धपर्यंकासन घालून बसलेले दाखविले असतात. ब्रह्मदेवास सामान्यतः तीन (खरोखर चार) व इतरांस एकेक तोंड काढलेलें असतें. विष्णूस नेहमीं चार हात तर ब्रह्मदेव व शिव यांना कधीं चार व कधीं दोन हात असतात. जुनें प्रोम येथें अशा तऱ्हेची एक व थातोज् अथवा रमञ्ञदेस येथें दोन मूर्ती सांपडल्या आहेत. पैकीं प्रोम येथील मूर्ती मगरीनें आधारलेल्या कमलाच्या शय्येवर पहुडली असून मगरीचें तोंड डोक्याच्या खालच्या बाजूस स्पष्ट दिसत आहे. जलशायीच्या बेंबीपासून तीन कमळें निघालीं असून त्यांवर ब्रह्मा, विष्णु व महेश बसले आहेत हें ब्रह्मदेवाचीं तीन (=चार) तोंडें व सर्वांचीं आयुधें यावरून स्पष्ट होत आहे[1]. थातोज येथील पहिल्या मूर्तीच्या पाठीमागून तीन सनाल कमलें निघून त्यांवर ब्रह्मा, विष्णू व महेश बसले आहेत. या शिल्पांत जलशायीच्या डोक्याजवळ नागाचे पांच फणे ओरखडले आहेत. थातोज येथील दुसऱ्या जलशायीच्या शिल्पांत नारायणाच्या बेंबींतून प्रथम एक कमलनाल निघून पुढें त्यास तीन फाटे फुटून त्यांस दाखविलेल्या तीन कमलांवर ब्रह्मा, विष्णु व महेश बसले आहेत. या शिल्पांत मात्र जलशायीच्या खालीं शेषाची शय्या आहे. या सर्व शिल्पांत शेषशायी व विष्णू या सर्वांच्या हातांत शंखचक्रादि आयुधांबरोबर बेलफळ अथवा महाळुंग आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे[2].

१ ऑसइक्सऑरि १९१९–२० पृ. २३ प्रप १ चि. ३. २ ब्रॅगॉव पृ. २८ चि. ४, पृ. ३० चि. ५, पृ. ३२ चि. ६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अनंतासन

ऐहोळे-विजापूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३ मथुरा-म्यूझियम योगीश्वर विष्णु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्म

ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न केल्यावर तिचें रक्षण करणारा कोण अशी चिंता त्यास लागली असतां त्याच्या शरीरापासून वृषभ–कल्प पुरूष उत्पन्न झाला. त्याचें नांव धर्म. ब्रह्मदेवानें त्यास जगाचें रक्षण करण्याविषयीं विनविलें. हा कृतादि युगांत अनुक्रमें ४,३,२,१ पायांचा असतो असें क्वचित् सांगितलेलें आढळतें. याचीं दोन जवळजवळ एकच अशीं ग्रंथिक वर्णनें मिळालीं तीं अशीं—

आपु (इहिइ १ सी ६२), विध[1] (७७): पांढरा; चार हात (काल, अवकाश, शौच, आत्मशुद्धि) व त्यांत (१) व्यवसायमस्तकीं (२) अक्षमाला (काल) (३) पुस्तक (वेद) (४) वृष (पुण्य, धर्म?) मस्तकीं; चार तोंडें (यज्ञ, सत्य, तप, दान); चार पाय (श्रुति, स्मृति, सदाचार, स्वस्य आत्मनः प्रिय); शुभ्र वस्त्रें; चौदा बायका (कीर्ति, लक्ष्मी, धृति, मेधा, पुष्टि, श्रद्धा, क्रिया, मति, बुद्धि, लज्जा, शांति, सिद्धि, तुष्टि).

योगीश्वर.

विशा[2] (चचि २।११४): पांढऱ्या कमळावर पद्मासन; चार हात व त्यांत (वरचे) (१) शंख (२) चक्र; खालचे योगमुद्रा व त्यांमागें (१) कमळ (२) गदा; अर्धोन्मीलित डोळे; नासाग्रीं दृष्टी.

कोनारक येथील योगीश्वर विष्णु विश्वपद्मावर पद्मासन घालून बसला असून त्यास दोनच हात आहेत. दुर्दैवानें ते तुटून गेल्यामुळें त्यांत कोणत्या वस्तू होत्या हें समजत नाहीं. कदाचित् दोन्ही हात मांडीवर ध्यान मुद्रेंत ठेवले असतील. डोक्यास अलंकृत करंडमुकुट, गळ्यांत तिहेरी कंठा व जानवें, अंगद, लांब हार, कमरेस वस्त्र व मेखला, साखळ्या इत्यादी दागिने व घडण इत्यादींचें कोनारक येथील इतर मूर्तींशीं साम्य यांवरून ही मूर्ती १३ व्या शतकांतील असावी असें दिसतें[3]. मथुरा म्युझि-

१ हात, पाय, तोंडें यांचे अर्थ व स्त्रिया हा तपशील फक्त विधमध्यें आहे. आपुमध्यें आहे कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. २ कै. गोपिनाथराव सिद्धार्थसंहितेंतील उतारा देतात तो वास्तवीक विशामधील आहे. त्यांची पाहण्यांत थोडी चूक झालेली दिसते. ३ आसइऑरि १९२६–२७ पृ. २०९ प्रप ४३ जी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यममधील योगीश्वर विष्णु योग किंवा ध्यानमुद्रेनें आसन मांडीनें घालून व तीवर खालचे दोन हात ठेवून बसला असून त्याच्या वरच्या हातांत अनुक्रमें गदा व चक्र या वस्तू आणि त्यामागें ब्रह्मा व शिव आहेत. डोक्यास मुलतानी टोपीसारखा मकूट असून अंगावर निरनिराळे दागिने आहेत. बैठकीवर स्त्री-पुरुष सेवक व लांछन म्हणून शंख काढला आहे'.

लक्ष्मीनारायण

कामिकागम (चचि १।७४०): पद्मासन; चार हात व त्यांत (१) कमळ (२) शंख (३) चक्र (४) आलिंगनमुद्रा; डाव्या मांडीवर लक्ष्मीः दोन हात व त्यांत (१) आलिंगनमुद्रा (२) रत्नपात्र. **रूम** (११ अ): रंग ?; गरूड; उजवी बाजू नारायणः दोन हात (१)? (२) आलिंगन-मुद्रा; डावी बाजू लक्ष्मीः हात?; पण त्यांत (१) आलिंगनमुद्रा (२) कमल. सर्व देवांचीं युग्मे अशींच करावीं; त्यांची शक्ति निराळी पण आयुधें व वाहनें तींच. **विशा** (चचि २।१।१३): रूमप्रमाणेंच; पण जास्त माहितीः उजव्या बाजूस वाहन; जवळ चामरधारी सिद्धी; पुढें पुरुषरूपधारी शंख व चक्र. जवळच उपासक म्हणून ब्रह्मा व शिव. **शिर** (२३।२३,२५।७५): अर्धनारीश्वराप्रमाणें एकरूप; सांवळा व गोरा; हात ?; पण त्यांत (१) कमळ (२) गदा (३) शंख (४) चक्र (५) विद्या (पुस्तक) (६) कमळ (७) आरसा (८) सोन्याचा कलश; डावा स्तन उंचावलेला; पिवळीं वस्त्रें.

वासुदेव-पंचक

वासुदेवपंचकामध्यें वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध व सांब अशीं पांच रूपें येतात. त्यांचें वर्णन क्रमानें येथें देतों.

वासुदेव

साधारण-अपु (४९।१०): सर्वांस सामान्यः बाजूस ब्रह्मा व शंकर; [१] रंग व वाहन ?; चार हात व त्यांत (१) गदा (२) शंख (३) चक्र (४) वरद. [२] रंग व वाहन ?; दोन हात व त्यांत (१) शंख (२) वरमुद्रा. [३] दोन हात व त्यांत (१) गदा (२) चक्र. [४] (इहिइ १ सी ६६): गोरा; पादपीठ; चार हात व त्यांत (१) पद्म (२) चक्र

१ मूचि २३; आसइअॅरि १९३०-३४ प्रप १२२ सी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) शंख (४)गदा; पद्म व वीणा यांनीं युक्त अनुक्रमें श्री व पुष्टी; दोन मालायुक्त विद्याधर. **पांचरात्र** (चचि १।२३८): उजव्या हातांत (१) गदा (२) योगमुद्रा व शंख ?; डावे हातांत (१) छातीवर (२) चक्र. **रूम** (इहिइ १ सी ६७): पांढरा व पोपटी रंग. **विध** (८५।२,२९;४७): [१] सावळा; वाहन ?; चार हात व त्यांत (१) गदा (२) कमळ (३) शंख (४) चक्र; गदा व चक्र हीं मनुष्यरूपी व चामरधारी आणि वासुदेवाचे हात त्यांच्या डोक्यांवर; वासुदेवाच्या दोन्ही पायांमध्यें वासुदेवाचे पाय हातांवर घेतलेली, देवाकडे पाहून आश्चर्यचकित झालेली पृथ्वी; पीत वस्त्रें, दागिने, डोक्यावर कमल. [२] कृष्णः निळा; हात ?; पण त्यांत (१) चक्र. [३] दोन हात व त्यांत (१) चक्र (गदा ?). **शिर** (२३।४०): पांढरा; हात ?; पण त्यांत (१) गदा (२) कमल (३) शंख (४) चक्र; पीत वस्त्रें.

दैविक–वैन (इहिइ १ सी ६५): रंग ?; सिंहासन; चार हात व त्यांत (१) शंख (२) चक्र (३,४) ?; उजवी बाजूः क्रमानें उजवीकडून डावीकडे (१) श्री (२) बलभद्र (३) रेवती (४) प्रद्युम्न (५) रोहिणी; डावीबाजूः डावीकडून उजवीकडे (१) भू (२) अनिरुद्ध (३) उषा (४) सांब (५) इंदुकरी.

मानुष–वैन (इहिइ १ सी ६४): रंग व वाहन ?; चार हातांचा विष्णु किंवा दोन हात व त्यांत (१) चक्र (२) शंख; उजव्या बाजूस उजवीकडून डावीकडे (१) रुक्मिणी (२) नांगर व मुसळ घेतलेला बलराम (३) दोन हातांचा आणि सुरी व कटिहस्त असा प्रद्युम्न (४) चतुर्भुज, चतुर्मुख (ब्रह्मा); डाव्या बाजूस डावीकडून उजवीकडे क्रमानें (१) दोन हातांचा आणि तलवार व ढाल घेतलेला अनिरुद्ध (२) दोन हातांचा आणि दान व दंड धारण करणारा सांब (३) गरुड.

संकर्षण

अपु (४९।६,१२): बलरामः रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) नांगर (२) मुसळ (३) गदा (४) पद्म. **चचि** (२।११२;१।२३७) विध १ प्रमाणें. **रूम**: तांबडा व पांढरा रंग. **विध** (८५;४७): [१] पांढरा; वाहन ?; चार हात व त्यांत (१) मुशल किंवा मुशलपुरुषाच्या डोक्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर (२) विकसित कमळ (३) शंख (४) नांगर किंवा हलपुरुषाच्या डोक्यावर; निळीं वस्त्रें. [२] क्र. १ प्रमाणें. फक्त हात ?; पण त्यांत (१) नांगर (२) दंड. [३] दोन हात व त्यांत (१) दंड (२) नांगर. **शिर** (२३।४०): पिवळा; वाहन ?; चार हात व त्यांत (१) चक्र (२) शंख (३) गदा (४) कमळ; पिवळीं वस्त्रें.

प्रद्युम्न

अपु (४९।१२): [१] रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) वज्र किंवा चक्र (२) शंख (३) धनुष्य (४) बाण. [२] रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) धनुष्य (२) बाण. **पांचरात्र** (चचि १।२३७): चार हात व त्यांत (१) शंख (२) पद्म (३) चक्र (४) गदा किंवा (१) धनुष्य (२) बाण. **बृस** (५८।४०): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) धनुष्य; सुरूप. त्याच्या स्त्रीचे हातांत (१) ढाल (२) तलवार. **रूम** (इहिइ १ सी ६७): पिवळा, पोपटी किंवा पांढरा. **विध** (८५; ४७): [१] सावळा; वाहन ?; हात ?; पण त्यांत (१) विकसित कमल (२) बाणपुरुषाच्या डोक्यावर (३) शंख (४) नृरूप धनुष्याच्या डोक्यावर; पांढरीं वस्त्रें. [२] हात ?; पण त्यांत (१) धनुष्य (२) बाण. **शिर** (२३।४०): सावळा; वाहन ?; चार हात व त्यांत (१) चक्र (२) शंख (३) गदा (४) कमल; पिवळीं वस्त्रें.

अनिरुद्ध

अपु (४९।१३): नारायणः रंग व वाहन ?; चार हात. **पांचरात्र** (चचि १।२३७): काळा; हात ?; पण बहुधा उजव्या हातांत (१) बाण (२) तरवार; डाव्या हातांत (१) धनुष्य (२) ढाल. **रूम** (इहिइ १ सी ६७): कलियुगीं काळा; एरवीं शुभ्र. **विध** (८५;४७): [१] गौर; वाहन ?; चार हात व त्यांत (१) विकसित कमल (२) खड्ग किंवा खड्गपुरुषाच्या डोक्यावर (३) शंख (४) चर्म किंवा चर्मपुरुषाच्या डोक्यावर; तांबडीं वस्त्रें. [२] गौर; वाहन व हात ?; पण हातांत (१) खड्ग (२) ढाल; तांबडीं वस्त्रें. [३] सावळा; पांढरीं वस्त्रें, बाकी बहुधा २ प्रमाणें. [४] दोन हात व त्यांत (१) ढाल (२) तलवार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



२४ नालंदा–बहार विष्णु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



२६ साभर-डाक्का विष्णु

२५ रंगपूर-बंगाल विष्णु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिर (२३।४०): निळा; वाहन ?; चार हात व त्यांत (१) चक्र (२) शंख (३) गदा (४) कमळ; पिवळीं वस्त्रें.

सांब

बृस (५८।४०): हात ?; पण त्यांत गदा; त्याची स्त्री ढाल–तलवार घेतलेली. विध (८५।७७): गोरा; गदायुक्त; तांबडीं वस्त्रें.

साधारण विष्णु

ज्या विष्णुमूर्ती इतर कोणत्याही वर्गांत पडूं शकत नाहींत त्यांस मी या नांवाखालीं एकत्र केलें आहे. यांतील विष्णुमूर्तींस एक मुख आणि दोन, चार, सहा, आठ, दहा इत्यादी हात असूं शकतील. तसेंच एक किंवा दोन पत्नीही त्याच्या संगतीनें सांपडतील. यानक, स्थानक, आसन व शयन आणि योग, भोग, वीर, अभिचारक या प्रकारांचीं वर्णनेंही सोईसाठीं मी याच अधिकरणांत समाविष्ट केलीं आहेत. वास्तविक तीं वर्णनें कोणत्याही मूर्तींस कमीजास्त प्रमाणांत लागूं करतां येतील.

अचि (३।१।७३३): रंग व वाहन ?; आठ हात व त्यांत (१) तलवार (२) गदा (३) बाण (४) पद्म (५) शंख (६) धनुष्य (७) चक्र (८) ढाल. अपु (४९।१६): [१] गरूड; आठ हात व त्यांत (१) शर ? (२) तलवार (३) गदा (४) वरद (५) धनुष्य (६) ढाल (७) चक्र (८) शंख. [२] गरूड; चार हात; पण त्यांत ?. अभे[1] (४८।१९): सावळा; पद्मपीठावर बैठा किंवा उभा; चार हात पण त्यांतः उजवे = (१) अभयमुद्रा (२) शंख (३) चक्र; डावे = (१) कटकमुद्रा (२) गदा (३) पद्म. डाव्या किंवा उजव्या अंगास श्री; पिवळीं वस्त्रें. बृस (५८।३१): सावळा; वाहन ?; श्रीवत्स, कौस्तुभ, पीतांबर वगैरे. [१] दोन हात व त्यांत (१) शांतिमुद्रा (२) शंख. [२] चार हात व त्यांतः उजवी बाजू (१) शांतिमुद्रा (२) गदा; डावी बाजू (१) शंख (२) चक्र. [३] आठ हात व त्यांतः उजवी

---

१ या वर्णनापुढें विष्णूच्या केवल अथवा संयुक्त मूर्तीचें वर्णन करतों असें म्हणून कांहीं श्लोक दिले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजू (१) शांतिमुद्रा (२) शंख (३) गदा (४) बाण; डावी बाजू (१) शंख (२) चक्र (३) ढाल (४) धनुष्य. **मासा** (५१): सावळा; वाहन ?; चार हात; पण त्यांत (१) अभयमुद्रा (२) वरमुद्रा (३) पद्म (४) गदा (५) चक्र (६) शंख; श्रीवत्स, वनमाला, पीतांबर, तेजोवलय; श्री व भू यांसह. **रूपा** (२० अ) अचिप्रमाणें. **रूम** (इहिइ १ सी ७१) लोकपाल: दोन हात व त्यांत (१) गदा (२) चक्र. **विशा** (चचि १।१७७): हात ?; पण त्यांत (१) गदा (२) पद्म (३) शंख (४) चक्र. **विध** (६०।१): **रूमप्रो**; पहा वासुदेव, वैकुंठ, विश्वरूप. **शिर** (२३।३) [१] शुभ्र; पांढऱ्या कमळाचें आसन; हात ?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र (३) कमळ (४) गदा; निरनिराळे अलंकार. [२] मुकुंद (२३।४): पिवळा; कल्पवृक्षाखालीं कमलामधील गरूड; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) वर(३) गदा (४) कमळ; तेजोवलय. [३] पंचामृत ? (२३।१७): पांढरा; मोत्यांचें बाळवंट; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) कमल (३) गदा (४) शंख. [४] मुकुंद (२३।२६): पिवळा; रत्नमय कमलासन; हात ?; पण त्यांत (१) गदा (२) कमळ (३) चक्र (४) शंख; रुक्मिणी आदीकडून अभिषेक केला जात अलेलेला. [५] मुकुंद (२३।१): पांढरा; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) कमळ (३) शंख (४) गदा; दोन्ही बाजूंस अनुक्रमें श्री व भू; पीतांबर, निरनिराळे दागिने. [६] संतानगोपाल (२३।१९): काळा; रथ; चार हात व त्यांत (१) चक्र (२) शंख; पिवळीं वस्त्रें; ब्राह्मणाला (सांदीपनीला ?) पुत्र देणारा. [७] हरि (२३।२४): हात ?; पण त्यांत (१,२) वेणू (३) माला (४) वेद; चित्रविचित्र वेष. [८] आवहन्ती (२३।२१): पिवळा; रक्तकमलस्थ; हात ?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र (३) सोन्याचा घट (४) तांबडें कमळ (५,६) दोन हातांनीं श्री धरली आहे; पिवळीं रेशमी वस्त्रें. [९] मुकुंद (२३।२५): सोन्याच्या जमिनीवर; हात ?; पण त्यांत (१) चक्र (२) शंख (३,४?) वेणू (५) कमल (६) गदा (७, ८) योगमुद्रा; गोपी अभिषेक करीत आहेत असा. [१०] वासुदेव (२३।२४): हात ?; पण त्यांत (१) अभय (२) वरमुद्रा; पायस भक्षिणारा; रुक्मिणी व सत्यभामा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांसह'. सुभे (इहिइ १ सी ७०): हात?; पण त्यांत (१) शंख (२) चक्र; श्री व भू यांसह; पिवळीं वस्त्रें; उभा, बैठा किंवा निजलेला.

अवंतिपूर (काश्मीर) येथें दोन मनोरंजक विष्णुमूर्ति आहेत. पैकीं एक वाकडया पायांच्या चौरंगावर डावें ललितासन घालून बसली असून तिच्या उजव्या व डाव्या बाजूंस अनुक्रमें सत्यभामा (भूदेवी?) व श्रीदेवी बसल्या आहेत. या मूर्तीस सहा हात असून उजव्या तीन आणि डाव्या वरच्या व खालच्या हातांत अनुक्रमें गदा, माला, मंजरी, धनुष्य व कमल-कलिका या वस्तू असून डावा मधला हात आलिंगनमुद्रेचा आहे. विष्णु-मूर्तीचा तिलक वाटोळा तर स्त्रीमूर्तीचा तिलक सतारक चंद्रकलाकृति आहे. दुसरी मूर्ती वरच्यासारखीच आहे. पण तिला फक्त चार हात असून तिचें आसन सव्य ललित आहे. शिवाय सर्वांचे तिलक सतारक चंद्रकलाकृति आहेत. दोन्ही मूर्तींच्या चौरंगांच्या दर्शनी भागांवर पोपट काढले आहेत हा एक विशेष आहे.[२] मथुरा शिलापट्टावरील एक विष्णु बोधिसत्वाशीं संबंध दाखविणाऱ्या प्राचीन मूर्तीपैकीं एक आहे. बोधिसत्व मैत्रेय दोन हातांचा असून त्याच्या उजव्या हातांत अभयमुद्रा व डाव्या हातांत अमृतघट असतो. या विष्णुमूर्तीस चार हात असून खालच्या हातांत गदा व चक्र आणि वरच्या हातांत अभयमुद्रा व कमंडलू आहे. वरच्या हातांत याच वस्तू असणाऱ्या आणखी दोन विष्णुमूर्ती मथुरा म्यूझियममध्यें आहेत. मथुरा-पंथात अमृतघटाऐवजीं शंख व अभयमुद्रेवर कमल काढलेल्या आणि थोड्या नंतरच्या काळांतील आणखी मूर्ती आहेत. विष्णूच्या डावीकडे बहुधा गरुड असावा[३]. नालंदा (बिहार) येथील विष्णुमूर्ती उभी व चतुर्भुज असून तिच्या पुढील दोन हातांत कोणत्या वस्तू आहेत हें समजत नसलें तरी मागचे दोन हात गदा व चक्र यांवर ठेवले आहेत. गदेचें स्वरूप अगदीं अभिनव

१ याशिवाय शिरमध्यें (२३।१२,१८,२७,२८,३५,३८,३९) कृष्ण स्वरूपी विष्णूचीं वर्णनें आहेत. त्यांत डोक्यावर मोराचीं पिसें, हातांत वेणू, गोपी, गाई यांनीं वेष्टित, पायास, लोणी वगैरे भक्षणारा इत्यादी मामुली गोष्टी सांगितल्यानें त्यांचा येथें समावेश केला नाहीं. २ ऑसइऑरि १९१३–१४ पृ. ४६ प्रप २७ डी, ई. ३ यू. पी. हिस्टॉरिकल सोसायटीचें जर्नल व्हॉ १०।२. भाग.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असून चक्रास दांडा लावला आहे हेंहि त्याचें वैशिष्ट्यच होय. याशिवाय याच्या गळ्यांत असलेला कर्णिकार फुलांचा हार, डोक्यामागील प्रभावलय, पुढील दोन हातांच्या मुद्रा या सर्व गोष्टी लक्ष्य आहेत.' रंगपूर येथील विष्णुमुर्ती इ. स. ६।७ व्या शतकांतील असून तिचा विशेष हा कीं, तिचा डावा हात चक्रावर ठेवला असून चक्र बरेंच मोठें आहे.[२] बाणगढ (दिनाजपूर, बंगाल) येथील विष्णू विश्वपद्मासनावर उभा आणि त्याच्या तीन हातांत पद्म, गदा व चक्र असून चौथा हात मोडला आहे. पद्म वास्तवीक हातांत नसून हाताच्या पंजाजवळ आहे. अंगावर मुकूट, कुंडलें, केयूर, आंगठ्या, अंगद, कंकणें, कंठा, हारवला जानवें, मेखला व तीखालीं गुडघ्यापर्यंतचें वस्त्र, गुडघ्याखालीं लोंबणारा हार, इत्यादी अलंकार आहेत. दोन्ही बाजूंस दोन गण तर आहेतच; पण त्यांशिवाय उजवीकडे चौरीधर लक्ष्मी व डावीकडे वीणाधर सरस्वती उभी आहे. मूर्तीच्या मुखावर मंदस्मित असून अंगकांति तुळतुळीत आहे.[३] साभर (डाक्का) येथील मातीच्या चकतीवरील विष्णूचा विशेष हा आहे कीं, त्याचे वरच्या दोन हातांत शंख व चक्र या वस्तू असून खालचे हात दोन स्त्रीपुरुषांच्या डोक्यांवर आहेत. हे स्त्रीपुरुष अनुक्रमें गदा व चक्र यांचीं मानुष रूपें आहेत हें उघड आहे. याच्या खालीं 'ओं नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र कोरला आहे. याची अक्षरवटिका ७।८ शतकांतील आहे[४]. डाक्का म्यूझियममध्यें लक्ष्मणकाटी येथून आणलेली एक मनोरंजक विष्णुमूर्ति आहे. ही गरुडावर सव्य ललितासन घालून बसली असून हिच्या मुकुटावर योगासनी विष्णूची छोटी मूर्ति आहे. हिच्या उजव्या वरच्या हातांत आंघोळ घालीत असलेल्या दोन हत्तींच्या मध्यें कमलावर बसलेली लक्ष्मी असून डाव्या हातांत कमलावर बसलेली व हातांत वाकडा वीणा घेतलेली सरस्वती आहे. उजव्या खालच्या हातांत चक्र असून त्यांत चक्रपुरूष काढला आहे आणि डाव्या खालच्या हातांत गदेची स्त्री मूर्ति आहे.[५] म्हैसूर संस्थानांतील एका विष्णुमूर्तीच्या सहा हातांपैकीं पहिला

१ आसइऑरि १९२८–२९ पृ. १४५ प्रप ५७ बी; मूचि २४. २ आसइऑरि १९२९–३० पृ. १४२ प्रप ३६ बी; मूचि २५. ३ ईइस्कूमिस्क प्रप ४३ डी; मूचि २८. ४ आसइऑरि १९२७–२८ पृ. १११ प्रप ४९ बी; मूचि २६. ५ इ. ब्रु. ब्र. स्क. डा. म्यू. पृ. ८६ प्रप ३२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



२७ रायनल्लूर–तंजावर श्रीनिवास

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२८ दिनाजपर–बंगाल विष्णु, श्री व सरस्वती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व शेवटचा अनुक्रमें अभय व दान अथवा वरद मुद्रेचे असून बाकींच्या हातांत शंख, बाण, धनुष्य व पद्म या वस्तू आहेत. मूर्तीच्या दोन्ही अंगास श्री व भू यांच्या छोट्या प्रतिमाही आहेत[1]. रायनल्लूर (तंजावर) येथील श्रीनिवासमूर्ती पालथ्या कमलावर उभी असून तिच्या वरच्या दोन हातांत अनुक्रमें चक्र व शंख आणि खालचा उजवा अभयमुद्रेचा व डावा मांडीपाशीं तळहात खालीं करून धरलेला आहे. उजव्या हातानें देव भक्तास अभय देत असून डाव्या हातानें भक्तास तुझा संसार-सागर मांडीइतका उथळ म्हणजे सहज तरून जाण्याजोगा असल्याचें दर्शवितो अशी यांत कल्पना केली आहे. वरदराज व श्रीनिवास यांच्या मूर्तींत फरक येवढाच कीं, अभयमुद्रेऐवजीं वरमुद्रा असते आणि डावा हात मांडीपाशीं असण्याऐवजीं कमरेवर तरी असतो किंवा गदेवर ठेवलेला दाखवितात[2]. ब्रह्मदेशांतील जुनें प्रोम येथील मूर्ति थोडी निराळी आहे. विष्णु पंख पसरलेल्या गरुडावर उभा, तर डाव्या अंगास लक्ष्मी कमलावर उभी आहे. विष्णूस असलेल्या चार हातांपैकीं उजवा खालचा छातीपर्यंत आणून त्यांत बेलफळ किंवा महाळुंग दाखविलें आहे. उजवा वरचा हात भंगला आहे. डाव्या वरच्या व खालच्या हातांत अनुक्रमें चक्र व गदा हीं आयुधें आहेत. लक्ष्मीच्या उजव्या हातांत सनाल कमलें असून डावा हात नुसता खालीं सोडून मांडीस चिकटविलेला दाखविला आहे[3]. येथील दुसऱ्या एका विष्णुमूर्तीच्या हातांतही शंख, चक्र, गदा या आयुधांबरोबर महाळुंग आहे[4]. बेलहन (जावा) येथील विष्णुमूर्ती लठ्ठ गरुडावर असलेल्या कमलावर सव्य ललितासन घालून बसली आहे. तिच्या वरच्या दोन हातांत अनुक्रमें कमळ व शंख असून खालचे दोन हात योगमुद्रेचे आहेत. गरुडाचें तोंड वराहासारखें पण राक्षसी, पंख मोठे व वळकट आणि पायांना पक्ष्यांप्रमाणें नख्या व त्यांत नाग धरलेले आहेत. विष्णु व गरूड यांच्या मुद्रांत पूर्ण विरोध दिसतो. विष्णु शांत, प्रसन्न, गंभीर, सुंदर असा तर गरूड क्रूर, अक्राळविक्राळ वगैरे दोषांनीं

१ म्हैसूर आर्किऑलॉजी रिपोर्ट १९३२ प्रप ९।२. २ आसइऑरि १९२१–२२ पृ. १०६ प्रप ३८ ए; मूचि २७. ३ ब्रॅ. गॉ. व. पृ. २४ चि. २. ४ कित्ता पृ. २७ चि. ३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युक्त भासतो'. एशियाटिक मायथॉलॉजीमध्यें चितारलेला विष्णू राक्षसरूप, पक्ष्यासारखे पाय व मोठे पंख असलेल्या गरुडावर नाचत आहे. त्यास चार हात असून त्यांतील आयुधेंही नेहमीचींच आहेत[२].

मूर्तीचे तिच्या असण्याच्या पद्धतीवरून यानक, स्थानक, आसन व शयन असे चार प्रकार होतात. पैकीं यानक प्रकार क्वचित् पाहण्यांत येत असला तरी ग्रंथांतरीं त्याचें वर्णन कोठें आढळत नाहीं. मूर्ती ज्या हेतूनें पूजिली जाते त्यावरून तिचे योग, भोग, वीर व अभिचारक असे आणखी चार प्रकार होतात. शिवाय तिजबरोबर दाखविलेल्या परिवारावरून तिचे उत्तम, मध्यम व अधम असेही तीन प्रकार होतात. बहुतेक प्रत्येक मूर्ती-विषयीं असे भेद होणें शक्य असलें तरी ग्रंथिक वर्णनें फक्त विष्णूविषयीं मिळत असल्यानें तेवढींच तक्त्याचे रूपानें पुढें देतों[३]. तो समजून घेतांना एकदोन गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. (१) या तक्त्यांत संक्षेप वापरले आहेत ते असे—काव्या=कामिनी व व्याजिनी; किमि=किन्नरमिथुन; किसु=किंकिंधसुंदर; चसू=चंद्र व सूर्य; नातु=नारद व तुंबर; ब्रश = ब्रह्मा व शंकर; भृमा = भृगु व मार्कंडेय = पूजकमुनि: मकै; = मधु व कैटभ; मास = माया व संल्हादिनी; यवि = यक्ष व विद्याधर; श्रीभू = श्रीदेवी व भूदेवी; सस = सनक व सनत्कुमार. (२) योग प्रकारां-तील आसनपद्धतींत बहुधा मुख्य मूर्ती व श्री सव्य ललितासन आणि भू वाम ललितासन घालून बसलेली दाखवितात. (३) श्री व भू यांच्या एकेका हातांत नेहमीं अनुक्रमें कमळ व उत्पल असतें आणि दुसरे हात खालीं सोडलेले, सिंहकर्णमुद्रेचे किंवा मांडीवर ठेवलेले असतात. (४) शयन-मूर्ती हें विष्णूचें जलशायी रूप असतें. त्यांत नाभिकमलांतून जन्मलेला ब्रह्मा असतोच; शिवाय शंकर व ब्रह्मा यांची जोडी असते. विष्णूची कोणतीही मूर्ती या चार प्रकारांत घालतां येईल. पण दक्षिणेंत खरोखरच त्या नियमां-प्रमाणें परिवार काढलेला आढळतो तसा उत्तरेंत काढीत असत असें वाटत नाहीं.

---

१ रिलेशन बिट्वीन दि आर्ट ऑफ इंडिया अँड जावा पृ. ४७ चि. ९. २ पृ. २०९ चि. १६. ३ मी ही माहिती इहिइ खंड १ परिशिष्ट सी पृ. १७ वरून घेतली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योग	उः सांवळा; चार हात; (१) अभय (२) शंख (३) चक्र (४) वरद, कमरेवर; भूमा, श्री भू यांनीं अर्चिलेला; ब्रश, यांसह. मः ब्रश याखेरीज अः पूजक ऋषीं-विरहित	उः पांढरा; चार हात; (१,४) मांडीवर (२,३) शंख चक्र विरहित. श्वेत-पद्मावर मांडी व तीवर हात; पिवळें नेसूं; पांढरें उत्तरीय, जटा बंध; ब्रश, चसू, सस, भूमा किंवा भूमा, यांसह. मः चसू, सस, याविरहित' अः भूमाविरहित'	उः पिवळा सावळा; उजव्या कुशीवर निजता दोन हात; (१) उशाला (२) कोपर वर करून मांडीवर अथवा कमरेवर. उपाः प्रासारित; डापा आकुंचित; भूमा, मकै, ब्रश, विष्वक्सेन, गरूड, सप्तर्षि, यांसह. मः सप्तर्षि, विष्वक्सेन, रहित अः भूमा, मकै, विरहित.
भोग	उः सांवळा; चार हात; (१) अभय, वरद (२) शंख (३) चक्र (४) कमरेवर, सिंहकर्ण; श्रीभू (कमल व उत्पलधारी), भूमा, मास, काव्या, नातु; २ किमि, यवि, सस, चसू, यांनीं युक्त. मः नातु, यवि, यांविरहित. अः सस, चसू, भूमा, यांविरहित.	उः सांवळा; ४ हात; (२,३) शंख, चक्र (१) अभय, वरद (४) कटिकर, सिंहकर्ण. ब्रश, भूमा, मास, नातु, किमि, यवि, सस, चसू, यांसह. मः नातु, किमि, यांविरहित अः सस, चसू, भूम रहित.	उः सांवळा; योग शयनाप्रो; श्रीभू, ब्रश, वक्रतुंड, विन्ध्यवासिनी, मकै पंचायुध, गरूड, चसू, नातु, अश्विनी, लोकपाल, अप्सरा, यांसह. मः नातु, लोकपाल, रहित अः भूमा व अप्सरा, रहित.

१ दुसऱ्या पाठात म व अ यांची उलटापालट केली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

	स्थानिक	आसीन	शयान
वीर	उः सांवळा; ४ हात; (१) शंख (२) चक्र; ब्रश, भूमा, किसु, सस, चसू, यांनीं युक्त.	उः तांबडा; चार हात; (२, ३) शंख चक्र (१) अभय (४) सिंहकर्ण; काळीं वस्त्रें; श्रीभू पूजक; ब्रश, भूमा, गीर्वाणी (चामरधारी) सस, नातु, चसू.	उः सांवळा; चार हात; (२,३) शंख, चक्र; योगशयनाप्रमाणें; श्रीभू, मकै, भूमा, ब्रह्मा, पंचायुध, गरूड, चसू, सप्तर्षि, १२ आदित्य, ११ रुद्र, जयादि अप्सरा, नातु, किमि, सस, ब्रश, यांसह.
	मः किसु, सस, यांविरहित.	मः नातू, सस काव्या, रहित.	मः रुद्र, आदित्य, अप्सरा, मुनि, रहित.
	अः चसू, भूमा खेंरीज.	अः ब्रश, चसू, श्रीभू, रहित.	अः किमि, सस, भूमा, रहित.
अभिचारिक	धुरकट; दोन किंवा चार हात; काळीं व कडक वस्त्रें, सुकें अंग, वर डोळे असलेला. ब्रह्मादि देव विरहित.	निळा; दोन किंवा चार हात; काळीं वस्त्रें, ऊर्ध्वनेत्र, देवी रहित.	उः निळा; २ किंवा ४ हात. महानिद्रायुक्त; कोरडी वस्त्रें व अवयव; काळीं वस्त्रें; दोन फणे व दोन वेटाळयांचा नाग.
	मः—	मः—	मः एक फणा व एक वेटाळें.
	अः—	अः—	अः सर्पविरहित, सारख्या भुईवर निजलेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ शिव

प्रस्ताव

हिंदुस्थानांत ज्यांची फार मोठ्या प्रमाणांत पूजा चालते त्यांपैकीं शंकर ही एक महत्त्वाची देवता आहे. अमरकोशांत याचीं ४८ नांवें दिलीं आहेत.[1] शूलिन्, चंद्रशेखर, कृत्तिवासस्, पिनाकिन्, कपर्दिन्, शितिकंठ, कपालभृत्, विरूपाक्ष, त्रिलोचन, धूर्जटि, नीललोहित, गंगाधर, वृषध्वज, व्योमकेश, भीम, त्र्यंबक, उग्र वगैरे नांवें त्याचें रूप कसें आहे तें सांगतात. उमापति, भूतेश, प्रमथाधिप, पशुपति इत्यादि नांवें त्याचे नातेवाईक व परिवार यांत कोण कोण आहेत हें सुचवितात. गिरीश, मृत्युंजय, शितिकंठ, गंगाधर, स्मरहर, त्रिपुरांतक, अन्धकरिपु, क्रतुध्वंसी, इत्यादी नांवें तो राहतो कोठें व त्यानें काय काय केलें हें दर्शवितात. पण हीं सर्व कृत्यें त्यानें एकदमच केलीं असें नाहीं. त्याचें हल्लीचें स्वरूप हें हळूहळूं बनत आलें आहे. वेदांमध्यें, त्याजविषयीं हल्लीं ज्या कथा प्रचलित आहेत किंवा त्याचें जें स्वरूप आज आपणास ठाऊक आहे, त्या सर्व कथा किंवा तीं सर्व वर्णनें सांपडतातच असें नाहीं. पण पुढील विस्तार समजण्यास मूळ वैदिक वाङ्मयात काय आहे तें पाहिलें पाहिजे.

रुद् धातूपासून रुद्र हा शब्द निष्पन्न झाला आहे. रुद् धातूचा अर्थ रडणें–ओरडणें असा आहे. रुद् याचा अर्थ प्रकाशणें किंवा तांबड्या रंगाचा असणें असाही कोणी कोणी समजतात.

रुद्राला हात, पंजे आणि इतर दृढ अवयव आहेत. त्याचे ओठ सुंदर आहेत. पूषन्प्रमाणें त्याच्या केसांची वेणी घातलेली आहे. त्याचा वर्ण पिंगट आहे आणि आकार झगझगीत आहे. तो सुवर्णालंकार घालतो, सोन्याची व चकाकणारी अशी वेगवेगळ्या आकारांच्या पुतळ्यांची माळ धारण करतो व रथांत बसतो इतकें वर्णन ऋग्वेदांत आढळतें. इतर वेदांत याहून थोडें अधिक सांपडतें. त्याला तोंड, जिव्हा आणि दांत आहेत. त्याचें

१ पहिलें कांड, स्वर्वर्ग श्लोक ३०

मू. ६. .....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोट काळें आहे आणि पाठ तांबडी आहे. तो नीलकण्ठ आहे आणि त्याच्या डोक्यावर निळा तुरा आहे. तो तांबूस वर्णाचा आहे. तो कातडें पांघरतो आणि पर्वतांत राहतो. धनुष्यबाण हें त्याचें प्रमुख आयुध आहे. तो कधीं-कधीं वज्रही हातांत धरतो. रुंद तोंडाचे, ओरडणारे आणि मांसभक्षक असे कुत्रे त्याजपाशीं असल्याचें वाजसनेयी संहिता व अथर्ववेद यांत म्हटलें आहे. कदाचित् भैरवाच्या संगतीनें कुत्रे दाखविण्याची कल्पना यावरूनच सुचली असेल.

मरुतांचा तो पिता आहे. परंतु मरुतांप्रमाणें तो युद्धांत भाग घेत नाहीं. त्र्यंबक हें त्याचें नांव वाजसनेयी संहितेंत व शतपथ ब्राह्मणांत आणि एकदां ऋग्वेदांतही आलें आहे. ज्याला तीन माता आहेत तो त्र्यंबक असा या शब्दाचा मूळ अर्थ आहे. पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्यौ या त्या तीन माता होत. अंबिका हें शिवाच्या पत्नीचें नांव वाजसनेयी संहितेंत आहे; परंतु तेथें ती त्याची बहीण असल्याचें म्हटलें आहे. उमा आणि पार्वती हीं नांवें प्रथम केनोपनिषत् व तैत्तिरीय आरण्यक यांत येतात. पण तेथें तीं शिवाच्या पत्नीला उद्देशून आहेत कीं नाहींत याविषयीं शंका आहे.

रुद्र हें अग्नीचें दुसरें नांव किंवा विशेषण असल्याचें आढळून येतें. वाजसनेयी संहितेंत शर्व आणि भव हीं रुद्राचीं दोन नांवें आलीं आहेत. शांखायन श्रौतसूत्रांत ते त्याचे पुत्र असल्याचें नमूद आहे. वाजसनेयी संहितेंत अग्नि, अशनि, पशुपति, भव, शर्व, ईशान, महादेव, उग्रदेव इ. एका देवतेचे अनेक आकार असल्याचें म्हटलें आहे. अथर्ववेदांत भव, शर्व, पशुपति, उग्र, रुद्र, महादेव, ईशान, असे दिशापति सांगितले आहेत. शिवाय भव, शर्व, पशुपति, रुद्र यांचे स्वतंत्र उल्लेख आहेत. हे सर्व रुद्र-देवतेशीं संबद्ध असले तरी त्या वेदांत हे एकरूप सांगितलेले नाहींत. पण ब्राह्मण ग्रंथांत रुद्र हा उषस्‌चा मुलगा म्हटलें असून त्यास प्रजापतीनें वरील सात व अशनि अशीं आठ नांवें दिलीं असें नमूद आहे. या आठ नांवांपैकीं चार उग्रत्व व चार शिवत्व वाचक आहेत हें ध्यानांत घेण्या-सारखें आहे. युजर्वेद आणि अथर्ववेद यांत पशुपति हें रुद्राचें नांव नेहमीं येतें. याचें कारण असें कीं, गोठ्यांत न बांधलेल्या पशूंवर तो हल्ला करतो; तरी त्यानें त्यांचा नाश न करतां त्यांचें रक्षण करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुद्र हा भयानक आणि संहारक असल्याचें ऋग्वेदांत वर्णिलें आहे. त्याच्या सूक्तांत नेहमीं भीति प्रकट केलेली असते. अनेक ठिकाणीं तूं आमचीं मुलें, नातलग, आमची प्रजा, गावकरी, गुरेंढोरें यांना मारूं नकोस; त्यांना रोग, विष इत्यादी भयांपासून मुक्त कर; चोर, वाटमारे, चांडाळ यातुधान, यांपासून आमचा बचाव कर अशा प्रकारच्या प्रार्थना केलेल्या आढळतात. इतर वेदांतही त्याची भयानकता वर्णिली आहे. ज्वर, विष, इत्यादिकांसह तो लोकांवर चढाई करतो असें अथर्ववेदांत म्हटलें आहे.

रुद्र जसा भयानक म्हणून वर्णिला आहे तसाच—प्रार्थनांचे योगानें संकटें नाहींशीं झाल्यामुळें—भयनाशक व कल्याणकारक असल्याचेंही सांगितलें आहे. तो वैद्यांचाही वैद्य आहे. औषधांच्या योगानें तो मानवांना रोगमुक्त करतो. यासंबंधांत 'जलाषभेषज' हें त्याचें विशेषण नेहमीं येतें. पशूंना वाचविणाराही तोच आहे. अर्थात् तोच पशुपति होय. निरनिराळ्या धंदेवाइकांचा मुख्य तोच, इत्यादि वर्णनेंही वारंवार येतात. राग टाकून देऊन लोकांना शिव—कल्याणकारक होण्याबद्दल त्याची प्रार्थना केली आहे. यावरून शिव हेंच त्याचें नांव वेदोत्तर कालांत रूढ झालें.

प्रजापतीनें दुहितृगमन केलें तेव्हां त्याला शिक्षा करण्याकरितां रुद्र उत्पन्न झाला. रुद्रानें पशुपतित्व स्वीकारलें व मृगरूपानें पळणाऱ्या प्रजापतीला वेधलें. तेच मृगव्याध, मृग व रोहिणी या स्वरूपांत आकाशांत दिसतात अशी कथा ऐतरेय ब्राह्मण, शतपथब्राह्मण व ब्रह्मपुराण यांत आली आहे.

तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण यांत अग्नीला रुद्र म्हटलें आहे व त्याला मरुन्न—यज्ञाचा नाश करणारा असें विशेषण जोडलें आहे. दक्षयज्ञविध्वंसाच्या कथेचें मूळ यांत असावें. रुद्रानें तीन नगरें फोडून असुरांना पळवून लावलें असें तैत्तिरीय संहिता, ऐतरेय ब्राह्मण व शतपथ ब्राह्मण यांत सांगितलें आहे. यांत त्रिपुरदाहाच्या कथेचें मूळ असावें. अथर्ववेदांत रुद्रास अंधकघातिन् असें विशेषण लावलें जाहे. महाभारतांत याचेंच अन्धकघातिन् असें रूप केलें आहे. यांत अन्धकासुरकथेचें बीज असावें असें दिसतें.

कांहीं असलें तरी रुद्राच्या भयानक रूपाची स्मृति सूत्रकालापर्यंत अगदीं ताजी होती. बहुतेक गृह्यसूत्रांत शूलगव नांवाचा यज्ञ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याचें विधान आहे. याचा हेतू गुरांतील रोग नाहींसा व्हावा हा असल्यानें तो गोठ्यांत करण्यास सांगितला हें ठीकच आहे. पण तो गांवाबाहेर करावा व त्यांतील कोणतेही अवशेष गांवांत आणूं नयेत, तसेंच यांत रुद्राला उदेशून बैलाचा बलि द्यावा आणि वपाही बारा रुद्रांना उद्देशून हवन करावी असें विधान आहे. यांत हर, मृड, शिव, भीम, शंकर अशीं पांच नवीन नांवें आणलीं आहेत. पारस्कर व हिरण्यकेशी गृह्यसूत्रांत मार्गांत असतां, चवाठ्यावर, नदी उतरतांना, नावेंत बसतांना, रानांत शिरतांना, डोंगर चढतांना, स्मशान ओलांडतांना, सर्प आढळल्यास, वादळांत सांपडल्यास, प्रचंड झाड भेटलें असतां, रुद्राचें ध्यान करावयास सांगितलें आहे. यावरूनही रुद्राचें स्वामित्व व रागलोभ यांविषयीं सूत्रकालीं काय कल्पना होती हें दिसतें.

वरील प्रकारचें स्वरूप त्यास एकदम प्राप्त झालें असेलसें वाटत नाहीं. तो आर्यांनीं बनविला असता तर त्याचें आरंभींचेंही स्वरूप इतकें घोर राहतें ना. पण तो अनार्यांनीं बनविला असल्यामुळें व या अनार्य संघाचें आर्यांशीं वाकडें असल्यामुळें आर्यांनीं या देवास क्रूर, दुष्ट, इत्यादी गुणयुक्त मानलें. पण कालांतरानें दोघांमधील वैर कमी झाल्यावर पूर्वीचा रुद्र नंतर शिव बनला. दक्ष प्रजापतीनें त्याला आपली मुलगीही दिली. पण स्मशानवास, चित्ताभस्मलेपन, मुंडमाला, कपालांतून भिक्षा मागणें, कुत्रें बाळगणें, अंगावर कातडीं पांघरणें, सर्प भूषणें म्हणून धारण करणें इत्यादि त्याचे ओंगळ आचार पाहून त्यास यज्ञामध्यें हविर्भाग मिळण्याचें दूरच राहिलें; त्यास त्याच्या सासऱ्यानें यज्ञाला बोलाविण्याचेंही नाकारलें. पुढें यानें यज्ञाचा नाश केला. इतकें होऊनही शेवटीं तो आर्य देवतांमध्यें मिसळून गेला आणि हळूहळूं तो विष्णू इतकाच महत्त्वाचा देव बनला. येवढेंच नव्हे तर अनेक असुरांचा नाश करण्याचें श्रेय जसें विष्णूला तसें शंकरालाही मिळत आहे. मात्र ब्रह्मा व विष्णू याना सृष्ट्युत्पादन व सृष्टिपालन हीं कामें देऊन आणि शिवास सृष्टिसंहारक बनवून त्याच्या मूळ स्वरूपाची स्मृति कायम ठेविली आहे.

अशा तऱ्हेनें शिव मूळचा द्राविडी असतां आर्यांनींही त्याचा स्वीकार केला. येवढेंच नव्हे तर युरोप व आशिया या दोन खंडांतील फार मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



२९ मोहेंजोदडो-सिंध लिंगें व योनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३१ उनकोटी-बंगाल चतुर्मुख लिंग

३० मोहेंजोदडो-सिंध योगीश्वर शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रदेशांत चालूं असलेली लिंगपूजा ही त्याचीच प्रतीक बनली. यामुळें शिवाचा भक्तवर्गही फार मोठा झाला. व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें या भक्त-वर्गामध्यें नुसता शैव किंवा पाशुपत, लाकुलीश, कापालिक, कालामुख, वीर-शैव, इत्यादि नांवांचे पंथ उत्पन्न झाले. या पंथांत कित्येक अतिशय महत्त्वाचे तत्वज्ञानी व ग्रंथकार होऊन गेले असले तरी यांतील तसेंच शिवाच्या कित्येक ओंगळ आचारांमुळें या पंथांचा प्रसार समाजाच्या खालच्या वर्गा-तूनच मुख्यत: झाला. वैष्णवांपेक्षां शैवांची संख्या जास्तच असेल. पण वैष्णवांत आचारबंधनें कडक तर शैवांत आचारांतील ढिलेपणा जास्त हें आजही दिसून येतें.

शंकराची आज सयोनी लिंग व मूर्ती या दोन स्वरूपांत लोक पूजा करतात. मोहेंजोदडो, हराप्पा, बलुचिस्थान इत्यादि ठिकाणच्या उत्खननसंशोधनांत हीं दोन्ही प्रतीकें सांपडलीं आहेत[1]. पैकीं योगीश्वरमूर्ती महादेवाचीं अर्थात् शंकराचीं प्रतीकें असावीं असें अनुमान आहे व मोहेंजोदडो येथील शिलालेखांचें विद्वत्संमत वाचन झाल्यावर खरें ठरेल इतकें तें साधार आहे. पण लिंगाची गोष्ट तशी नाहीं. लिंगें व योनी यांची त्या वेळींही पूजा होई; अर्थात् तीं कोणत्या तरी देवतेचीं प्रतीकें आहेत हें खास. पण योगीश्वर हें ज्या देवतेचें प्रतीक त्याच देवतेचें योनीसह लिंग हें प्रतीक होतें कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. कारण उघड आहे. शिव ही केवळ द्राविडी देवता असून तिचें प्रतीक लिंगपूजा युरेशिया म्हणजे आशिया व युरोप या दोन्ही खंडांतील

१ या दोन्ही प्रतीकांचें एकेक चित्र मी या पुस्तकांत दिलें आहे (क्र. २९ व ३०). २९ व्या चित्रांत वरच्या दालनांत दोन लिंगमणि दाखविले असून खालच्या दालनांत ज्या योनींवर ते बसवावयाचे त्यांचीं चित्रें आहेत. दोहोंनाही भोकें असून तीं बहुधा योनी व लिंगें एकत्र बांधण्याकरतां असावीं. खालच्या दालनांत एक नुसतेंच लिंगही आहे (आसइअँरि १९२६–२७ पृ. ६८ प्रप १४ ए). शिवमूर्ती चौरंगावर योगासनानें व योगमुद्रेनें बसली असून तिच्या बाजूंस व खालीं धावता वाघ, हत्ती, गेंडा, रानरेडा, हरणें हे प्राणी दाखविले आहेत. त्यावरून असें वाटतें कीं, ही मूर्ती पशुपति महादेवाची असावी. हिला दोन शिंगांचा मुकुट असून तसे सशृंग मुकूट दक्षिण हिंदुस्थानांतील कित्येक देवळांत दृष्टीस पडतात (आसइअँरि १९२८–२९ प्रप २८ एफ).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक देशांत फार प्राचीन काळापासून प्रचलित होती. हिंदुस्थान वगैरे पौर्वात्य देशांत ती आजही जारी आहे. युरोपांतील कित्येक देशांत ती १५।१६ व्या शतकांपर्यंत प्रचलित होती. यामुळें या पूजेचे योनिलिंगरूपाचे अवशेष इंग्लंड, फ्रान्स, इटली, नार्वे वगैरे अनेक देशांतून सांपडले आहेत. सजीव सृष्टि जर योनि व लिंग यांच्या संयोगानें उत्पन्न होते तर निर्जीव सृष्टीही तशाच तऱ्हेनें उत्पन्न होत असली पाहिजे; तेव्हां जगाचें आदिकारण हेंच असलें पाहिजे किंवा जगाचा उत्पत्तिकर्ता जर कोणी असेल तर त्याचें सयोनिलिंग हेंच सर्वोत्कृष्ट प्रतीक आहे, अशा समजुतीनें मूलतः यांची पूजा प्रचारांत आली. वांझ किंवा नपुंसक, तसेंच इतरही कांहीं कारणानें ज्यांना मुलें होत नाहींत, झालीं तर मरतात, थोडीं होतात, केवळ मुलीच किंवा मुलगेच होतात, लग्नें होत नाहींत, पिकांची चांगली निपज होत नाहीं, गुरेंढोरें वाढत नाहींत इत्यादींनीं पीडित झालेले लोक उत्पत्तीच्या याच प्रतीकाची पूजा करूं लागले. असे लोक प्रत्येक देशांत सर्व काळीं असल्यामुळें फार मोठ्या भूभागावर याचें पुष्कळ काळ महत्त्व टिकून राहिलें. हिंदुस्थानांतहि या प्रतीकाची प्रथम स्वतंत्र रीतीनें व स्वतंत्र देवता म्हणून पूजा होत असावी. पण पुढें द्राविडी देवता शिव हिला सर्वव्यापी महत्त्व येऊन तीच जगाचें आदिकारण, अर्धनारीश्वर हें त्या कारणाचेंच रूप अशी समजूत सर्वसामान्य लोकांत प्रचलित झाल्यावर सयोनि लिंग हेंहि त्याच शंकराचें प्रतीक आहे असें समजूं लागले. अशा तऱ्हेनें मूलतः लिंगपूजा अनार्य व शिवदेवता द्राविडी असतां दोघांचें एकीकरण झालें. वैष्णवांनीं या लिंगप्रतीकास तोड म्हणून शालिग्रामपूजा प्रचारांत आणली असावी; पण तिला सर्वव्यापित्व आलेलें दिसत नाहीं.

शंकराची पूजा लिंग व मूर्ती या दोन्ही पद्धतींनीं होते हें वर सांगितलेंच आहे. यांवर हिंदुस्थानाच्या सर्व भागांत मोठमोठीं देवळें बांधलेलीं दिसतात. मात्र हा देव मूळचा द्राविडी असल्यानें दक्षिण हिंदुस्थानांत त्याच्या मूर्ती,लिंगें व एकंदरींत भक्ति या बाबतींत जितकी विविधता व प्रसार आढळेल तितका उत्तरेंत आढळणार नाहीं. अर्वाचीन शिवालयांत गणेशपट्टीवर गणेशच खोदतात. पण पूर्वीच्या देवळांत गणेशपट्टीवर शिवाची एकादी प्रतिमा, लिंग किंवा क्वचित् नंदी खोदलेला आढळतो. किंवा देऊळ ज्या शैव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंथाचें असेल त्या पंथाची लकुलीशाप्रमाणें विशिष्ट मूर्ती, नक्षी, यांसारखें चिन्ह काढतात. तसेंच गणेशपट्टीवरील पट्टीवर मध्यें शिवमूर्ती व बाजूस ब्रह्मा, विष्णु, गणेश, स्कंद इत्यादींच्या मूर्ती असतात. कित्येक लिंगायत देवळांत गणेशपट्टीवर गणेशाऐवजीं योगी, संन्यासी किंवा एकादा नक्षीदार चौकोन काढलेला मी पाहिला आहे. अशा देवळांत भिंतींच्या आंतील व दर्शनी बाजूवर शिवाच्या अनेक प्रतिमा सांपडल्या तर कांहींच आश्चर्य नाहीं. पण देऊळ वैष्णव असलें तरीहि अशा प्रकारच्या मूर्ती सांपडतात. देवळांतील कोनाडेही अशा वेळीं प्रायः शिवसंबमूर्तीनीं भरलेले असतात. विष्णूप्रमाणें शिवालाहि देवतांचा मोठा परिवार आहे. सर्व परिवार यथातथ्य दाखविणारीं देवळें महाराष्ट्रांत सांपडत नसलीं तरी दक्षिणेंत पुष्कळ आहेत. महाराष्ट्रांत शिवपंचायतनाचीं देवळें मात्र आधुनिक कालापर्यंत सर्वत्र बांधीत असें म्हणतां येतें. या देवळांत मध्यें पूर्वेकडे तोंड करून शिव असल्यास आग्नेयादि चार कोपऱ्यांवर अनुक्रमें सूर्य, गणेश, देवी व विष्णू यांचीं देवळें उभारतात किंवा या देवतांची स्थापना करतात[1]. अष्टदिक्पालांचे शिलापट्ट तपासले तर अनेक उदाहरणांत बरोबर मधल्या खान्यांत तांडव, गजासुरमर्दन किंवा आणखी एकाद्या रूपांत शिव काढलेला आढळतो. सर्वसाधारण लोकांत शैव पंथाचा इतका प्रसार झालेला आहे कीं, सामान्यतः सर्व शिवालयांत ब्राह्मणाप्रमाणें सर्व दर्जाचे ब्राह्मणेतर लोक शिवलिंगाची सस्पर्श पूजा करूं शकतात. याचमुळें शिवपूजकांची शैव ब्राह्मण किंवा गुरव या नांवानें ओळखणारी ब्राह्मणांहून कमी दर्जाची एक जात बनली आहे. पण तिला शैवपूजेंत इतकें महत्त्व आहे कीं, किती तरी महत्त्वाच्या शिवालयांत या लोकांचीच कायमचे पुजारी किंवा शागिर्द म्हणून नेमणूक केलेली आढळते.

शिवाची बौद्ध तंत्रपंथांत अवहेलना केली आहे. वज्रहुंकार आपल्या पायांखालीं भैरवाला[2] आणि त्रैलोक्यविजय आपल्या डाव्या पायाखालीं महेश्वर व उजव्या पायाखालीं गौरी यांना तुडवीत असल्याचें दाखवावें म्हणून सांगितलेलें आढळतें. दशभुज सितमारीची व उभयवराहानन

१ धर्मसिंधू पृ. २५६. २ बुइ १४४, १४६ प्रप ३९ सी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारीची या देवताही शिवास तुडवीत असल्याचें काढावें म्हणून विधान आहे[1]. शिवाय त्यास मार म्हणून संबोधिलें आहे तें निराळेंच[2].

शिवप्रतीकांचे मी लिंगें व मूर्ति असे दोन मुख्य वर्ग करतों. लिंगामध्यें लिंग, एकमुखलिंग, चतुर्मुखलिंग व लिंगोद्भव असे प्रकार आहेत. मूर्ति-वर्गाचे सामान्य व विशेष असे दोन उपवर्ग पाडले पाहिजेत. सामान्य उपवर्गांत शिवाच्या उभ्या व बैठ्या एकाकी किंवा सकुटुंब मूर्ति पडतात. विशेष उपवर्गांत वैदिक व पौराणिक कथांवर आधारलेल्या किंवा शिवाचीं वैशिष्ट्यें दाखविणाऱ्या मूर्ति येतात. यांत त्याच्या अनुग्रह, संहार, नृत्त, दक्षिणा व संकीर्ण मूर्तिप्रकारांचा समावेश होतो. या सर्व मूर्तींचीं एकूण-एक ग्रंथिक व शिल्पवर्णनें देण्यास येथें बिलकूल अवकाश नाहीं. फक्त मेजक्या मूर्ती वर्णन करणें भाग आहे.

लिंगें

हीं स्वयंभू व कृत्रिम अशा दोन प्रकारचीं असतात. स्वयंभू लिंगांचा आकार कसा असेल तें सांगतां येत नाहीं. कारण तीं घडविलेलीं नसतात. बहुतेक ठिकाणीं भोंवतीं योनी बांधून मध्यें विशिष्ट स्वयंभू लिंगाची कल्पना केलेली असते. कृत्रिम लिंगें घडवावयाचीं असल्यानें तीं लाकूड, दगड, निर-निराळे धातू, मूल्यवान रत्नें, स्फटिक, माती इत्यादि वस्तूंचीं बनविलेलीं असतात आणि त्यांचे आकार, घडण वगैरेमध्यें पुष्कळ भेद होऊं शकतो. कृत्रिम लिंगांवर ब्रह्मसूत्र म्हणून एक रेषा काढावी असें सांगितलें असून हिचें प्रयोजन लिंग खरोखरच पुरुषाचें जननेंद्रिय आहे अशी कल्पना येण्यासाठीं बहुधा असावें. हीमुळें लिंगावर शिस्नाग्राचा किंवा शिस्न मण्याचा भास उत्पन्न होतो. केवळ लिंग क्वचितूच आढळतें, बहुधा तें योनीमध्यें बसविलेलें असतें. त्यांपैकीं प्रमुख प्रकारांची थोडी माहिती येथें देतों. जास्त वर्णनासाठीं इहिइ खंड २ मधील लिंगप्रकरण पहावें. **अष्टोत्तरशत व सहस्र लिंगें** : यांमध्यें योनीच्या वर असलेल्या पृष्ठभागांत १०८ किंवा १००० लहान लिंगें खोदलेलीं असतात. यांचे नमुने महारा-ष्ट्रांतही आढळतात. उ. सातारा जिल्ह्यांत साताऱ्याच्या आग्नेयीस सुमारें तीन

१ बुइ ९९, ९८. २ कित्ता १५४ टीप्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



३२ खोह-नागोद (म. भारत) एकमुख लिंग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



३३ जावा चतुर्मुख सिंघ-ब्रह्मा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोसांवर देगांव म्हणून एक खेडें असून त्याच्या जवळच असलेल्या डोंगरावर पाटेश्वर नांवाचें गुहास्थान आहे. तेथें दक्षिणेच्या बाजूस असलेल्या गुहेला वऱ्हाडघर म्हणतात. हींत असलेलें सहस्रलिंग माझ्या चांगलें ध्यानांत आहे. तेथेंच अष्टोत्तरशत लिंगही असावें अशी माझी अंधुक आठवण आहे. पण निश्चय नाहीं. **धारा किंवा नलिका लिंग**: यामध्यें लिंगावर उभ्या पन्हळ्या पाडलेल्या असतात. जेथें दोन नळ्या मिळतात तेथें साहजिकच धार उत्पन्न होते. यामुळें यास मुख्यत: धारालिंग म्हणतात. **मुखलिंग**: यामध्यें लिंगावर एक, दोन, तीन, चार किंवा पांच मुखें असतात. यांचें वर्णन अनेक ठिकाणीं आलें असून त्यांपैकीं रूपमंडनांत कोणत्या दिशेस, कोणाचें, कोणत्या रंगाचें मुख असावें याविषयीं माहिती दिली आहे. एकच तोंड काढल्यास तें पूर्वेकडे करावें, दोन खोदल्यास तीं पूर्व व पश्चिम या दोन दिशांस, तीन मुखें खोदल्यास तीं पूर्व, दक्षिण व उत्तर या दिशांस आणि चार किंवा पांच काढावयाचीं झाल्यास तीं चार दिशांस चार व ऊर्ध्व दिशेस पांचवें अशीं काढावीं आणि मुखें असतील तितकीं व त्या दिशांस देवळाचीं दारें असावीं; लिंगाच्या भोवतीं काढावयाचीं हीं तोंडें दिशानुक्रमें तत्पुरुष, अघोर, सद्योजात, वामदेव व ईशान या पंचब्रह्मांचीं असावीं असें सांगितलें आहे'. यांचीं वर्णनें पंचब्रह्म सदराखालीं यावयाचीं असल्यानें तीं येथें देत नाहीं. पण येवढें मात्र नमूद करावयास हरकत नाहीं कीं, एकमुखलिंगांत शंकराचींच तोंडें दाखविण्याचा प्रघात असला तरी चतुर्मुख लिंगांत बहुधा आणि चतुष्काय लिंगांत निश्चयानें ब्रह्मा, विष्णु, महेश व सूर्य यांच्या आकृति प्राय: दाखविलेल्या असतात. मुखलिंगांचीं उदाहरणें अशीं–

नागोद (मध्यभारत) संस्थानांतील खोह गांवीं गुप्तकालीन एक अतिशय सुंदर एकमुख लिंग आहे. या लिंगाच्या खालच्या एकतृतीयांश भागांत एक कमनीय मुख काढलें असून त्याचा जटामुकुट व त्यावरील चंद्र, कपाळावरील तिसरा डोळा, यांवरून तें मुख शंकराचेंच आहे या विषयीं शंका नाहीं. त्याच्या गळ्यास वळ्या पडलेल्या दाखविल्या असून त्यांत मौक्तिक हार आणि कानांत कुंडलें आहेत[२]. गुडिमल्लं येथील लिंग फार मजेदार आहे. हें वास्तविक मुख-

१ रूम १४ अ. २ आसइवेस १९१९–२० परिच्छेद १४६ पृ. १०६ प्रप २९; मूचि ३२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिंग नसून कायलिंग आहे. कारण यावर पूर्ण मूर्ती खोदली आहे. ही किंचित् पाय फांकून अपस्मार पुरुषावर उभी राहिली असून हिला असलेल्या दोन हातांत अनुक्रमें मागले पाय धरलेला व खालीं डोकें झाल्यानें लोंबकळणारा बकरा व कमंडलु या वस्तू आहेत. शिवाय डाव्या बगलेंत खांद्यावर ठेवलेल्या परशूचा दांडा आहे. मूर्तीस शिरोवस्त्र किंवा शिरस्त्राण, हार, अंगद, कटक व मेखला हे दागिने आणि कमरेस वस्त्र आहे. लिंगाच्या माथ्यास स्पष्टपणें शिस्नमण्याचा आकार दिला आहे. हें कै. गोपिनाथराव यांच्या मतानें इ. स. च्या पहिल्या शतकांतलें आहे'. इतरांना त्यांचें म्हणणें पटत नसून ते त्याचा काळ इ. स. चें आठवें नववें शतक ठरवितात. तें कसेंही असो. हें कायलिंग फार महत्वाचें आहे येवढें निश्चित[२].

याहून अतिशय जुनें लिंग लखनौ म्युझियमध्यें आहे. याच्या माथ्यावर मनुष्याचें ऊर्ध्वांग आहे. याचा नाकापासून डोक्यापर्यंतचा भाग फुटून गेला आहे. याचा उजवा हात अभयमुद्रेचा व डाव्या हातांत घट आहे. यानें पांघरलेलें धोतर खांद्यावरून छातीपर्यंत आलें आहे. कानांत दोन बाळ्या आहेत. जेथें या ऊर्ध्वांगाची कमर असावयाची तेथें चार उपदिशांस चार तोंडें आहेत. यांच्या डोक्यांचे केसांची पद्धत, कानांतील बाळ्या वगैरेवरून तीं स्त्रीमुखें असावींसें वाटतें. स्त्रीमुखाखालीं खोल रेषा व तीखालीं या आकृतीचें लिंगत्व सिद्ध करणारा लेख आहे. त्याच्या अक्षरवटिकेवरून तो इ. स. पूर्व पहिले शतकांतील ठरत असल्यानें लिंगाचाही तोच काल समजण्यास हरकत नाहीं[३].

उनकोटी येथील चतुर्मुख लिंगशिल्पाच्या मध्यभागीं वाटोळें लिंग असून चारी बाजूंस चार ऊर्ध्वांगें आहेत. प्रत्येक ऊर्ध्वांग स्वतंत्र रीतीनें कोठें दाखविलेलें नाहीं. पण एका ऊर्ध्वांगाच्या डोक्यास जटामुकुट असून दोन हातांपैकीं छातीपाशीं आणलेल्या उजव्या हातांत माला व डाव्या हातांत चंबू आहे. तेव्हां हें ब्रह्मदेवाचें मुख आहे असें वाटतें. याच्या अवयवांवर दुहेरी कंठा, अंगद, कडीं इत्यादि भूषणें आहेत. चेहऱ्यावरील

---

१ इहिइ खंड २ पृ. ६९. २ मेआसइ नं. ४० पृ. २४ प्रप १३ ए. ३ आसइॲरि १९०९–१० पृ. १४७ प्रप ५४ सीडीई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



३४ जावा चतुर्मुख लिंग-विष्णु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३५ जावा चतुर्मुख लिंग-शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंद हास्य, अवयवांचा गुटगुटीतपणा, हे गुण विचारांत घेतां मूर्ति मध्ययुगाच्या दुसऱ्या पादांत बसण्यास हरकत नाहीं[1].

जावा येथील चतुर्मुख कायाच्या शिल्पांत मध्यभागीं लिंग असून त्यास चिकटून चारी दिशांस ब्रह्मा, विष्णु, महेश व सूर्य अशा चार देवता आहेत. ब्रह्मदेवाचीं तीन तोंडें दिसतात. त्याच्या चार हातांपैकीं उजवा खालचा हात वितर्क मुद्रेचा व फूल घेतलेला आहे. वरच्या हातांत एक अस्पष्ट वस्तु आहे. डाव्या वरच्या हातांत वाकडा दंड (तलवार) असून खालच्या हातांत चंबू आहे. विष्णूचें मुख फुटलें असून त्याच्या चार हातांत अनुक्रमें गोल पदार्थ, ?, शंख, कटिहस्त या वस्तू व मुद्रा आहेत. शंकराच्या चार हातांत वरद, फूल, ?, कटिहस्त या वस्तू व मुद्रा आहेत. सूर्याच्या दोन हातांत बहुधा कमळें असावीं. ब्रह्मा व शिव यांचे नक्षीदार जटामुकुट असून सूर्याचा किरीटमुकुट आहे. सर्वांचें अंगावर कुंडलें, साधी अथवा नक्षीदार अंगदें एकेरी अथवा दुहेरी कंठे, कडीं, सवस्त्र मेखला, हे दागिने आहेत. सूर्याशिवाय इतरांना दुहेरी अथवा बहुपदरीं जानवीं आहेत. सूर्याचे कमरेस लुंगी व पायांत उंच बूट असून इतरांचे कमरेस धोतर आहे. मूर्तींचा पेहराव, दागिने, ढब, आविष्कार ह्या गोष्टी लक्षांत घेतां या गुप्त कालाच्या सुमाराच्या व हिंदी शिल्पाचे संस्कार झालेल्या आहेत असें म्हणतां येतें[2].

चतुर्मुख लिंगांप्रमाणें अष्टमुख–लिंगेंही आहेत. उदाहरणार्थ पेजेंग (Pedjeng बाली द्वीप) येथील लिंगाची बैठक चौकोनी असून तीवर अष्टदली कमल आहे. प्रत्येक दलाच्या मागें एक शिवमूर्ती आहे. या शिवमूर्तींच्या मागें व वर पुन्हां एक अष्टदली कमल असून त्या प्रत्येक दलाच्या मागें एक शिवमूर्ती आहे. या दोन्ही कमळांच्या मध्यावरून लिंग असल्यानें या मूर्ती व दलें लिंगास चिकटलेलीं आहेत. प्रत्येक मूर्तीच्या डोक्यांत एक मुंड (गंगामुख ?) व चंद्रकला असल्यामुळें त्यांच्या शिवत्वा-

---

१ ईइस्क्रमिस्क पृ. १११ प्रप ५१ डी; मूचि ३१. २ पी. अंडरसनचा इंडियन म्यूझियमचा कॅटलाग भाग २ पृ. ३ डी २; आसइॲरि १९२४–२५ पृ. १२५ प्रप ३७ एबीसीडी; मूचि ३३–३६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विषयीं शंका रहात नाहीं. शिवाय हें लिंग मूळांत एका योनीवर होतें'.

लिंगोद्भव

एकदां ब्रह्मा व विष्णू यांजमध्यें सृष्टीचा आदिकर्ता कोण याविषयीं भांडण लागून दोघेही वर्दळीस आले असतां त्यांजमध्यें एकदम एक अग्निस्तंभ उत्पन्न झाला. तेव्हां याच्या शेवटाचा पत्ता लावील तो श्रेष्ठ असें दोघांनीं ठरवून शेंड्याचा पत्ता लावण्यासाठीं ब्रह्मदेव हंसरूप घेऊन आकाशांत उडाला व विष्णू वराह बनून बुंधा हुडकण्यासाठीं जमीन उकरूं लागला. दोघांना श्रम करूनही पत्ता न लागल्यामुळें त्यांनीं त्या स्तंभाची प्रार्थना केली. तेव्हां अकस्मात तेथें शंकर विशिष्टरूपानें प्रकट झाले व त्यांनीं दोघांचीही समजूत घातली. शंकराचे या वेळच्या रूपास लिंगोद्भव म्हणतात. ही गोष्ट शंकराचें श्रेष्ठत्व दाखविण्यासाठीं शैवानीं रचिलीं असावी असें उघड वाटतें.

अभे (७८): लिंगामध्यें चंद्रशेखरमूर्ति; तांबडा; हात व आयुधें?; डावा: वर हंसरूप, सोनेरी, ब्रह्मा; उवा: वराहरूप, बैठा, सांवळा, विष्णु; दोघेही अंजलिहस्त व मूर्तीकडे पहात असलेले. **उका** (इहिइ २ बी ५३): लिंगांतर्गत चंद्रशेखर; वर व खालीं हंस व डुक्कर; शिवाय दोन्ही बाजूस वाकलेले ब्रह्मा, विष्णु; किंवा हे नसावे. **काग** (इहिइ २ बी ५३): अभे प्रमाणें; शिवाय चंद्रशेखरास चार हात व त्यांतः वरमुद्रा, परशु, मृग, अभय; पायांपासून गुडघ्यापर्यंत लुप्त. **शिर** (२२।१७६): अभेप्रमाण; पण शंकराचा रंग ?; ब्रह्मा तांबडा व विष्णू सांवळा. **सुभे** (इहिइ २ बी ५२) लिंगामध्यें मुकुट व पाय लुप्त झालेला चंद्रशेखर; वरच्या बाजूस हंसरूप ब्रह्मा, खालच्या बाजूस वराहरूप विष्णु शिवाय पाटीमागें अंजलिहस्त ब्रह्मा, विष्णू.

उपर्युक्त मूर्तींचें अगदीं साधें उदाहरण अंबरमागाळें येथें पहावयास मिळतें. यांत लिंगावरील एका लंबवतुळांत पदलुप्त चंद्रशेखर काढला असून लिंगाच्या उजव्या अंगास वरच्या कोपऱ्यांत उडता हंस व डाव्या अंगास

१ इंडियन इन्फ्लुएन्सेस इन ओल्ड बालिनिज आर्ट—डॉ. डब्ल्यू. एफ्. स्तुतेरहेम (Stutterheim), प्रप १९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६ जावा चतुर्मुख लिंग-सूर्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३७ लाखामंडल-देहरादून आलिंगन वीणाधर शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जमीन उकरणारा नृवराहरूप विष्णु काढला आहे'. चंद्रशेखराचे हातांत (१) अभय (२) परशु (३) मृग व (४) कटयवलंबित या वस्तू व मुद्रा आहेत. याहून थोडें जास्त तपशीलाचें उदाहरण वेरूळच्या गुहांत आहे. येथेंही चंद्रशेखर एका ज्वालायुक्त वाटोळ्या खांबावर काढलेल्या लंबवर्तुळांतच आहे. तसेंच त्याच्या हातांत अभय, परशु, मृग, कटयवलंबित या वस्तू व मुद्रा आहेत. पण या खांबाच्या उजव्या अंगास वरच्या बाजूस उडता चतुर्मुख, चतुर्हस्त, ब्रह्मा असून शिवाय खालीं उभा, चतुर्हस्त, चतुर्मुख व अंजलिमुद्रेचा ब्रह्मा आहे. डाव्या बाजूस खालीं वराहमुखी जमीन उकरणारा विष्णु असून शिवाय त्याच्या मागें अंजलिमुद्रेचा चतुर्हस्त विष्णू उभा आहे[२].

सामान्य मूर्ती

चंद्रशेखर

नांबावरून याच्या ठिकाणीं चंद्रकलेच्या अस्तित्वाला महत्त्व असून ती आवश्यक आहे हें ठरतें. त्याशिवाय ही मूर्ती उभी असते हेंही तिचें एक वैशिष्ट्य आहे. हिच्याबरोबर पार्वती असेल तर ती उमासहित चंद्रशेखर आणि शिवपार्वती आलिंगनमुद्रेची असतील तर ती आलिंगन चंद्रशेखर मूर्ती होते.

केवल-अभे (इहिइ २ बी ५६): आरक्त; चार हात व त्यांत अभय, टंक, कर्तरी, वरद; जटामुकुट व त्यावर डाव्या अंगास चंद्रकला, तीन डोळे, पिवळें वस्त्र, सौम्य चेहरा, दागिने. **उका** (इहिइ २ बी ५५): चार हात व त्यांत अभय किंवा वरद, काळवीट, टंक, वरद किंवा सिंहकर्ण किंवा गजहस्त; समपद व उभा; खांद्यापर्यंत केस; कानांत अनुक्रमें मकर आणि रत्न, शंखपत्र अथवा पद्मपत्र कुंडलें; अंगावर हार, केयूर, कटक, आंगठ्या, जानवें, मेखला[३]. **शिर** (२२।१७): तांबडा; चार हात व त्यांत अभय,

१ इहिइ खंड २ पृ. १० प्रप १४।२. २ आसवेइ व्हॉ. ५ प्रप २१।३. ३ यांत उमासहित व आलिंगन प्रकारांचीं निराळीं वर्णनें न देतां फक्त देवी असल्यास ती भिन्न पीठावर किंवा आलिंगन पद्धतीची असावी येवढें सांगितलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टंक, हरिणी, वरद; एकटा, उभा, ताठ पाय; उजवी अथवा डावीकडे चंद्रकला; बाकी अभेप्रमाणें. **सुभे** (३४): हात ?; पण त्यांत मृग, परशु; सरळ उभा, अंगावर कातडें.

उमासहित-शिर (२२।२२) : भिन्न पीठावर गौरी; बाकी केवला-प्रमाणें. **श्रीनि** (पृ. ६९): आरक्त; पद्मपीठावर उभा; पाय सारखे; हात ?; पण त्यांत अभय, परशु, हरिण, वरद; सौम्य, शृंगारित, डोक्यावर चंद्रखंड; डाव्या बाजूस पद्मपीठावर पार्वती : सावळी; दोन हात व त्यांत नील कमल, पद्मपीठावर; तीन डोळे, त्रिभंगी.

आलिंगन-शिर (२२।२३): चंद्रशेखराचा वरद हस्त डाव्या अंगच्या देवीच्या पाठीवरून व आलिंगनमुद्रेचा. देवीचा उजवा हात देवाच्या पाठीवरून उजव्या बाजूस मेखलेवर; देवीस हात ?; पण त्यांत फूल; किंवा अनुक्रमें रक्तोत्पल व गजहस्त.

उत्तरेकडील एक चंद्रशेखर मूर्ति पायांचा खालचा भाग तुटलेली, डोक्यास शिरोवस्त्र, कानांत सर्पकुंडलें, गळ्यांत कंठा, लांब हार व बहुधा नागाचें जानवें असलेली आहे. तीस हात बहुधा दोन असून उजवा अस्पष्ट पण अभयमुद्रेचा आणि डावा आंबा, बेलफळ किंवा महाळुंग घेतलेला असा आहे. कमरेस धोतर व अंगावर उपरणें आहे[1]. पागन (ब्रह्मदेश) येथें मिळालेली केवल चंद्रशेखरमूर्ति कमलावर उभी असून तिच्या डोक्यास जटामुकुट आहे. अंगावर खूप दागिने व कमरेस वस्त्र आहे. हिच्या चार हातांत अनुक्रमें खड्ग, त्रिशूल, डमरू आणि गदा या वस्तू आहेत. पैकीं डमरू आकारानें सामान्यतः चौरस व दांडा असलेलें खोदल्यानें त्याचें ब्रह्मदेवाच्या पळीशीं इतकें साम्य आहे कीं, मध्यें खोलगट जागा असती तर त्यास पळीच म्हणावें लागलें असतें[2]. बँकोकच्या नॅशनल म्यूझियमम-धील केवल चद्रंशेखरमूर्ती उभी व दोन हातांची आहे. तिनें जानवें, पायघोळ वस्त्र व मामुली दागिने धारण केले आहेत. तिचें वैशिष्ट्य म्हणजे तिचे हात काक व हरिण या मुद्रांचे आहेत[3]. तोरेन म्यूझियममधील मूर्तीही

१ आसइनासऑरि १९२०–२१ पृ. ६ प्रप ७. २ ऑसइबस १९१२–१३ प्रप २ चि. १; ब्रॅगॉब पृ. ५९, ९१ चि. २१. ३ आर्स एसियातिका व्हॉ. १२ प्रप ३६।१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उभी व दोन हातांची आहे. हिच्या अंगावर दागिने भरपूर असून हिला दाखविलेल्या मिशा सहज लक्षांत येतात. हिचा उजवा हात मांडीस चिकटलेला असून डावा हात लिंगासारख्या (?) वस्तूसह कमरेवर ठेवला आहे[1]. जावामधील एक उमासहित चंद्रशेखरमूर्ति कमलावर उभी असल्याचें दाखविलें आहे. शिवास चार हात व त्यांत अनुक्रमें माला, चौरी व कमंडलू या वस्तू असून उजवा खालचा भग्न आहे. डोक्यास जटामुकुट आणि त्यांत मुंड (गंगा?) व अर्धचंद्र, तसेंच गळ्यांत नागाचें जानवें आहे. पार्वतीस दोन हात होते; पण डावा मोडला आहे. त्यांत अनुक्रमें वर व उत्पल या मुद्रा व वस्तू असाव्या[2]. आटपाडी (औंध–सातारा) येथील आलिंगन चंद्रशेखरमूर्ती तेथील कल्लेश्वराच्या देवळाचे वायव्य भागांत असलेल्या पिंपळाच्या पारास टेकून ठेवली आहे. ही सुमारें ३ फूट उंचीची असून जांबोत्री दगडाची खोदलेली आहे. या देवतेच्या दोन्ही मूर्ती उभ्या असून शंकराच्या चार हातांपैकीं उजव्या बाजूचे खालच्या हातांत माला, वरच्या हातांत त्रिशूल, डाव्या बाजूचे वरच्या हातांत नाग व खालचा हात पार्वतीस आलिंगन देत असलेला असा आहे. शंकराच्या उजव्या अंगाला खालच्या बाजूस शंकराकडे तोंड केलेला व बसलेला नंदी आहे. लाखामंडळ (देहरादून) येथील आलिंगन चंद्रशेखर मूर्ति–शिल्पांत शिवपार्वती दोघेही त्रिभंगी उभे असून त्यांचे मागें, पण तोंड मात्र पुढें आणून त्यांजकडे पहात असलेला नंदी आहे. शंकराच्या उजव्या खालच्या व डाव्या वरच्या अशा दोन हातांत मिळून उभा वीणा आहे. उजव्या वरच्या हातांत बहुधा त्रिशूल असावा. डावा खालचा हात पार्वतीच्या पाठीवरून डाव्या स्तनावर आणला आहे. पार्वतीच्या दोन्ही हातांत मिळून माला आहे. शंकराच्या डोक्यावर जटामुकुट असला तरी कंठे, कुंडलें, केयूर, कटक, मेखला हे दागिने आहेत. पार्वतीस मेखला नाहीं. पण बाकींचे दागिने शंकराप्रमाणेंच आहेत. या शिल्पाची घडण गुप्तकालीन असून मूर्ती फार सुंदर आहे[3]. ही मूर्ती घडली असेल तेव्हां यांचीं

१आर्स एसियातिका व्हॉ. ४ प्रप २९. २ KBGKWJB १९३६ भाग ३ क्र. ६०९१ पृ. १९४ प्रप ४. ३ आसइऑरि १९२३–२४ पृ. ५९ प्रप २१ जी; मूचि ३७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बारीक वर्गीकरणेंही झालीं नसतील. पण आतां आपणांस तीं मिळत असल्यानें मी हिला व मागें वर्णिलेल्या मूर्तींना चंद्रशेखर प्रकारांत घालतों. मी वर दिलेलीं चंद्रशेखराचीं ग्रंथिक वर्णनें या मूर्तींशीं अंशतःही जुळत नाहींत हें खरें; पण तीं सर्व दक्षिणेकडील आहेत हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे.

साधारण शिव

अचि (३।१।७६०): [१] चार हात व त्यांत त्रिशूल, डमरू, वरद, अक्षमाला. [२] आठ हात व त्यांतील उजव्यांत अक्षमाला, शक्ति, दंड, शूल आणि डाव्यांत खट्वांग, कपाल, वरद, नाग; दोहोंना सामान्यः पांढरा किंवा पिवळा; वाहन?; हस्तिचर्म, केयूर, हार, तिहेरी करगोटा, चंद्रकला, शूल, मृग, नाग इ. अलंकार, कानांत कुंडलें, जटाजूट, नीलकंठ, तीन डोळे, सोळा वर्षांचा. **अभे** (४८।१०६): पांढरा; वाहन?; चार हात व त्यांत अभय, वरद, शूल, पाश; दोन डोळे, पांढरें वस्त्र, करंडमुकुट. **बृस** (५८।४३): रंग?; बैल; हात?; पण त्यांत शूल, धनुष्य; डोक्यावर चंद्रकला, कपाळावर तिसरा डोळा. **मपु** (२५९।३): पांढरा; वाहन?; हात?; जटा, चंद्रकला, ऊर्ध्वकेश, व्याघ्रचर्म, तिहेरी करगोटा, सौम्य मूर्ति, हार, केयूर, कुंडलें, भुजंग इ. आभरणें. **मासा** (५१।७२): तांबडा; वाहन?; चार हात व त्यांत अभय, वरद, हरिण, डमरू; तीन डोळे, जटा मुकुट, गंगा व चंद्रकला, गळ्यावर डाव्या बाजूस कालकूटाचें चिन्ह, व्याघ्रचर्म, बरोबर पार्वती. **विध** (५६): हात?; पण त्यांत त्रिशूल, अक्षमाला; जटा, तीन डोळे, आभरणें. **ससू** (७७।१०): पांढरा; राजधानींत दोन हातांचा, शहरांत चार हातांचा, एरवीं आठ हातांचा, अरण्यांत किंवा स्मशानांत १८, २०, १०० किंवा १००० हातांचा; पट्टा हें आयुध; जटा, नीलकंठ, चंद्रखंड, सर्प, सिंहचर्म, शिरोमाला इ. भूषणें, तीन डोळे, दाढा'.

तिरुत्तनी येथील दर्शनी भागावर शिव नाग व मकर असलेल्या बैठकीवर सव्य ललितासन घालून बसला आहे; पण डावा पाय तळावर किंचित् कलता व उभा केला आहे. चार हातांपैकीं एक अभयमुद्रेचा, एक गुढघ्यावर व

१ साधारण शिवाचीं वर्णनें शेकड्यांनें मोजतां येण्याइतकीं सहज सांपडतील. येथें मी जुनीं किंवा महत्त्वाचीं तेवढींच घेतलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका हातांत पोथीसारखी कांहीं वस्तू आहे. डोक्यामागें मोराच्या पिसाऱ्यासारखें वर्तूळ (जटामुकुट ?), गळ्यांत तीन कंठे, पदरांचें जानवें, चार कडीं व मेखला हे दागिने आहेत[1]. जावामधील कित्येक शिवमूर्ती अपरिचित व मनोरंजक असल्यानें त्यांचें वर्णन येथें देतों. एक मूर्ती मानवदेही नंदीवर आरूढ झाली असून हिच्या चार हातांपैकीं वरच्या दोहोंविषयीं कांहीं सागतां येत नसलें तरी खालचे दोन गुढघ्यावर ठेविले आहेत. मूर्तीचे दोन्ही पाय नंदीच्या हातांवर असल्याचें दाखविलें आहे. दुसरी मूर्ती उभी व दोन हातांची आहे. पैकीं एक कांहीं तरी वस्तू घेऊन छातीपाशीं धरलेला असून दुसरा कमंडलू घेऊन खालीं सोडला आहे. तिसरी मूर्ती उभी व चार हातांची आहे. हिच्या डाव्या खालच्या हाताच्या तळावर उजव्या खालच्या हाताची वर आंगठा केलेली मूठ ठेविली असून बाकीच्या दोन हातांत माला व बहुधा अंकुश या वस्तू आहेत[2]. पालेम्बन्गची एक मूर्ती उभी, चंद्रसूर्यांसह जटामुकुट, अंगद, कटक, कंठा, नागयज्ञोपवीत, मेखला व तीखालीं व्याघ्रचर्म आणि चार हात यांनीं युक्त आहे. हिच्या डाव्या वरच्या व खालच्या हातांत अनुक्रमें छोटी चौरी व कमंडलु असून एका उजव्या हाताची विशिष्ट मुद्रा व दुसऱ्या हातांत माला आहे. कपाळावर तिसरा डोळाही दाखविला आहे[3]. पालेम्बन्ग येथील दुसरी मूर्ती एका बैठ्या, सन्मुख सिंहावर प्रभावळीस टेकून उभी आहे. हिच्या अंगावर मुकुट, कडीं, खूप मोठी सवस्त्र मेखला, इत्यादी दागिने असून याच्या चार हातांपैकीं खालचे दोन एकावर एक ठेऊन छातीपाशीं नेले आहेत आणि वरच्या दोहोंत अनुक्रमें बाण किंवा भाला व एक फूल अशा वस्तू आहेत[4]. लवतन येथील मूर्ती उभी असून हिचे अंगावर चंद्रकलेसह जटामुकुट, दोन कंठे, एक साधें व नागाचें यज्ञोपवीत, केयूर, अंगद, कडीं, मेखला व तीखालीं लुंगीसारखें व्याघ्रचर्म, इत्यादि दागिने व वस्त्रें आहेत. हिच्या चार हातांपैकीं डावीकडचे वरच्या हातांत चौरी व खालच्या हातांत कमं-

१ मेआसइ क्र. ४०. २ आर्स एसियातिका व्हॉ. ८ प्रप ३।२, ४।३ व ३४. ३ KBGKWJB २।१९३४ पृ. ११४ क्र. ६०३१व त्यासमोरील चित्र १. ४ कित्ता पृ. ११५ व त्यासमोरचें चित्र क्र. ६०३४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डलू या वस्तू असून उजव्या हातांना अनुक्रमें वितर्क व व्याख्यान या मुद्रा दाखविल्या आहेत. कपाळावर तिसरा डोळा दाखविला असल्यानें ही मूर्ती शिवाचीच असावी असें वाटतें'.

सुखासन

शिवमूर्तीचा तिसरा प्रकार बैठी किंवा सुखासन मूर्ती होय. यांत केवल, उमासहित, आलिंगन किंवा उमामहेश्वर व सोमास्कंद असे चार भेद आहेत. वास्तवीक पार्वतीसह असलेल्या प्रत्येक उभ्या किंवा बैठ्या शिवमूर्तीस उमामहेश्वर म्हणण्यास हरकत नसावी. पण केवल आलिंगनमुद्रेच्या बैठ्या शिवपार्वतीस उमामहेश्वर म्हणण्याचा प्रघात आहे.

केवल–पूका (इहिइ २ बी ६५) : वाम ललितासन; चार हात व त्यांत अभय, परशु, काळवीट, वरद; जटामुकुट, त्रिनेत्र; बाकी उमासहित शिवाप्रमाणें; पण स्कंद व गौरी यांनीं रहित. **शिर** (२२।१): आरक्त; भद्रपीठावर; सव्य ललितासन; चार हात व त्यांत अभय, परशु, मृग, कटक किंवा सिंहकर्ण; जटामुकुट, त्रिनेत्र, दोन्ही कानांत वाळ्या किंवा उजव्या कानांत मकर किंवा सिंहकुंडलें व डाव्यांत पत्रकुंडलें, सर्पकंकणें, व्याघ्राजिन व रेशमी वस्त्रें. **सुभे** (इहिइ २ बी ६४) : चार हात व त्यांत अभय, परशु, मृग, वरद किंवा कटक; उमास्कंदवर्जित; शिवाय सामान्य लक्षणें.

उमासहित – अभे (इहिइ २ बी ६५) : केवल सुखासनाप्रमाणें[२]; पण डावीकडे त्याच किंवा भिन्न आसनावर पार्वती. **शिर** (२२।२१ ?): केवल सुखासनाप्रमाणें; पण डावीकडे भिन्न आसनावर गौरी. **श्रीनि** (इहिइ २ बी ७२): पांढरा; वृषभ; डावीकडे पार्वती; मागें इंद्र, विष्णु, ब्रह्मा, भृंगी, नारद, भैरव, गणपती, स्कंद, वीरभद्र.

उमामहेश्वर–अचि (३।१।७७९) : जवळजवळ मपुप्रमाणें. **अभे** (इहिइ २ बी ६६) : हात ? ; पण त्यांत वरद, आलिंगनमुद्रा; देवीस

---

१ KBGKWJB २।१९३४ क्र. ६०५० व पृ. ११६ समोरचें चित्र.
२ अभेमध्यें केवल व उमासहित सुखासनाचें निराळें वर्णन दिलेलें नाहीं. केवल व उमासहित चंद्रशेखरच बैठा असला म्हणजे त्यास वरील नांवें देतात असा त्याचा आशय दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हात ?; पण त्यांत आलिंगन किंवा रक्तोत्पल, पुष्प किंवा गजहस्त. **मपु** (२६०।११) : बैठा; दोन किंवा चार हात व त्यांत कमल, शूल, उमेच्या स्कंधावरून डाव्या स्तनावर, ?; जटा, चंद्रकला, तीन डोळे, अंगावर हत्तीचें कातडें; डाव्या बाजूस शिवमुखाकडे पाहणारी पार्वती : हात ?; पण त्यांत आलिंगन, कमल किंवा दर्पण; निरनिराळीं भूषणें; पाठीमागें जया, विजया, गणेश, कार्त्तिकेय; तोरणावर गुह्यक, विद्याधर, अप्सरा. **रूपा-रूम** (२७ आ, १० आ) : बैल; हात ?; पण त्यांत महाळुंग, त्रिशूल, नाग, आलिंगन; उमा : हात ?; पण त्यांत आलिंगन, आरसा; बरोबर स्कंद, गणपती, भृंगी. **विध** (चचि २।१२५): दोन हात व त्यांत उत्पल, आलिंगन; आठ तोंडें, जटा, चंद्रकला; देवीस दोन हात व त्यांत आलिंगन, आरसा.

बेडुला (बालीद्वीप) येथील केवल-सुखासन शिव कमलावर सव्य ललितासन घालून बसला असून त्याच्या उजव्या पायाखालीं उसें आहे. त्याला चार हात होते. पण दोन भग्न झाले असून बाकींच्या दोहोंत माला व चामर या वस्तू आहेत. डोक्यावर जटामुकुट असून त्यांत एक मस्तक (बहुधा गंगेचें प्रतीक) व चंद्रकोर आहे. यामुळें ती मूर्ती शंकराची आहे या विषयीं शंका राहात नाहीं[1]. उमासहित शिवाचें उदाहरण मुंबई जवळच्या घारापुरी गुहांत पहावयास मिळतें. तेथील मुख्य गुहेच्या दक्षिण बाजूस अगदीं कडेच्या दालनांत उंच बैठकीवर शिव व पार्वती मोठ्या सुखानें बसली आहेत. हें शिल्प फुटल्यामुळें याचा तपशील देतां येत नाहीं. पण पार्वतीचें मुख किंचित् बाजूला असल्यामुळें ती रागावल्याची कल्पना केली आहे ती मात्र तितकीशी बरोबर वाटत नाहीं. कारण या शिल्पांत ती रुसल्याचीं इतर चिन्हें कांहींच दिसत नाहींत. येथें शिवपार्वती एकत्र असून आलिंगन-मुद्रेची नाहींत म्हणून यांस उमासहित शिव हें नांव दिलें पाहिजे[2]. ऐहोळी (बदामी जवळ-विजापूर) येथील उमामहेश्वर शिल्पांत शिव सव्य ललितासनानें बसला असून त्याच्या उजव्या हातांत नाग व त्रिशूल आहेत. डाव्या वरच्या हातांत काय आहे तें समजत नाहीं. पण खालच्या हातानें पार्वतीस आलिंगन दिलें आहे. पार्वतीनें आपला उजवा हात शिवाच्या

१ इन्डियन इन्फ्लुएन्सेस् ऑन ओल्ड बालिनीज आर्ट प्रप १. २ हिरानन्द शास्त्रीकृत ए गाइड टु एलेफंटा पृ. ४५ प्रप १४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांडीवर व डावा स्वतःच्या खुरमांडीवर ठेविला आहे. शंकराच्या मागें नंदी, बाजूस भृंगी वगैरे ऋषी आणि खालीं भूतगण आहेत. हें शिल्प बदामी चालुक्यांच्या उत्तर कालांतील आहे[1]. थातोऱ मधून आलेली पण सध्यां रंगून म्यूझियममध्यें असलेली उमामहेश्वरमूर्ति कमलावर सव्य ललितासन घालून बसली असून तिच्या उजव्या लोंबत्या पायाखालीं अगदीं लहान नंदी काढला आहे. शिवाचे डोक्यावर जटांचा शंक्वाकृति मुकुट आहे. डोकें उजवीकडे झुकलेलें असून त्या भोवतीं प्रभावलय आहे. त्याच्या चार हातांत अनुक्रमें अक्षमाला, त्रिशूल, वज्र, मातुलुंग या वस्तू असून मातुलुंग धारण केलेला हात आलिंगनमुद्रेचा अर्थात् डाव्या मांडीवर बसलेल्या पार्वतीस आलिंगन देणारा आहे. गळ्यांत नाग असून शिवपार्वतींच्या अंगावर खूप दागिने आहेत. पार्वतीची मूर्ती विद्रूप झालेली आहे. तिच्या खालच्या बाजूस रेडा दाखविला आहे. नंदी, नाग व रेडा यांवरून वरील शिल्प उमामहेश्वराचें असल्याविषयीं शंका राहात नाहीं[2].

सोमास्कंद

उका (इहिइ २ बी ६७): सव्य ललितासन; चार हात व त्यांत अभय, परशु, हरिणी, वरद; तीन डोळे, जटामुकुट; डावीकडे देवी, मध्यें स्कंद: उभा, बैठा, देवीच्या मांडीवर किंवा नाचता; दोन हात व त्यांत कमळ, गजहस्त; किंवा कमळ, कमळ; किंवा वस्तुविहीन; मकरकुंडलें, करंडमुकुट, दोन डोळे. पूका (इहिइ २ बी ७०): पद्मपीठ किंवा साधें पीठ; शिव: सव्य ललितासन; चार हात व त्यांत उकाप्रो; त्रिनेत्र, जटामुकुट; डावीकडे वाम ललितासनी गौरी: दोन हात व त्यांत कटकमुद्रा, वरद; दोन डोळे, करंडमुकुट; मध्यें बालरूप स्कंद : दोन हात व त्यांत कटकमुद्रा, गजहस्त; उभा किंवा बैठा. शिर (२२।७): शिवाच्या डावीकडे वाम ललितासनी पार्वती: दुर्वाश्याम; हात ?; पण त्यांत उत्पल, वरद किंवा आसनावर; रक्तवस्त्रें; दोहोंमध्यें बैठा, उभा किंवा नाचता, नागडा, स्कंद: दोन हात व त्यांत पुष्पें किंवा पुस्तक आणि वरद, कटक, सिंहकर्ण; नाचता असल्यास सूची

१ चालुक्यन आर्किटेक्चर प्रप १७।१; सूचि. ३८. २ ब्रॅगॉव पृ. ५८ प्रप १५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उमामहेश्वर

बदामी–विजापुर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



३९ महाबलिपुरम्–चिंगलपुट सोमास्कंद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि फल किंवा प्रसारित; करंडमुकुट. सुभे (इहिइ २ वी ६८): शिवाच्या डावीकडे उमा : दोन हात व त्यांत पद्म, कटक व प्रसारित; दोहोंमध्यें स्कंद: उभा किंवा बैठा; बालरूप; हात ?; पण त्यांत वरद, कटक; गळ्यांत शूल (?) व छन्नवीर.

सोमास्कंदाचें उत्तम उदाहरण महाबलिपुरम् येथील धर्मराज रथाच्या शिल्पांत पहावयास सांपडतें. यांत शिव व पार्वती दोघेही वाम ललितासनानें बसले असून पार्वतीनें आपल्या मांडीवर स्कंदास घेतलें आहे. शंकराच्या पाठीमागें उजव्या अंगास ब्रह्मदेव व डाव्या अंगास म्हणजे शिवपार्वतींच्या[1] मध्यें विष्णू उभा आहे. शंकराच्या खालच्या उजव्या हाताचा पंजा लुप्त झाला असून डावा हात ध्यानमुद्रेचा आहे. उजवा वरचा हात अजिबात दिसत नसून डाव्या हाताचा पंजा खांद्यास लावला आहे. पार्वतीनें उजव्या हातानें स्कंदास धरलें असून डावा हात बैठकीवर ठेवला आहे. ब्रह्मदेव व विष्णू यांचे अनुक्रमें उजवेडावे व डावेउजवे हात अंजलि व अभयमुद्रांचे आहेत आणि विष्णूच्या वरच्या हातांत चक्र व शंख या वस्तू आहेत. सर्वांच्या डोक्यांस मुकुट व शिवपार्वतींच्या कमरेस वस्त्रें आहेत. त्यांच्या गळ्यांत जानवें, कानांत कुंडलें आणि हातांत कंकणें व बांगड्या आहेत. शिवाय पार्वतीच्या गळ्यांत दोन कंठे आहेत. स्कंदाची आकृती हात लांबविलेले व पाय किंचित् उचललेले असल्यानें अतिशय स्वाभाविक दिसते. फक्त पार्वतीच्या डोक्यावर छत्र व शिवाच्या मुखाभोंवतीं तेजोवलय आहे. हें शिल्प मध्ययुगाच्या आरंभीचें असल्यानें याचा साधेपणा लक्षांत भरण्याइतका आहे'.

विशेष मूर्ती

अनुग्रहमूर्ती

शंकरानें कित्येक असुरांचा नाश केला त्याप्रमाणें कित्येक शरणागतांवर किंवा भक्तांवर अनुग्रहहि केला आहे. पण संहारमूर्तीप्रमाणें अनुग्रहमूर्ती इतक्या प्रसिद्धीस आलेल्या नाहींत. अर्जुनानुग्रह, रावणानुग्रह आणि विष्णवनुग्रह या त्यांतल्या त्यांत महत्त्वाच्या आहेत. तेव्हां त्यांचींच वर्णनें येथें देतों.

१ मेआसइ क्र. ३३ पृ. २६ प्रप १६ सी; मूचि ३९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्जुनानुग्रह—अर्जुनानें घोर तपश्चर्येनें, आराधनेनें व लढाई देऊन शंकरास कसें प्रसन्न केलें व पाशुपतास्त्र मिळविलें तें प्रसिद्ध आहे. याचें ग्रंथिक वर्णन एकच मिळालें तें असें–**श्रीनि** (पृ. ७४): तांबडा; चार हात व त्यांत बाण, परशु, मृग, धनुष्य; तीन डोळे, जटामुकुट, समभंग; डावा पार्वती; उवा अर्जुन : जटामुकुट, अंजलिमुद्रा. याच्या श्रीशैलम् येथील शिल्पांत अर्जुनानें आपल्या डाव्या हातांत धनुष्य धरलें असून उजव्या हातानें शंकर देत असलेला बाण घेत आहे असें दाखविलें आहे. शंकराच्या दोन हातांत परशु व त्रिशूल आहेत'.

रावणानुग्रह—कुबेराचा पराजय करून रावण परत येत असतां त्याचें विमान कैलास पर्वताजवळ अडकलें. तेव्हां रागावून त्यानें कैलास पर्वतच बाजूस ठेवण्यासाठीं उचलिला. यामुळें पार्वती घाबरली. पण शंकरांनीं पर्वत खालीं दाबतांच रावण त्याखालीं सापडला. नंतर त्यानें प्रार्थना केल्यावरून शंकरांनीं त्यास मुक्त केलें. याचीं ग्रंथिक वर्णनें कोठें आढळत नसलीं तरी प्रत्यक्ष शिल्पें मात्र सांपडतात. उ. मुंबईजवळच्या घारापुरी गुहांतील शिल्पांत शिव पार्वती व इतर परिवार यांसह उंच बैठकीवर बसला असून बैठकीखालचा रावण आपल्या सर्व हातांनीं कैलास हालवीत आहे. आणि कैलास एकदम हालल्यामुळें स्वतःस जणूं सावरण्यासाठीं शंकरानें आपले दोन हात दोन गणांचे डोक्यांवर ठेविल्याचें दाखविलें आहे[२].

विष्ण्वनुग्रह—एकदां असुरांना जिंकण्यास विष्णु असमर्थ झाला; तेव्हां तो शिवाकडे गेला आणि त्याजपाशीं असलेलें चक्र असुरवधाकरितां देण्याची प्रार्थना करीत राहिला. प्रार्थनेबरोबरच तो शिवाची पूजा करी. तीमध्यें एक हजार कमळें तो शिवाला वहात असे. एक दिवस त्याचें सत्व पाहण्याकरितां शिवानें त्यांतील एक कमळ गुप्त केलें. पूजा करतांना एक कमळ कमी आल्याचें विष्णूच्या ध्यानांत आलें; तेव्हां त्यानें आपला एक डोळा (कारण विष्णूच्या डोळ्यांना कमळाची उपमा दिली आहे) काढून शिवाला वाहिला. हें पाहून शिव प्रसन्न झाला व त्यानें त्याला चक्र दिलें. महाभारत, शिवपुराण व स्कंदपुराण यांत वरील प्रकारची कथा आहे.

१ इहिइ खंड २ पृ. २१६ प्रप ५२।२. २ ए गाइड टू एलेफन्टा पृ. ५२ प्रप १५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचीं ग्रंथिक वर्णनें अशीं—

उकामि (इहिइ २ बी १०७): नंदीशानुग्रहाप्रमाणें; नंदीशाच्या जागीं विष्णु: चार हात व त्यांत चक्रासह अंजलि, शंख, कमल. उका (इहिइ २ बी १०८): रंग ?; सव्य ललितासन; चार हात व त्यांत टंक, चक्र, कृष्णमृग, वरद; त्रिनेत्र, शांत, जटामुकुट; डाव्या बाजूला गौरी व हात जोडून विष्णु, उजव्या बाजूस ब्रह्मा. श्रीनि (पृ. ७५): हात ?; पण त्यांत टंक, कृष्णमृग, वरद, परशु; एकमुख, त्रिनेत्र, जटामुकुट, शंकराच्या पुढें विष्णु: श्याम; अंजलिहस्त; शंकराच्या पायांकडे पाहणारा, पीतांबर, कौस्तुभ.

याचीं दोन शिल्पें कै. गोपिनाथराव यांनीं वर्णिलीं आहेत. पैकीं एकांत चतुर्भुज शिवाच्या बैठकीजवळ विष्णू दाखविला असून तो आपल्या चार हातांपैकीं एकानें कमळ वाहात आहे व दुसऱ्यानें आपला डोळा उपशीत आहे. दुसऱ्या शिल्पांत शिव विष्णूस चक्र देत असल्याचा देखावा आहे.'

अन्धकासुरमर्दन

अथर्ववेदांत (११।२।७) रुद्राचें अर्धकघातिन्—अर्धकाला मारणारा असें विशेषण आलें आहे. महाभारतांत शिवाला अन्धकघातिन् म्हटलें आहे. तेव्हां अर्क—अंकप्रमाणें अर्धक—अन्धक रूप झालेलें दिसतें. अर्थात् अन्धकाचा उल्लेख वेदांत आला असें म्हणावें लागतें. पण त्यांत याविषयीं कथा नाहींत. त्या पुराणांत मिळतात. त्यांवरून असें दिसतें कीं, २।३ अन्धकासूर झाले आहेत. मात्र त्यांचें कथासूत्र एकच वाटतें. तें असें—अन्धकासूर राज्य करीत असतां त्याला पार्वतीची अभिलाषा उत्पन्न झाली किंवा त्यानें कैलास पर्वत हालविला; यामुळें शंकराशीं त्याचें युद्ध सुरू झालें. या युद्धांत त्याच्या प्रत्येक थेंबापासून राक्षस उत्पन्न होऊं लागले; तेव्हां शंकरानें चामुंडीसह सप्तमातृकांस उत्पन्न करून त्याचें रक्त पिण्यास सांगितलें. त्या तें पिऊन तृप्त झाल्यावर पुन्हां राक्षस उत्पन्न होऊं लागले. शेवटीं विष्णूच्या मदतीनें शंकर त्यास भाल्यानें पूर्ण मारणार तों त्यानें त्याची स्तुति केली. तेव्हां शंकरानें त्यास आपल्या गणांचें आधिपत्य दिलें. व भृंगीश अथवा भृगिरिटि असें त्याचें नांव ठेविलें.

१ इहिइ खंड २ पृ. २०९ प्रप ५१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचीं ग्रंथिक वर्णनें मला कोठें आढळलीं नाहींत; पण शिल्पें मात्र अनेक ठिकाणीं आहेत. उ. याचें एक सर्वांत उत्कृष्ट शिल्प मुंबई जवळच्या घारापुरी गुहांत आहे. तेथें शंकर आलीढासनानें उभा असून त्यास आठ हात आहेत. पैकीं दोन्ही अंगच्या दोन हातांत मिळून एक लांब भाला घेतला असून त्याच्या फळावर अन्धकासूर खोदलेला आहे. यांशिवाय शाबूत हातांत घंटा, कपाल व खड्ग या वस्तू आहेत. वेरूळच्या मूर्तीचे हातांत याशिवाय डमरू दिसत असल्यानें याच्याही एका भग्न हातांत डमरू होतें असें समजावयास हरकत नाहीं. शंकरानें दोन भग्न हातांनीं मागें प्रभावळीप्रमाणें असणारें हत्तीचें कातडें धरलेलें असावें असें वाटतें. त्याच हत्तीचें डोकें शंकराच्या पायाखालीं होतें तेंही दिसत आहे.'

अर्धनारीश्वर

ब्रह्मदेवानें पुरुष प्रजापति उत्पन्न करूनही त्यांचे हातून प्रजोत्पादनाचें काम मनाजोगें होईना. म्हणून त्यानें शिवाचें ध्यान केलें; तेव्हां तावडतोब शंकर अर्धनारीश्वर रूपानें प्रकट झाले. त्यांचें रूप पाहतांच ब्रह्मदेवास आपली चूक कळून येऊन त्यानें शंकरास प्रजोत्पादनासाठीं एक स्त्री मागितली. ती मिळतांच प्रजोत्पादन व्यवस्थित होऊं लागलें. अशी एक कथा आहे. भृंगी ऋषीची केवल पार्वतीरहित शिवाचीच भक्ति करण्याची प्रतिज्ञा होती. पार्वतीस हें न आवडून ती मोठ्या तपश्चर्येनें शंकराशीं एकरूप झाली अशीही आणखी एक कथा आहे. कथा कांहींही असोत. माझ्या दृष्टीनें या रूपांत पुढील तत्वें अनुस्यूत आहेत असें वाटतें. (१) सयोनी लिंग ज्या कारणानें शिवाचें प्रतीक बनलें त्याचमुळें अर्धनारीश्वराचें रूप बनलें. योनी व लिंग स्त्रीपुरुषांचीं प्रतीकें आहेत. तेच स्त्रीपुरूष अर्धनारीश्वरांत एकत्र केले आहेत. (२) प्रजोत्पादनासाठीं त्यांचें एकत्र होणें आवश्यक आहे. तो सृष्टीचा नियम आहे. (३) सृष्टीच्या अगोदर स्त्रीपुरुष भेद होता कीं नव्हता व नसल्यास तो कसा उत्पन्न झाला या प्रश्नांचें उत्तर देण्याचा या रूपांत प्रयत्न आहे. स्त्रीपुरुष भेद होता पण एकाच रूपांत तो होता हें त्याचें उत्तर दिलें गेलें. (४) जगाच्या बुडाशीं दोन तत्वें पुरुष व प्रकृति हीं असलीं तरी तींही एकरूपच आहेत. याचीं ग्रंथिक वर्णनें अशीं--

१ ए गाइड टु एलेफंटा पृ. २७ प्रप ८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अचि:(३।१।७७२) उजवा भाग पुरुषी: त्रिशूल; सर्पकुंडल, जटाभार, अर्धचंद्र, कपाळावर अर्धा डोळा, विशाल छाती, गजचर्म, कमलावर पाय; डावा भाग बायकी : दर्पण किंवा उत्पल; कुंडल, केसांची वेणी; कपाळावर अर्धा तिलक, उन्नत स्तन, लुगडें, पायांत नूपुरें, कटिसूत्र. **अभे** (६९) [१]ललितासन; चार हात व त्यांत अभय, परशु, बैलाच्या डोक्यावर कोपर, कमरेवर पुष्पहस्त. [२] ललितासन; दोन हात व त्यांत वरद, पुष्प. [३] ललितासन; दोन हात व त्यांत शूल, फूल. [४] ललितासन; हात ?; पण त्यांत वरद, बैलाचे डोक्यावर कोपर. [५] हात ?; पण त्यांत कपाल, प्रसारित. **सर्वांना सामान्य** : उजवा भाग शंकराचा, डावा भाग पार्वतीचा; अर्थात् उजवा पुरुषस्तन, डावा स्त्रीस्तन; उजवी रौद्रदृष्टि, डावी शीतल दृष्टि; उजवीकडे पुरुषी वस्त्रादि, डावीकडे बायकी वस्त्रादि. **उका** : (इहिइ २ बी १६५) उजवा भाग हर: जटामुकुट व चंद्रकला, कपाळावर अर्धा डोळा, मकरकुंडलें अथवा अभाव, टंक व अभय; व्याघ्राजिन, पायाची मांडी, रक्तवर्ण; डावा भाग उमा: करंडमुकुट,पत्रकुंडलें किंवा बाळी, कमल किंवा आरसा, उन्नतस्तन, लोंबता पाय, हिरवट रंग. **पुका** (इहिइ २ बी १६८): उकाप्रमाणें; फक्त डाव्या हातांत कमल. **वृस** (५८।४३) : साधारण शिवाप्रमाणें; पण वामार्ध पार्वतीचा. **मपु** (२६०।१): उजवा भाग पुरुषी : चंद्रकलेसह जटा, कानांत वासुकी, हातांत कपाल किंवा त्रिशूल, ऊर्ध्वलिंग, गजचर्म, पद्मावर पाय, जानवें; डावा भाग स्त्रीचा: भांग व तिलक, कुंडलें किंवा बाळी, हातांत आरसा किंवा कमळ, कंकणें, लट्ठ स्तन, हार; वस्त्र, कटिसूत्र, पायांत नूपुरें, अळत्याच्या रंगाचा पाय. **रूपा** (२७ अ) : उजवा भाग शिवाचा: कुंडल, जटाभार, हातांत कपाल, त्रिशूल व अक्षमाला; डावा भाग पार्वतीचा: पत्रकुंडलें किंवा बाळी, उन्नत स्तन, मुकुट, हातांत कमंडलु, दर्पण किंवा गणेश. **विध** (५५) : उजवा भाग पुरुषी : चंद्रासह जटाजूट,भस्म युक्त, नागाचें जानवें, ऊर्ध्वलिंग, सर्पमेखला, पद्मावर पाय, हातांत त्रिशूल व अक्षमाला; डावा भाग बायकी : तिलक, शेंदरासह भांग, कुंकुमयुक्त, हार, उन्नत स्तन, सुवस्त्र, मेखला, अळता व काजळ यांनीं युक्त पाय, हातांत आरसा व कमळ. **शिर** (२२।१०३, २५।७६) : [१] ललितासन; बैल, चार हात व त्यांत अभय, परशु, बैलावर ठेवलेला व पुष्प, कटक. [२]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिवळा व बंधूक पुष्पाप्रमाणें; हात ?; पण त्यांत पाश, अंकुश, अक्षमाला, अभय; चंद्रकलेसह जटा, तीन डोळे. [३] शेंदरी व पिवळा; हात?; पण त्यांत अभय, अक्षमाला, पाश, वरद; पार्वती व शिव यांच्या चिन्हांनीं युक्त असे अर्धे अर्धे भाग. [४] लाल व पिवळा; पद्मासन; हात ? ; पण त्यांत वरद, पाश, टंक, अभय; पार्वती व शिव यांच्या अर्ध्या अर्ध्या भागांनीं युक्त; सौम्य व रौद्र चिन्हें. **सुभे** : (इहिइ २ बी १६५): उजवा भाग शिवाचा : रक्तवर्ण; पायाची मांडी; हाताचें कोपर बैलावर; मांडीवर पोपट; हातांत परशु, अभय; व्याघ्रचर्म. डावा भाग पार्वतीचा: श्यामवर्ण, कटकहस्त; रेशमीं वस्त्र.

मथुरा शिलापट्टांतील अर्धनारीश्वर मूर्ती उभी व दोन हातांची आहे. उजवा हात कुषाणकालीन बुद्ध व बोधिसत्व मूर्तीप्रमाणें अभयमुद्रेचा असून तो शिलापट्टाशीं एका उचवट्यानें जोडला आहे. डाव्या हातांत वाटोळा आरसा आहे. अर्ध्या अधिक उजव्या भागावर जटाजूट व डाव्यावर भांग आहे. दोन्ही कुंडलें एकाच प्रकारचीं आहेत. डावीकडे उन्नत स्तन आणि कमरेस उत्कृष्ट खोदलेली मेखला आहे. मेखलेखालीं ऊर्ध्वलिंग आहे. डावा पाय किंचित् आखडलेला व उजव्यावर घोट्यापर्यंत धोतर व त्यावर बाळा आहे[1]. बदामी गुहांतील अर्धनारीश्वर मूर्ती उभी आहे. तिच्या चार हातांपैकीं खालच्या दोहोंत वीणेप्रमाणें धरलेला दंड असून वरच्या दोन हातांत अनुक्रमें नागाचा विळखा असलेला परशु व उत्पल या वस्तू आहेत. शिवाय उजवा हात जणूं नंदीवर ठेवल्याचें दाखविलें आहे. डोक्याच्या डाव्या बाजूस स्त्रीत्व दर्शक अंबाडा व उन्नत स्तन, कंकणें व बांगड्या हीं वैशिष्ट्यें आहेत. मूर्तीच्या अंगावर भरपूर दागिने, तेजोवलय इत्यादी असून शिवाय उजवीकडे सव्यावर्ति पण सन्मुख नंदी आणि अंजलिहस्त भृंगी आणि डावीकडे खांद्यापाशीं नेलेल्या हातांत अनोळखी पदार्थानें भरलेलें भांडें घेतलेली स्त्री उभी आहे. हीस दासी म्हणावें तर हिचे अवयव दागिन्यांनीं खचलेले आहेत. अर्धनारीश्वराची शक्ति म्हणावें तर अर्धनारीश्वरच शिवशक्तिरूप असल्यानें त्यास निराळ्या शक्तीची आवश्यकता संभवत नाहीं[2]. अर्धनारीश्वराच्या मूर्तीला सामान्यतः

१ जर्नल ऑफ दि यू. पी. हिस्टॉरिकल सोसायटी व्हॉ. १० अं. २.
२ मेआसइ क्र. २५ पृ. ६ प्रप ३ ए.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक तोंड व २, ३ किंवा ४ हात असून उजवा भाग पुरुषाचा व डावा भाग स्त्रीचा असतो. पण धारासुरम् येथील अर्धनारीश्वराच्या उभ्या मूर्तीस तीन तोंडें आणि आयुधें स्पष्ट होत नसलीं तरी आठ हात आहेत[1]. तिरुवादि येथील अर्धनारीश्वर मूर्तीचा उजवा भाग स्त्रीचा तर डावा भाग पुरुषाचा आहे हें डोक्यावरच्या उजव्या भागास मुकुट व डाव्या भागास जटाजूट, उजवा स्तन उन्नत, उजव्या हातांत कमल, तर डावा हात वैलावर इत्यादी खुणांवरून स्पष्ट होईल[2]. बँकोक म्यूझियममधील अर्धनारीश्वराची मूर्ती बैठी व दोन भग्न हातांची आहे. हिच्या उरावर डावीकडे मोठा स्तन असून ओठावर उजवीकडे मिशी दाखविली आहे. डोक्यास मुकुट व अंगावर मामुली दागिने असून कमरेस वस्त्र व ऊर्ध्वांग उघडें आहे[3].

कंकालमूर्ती

या जगाचा आद्य कर्ता कोण असा महर्षींपुढें विचार पडला असतां ते ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवानें मीच म्हणून उत्तर दिलें; तेव्हां शंकरांनीं चमत्कार दाखवून तें खोटें असल्याचें कबूल करण्यास सांगितलें. पण ब्रह्मदेवानें तसें करण्याचें नाकारतांच शंकरांनीं आपल्या भैरवरूपास त्याचें पांचवें मस्तक तोडण्यास सांगितलें. भैरवानें तसें केलें; पण त्यामुळें भ्रूण (श्रोत्रिय ब्राह्मण) हत्या स्त्रीरूपानें त्याचे मागें लागली. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मदेवाच्या कवचींतून भिक्षा मागत बरींच वर्षें काढल्यावर तो विष्णूकडे गेला. तेथें विष्वक्सेन नांवाच्या ब्राह्मण द्वारपालाशीं भांडण होऊन त्यास ठार केल्यामुळें आणखी ब्रह्महत्या त्याचे मागें लागली. शेवटीं काशीस गेल्यावर या दोन्ही हत्यांचे पापापासून तो मुक्त झाला. कूर्मपुराणांत अशा प्रकारची कथा आहे. याचीं ग्रंथिक वर्णनें अशीं—

अभे (७२): पांढरा; हात ?; पण त्यांत प्रहर, हरिणीमुखांत, पिंच्छदंड, नगारा; जटामुकुट, चंद्रकला, डोक्यावर धत्तुरपुष्पें व नाग, डाव्या बाजूला कमरेस सुरी, दोन्ही बाजूंला नाग, कंकालास्थि, भोंवतीं ऋषि, गंधर्व, सिद्ध, विद्याधर, छत्रचामरांसह स्वर्गीय स्त्रिया. **उका** (इहिइ २ बी १५१): रंग ?;

१ साइइगॉगॉ पृ. १२६ चि. ७९; मूचि ४८. २ कित्ता पृ. १२७ चि. ८०. ३ आर्स एसियातिका व्हॉ. १२ प्रप ८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाहन ?; हात ?; पण त्यांत अभेप्रमाणें वस्तु; उजव्या कानांत मकरकुंडल, डाव्यांत शंखपत्र, समभंग, रेशमीवस्त्र, भोंवतीं नग्न स्त्रिया; बाकी अभेप्रमाणें. **पुका** (इहिइ २ बी १५३): तीन डोळे, कंकाल असलेल्या हातांत कटक;डाव्या बाजूस बलिपात्र घेतलेला भूतदेव. **शिर** (२२।११६): [१]पांढरा; हात ?; पण त्यांत हरिणीच्या मुखांत, दंड. [२] सांवळा; दोन हात; पण त्यांत ?; डोळ्यांतून रक्त बाहेर येत आहे, डाव्या खांद्यावर कंकालदंड, व्याघ्रचर्म, रेशमी वस्त्र, उजव्या बाजूस कमरेला सुरी.

कै. गोपीनाथराव यांनीं आपल्या पुस्तकांत ५ कंकालमूर्तींचीं चित्रें दिलीं असून त्यांपैकीं प्रत्येकीस चार हात आहेत. त्यांतील खालच्या दोहोंत कंकाल (एक मोठें हाड) व डमरू या वस्तू असून वरचे दोन हात कधीं मोकळे तर कधीं कथेंत दिग्दर्शित केल्याप्रमाणें खांद्यावर घेतलेल्या विष्वक्सेनाचें प्रेत तोलून धरणारे असे आहेत'.

कल्याणसुंदर

दक्षानें यज्ञप्रकरणांत शंकरास अपमानास्पद असें वर्तन केल्यामुळें त्याची मुलगी सती हिनें आत्महत्या करून हिमालयाच्या पोटीं जन्म घेतला व ती शिवप्राप्तीसाठीं तप करूं लागली. शंकरहि तप करूं लागले. इकडे तारकासुर देवांना त्रास देऊं लागला. शंकराचा मुलगाच त्याला मारूं शकणार असल्यानें शंकरांना कामविद्ध करण्यासाठीं देवांनीं कामाची योजना केली. शंकरांनीं रागावून कामास दग्ध केलें; पण कामविद्ध झाल्यामुळें त्यांनीं पार्वतीशीं लग्न केलें. या कथेवरून शंकराविषयीं कामांतक व कल्याणसुंदर अशीं दोन शिल्पें प्रचारांत आलीं. पैकीं कामांतकाचीं फक्त ग्रंथिक वर्णनें मिळतात; तर कल्याणसुंदराचीं प्रत्यक्ष शिल्पेंही आढळतात. म्हणून कल्याणसुंदराचींच वर्णनें येथें देतों.

अभे (६८): तांबूस; हात ?; पण त्यांत गौरीचा उजवा हात, परशू, मृग, वरद; जटामुकुट; उजव्या बाजूस देवी: श्याम; हात ?; पण त्यांत शिवाचा उजवा हात, कमल; लाजलेली; मागें श्री व भू यांनीं गौरीच्या कटीला स्पर्श केलेला; देवीदेवांचें तोंड पूर्वेस; देवीदेवांच्या उजव्या बाजूस

१ इहिइ खंड २ प्रप २२–२५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४० गोकाक–बेळगांव महेश्वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१ बिकानेर उमामहेश्वर

४२ शाहपुर–राजशाही सदाशिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवाच्या समोर होमकर्ता ब्रह्मा; होमाच्या उत्तरेस, दक्षिणेकडे तोंड करून विष्णुः अंजलियुक्त यक्ष, गंधर्व, माता, ऋषि इ. **उका** (इहिइ २ बी १७३): रंग ?; उभा; चार हात व त्यांत वरद, कमंडलु, अक्षमाला, अभय; त्रिनेत्र, जटामुकुट, चंद्रकला, समभंग; डावा पाय स्थिर, उजवा आकुंचित; समोर अग्निकुंड व पंचजिव्हायुक्त अग्नि; उजव्या हातानें पाण्याची धार सोडणारा विष्णु; होमोन्मुख ब्रह्मा. **पूका** (इहिइ २ बी १७६): रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत देवीहस्त, परशु, मृग, वरद; शशिकला, जटा, त्रिनेत्र, अहिकुंडल, कमरेला तक्षक, त्रिभंग, उजवा पाय आकुंचित, डावा स्थित; देवाच्या उजव्या बाजूला देवीः दोन डोळे, दोन हात; मागें लक्ष्मी; समोर होमकर्ता ब्रह्मा व उदकदाता विष्णु. **शिर** (२२।९०): अभेप्रमाणें. **श्रीनि** (पृ.७०): शैंदरी; दोन किंवा चार हात व त्यांत पार्वतीचा उजवा हात, टंक, हरिण, वरद; त्रिनेत्र, उजवा पाय आखडलेला, डावा ताठ.

या पुस्तकांत दिलेलें कल्याणसुंदर मूर्तीचें पहिलें शिल्प गयेंतील असून त्यांत शंकराच्या उजव्या बाजूस पार्वती उभी आहे. शंकराचे खालच्या उजव्या हातांत पार्वतीचा उजवा हात होता (सध्या दोन्ही भग्न आहेत). शंकराच्या बाकींच्या हातांत अनुक्रमें उपायन, शूल, कटिहस्त या वस्तू व मुद्रा असून पार्वतीच्या डाव्या हातांत आरसा आहे. प्रभावळीवर नवग्रह व शिवपार्वतींच्या मध्यें पायांपाशीं होमकर्ता ब्रह्मा आहे. बैठकीखालीं शिवपार्वतीविवाहानें आनंदित झालेले गण नाचत, गात, वाजवीत आहेत[1]. दुसरें शिल्प राजशाही म्यूझियममधील आहे. यांत शिव व पार्वती एकाच दिशेकडे तोंड करून एकापुढें एक उभी आहेत. शिवाच्या डाव्या हातांत त्रिशूल व उजव्या हातांत जंबिया असून पार्वतीच्या डाव्या हातांत आरसा व उजव्या हातांत कांहीं फळ आहे. शिवाच्या डोक्याचे अगदीं वर पण पट्टाच्या मध्यभागीं नवग्रह असून त्याखालीं दोन्ही बाजूस अभिषेक करणाऱ्या व्यक्ती आहेत. शिवपार्वतींच्या उजव्या अंगास अनुक्रमें गरूड, हंस व हत्ती यांवर बसलेले विष्णु, ब्रह्मा, इंद्र हे देव असून डाव्या बाजूसही ब्रह्मा व अशाच पण अनोळखी व्यक्ति आहेत. बैठकीच्या दर्शनी भागावर नंदी व सिंह दाखविले आहेत[2].

१ आसइअॅरि १९२५–२६ प्रप ६७ बी; मूचि ४३. २ ईइस्कूमिस्क पृ. ११२ प्रप ५४ सी; मूचि ४४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गंगाधर

सगरानें अश्वमेध यज्ञ करण्यास सुरवात करून घोडा सोडला. इंद्रानें तो पळवून पाताळ लोकांत कपिलाच्या आश्रमापाशीं नेऊन ठेविला. ६०००० सगरपुत्र शोध करीत कपिलाश्रमापाशीं आले. त्यांस तो घोडा दिसला तेव्हां कपिलानेंच घोडा चोरला असें वाटून ते त्यावर धावले; पण कपिलानें त्यांची क्षणमात्रांत राख केली. गंगेच्या सिंचनानें त्यांचा उद्धार होईल असें समजल्यावरून सगराचा निपणतु भगीरथ यानें घोर तपश्चर्या केली व गंगेस प्रसन्न केलें. पण गंगेचा वेग पृथ्वीस सहन होणार नाहीं असें समजल्यावरून पुन्हां शंकरांस प्रसन्न केलें व त्यास गंगा धारण करावयास विनविलें. शंकरांनीं गंगेचा वेगाविषयींचा गर्व हरण करून तीस आपल्या जटेंतच गुरफटून टाकलें. शंकराच्या या रूपास गंगाधर म्हणतात. याचीं ग्रंथिक वर्णनें अशीं—

अभे (६६): रंग?; वाहन?; चार हात व त्यांत वरद, जटांवर जान्हवी, मृग, देवीला आलिंगन; उजवा पाय स्थित, डावा आकुंचित. उवा भागीरथी, डावा गौरी–डावा पाय सुस्थित, उजवा आकुंचित; हात?; पण त्यांत प्रसारित किंवा तिरका, पुष्प; प्रार्थना करणारे ऋषी. **उका** (इहिइ २ बी १६२): रंग?; वाहन?; चार हात व त्यांत अभय, जटायुक्त गंगा, मृग, परशु; तीन डोळे; जटामुकुट; बाकी सर्व चंद्रशेखराप्रमाणें. डावा देवी; भगीरथः दोन हात, दोन डोळे, हृदयापाशीं अंजलि; जटावल्कलधारी. **उका** (इहिइ २ बी १६३): चार हात व त्यांत अभय किंवा कटक, गंगेसह जटा, परशु, मृग; तीन डोळे; जटामुकुट. डावा भवानी. भगीरथः वल्कलें, लांब जटा, मानवाकार. **शिर** (२२।६६): अभेप्रो.

तंजावर जिल्ह्यापैकीं वैथीश्वरन कोविल येथील गंगाधरमूर्ती या पुस्तकांत चित्रित केली आहे. यांत शिवपार्वती दोघेही उभे असून शिवानें आपला उजवा हात पार्वतीच्या हनुवटीजवळ नेला आहे. डाव्या खालच्या हातानें पार्वतीस आलिंगिलें आहे आणि उजव्या वरच्या हातानें जटामुकुटांतून निघालेल्या गंगाप्रवाहास आधार दिला असून वरच्या डाव्या हातांत हरिण आहे. गंगाप्रवाहांत अंजलिहस्त गंगेचें ऊर्ध्वांग असून ती शंकरांकडे पहात आहे[1].

---

१ मूचि ४६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गजासुरमर्दन

काशीमधील एका शिवलिंगाभोंवतीं बसून नित्यक्रमानुसार ब्राह्मण ध्यान, धारणा, इत्यादि करीत असतां एक असूर हत्तीच्या रूपानें तेथें आला व त्यानें ब्राह्मणांना त्रास देण्यास सुरवात केली. हें पाहून शंकर लिंगांतून बाहेर आले, त्यांनीं त्या गजासुराला मारलें व त्याचें कातडें उत्तरीय म्हणून पांघरलें अशी कूर्मपुराणांत एक कथा आहे. तसेंच, असुरांचा राजा अंधक पार्वतीस पळविण्याच्या खटपटींत असतां नील नांवाच्या त्याच्या असुरानें वेगळाच बेत करून हत्तीचें रूप घेतलें व शंकराला मारण्याचें ठरविलें. नंदीस ही बातमी कळतांच त्यानें ती वीरभद्राला सांगितली. वीरभद्रानें सिंहाचें रूप घेतलें आणि गजरूपी नीलाला मारलें. त्याचें कातडें वीरभद्रानें शंकराला नजर केलें. शिवानें तें उत्तरीय म्हणून पांघरलें. यानंतर सर्व साहित्यासह निघून शंकरांनीं अंधकासुराला मारलें अशी वराहपुराणांत कथा आहे. याचीं ग्रंथिक वर्णनें अशीं—

अचि (३।१।७६७): साधारण शिव; पण दहा हात व आयुधें नृत्तमूर्तीप्रमाणें. **अभे** (७०): सामान्य : डाव्या पायाखालीं गजाचें मस्तक, मुकुटावर गजाचें पुच्छ, उजवा पाय वर उचलललेला, डाव्या बाजूस स्कंद आणि पार्वती. [१] किरमिजी; चार हात व त्यांत पाश, गजचर्म, गजदंत, गजचर्म. [२] आठ हात व त्यांत शूल, डमरू, पाश, गजचर्म, हत्तीचा दात, कपाल, गजचर्म, विस्मय. [३] आठ हात व त्यांत शूल, खड्ग, ढाल, हत्तीचा दात, कपाल, ढाल, घंटा, गजचर्म. **मपु** (२५९।३): अचिप्रमाणें. **शिर** (२२।१०६): अभे १।२ प्रमाणें. **श्रीनि** (पृ. ७३): पांढरा; डावा पाय गजमस्तकीं, उजवा उचलललेला; हात ?; पण त्यांत शूल, असि, (गज) शृंग, टंक, मृग, सूचिमुद्रा; डावा उमा, स्कंद.

कै. गोपिनाथरावांनीं या मूर्तींचीं पांच उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, सामान्यत: या शिल्पांत शंकर मारलेल्या हत्तीच्या डोक्यावर नाचत असतो. तो दोन हातांनीं हत्तीचें कातडें आपल्या शरीराभोंवतीं पण पाठीमागें ताणून धरतो. त्याच ठिकाणीं बहुधा हत्तीचे पाय आणलेले असतात. हत्तीची शेपटी बहुधा शंकराच्या डोक्यावर असते. भोंवतीं ब्रह्मा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विष्णु, भक्त व पार्वती यांपैकीं एक किंवा अधिक व्यक्तिही चितारलेल्या असतात[1].

त्रिपुरान्तक

तारकासुराच्या तीन मुलांनीं उग्र तपश्चर्येनें ब्रह्मदेवास प्रसन्न करून घेतलें आणि ज्यांत आपल्या मनाजोग्या हालचाली करतां येतील, एक हजार वर्षांनीं ज्यांचें एकीकरण होईल व नंतर जें फक्त एका विशिष्ट बाणानेंच नष्ट होईल अशा प्रकारचीं तीन पुरें मागून घेतलीं. त्याप्रमाणें मयानें त्यांना स्वर्ग, अंतरिक्ष व पृथ्वी यांवर तीन पुरें बांधून दिलीं. तिघे पुत्र त्यांत राहून देवांना त्रास देऊ लागले. तेव्हां त्यांनीं ब्रह्मदेवास त्रिपुर-नाशनाचा उपाय विचारला. त्यानें शंकरानें बाण मारल्यास तें काम होईल म्हणून सांगितलें. पण शंकरानें यासाठीं देवांच्या अर्ध्या शक्तीची मागणी केली. त्याप्रमाणें देवांनीं केल्यावर शंकरानें विष्णु, अग्नि व यम यांचा बाण केला आणि वेदांचें धनुष्य व सावित्रीस दोरी बनविलें. ब्रह्मा सारथी झाल्यावर हा बाण सोडून शंकरानें त्रिपुरें व त्यांतील असुर यांचा नाश केला. अशी कथा थोड्याफार फरकानें व संक्षेपानें तैत्तिरीय संहिता, ऐतेरय व शतपथ ब्राह्मण आणि कर्णपर्व यांत आली आहे. मत्स्य व शिव या पुराणांत त्रिपुरांतील असुर धार्मिक वृत्तीचे असतां विष्णूनें बुद्ध व जिन यांचीं रूपें घेऊन त्यांस अधार्मिक बनविलें असें आणखी सांगितलें आहे. तात्पर्य, या कथेंत फार खोल अर्थ भरला आहे असें वाटतें. पण त्याचा उलगडा करण्याचें हें स्थळ नव्हे. येथें आपण या कथेवरून बनणाऱ्या शिल्पांचीं ग्रंथिक वर्णनें कशीं आहेत तें पाहूं या.

अचि (३।१।७६५) : साधारण शिव; पण सोळा हात व त्यांत अक्ष-माला, तलवार, भाला, दंड, शूल, बाण, चक्र, गदा, खट्वांग, सर्प, कपाल, ढाल, वरद, धनुष्य, घंटा, शंख. **अभे** (६७) : तांबूस; आलीढ; हात?; पण त्यांत बाण, टंक, हरिण, धनुष्य; जटामुकुट; डावा गौरी. **उकामि** (इहिइ २बी ८४): [१] चार हात व त्यांत बाण, परशु, मृग, धनुष्य. [२] दोन हात व त्यांत बाण, धनुष्य; डावा विकल्पानें पार्वती; जटामुकुट,

१ इहिइ खंड २ पृ. १५२-१५६ प्रप ३० ३३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४३ गया कल्याणसुंदर शिव

४४ राजशाही–कल्याणसुंदर शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४५ बहार हरिहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिनेत्र. पूका (इहिइ २ बी ८५) : चार हात व त्यांत उकामि १ प्रमाणें; तीन डोळे, जटामुकुट, कानांत नक्र व पत्र कुंडलें, यज्ञोपवीत. मपु (२५९।८) : अचिप्रमाणें. श्रीनि (पृ. ७२) : तांबूस; हात ? ; पण त्यांत उकामि १ प्रमाणें; त्रिनेत्र, जटामुकुट, [अहि] व पत्र कुंडलें, उपवीत; उमेसह. सुभे (इहिइ २ बी ८४) : हात ? ; पण त्यांत उकामि १ प्रमाणें; बरोबर उमा.

हीं सामान्य वर्णनें झालीं. यांशिवाय अभेमध्यें याचे केवळ पायांचे पवित्रे व हातांची संख्या बदलून होणारे आणखी सात प्रकार सांगितले आहेत ते असे–(२) डावा पाय अपस्मारावर (३) पायांचा पवित्रा १ च्या उलट (४) डावा पाय अपस्मारावर (५) चार हात व त्यांत बाण, टंक, धनुष्य अगर मृग (६) आठ हात व त्यांत बाण, परशु, खड्ग, वज्र, धनुष्य, विस्मय, ढाल, कटक (७) दहा हात व त्यांत बाण, चक्र, शूल, टंक, वज्र, धनुष्य, शंख, सूची, विस्मय, ढाल (८) रथ; उजवा गुडघा खालीं टेकून; ब्रह्मा सारथी.

कै. गोपिनाथराव यांनीं या मूर्तीचीं तीन जुनीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, त्रिपुरांतक रथांत राहून त्रिपुरदहनाचें काम करतो. त्याच्या रथास दोन घोडे व ब्रह्मा सारथी असतो. रथासमोर पळणारे राक्षस असतात. शंकरास हात मात्र २ ते ८ दाखवितात[1].

दक्षिणामूर्ति

शिव, ज्ञान, योग, इत्यादि मोक्षमार्ग व गान, नृत्य इत्यादि कला यांमध्यें अतिशय प्रवीण असल्याची समजूत आहे; येवढेंच नव्हे तर अनेक शास्त्रें व कला यांवरील शास्त्रीय व लौकिक ग्रंथांतील ज्ञान शिवपार्वतींच्या संवादांतून उत्पन्न झाल्याचें सांगितलेलें असतें. उदाहरणार्थ, पाणिनीच्या अष्टाध्यायीचा आरंभ माहेश्वर सूत्रांनीं होतो. ज्ञानेश्वरींतील तत्वज्ञान शिवपार्वतींच्या संवादांत उद्भूत झालें आहे. असेंच अनेक ग्रंथपंथांच्या बाबतींत म्हणतां येतें. शिवाच्या ज्ञान, योग, गान यांतील प्रवीणता दाखविणाऱ्या मूर्तीना दक्षिणा-

१ इहिइ खंड २ पृ. १७० प्रप ३७–४०
मू. ८.....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्ति म्हणतात. त्याचें तोंड दक्षिणेकडे असे किंवा त्याच्या मूर्ती देवळाच्या—विशेषतः गाभाऱ्याच्या—दक्षिणेकडील कोनाड्यांत बसवितात म्हणून त्यास दक्षिणामूर्ति हें नांव पडलें असावें. महाराष्ट्रांत याच्या मूर्ती क्वचितच असतील. पण दक्षिण हिंदुस्थानांत निदान मध्ययुगापासून तरी याच्या मूर्ती फार मोठ्या प्रमाणांत करीत असें दिसतें. शंकराचार्यांनीं यावर एक स्तोत्र केलें आहे. यावरून त्याचा प्रसार किती होता याची कल्पना येईल. विष्णुधर्मोत्तरांत व्याख्यान दक्षिणामूर्तीचें वर्णन आलें असल्यानें असें वाटतें कीं, उत्तरेंतही या मूर्तीचा थोडासा प्रसार असावा. याच्या मूर्तींचें गान किंवा वीणाधर, योग, ज्ञान व व्याख्यान असे चार प्रकार करतात.

वीणाधरमूर्ति डाव्या पायावर उकिडवी बसलेली व आपल्या दोन हातांत वीणा घेतलेली दाखवावी म्हणून सांगितलें असलें[1], तरी प्रत्यक्ष शिल्पांत शिव उभा, चार हातांचा, वीणेशिवाय, पण जणूं खालच्या दोन हातांत वीणा असलेला आणि वरच्या दोन हातांत परशु व मृग घेतलेला दाखविला आहे[2].

शिवाच्या सामान्य लक्षणांखेरीज योगासन किंवा अर्ध उत्कुटिकासन व अर्ध ललितासन, योगपट्टानें पाय आवळणें, चार हातांपैकीं उजव्या दोन हातांत अक्षमाला, ज्ञान, किंवा संदर्श आणि डाव्या दोन हातांत कमल, वरद, कमंडलु या पैकीं वस्तू व मुद्रा असणें किंवा खालचे दोन हात गुडघ्यावरून पुढें आणलेले असणें, तसेंच नासाग्रदृष्टीसारखीं ध्यानलक्षणें या चिन्हांवरून योगदक्षिणामूर्ती ओळखतां येते[3]. फक्त मत्स्यपुराणांत योगेश्वरास चार किंवा आठ हात सांगितले आहेत[4]. कै. गोपिनाथराव यांनीं योग मूर्तीच्या दिलेल्या दोन उदाहरणांत यांतील बहुतेक लक्षणें आढळून येतातच; पण डाव्या हातांत अग्नि आहे हा एक विशेष दिसतो[5].

व्याख्यान मूर्तीचीं लक्षणें अशीं—सांवळा, गोरा, पिवळा, तांबडा; सव्य ललितासन, वाम उत्कुटिकासन किंवा वीरासन; चार हात व त्यांत (१) ज्ञानमुद्रा, संदर्श मुद्रा, व्याख्यान मुद्रा (२) अक्षमाला (३) अग्नि, सर्प, अमृतघट यांपैकीं एक (४) दंड, वरद, अभय, पुस्तक, नाग, गुडघ्यावर यांपैकीं एक; पांढरें वस्त्र, हस्तिचर्म, व्याघ्रचर्म, रुईचीं फुलें, शिवाय शिवाचीं

१ इहिइ खंड २ बी १४५. २ कित्ता प्रप ८०, ८१. ३ कित्ता २ बी १४२. ४ अ. २५९।१३. ५ इहिइ खंड २ प्रप ७७, ७८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामान्य लक्षणें[1]. ज्ञान–दक्षिणामूर्तीचें आसन वाम उत्कुटिक आणि हातांत ज्ञान, अक्षमाला, उत्पल व अभय किंवा गुडघ्यावरून पसरलेला अशा मुद्रा व वस्तू असतात[2]. फक्त मत्स्यपुराणांत ज्ञानेश्वर शंकरास चार किंवा आठ हात असावे म्हणून सांगितलें आहे.

श्रीतत्त्वनिधिमध्यें (पृ. ७७) व्याख्यान दक्षिणामूर्तीचें एक अगदीं निराळेंच ध्यान दिलें आहे. त्यांत तो चार हातांत ज्ञान, अक्षमाला, वीणा नि पुस्तक या मुद्रा व वस्तू, पायांस योगपट्ट व व्याख्यान–पीठावर बसलेला असावा असें सांगितलें असल्यानें तेथें ज्ञान, व्याख्यान, योग व वीणाधर अशा चारी मूर्ती एकत्र केल्या गेल्या आहेत असें वाटतें. कुतूहलाची गोष्ट अशी कीं, म्हैसूर संस्थानांतील नंजनगोडु गांवीं जवळजवळ या वर्णनाची एक कांहींशीं अर्वाचीन मूर्ती आहे[3]. हिच्या उजव्या वरच्या हातांत नाग असून खालच्या हातांत ज्ञानमुद्रेसह अक्षमाला आहे येवढाच काय तो फरक आहे.

नटराज

नटराज हा शिवमूर्तीचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. या प्रकाराच्या मूर्ती बाहुल्यानें दक्षिण हिंदुस्थानांत सांपडत असल्या तरी उत्तरेंत त्या अजिबात नाहींत असें म्हणतां येत नाहीं. शिव मूळची अनार्य देवता असल्यानें तिची आर्यांनीं प्रथम कल्पना केली ती वेडेवाकडे अंगविक्षेप करणारा, तोंडानें कांहीं तरी गाणारा व कठोर वाद्यें वाजविणारा अशी असावी. पण पुढें त्याचा आर्यांनीं स्वीकार केल्यावर तो उत्तम गायक, वादक व नर्तक किंवा ललितकलाकुशल बनला. पैकीं नर्तनकलेचा आविष्कार करणाऱ्या मूर्तींना नटराज ही संज्ञा आहे.

नर्तनाचे किंवा तांडवाचे प्रकार १०८ असल्याचें भरताच्या नाट्यशास्त्रांत व शैवागमांत सांगितलें आहे; येवढेंच नव्हे तर चिदंबरं येथील नटराजाच्या देवळांत गोपुरावर असे १०८ नर्तनप्रकार भरतानें दिलेल्या

---

१ चचि २।१२५; इहिइ २ बी १३७. २ इहिइ २ बी १४१. ३ कित्ता खंड २ प्रप ७९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या वर्णनांसह खोदले आहेत[1]. या सर्व प्रकारांचीं तेथील वर्णनें सदर्न सर्कलचे एपिग्रफीच्या १९१३–१४ च्या रिपोर्टांत आलीं असून अलीकडे हीं वर्णनें व तदनुरूप खोदलेल्या शिल्पांचीं चित्रें यांचें 'तांडवलक्षणम्' नांवाचें पुस्तकही प्रसिद्ध झालें आहे. शिल्प–रत्नांत तर शिवाच्या नर्तनाचे ८०० प्रकार होते असें नमूद आहे.[2] पण त्यांत आणि अंशुमद्भेदागम[3] व आगमग्रंथ यांत फक्त नऊ प्रकारच वर्णिले आहेत. श्रीतत्त्वनिधीमध्यें आनंद, संध्या, उमा, गौरी, कालिका, त्रिपुर व संहार अशा सात तांडव प्रकारांचीं वर्णनें दिलीं असून[4] कै. गोपिनाथरावांनीं भुजंगत्रास, कटिसम, ललित, ललाटतिलक, चतुर आणि तलसंस्फोटित अशीं सहा प्रकारचीं नृत्यें भरताच्या नाट्यशास्त्रावरील अभिनवगुप्ताचार्याच्या टीकेच्या साह्यानें वर्णिलीं आहेत[5].

नटराजाविषयीं इतक्या ठिकाणीं माहिती आल्यामुळें व त्यावर स्वतंत्र पुस्तकच झाल्यामुळें प्रत्येक नर्तनप्रकाराचें विस्तृत वर्णन येथें देण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं. त्याचीं इतर ग्रंथांत आलेलीं सामान्य वर्णनें दिल्यानें काम भागेल असें समजूं या. अचिमध्यें महादेवाचें सामान्य वर्णन दिलें असून त्यासच दहा हात दाखविल्यास तो नटराज होतो म्हणून सांगितलें आहे. मात्र त्यांतील आयुधें सांगतांना शुद्ध पाठ न मिळाल्यामुळें वर्णनावरून आठ हातांत अक्षमाला, शक्ति, दंड, शूल, खट्वांग, कपाल, ढाल, वरद, अशा वस्तू व मुद्रा असाव्या येवढाच बोध होतो[6]. मपुमध्यें नटराजास उजव्याडाव्या अंगांस अनुक्रमें खड्ग, शक्ति, दंड, त्रिशूल, वर, ढाल, कपाल, नाग, खटवांग, अक्षमाला या मुद्रा व वस्तू धारण करणारे दहा हात दाखवावे म्हणून सांगितलें आहे[7].

मीं या पुस्तकांत नटराजाचीं तीन उदाहरणें दिलीं आहेत. पैकीं पहिलें

---

१ इहिइ खंड २ पृ. २२३. २ अ. २२।३३. ३ पटल ६५. ४ पृ. ६५; हे प्रकार भरतांत नाहींत. ५ इहिइ खंड २ पृ. २५२; हे प्रकार भरतांत आहेत हें सांगावयास नकोच. ६ प्र. ३।१।७६५; इहिइ खंड २ पृ. ११७ वरून त्याचा खुलासा होतो. ७ अ. २५९।८; हें व अचिमधलें दोन्ही वर्णनें जवळ जवळ एकच आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिण हिंदुस्थानांतील आहे. ही मूर्ती चार हातांची असून तीन हात अभय-मुद्रा, डमरू व अग्नि धारण करणारे आणि चौथा हात व एक पाय भग्न आहेत. दुसरा पाय अपस्मार पुरुषावर ठेवला आहे. दक्षिण हिंदुस्थानांत अशा मूर्ती पुष्कळ सांपडत असून या मूर्तीस त्यांपैकीं एक उत्तम नमुना म्हणून समजण्यास हरकत नाहीं[1]. सामान्यत: अशा नटराजमूर्तींत उजवा पाय टेकलेला व डावा उचलेला असतो. पण अशाही कांहीं मूर्ती आहेत कीं, ज्यांत डावा पाय जमीनीवर टेकलेला व उजवा उचललेला असतो. पायांखालीं एकदम साप आल्यामुळें शिव भयानें चटकन् पाय उचलतो अशी कल्पना या प्रकारांत केली असल्यामुळें यास भुजंगत्रास असें नाट्य-शास्त्रीय नांव आहे. दुसरी मूर्ती तंजावर जिल्ह्यापैकीं तिरुपनन्थल येथील आहे. हिच्या पहिल्या तीन हातांत अभयमुद्रा, डमरू व अग्नि असून चौथा हात स्वत:च्या डोक्यावर छत्राप्रमाणें धरला आहे. डावा पाय अपस्मार पुरुषावर असून उजवा पाय उचलून डोक्यापाशीं नेला आहे. उजव्या बाजूस एक भक्त आहे. स्वत:च्या पायाच्या आंगठ्यानें स्वत:च्या कपाळास टिळा लावावयाचा अशी या प्रकारांत कल्पना केली असल्यानें यास ललाटतिलक हें नांव नाट्यशास्त्रांत दिलें आहे[2]. तिसरी मूर्ती बंगालमधील काशीपूर येथील आहे. ती बैलावर दोन्ही पाय गुडघ्यांत वाकवून पण उजवा पूर्ण व डाव्या पायाचा चवडा टेकून उभी असून हिच्या दहा हातांत अभय, शक्ति, टंक, त्रिशूल, खड्ग, दंड, पाश, ढाल, कपाल, गजहस्त, या मुद्रा व वस्तू आहेत. मुख्य मूर्तीभोंवतीं गणपती, उद्यतायुध तीन वीर, एक मृदंगी व झांज वाजविणारा अशा व्यक्ति आहेत. गजहस्त व पायांची पद्धति यांवरून या प्रकारास नाट्यशास्त्रांत चतुर म्हणतात[3].

पंचब्रह्म

तत्पुरुष, अघोर, सद्योजात, वामदेव व ईश अशा पांच शिवरूपांना पंचब्रह्म अशी संज्ञा आहे. पंचब्रह्मांचें तात्त्विक वर्णन आगमग्रंथांतून पुष्कळ आलें आहे. पण त्याशीं आपणांस कर्तव्य नाहीं. या पाचांचीं मिळून एकच

१ आसइअॅरि १९२४–२५ पृ. १२६ प्रप ३८ए; मूचि ५१. २ मूचि५२.
३ आसइअॅरि १९३०–३४ प्रप १५० सी; मूचि ५०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्ती प्रथम कल्पिली गेली किंवा यांवरून शिवाच्या पंचमुख व दशहस्त रूपाची कल्पना केली गेली असावी[1]. उ. विष्णुधर्मोत्तरांत पंचवक्त्र शिवाचें वर्णन देतांना त्याच्या मुखांस हींच नांवें दिलीं असून प्रत्येक मुखास दोन हात सांगितले आहेत[2]. रूपमंडनांतही मुखलिंग प्रकरणांत मुखें असतील त्या मानानें त्यांस पूर्वादि दिशांच्या क्रमानें हींच नांवें व पिवळा, काळा, तांबडा, ?, पांढरा, हे रंग द्यावे म्हणून सांगितलें आहे[3]. शिरमध्येंही(२२।१८९) यांचे लाल, काळा, पांढरा, तांबूस, पांढरा, असे रंग सांगितले आहेत. याशिवाय वाजूस दिलेल्या कोष्टकाप्रमाणें कोणत्या दिशेस कोणतें तोंड असावें, प्रत्येकाचें दुसरें नांव, त्यांच्या हातांतील वस्तू इत्यादि आणखीही तपशील विष्णुधर्मोत्तरांत दिला आहे. ही माहिती देतांना वामदेवास अर्थात् उमामुखास दोनच डोळे व इतरांस तीन डोळे दाखवावे म्हणून सांगून जटा, चंद्रकला, व्याघ्रचर्म, वृषभ, वासुकीचें यज्ञोपवीत वगैरे चिन्हेंही विहित आहेत.

पूर्व	तत्पुरुष	महादेव	अक्षमाला, कमंडलु.
दक्षिण	अघोर	भैरव	दंड, महाळुंग.
पश्चिम	सद्योजात	नंदि	त्रिशूल, ढाल.
उत्तर	वामदेव	उमा	कमल, आरसा.
ऊर्ध्व	ईशान	सदाशिव	बाण, धनुष्य.

यावरून पंचवक्त्र शिवच प्रथम पंचब्रह्माचें प्रतीक होतें असें ठरतें. पण पुढें या पंचब्रह्मांपैकीं प्रत्येकाचें स्वतंत्र रूप तयार झालेलें दिसतें. कारण विष्णुधर्मोत्तरांतच पुढें या पांचांस पिवळा, काळा, तांबडा, पांढरा, हे रंग, प्रत्येकास पांच तोंडें, दहा हात व त्यांत अभय, शूल, खड्ग, बाण, अक्षमाला, कमंडलु, धनुष्य, ढाल, कमल, वर, या मुद्रा व वस्तु असाव्या असें सांगितलें आहे[4]. इतर ग्रंथकारांनीं मात्र पंचब्रह्मापैकीं प्रत्येकाचें निराळें रूप कल्पिलें आहे. त्यांचीं वर्णनें लहान लहानच असल्यामुळें येथें देण्यास हरकत नाहीं.

१ विध ४४. २ कित्ता ४८. ३ रूम १४ अ; रूपा ३६ अ. ४ चचि २।२१४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अघोर–रूम (९ आ): श्याम, पिंगट; वाहन ?; आठ हात व त्यांत त्रिशूल, परशु, खड्ग, दण्ड, खट्वांग, कपाल, ढाल, पाश; मोठ्या दाढा, तीन डोळे, डोक्यावर साप, रुंडमाला, सर्पाचीं कुंडलें व हार, हातांवर सर्प व केयूरें, कटि-सूत्र, विंचवांची माळ, पिंगट जटा, शशिकला, पायांत तक्षक व पुष्टिक हे नूपुर. **शिर** (२२।२०२): काळा; वाहन ?; चार हात ? व त्यांत अक्षमाला, वेद, पाश, अंकुश, डमरु, खट्वांग, शूल, कपाल; दाढा, तीन डोळे, चार तोंडें. **शैकाग** (श्रीनि पृ. ६४):निळा; वाहन ?;हात ?;पण त्यांत कुठार, अंकुश, पाश, शूल, कपाल, ढक्का, अक्षमाला, ढाल; तीन डोळे, चार तोंडें.

ईशान— रूम (९ आ): पांढरा; वाहन ?; हात ? ; पण त्यांत अक्षमाला, त्रिशूल, कपाल, अभय; जटाचंद्र. [१] **शिर** (२२।२०३) : गौर; वाहन ?; दहा हात व त्यांत अभय, वरद आणि अघोराप्रमाणें; पांच तोंडें. **शैकाग**–(श्रीनि पृ. ६५) : शिरप्रमाणें; फक्त हात ?; दहा आयुधें; पण खट्वांग ऐवजीं टंक.

तत्पुरुष—रूम(९ आ;) : रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत अक्ष-माला, महाळुंग; पींतवस्त्र, पिवळें जानवें. **शिर** (२२ । २०३) : पांढरा; वाहन ?; चार हात व त्यांत वेद, अभय, वरद, कुठार; चार तोंडें, तीन डोळे. **शैकाग** (श्रीनि पृ. ६४) : पिवळा; वाहन ?; हात ?; पण त्यांत विद्या, वरद, अभय, कुठार; चार तोंडें, तीन डोळे.

वामदेव—रूम(९ अ) : रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत खड्ग, खेटक; तांबडें वस्त्र, यज्ञोपवीत, कुंडलें, शिरस्त्राण, नेत्र, माला व अनुले-पन; जटा, चंद्रकला, तीन डोळे, उंच नाक. **शिर** (२२ । २०२):तांबडा, केशरी; वाहन ?; चार हात व त्यांत अभय, परशु, अक्षमाला, वरद; चार तोंडें, तीन डोळे. **शैकाग** (श्रीनि पृ. ६४) : गोरा; वाहन ?; हात ?;पण त्यांत वरद, अक्षमाला, अभय, टंक; तीन डोळे, चार तोंडें.

सद्योजात — रूम (९ अ) : रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत वरद, अभय; तीन डोळे, सौम्य मुख, कुंडलें, पांढरें वस्त्र व गंध, पांढरीं फुलें, जटा, शशिकला. **शिर** (२२ । २०२) : गोरा; वाहन ?; चार हात व त्यांत अभय, वेद, अक्षमाला, वरद; तीन डोळे, चार तोंडें. **शैकाग** (श्रीनि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृ. ६४) : पांढरा; वाहन ?; हात ?; पण त्यांत अभय, विद्या, अक्षमाला, वरद; तीन डोळे, चार तोंडें.

भिक्षाटन

दारुवनांत स्त्रिया व मुलेंसुद्धां तप करीत. त्यांचें ऐहिक सुखाकडे लक्ष लागावें म्हणून शंकरानें काळें, कुरूप व नागवें असें रूप धारण करून त्या वनामध्यें भिक्षा मागितली आणि मुलें व स्त्रिया यांचें लक्ष ऐहिक सुखाकडे खेचलें. लिंग पुराणांत अशा प्रकारची कथा आहे. या कथेचें कंकालशिवाच्या कथेशीं बरेंच साम्य असलें तरी शिवाचें नग्नत्व हा मोठा भेद आहे. यामुळें प्रत्यक्ष शिल्पें ओळखण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. याचीं ग्रंथिक वर्णनें अशीं—

अभे (७४), **उका** (इहिइ २ बी १५५): पांढरा; पद्मपीठावर; हात?; पण त्यांत मृगाजवळ; डमरू, मोराचीं पिसें, कपाल व वरद; पांढरें उत्तरीय, कमरेला नाग, यज्ञोपवीत, जटा विकीर्ण किंवा मंडल, ललाटपट्ट, नग्न, चंद्रशेखर, नीलकंठ, त्रिपुण्ड्र, कटिसूत्र नाहीं, पायांत पादुका किंवा अनवाणी, डावा पाय स्थिर, उजवा उचललेला; बाकी कंकालमूर्तीप्रमाणें. **काग** (इहिइ २ बी १५७): रंग? ; वाहन? ; चार हात व त्यांत अभेप्रमाणें. फक्त वरद नाहीं; तीन डोळे, स्मितमुख, पादुका, आभंग. **शिर** (२२।१३७) : अभेप्रमाणें. **सुभे** (इहिइ २।१५६) : स्थितिमूर्तीचें धड व सृष्टिमूर्तीचें कपाल; पादुका, भस्म लावलेलें, अंगावर साप, खांद्यावर शूल व डमरू. **श्रीनि** (पृ. ६४): जवळ जवळ अभे-प्रमाणें; पण चार हात व त्यांत हरिणमुखाजवळ, डमरु, पिसांसह त्रिशूल, कपाल.

तिरुवेंगोडु (तंजावर) येथील भिक्षाटन शिव वर दिलेल्या वर्णना-प्रमाणेंच दाखविला आहे. जटामंडल, ललाटपट्ट, त्रिनेत्र, नग्न, कटिसर्प, पादुका वगैरे लक्षणें तर या मूर्तींत आहेतच. पण चार हातांत हरिण मुखाजवळ, डमरू, मोराच्या पिसांसाठीं कटकमुद्रा, कपाल या मुद्रा व वस्तू धारण केल्या आहेत. या मूर्तीचा उजवा पाय आखडलेला व डावा ताठ आहे'.

---

१ मूचि ४९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४६ वैथीश्वरन कोविल–तंजावर गंगाधर



४७ राजगृह–पाटणा शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४८ धारासुरम्–तंजावर अर्धनारीश्वर



४९ तिरुवेंगोडु–तंजावर भिक्षाटन शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भैरव

ब्रह्मदेवानें रुद्र उत्पन्न केला व त्याला कपालि या नांवानें संबोधून पृथ्वीचें रक्षण करण्यास सांगितलें. या नांवामुळें स्वतःचा अपमान झालासें वाटून रुद्रानें आपल्या डाव्या हाताच्या आंगठ्याच्या नखानें ब्रह्मदेवाचें पांचवें डोकें तोडलें. परंतु तें त्याच्या आंगठ्याला चिकटून राहिलें व कांहीं केल्या निघेना. यांतून मुक्त होण्याला काय उपाय करावा हें सांगण्याची रुद्रानें ब्रह्मदेवास विनंति केली. ब्रह्मदेवानें १२ वर्षें कापालिक व्रत आचरण्यास सांगितलें. रुद्र महेंद्रगिरीवर गेला. त्यानें केसांचें यज्ञोपवीत आणि अस्थींच्या मण्यांचा हार घातला, जटामुकुटावर मुंड ठेवलें आणि हातांत रक्तानें भरलेलें एक कपाल घेऊन पृथ्वीवरील सर्व तीर्थांची यात्रा करीत तो हिंडला. बाराव्या वर्षी तो काशींत आला आणि त्या ठिकाणीं त्याच्या हातापासून ब्रह्मदेवाचें कपाल गळून पडलें. ज्या ठिकाणीं तें पडलें त्या स्थानाला कपालमोचन म्हणतात. रुद्रानें गंगेंत स्नान केलें, विश्वेश्वराची पूजा केली आणि तो कैलासाला परत गेला. वराह पुराणांत अशा प्रकारची कथा आहे. किंवा कंकालमूर्ति सदराखालींही ब्रह्मदेवाचें शीर तोडल्याबद्दलची एक कथा दिली आहे. या कथांच्या अनुरोधानें भैरवाच्या मूर्ती झालेल्या दिसतात.

महाराष्ट्रसमाजाच्या खालच्या थरांत या देवतेचा इतका प्रसार आहे कीं, सामान्यतः प्रत्येक खेड्यांत बहुधा भैरव किंवा क्वचित् कालभैरव सांपडतो. खेड्यांतील लोक आपल्या अनेक दुःखांबाबत दाद मागण्यासाठीं याकडे जातात. विशेषतः साप चावल्यास किंवा भुतानें झपाटल्यास त्या बाधांतून मुक्त होण्यासाठीं या देवतेची आराधना करण्याचा प्रघात सर्वत्र आढळतो. यामुळें यास क्षेत्रपाल असेंही नांव पडलें आहे. पण मूर्तीवरून तो भैरवच ठरतो.

याच्या मूर्तीचे दोन भाग पडतात. एकांत सामान्य, क्षेत्रपाल, चंड, बटुक, स्वच्छंद व स्वर्णाकर्षण भैरव येतात; तर दुसऱ्यांत ६४ भैरवांचा समावेश होतो. भैरवमूर्तीचा प्रसार फार असल्यानें त्या सर्वांचीं वर्णनें येथें देणें जरूर आहे.

चंड-रूपा (२८ आ): रंग व वाहन ? ; सहा हात ? ; पण त्यांत अभय,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तलवार, भाला, बाण, अंकुश, गजचर्म, गजचर्म, खट्वांग, धनुष्य, कपाल, ढाल, अभय.

बटुक–रूम (१९ अ): रंग व वाहन ?; हात ?; पण त्यांत खट्वांग, तलवार, पाश, शूल, डमरू, कपाल, वरद, भुजंग; सदृश वर्णाचा हरिण जवळ. **श्रीनि** (पृ. ८७): तांबडा; कुत्रा; हात ?; पण त्यांत शूल, कपाल, पाश, डमरू; तांबड्या मोकळ्या जटा, तीन डोळे, पिशाच व गण यांनीं वेष्टित.

सामान्य–अपु (५२।९): रंग व वाहन ?; प्रेतासन; बारा हात व त्यांत अभय, तलवार, अंकुश, कुऱ्हाड, बाण, गजचर्म, गजचर्म, धनुष्य, त्रिशूल, खट्वांग, पाश, वरद. मातांमध्यें, दाढा, जटा, चंद्रकला. **विध** (२।१३०): सावळा; अनेक हात व आयुधें; लंबोदर, पिंगट डोळे, फुगलेल्या नाकपुड्या, हत्तीचें कातडें पांघरणारा, कपालांची माळा, दाढा, सर्पभूषणें. **श्रीनि** (पृ. ७३): गोरा; चार हात व त्यांत वज्र, परशु, शूल, ब्रह्मकपाल; तीन डोळे, जटा.

स्वच्छंद–अचि(३।१।७६९): अठरा हात व त्यांत त्रिपुरांतकाचीं सोळा आयुधें आणि डमरू, शंख.

स्वर्णाकर्षण–श्रीनि (पृ. ८६): पिवळा; वाहन ?; चार हात व त्यांत रत्नजडित सुवर्णपात्र, शूल, चामर, तोमर; तीन डोळे, पिवळीं वस्त्रें.

क्षेत्रपाल–अचि (३।१।८५०): रूमप्रमाणें.**अपु** (५१।१८): शूलधारी. **मपु**(२६१।५१): हात ?; पण **शस्त्र**, कपाल: जटा, बाकडें तोंड, नागडा, पाठीमागें कुत्रा व कोल्हा. **रूपा** (४६ आ) व **रूम** (१८ आ): हात ?; पण त्यांत कर्तिका, डमरू, शूल, कपाल; नागवा, मुंडमाला, घंटामाला, डोक्यावर कपाल व डोळा. **शिरः सात्त्विक** (२५।१०२): पांढरा; [१] दोन हात व त्यांत शूल, कपाल. [२] चार हात व त्यांत वरद, शूल, कपाल किंवा घंटा, डमरू किंवा अभय. **राजस** (२५।१०६): तांबडा; सहा हात व त्यांत शूल, खड्ग, घंटा, खेटक, कपाल, नागपाश. **तामस** (२५।१०७): काळा; हात ?; पण त्यांत धनुष्य, बाण; बाकी राजसप्रमाणें; तांबडें उभ्या जटांचें मंडल, उग्र दृष्टि, अनेक नाग, तीन डोळे, नागवा.

चौसष्ट भैरव : यांचे आठ मुख्य वर्ग असून त्या प्रत्येकांत पुन्हां आठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आठ भैरव आहेत. त्यांचीं नांवें व लक्षणें अशीं'–(१) असितांग वर्गः असितांग, विशालाक्ष, मार्ताण्ड, मोदकप्रिय, स्वच्छन्द, विघ्नसंतुष्ट, खेचर, सचराचर. सोनेरी; त्रिशूल, खड्ग, डमरू, पाश, हीं आयुधें. (२) रुरु वर्गः रुरु, क्रोडदंष्ट्र, जटाधर, विश्वरूप, विरूपाक्ष, नानारूपधर, पर किंवा महाकाय, वज्रहस्त. पांढरा; अक्षमाला, अंकुश, वीणा, पुस्तक, हीं आयुधें. (३) चंड वर्गः चंड, प्रलयान्तक, भूमिकंप, नीलकंठ, विष्णु, कुलपालक, मुंडपाल, कामपाल. निळा; अग्नि, शक्ति, गदा, कुंड किंवा कुंत, हीं आयुधें. (४) क्रोध वर्गः क्रोध, पिंगलेक्षण, अभ्ररूप, धरापाल, कुटिल,मन्त्रनायक, रुद्र, पितामह. धूम्रवर्ण; खड्ग, खेटक, पट्टा, परशु, हीं आयुधें. (५) उन्मत्त वर्गः वटु–क–नायक, शंकर, भूत-वेताळ, त्रिणेत्र, त्रिपुरान्तक,वरद, पर्वतावास. शुभ्रवर्ण; कुंड किंवा कुंत, खेटक, परिघ, भिंडिपाल (गोफण), हीं आयुधें. (६) कापाल वर्गः कपाल, शशिभूषण, हस्तिचर्मांबरधर, योगीश, ब्रह्मराक्षस, सर्वज्ञ, सर्वदेवेश, सर्वभूतहृदिस्थित. सोनेरी; पांचव्या वर्गाप्रमाणें आयुधें. (७) भीषण वर्गः भीषण, भयहर, सर्वज्ञ, कालाग्नि, महारौद्र, दक्षिण, मुखर, अस्थिर; तांबडा ?; पांचव्या वर्गाप्रमाणें आयुधें. (८) संहार वर्गः सहार, अतिरिक्तांग, कालाग्नि, प्रियंकर, घोरनाद, विशालाक्ष, योगीश, दक्षसंस्थित. विद्युद्वर्ण; पांचव्या वर्गाप्रमाणें आयुधें.

मी या पुस्तकांत खिचिंग (ओडिसा) येथें मिळालेल्या दोन भैरव-मूर्तींचीं चित्रें दिलीं आहेत[२]. यांतील पहिली मूर्ती विश्वपद्मावर उभी असून तिच्या चार हातांपैकीं उजवा खालचा तुटला आहे आणि बाकींच्या तीन हातांत अनुक्रमें डमरू, अक्षमाला व त्रिशूल (शक्ति ?) या वस्तू आहेत. हिच्या डोक्यावर जटामुकुट, कानांत बाळ्या, कपाळावर डोळा, ओठांवर मिशा आहेत. हिच्या दोन्ही बाजूंस दोन गण आहेत. हिचा चेहराच ही मूर्ती भैरवाची असावी असें सांगतो. दुसरी मूर्ती बहुतेक तपशीलाच्या बाबतींत पहिली सारखीच असली तरी हिचे उजवा खालचा व डावा वरचा हे हात तुटले आहेत आणि बाकींच्या दोहोंत अनुक्रमें टंक, कपाल व त्रिशूल या वस्तू आहेत. हीस तिसरा डोळा व मिशा नाहींत आणि बाजूंस पुरुषगणां-

१ रुद्रयामलांतर्गत; श्रीनि पृ.८८. २मूचि५३,५४;आसइॲरि१९२९–३० प्रप, ४४ सी,एच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐवजीं सोपायन स्त्रीगण आहेत. ही मूर्ती पूर्वीच्या मूर्तीप्रमाणें उग्र दिसत नसली तरी ती भैरवाचीच आहे असें वाटतें. आर्किऑलाजीच्या रिपोर्टांत तीस रुद्र कां म्हटलें आहे तें समजत नाहीं. महाराष्ट्रांतील भैरवमूर्ती सामान्यतः नागडया, सर्पभूषणी, मुंडमालाधारी, अशा असून त्यांचे बाबतींत एक असा विशेष आढळतो कीं, भैरवाचे डाव्या बाजूच्या खालच्या हातांत केसांनीं धरलेलें मुंड व त्यांतून गळणारें रक्त चाटणारे एक किंवा अधिक कुत्रे दाखविलेले असतात. तें डोकें बहुधा ब्रह्मदेवाचें असावें अशी कल्पना होते व वेदांत रुद्राबरोबर कुत्रे असतात म्हणून सांगितलें असल्यानें तें रुद्ररूप आहे हेंही समजून येतें.

महाकाल

अपु (५०।३९) : हात?; पण त्यांत तरवार, मुंड, शूल, ढाल. **विध** (चचि २।१३०) : भैरवाप्रमाणें मुख; हातांतील सर्पानें देवीला भीति दाखविणारा; देवी समोर नसावी; ती पांढरी किंवा तांबडी नसावी; शेजारीं मातृगण. **श्रीनि** (पृ. ६३) : काळा; सिंहासन; काळा डगला; महाकालीनें आलिंगन दिलेला; ब्रह्मांडाच्या प्याल्यांत विश्वरस पिणारा; बरोबर महाकाली, काल व मृत्यु.

महेश्वर

विध (४४; चचि २।१२३) : पांढरा; बैल; दहा हात व त्यांत अक्षमाला, त्रिशूल, ढाल, दंड, कमल, महालुंग, धनुष्य, दर्पण, कमंडलु, ढाल; पांच तोंडें; त्यांतील चार सौम्य व दक्षिणेचें भयंकर; पांचवें वर; प्रत्येकीं तीन डोळे; पण उत्तरेकडील डोक्याला डोळे नाहींत?; कपालमाला, जटा, चंद्रखंड, वासुकीचें यज्ञोपवीत. **शिर** (२२।१८०) : पांढरा; पद्मासन; हात?; पण त्यांत कुठार, मृग, अभय, वरद; पांच तोंडें. तीन डोळे, उंच मुकुट, व्याघ्र चर्म, **सुभे** (इहिइ २ वी १९१) : पांढरा; वाहन?; दहा हात व त्यांत अभय, शूल, परशु, वज्र, खड्ग, ढाल, अंकुश, पाश, घंटा, वरद; ५ डोकीं, ४ तोंडें, १२ डोळे, ४ नाकें, ४ गळे, ८ कान, २ पाय; शुभ्र वस्त्र व शुभ्र यज्ञोपवीत; देवाच्या डाव्या बाजूला एकाच पीठावर बसलेली शक्तिः चार हात व त्यांत वरद, उत्पल, माळ, अभय; तीन डोळे, रेशमी वस्त्र, करंडमुकुट, अलंकार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोकाकच्या धबधब्याजवळ (बेळगांव) सांपडलेल्या महेशमूर्तीचीं तीन तोंडें व पांच हात स्पष्ट दिसत आहेत. हातांत अभयमुद्रेसह अक्षमाला, त्रिशूल, डमरू, एक फळ या वस्तू निश्चयानें आहेत. मूर्तीच्या अंगावर नाग व दागिने असून बैठकीवर नंदी काढला आहे. ही मूर्ती जास्त चांगल्या स्थितींत असती तर हिजविषयीं अधिक तपशील मिळून ही खरोखरच महेश्वरमूर्ती आहे कीं सदाशिवमूर्तीही होऊं शकेल याचा निश्चय करतां आला असता. सध्यां त्यास महेश्वरच म्हणूं या[1]. बिकानेर येथील शिवमूर्ती बैलावर मांडी घालून बसली असून तिचीं तीन तोंडें स्पष्ट दिसत आहेत. या प्रत्येकास जटामुकुट असून त्यांवर गंगेचें ऊर्ध्वांग तरी आहे किंवा शंकराचें आणखी एक मुख तरी आहे. त्रिमुखांपैकीं मधल्यास कपाळावर तिसरा डोळा आहे. शिवाला दोनच हात दाखविले असून ते अनुक्रमें छातीपाशीं नेलेला (ध्यानमुद्रा ?) व कमंडलुधारी आहेत. शिवाच्या गळ्यांत कंठा, कानांत बाळ्या, मनगटावर कटक व कमरेस मेखला आहे. डाव्या बाजूस पार्वती पाय खालीं सोडून व झगा घालून बसली त्याहे. तिच्या डोक्यास करंडमुकुट, कानांत बाळ्या, गळ्यांत कंठा व माळ, दंडांत बाकी, मनगटावर कटक व कंकण हे दागिने दिसत असून हातांत अनुक्रमें उत्पल व आरसा या वस्तू असाव्या. शिवास दहा हात नसले तरी तीन किंवा चार तोंडावरून मी यास महेश्वरच म्हणतों[2]. मध्य आशियांत एका महेश्वरमूर्तीचें चित्र सापडलें आहे. मात्र हें स्वतंत्रतेनें मिळालें नसून एका बौद्ध अवलोकितेश्वराच्या चित्राच्या संगतींत आहे. यांतील महेश्वर एका ताणून पडलेल्या बांडग्या रंगाच्या बैलावर मांडी घालून बसला असून त्यास तीन मस्तकें व सहा हात आहेत. त्याचे अंगावर बोधिसत्वाचा पोशाख असून मुद्रा परोपकारी आहे. त्याच्या गुडघ्यांवर एक लहान गुडघे टेकलेली मूर्ती असून तिच्या पसरलेल्या हातांत एक तांबडा वाटोळा पदार्थ आहे. महेश्वराच्या डाव्या वरच्या हातांत ज्वालायुक्त त्रिशूल असून खालचा हात प्रसृत पण मोकळा आहे. उजव्या वरच्या हातांत एक वाटोळा पदार्थ व खालच्या हातांत शंख असून मधला

१ चाआ प्रप १३६; मूचि ४०. २ आसइअरि १९१७–१८ प्रप १३।२; मूचि ४१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हात मांडीवर ठेवला आहे[1]. बँकोकच्या मुसी नेशनलमधील एक महेश-मूर्ति उभी व पांच तोंडांचीं असून तीन दिशास तीन, चौथें पाठीमुळें गुप्त व पांचवें तोंड तिहींच्या वर आहे. मूर्तीस असलेल्या दहा हातांपैकीं दोन्ही बाजूंचे अगदीं वरचे दोन अभयमुद्रेचे असून बाकीच्या आंठ हातांत निरनिराळ्या वस्तू आहेत. गळ्यांत जानवें व मामूली दागिने आहेत[2]. जावामधील महेशमूर्ती चौकोनी बैठकीवर असलेल्या कमलावर वज्रासन घालून बसली आहे. हिला तीन तोंडें असलीं तरी मधलेंच विच्छिन्न आहे. प्रत्येक मस्तकास मुकूट आहे. मूर्तीच्या चार हातांपैकीं पहिला हात उजव्या मांडीवर उताणा ठेवला असून त्यांत कांहीं वस्तू आहे. उरलेल्या तीन हातांत अनुक्रमें अक्षमाला, चामर व कमंडलु या वस्तू आहेत. अंगावर हार, केयूर, उपवीत, मणिबंध, मेखला इत्यादी अलंकार भरपूर आहेत[3].

रुद्र

रुद्रांची संख्या अकरा अशी सामान्य समजूत आहे व अनेक ठिकाणीं ते तसे आलेलेही आहेत. उ. विश्वकर्मशास्त्रांत त्यांचीं नांवें अज, एकपाद, अहिर्बुध्न, विरूपाक्ष, रेवत, हर, बहुरूप, त्र्यंबक, सुरेश्वर, जयन्त, अपराजित, अशीं आलीं आहेत[4]. क्वचित् हे बाराही सांगितलेले आढळतात. उ. रूपमंडनांत सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान, मृत्युंजय, किरणाक्ष, श्रीकंठ, अहिर्बुध्न, विरूपाक्ष, बहुरूप, त्र्यंबक अशीं बारा रुद्रनामें आलीं आहेत[5]. शैवागमांत शंभु, पिनाकी, गिरीश, स्थाणु, भर्ग, सदाशिव, शिव, हर, शर्व, कपाली, भव, अशीं अकरा भिन्न नांवें दिलीं आहेत[6]. अशा तऱ्हेनें केवळ नामावलीच तपासल्या तर रुद्र अकरा किंवा बारा असतां त्यांचीं नावें मात्र सुमारें पन्नास तरी भरतील. शतरुद्रीयांतून यथारुचि अकरा नांवें घेऊन अकरा किंवा बारा रुद्रांची कल्पना केलेली दिसते. भव, शर्व, ईशान, पशुपति, उग्र, रुद्र, भीम, महादेव, अशा रुद्राच्या अष्ट-

---

१ सेरिंदिया पृ. १०७८ ch lvi ००१९; डावा मधला हातही मला वाटतें मांडीवर असावा. २ आर्स एसियातिका व्हॉ. १२ प्रप ३८. ३ जावा खंड १७ अंक १ व २ पृ. ७२ बी २ चि. २१. ४ चचि २।१२९. ५ रूम ९ अ; रूपा २३ आ. ६ श्रीनि पृ. ६७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्ति कित्येक ग्रंथांत सांगितल्या आहेत[1]. ही रुद्रांची एकादश रुद्रांपूर्वांची आवृत्ति असावीसें दिसतें. प्रजापतीनें उपेचा मुलगा रुद्र यास आठ नांवें दिलीं तीं किंवा देवांनीं सात रुद्रदेवतांना दिग्भाग रक्षिण्याचें काम दिलें तीं रुद्रनामें वरील आठ नांवांशीं अगदीं जुळतीं आहेत. याच आठ नांवांत थोडा फरक करून व त्यांत अज, एकपाद, अहिर्बुध्न या वैदिक व रुद्ररूपांशीं सदृश अर्थात् भयप्रद देवता मिळवून एकादश रुद्र बनविले गेले आहेत असें म्हणाययास हरकत नाहीं.

भवादि अष्टमूर्तींचीं ग्रंथिक वर्णनें देणें फार सोपें आहे. कारण त्यांच्या रूपांत फार थोडा फरक आहे. पूर्वकारणागमांत यांचे रंग गोरा, सावळा, तांबडा, काळा, पांढरा, केशरी, तांबूस व निळा असे असावे, त्यांचीं वस्त्रें तांबडीं असावीं, त्यांस तीन डोळे, जटामुकुट, चार हात व त्यांत अभय, टंक, मृग व वर या मुद्रा व वस्तु दाखवाव्या म्हणून सांगितलें आहे;[2] तर विष्णुधर्मोत्तरांत त्यांस जटामुकुट व त्यावर चंद्रकला, तीन डोळे, चार हात व त्यांत वर (अभय ?), खट्वांग, त्रिशूल, व वर या वस्तू व मुद्रा दाखवाव्या असा तपशील दिला आहे[3]. ब्रह्मांडपुराणांत हे सर्व जटाधारी, कातडें परिधान करणारे आणि खट्वांग व शूल धारण केलेले असावे म्हणून नमूद आहे[4].

रुद्रांचीं सामान्य लक्षणें अशीं— **अभे** (४८ । ६२) : पांढरा; पद्मपीठावर उभा; चार हात व त्यांत अभय, परशु, मृग, वरद; त्रिनेत्र, जटामुकुट, पांढरीं किंवा काळीं वस्त्रें. **विशाः** (चचि १ । ३३०) :तांबडा; दोन हात व त्यांत बाण, धनुष्य; तीन डोळे, जटाधारी, चंद्रकला. **श्रीनि** (पृ. ६९, पपु): अनुक्रमानें तांबडा, हिरवा, निळा, पांढरा, सांवळा, धुरकट, पिवळा, काळा, पिंगट, तांबूस, पांढरा चार हात व त्यांत वर, परशु, मृग, अभय; त्रिनेत्र, चंद्रकला, जटामंडल, नीलकंठ, व्याघ्रचर्मपरिधान.

लकुलीश

वायुपुराणाच्या २३ व्या अध्यायांत भविष्यें सांगतांना लकुलीश

---

१ चचि २।१२४; इहिइ २ बी २०१; श्रीनि पृ. ६७. २ कित्ता. ३ कित्ता. ४ चचि १ । ७४७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांवाचा शिवाचा २८ वा अवतार कायावरोहण किंवा कारोहण (कारवान–डभोई–वडोदें) येथें होणार म्हणून सांगितलें आहे. पुराणांचें पुराणत्व सिद्ध व्हावें म्हणून, झालेल्या गोष्टीच त्यांत भविष्यरूपानें सांगितलेल्या असतात. अर्थात् वायुपुराण बनलें तेव्हां हा लकुलीश होऊन गेला असला पाहिजे. वायुपुराणाचा काळ इ. स. चौथ्या शतकाचा आरंभ हा असल्यामुळें त्यापूर्वी लकुलीशाचा अवतार झाला असावा. यानें शैवमताचा उद्धार केला अशी समजूत आहे. वायुपुराणांत याचे हातांत लकुट असावा येवढेंच सांगितलें आहे. विश्वकर्मावतारवास्तुशास्त्र या ग्रंथांत हा पद्मासनी, ऊर्ध्वलिंग, दोन हातांत अनुक्रमें महाळुंग व दंड घेतलेला असावा म्हणून सांगितलें आहे. याच्या मूर्ती पुष्कळ ठिकाणीं पहावयास मिळतात. डॉ. डी. आर. भांडारकर यांनीं एका आर्किऑलॉजी खात्याच्या रिपोर्टांत लकुलीशाचीं कित्येक उदाहरणें नमूद केलीं आहेत. त्यांपैकीं एकांत लकुलीश पद्मासन घालून बसला असून त्यानें उजव्या हातांत महाळुंग व डाव्या हातांत आखूड सोटा घेतला आहे[1]. बदामी (विजापूर) येथें एक भग्न लकुलीश आहे. त्यानें डाव्या पायाची मांडी घातली असून उजवा पाय तळपायावर उभा केला आहे. त्यानें याच पायावर उजव्या हातांत कांही पदार्थ घेऊन त्याची मूठ ठेविली आहे व डावा हात मोडला आहे[2]. एशियाटिक मायथॉलॉजीमध्यें एका शिवाचें वर्णन आलें आहे. त्यांत डाव्या पायाची मांडी घातली असून उजवा पाय गुडघ्यांत मोडून तळपायावर उभा केलेला आहे. त्यानें उजवा हात उजव्या गुडघ्यावर ठेवला असून डाव्या हातांत एक आखूड सोटा घेतला आहे.[3] तारेन म्यूझियममधील शिवमूर्तीची बसण्याची पद्धत वरच्या मूर्तीप्रमाणेंच आहे. पण डावा हात डाव्या मांडीवर ठेवला असून त्यांत आखूड सोटा घेतला आहे असें वाटतें. डोक्यास करंडमुकुट? व कानांत कर्णफुलें आहेत. मूर्तीच्या खालची बैठक चौकोनी असून तिच्या उजव्या दर्शनी बाजूवर कीर्तिमुख कोरलें आहे[5].

१ पृ. १८६ चि. ५; रिपोर्टाचें वर्ष मला मिळालें नाहीं. मीं या लेखाच्या सुटया प्रतीचा उपयोग केला आहे. येथील सर्व माहितीही त्यांच्याच एका पूर्वीच्या लेखावरून घेतली आहे. २ चाआ प्रप ३३।५. २ पृ. २२५ चि. ३३. २ आर्स एसियातिका व्हॉ. ४ प्रप २८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५० काशीपूर–बकरजंग तांडव शिव

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५२ तिरुपनन्थल-तंजावर

ऊर्ध्वतांडव शिव



५१ मद्रास तांडव शिव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वीरभद्र

एकदां यज्ञमंडपांत सर्व ऋषि जमले होते. दक्षानें तेथें प्रवेश करतांच ब्रह्मा व महादेव यांखेरीज इतर सर्व उठून उभे राहिले. दक्षानें ब्रह्मदेवाला वंदन केलें व त्याच्या अनुमतीवरून तो बसला. परंतु महादेवाचे ओंगळ आचार लक्षांत घेतां त्यानें तेथें बसावें हें दक्षास न आवडून त्यानें महादेवाची निंदा व यज्ञांत कधींहि त्याला हवि मिळूं नये अशी व्यवस्था केली. तेव्हां महादेव मंडपांतून निघून गेला. कांहीं वर्षांनीं दक्षानें यज्ञ केला. तिकडे जाण्याला सर्व देव आपल्या पत्न्यांसह निघालेले पाहून सतीनेंहि महादेवास तिकडे चलण्याबद्दल आग्रह केला. महादेवानें तिला पूर्वी घडलेल्या हकीकतीचें स्मरण दिलें. तरीही ती गेली. तेथें दक्षाकडून अपमान झाल्यामुळें तिनें आत्महत्या केली. हें कळतांच शिवानें आपली एक जटा तोडून तींतून एक भयंकर आकृति (वीरभद्र) निर्माण केली व तिजकडून यज्ञविध्वंस करविला. मग दक्ष महादेवास शरण आला. अशा प्रकारची महाभारत व भागवत यांमध्यें कथा आहे. या कथेमुळें शंकर मूलतः वेदबाह्य व यज्ञविरोधी होता हें कळून येतें त्याप्रमाणेंच वीरशैव मतांत वीरभद्रास महत्त्व कसें आलें याचाही आपणास पत्ता लागतो. वीरशैव पंथ अहिंदु नसला तरी अवैदिक व चातुर्वर्ण्यविरोधी आहे याबद्दल दुमत होणार नाहीं. त्या पंथाच्या या प्रवृत्तीमुळेंच तदनुयायांत वीरभद्रास उच्च स्थान मिळालें. वीरशैव समाजांत अनेक लोकांचें वीरभद्र नांव असल्याचें आढळून येईल. पूर्वी हें नांव हल्लींहूनही जास्त प्रचारांत असावें. पण बसवास श्रेष्ठत्व आल्यामुळें तें मागें पडलें असा माझा कयास आहे. असो. याचीं ग्रंथिक वर्णनें शिवपरिवारांत येतात तशीं सप्तमातृकांतहि येतात. येथें दोन्ही ठिकाणचीं वर्णनें एकत्र करून दिलीं आहेत.

अचि (३।१।८३७) : बैल; हात ?; पण त्यांत वीणा, त्रिशूल. अपु (५२।१४): बैल; चार हात; पण त्यांत ?. अभे (४६।६८): बैल; चार हात व त्यांत अभय, शूल, गदा, वर; त्रिनेत्र. उका (इहिइ २ बी ९६): तांबडा; वाहन ?; चार हात; पण त्यांत खड्ग, बाण, भिंदिपाल, धनुष्य, खेटक, कपाल; त्रिनेत्र, नीलकंठ, ज्वालाकेश, दाढा, घंटामाला, शिरोमाला,

मू. ९.....

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागयज्ञोपवीत, वृश्चिकाभरण, पायांत पादुका व नूपुरें. **मपु** (२६१।३९): अचिप्रमाणें. **रूम**[1] (१८ आ): अचिप्रमाणें. **विध** (चचि २।१३०): बैल; चार हात व त्यांत त्रिशूल, वीणा, हातांवर (कमरेवर), तर्जनीमुद्रा; त्रिनेत्र. **शिर** (२५।८४, ८५): [१] पांढरा; वेताळावर बसलेला; हात ?; पण त्यांत अभय, खड्ग, शूल, परशु, डमरू, खेट, कपाल, वरद; त्रिनेत्र, उग्र, पिंगट जटा, व्याघ्रांबर, चंद्रकला, नाग, भोवतीं गण. [२] पांढरा; पांढऱ्या कमळावर; बालभाव, व्याघ्रनखादि चिन्हें; दिगंबर. [३] बैल; हात ?; पण त्यांत वर, हरिण, टंक, अभय; त्रिनेत्र, नागाचें जानवें, पांढरें कातडें व वस्त्र. **श्रीनि** (पृ. ७३): चार हात व त्यांत खड्ग, बाण, धनुष्य, गदा; त्रिनेत्र, जटामुकुट, भयंकर दाढा, रुंडमाला, पादुकांवर उभा, शेजारीं भद्रकाली.

वृषवाहन

शिवाच्या या रूपांत त्याचें वाहन नंदी बाला फार महत्त्व असतें. या प्रकारांत शिव बहुधा बैलास टेकून उभा असतो किंवा क्वचित् बैलावर बसलेला असतो. पार्वती विकल्पानें दाखविलेली असते. कै. गोपिनाथराव यांनीं या प्रकाराचीं सहा उदाहरणें दिलीं आहेत. पैकीं प्रप १०९ वर असलेल्या, चित्रांत वृषभ नसला तरी डाव्या खालच्या हाताची ठेवण अशी आहे कीं तो बैलावर ठेवण्याकरतांच तसा केला आहे हें स्पष्ट ठरतें[2].

शरभ

विष्णूनें नृसिंहरूप धारण करून हिरण्यकशिपूस मारलें; पण खून चढल्यामुळें त्याची उग्रता कमी होईना; तेव्हां सर्व सृष्टि शंकरास शरण गेली; शंकरानें दोन तोंडें, आठ पाय, दोन पंख व लांब शेपूट असलेल्या शरभाचें रूप धारण करून नृसिंहास फाडलें आणि त्याचें कातडें पांघरलें व डोकें मुकुटावर धारण केलें अशी एक कथा आहे. मला ही कथा विष्णूपेक्षां शिव श्रेष्ठ असें दाखविण्याकरितां रचली गेली असावी असें वाटतें. शरभमूर्तींचें एक उदाहरण कै. गोपिनाथराव यांनीं आपल्या पुस्तकांत दिलें

१ मजजवळ असलेल्या पोथींत वीणा, त्रिशूल, बाण अशीं तीन आयुधें दिलीं आहेत. २ इहिइ खंड २ भाग १ प्रप १०८–११२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्यांत त्यास तीन पाय, सिंहाचें मुख व शरीर, शेपटी आणि पाश, परशु, मृग व अग्नि या वस्तू धारण करणारे चार हात दाखविले आहेत. शरभानें नृसिंहास दाबून धरलें असून नृसिंह आपल्या हातांनीं सुटण्याची खटपट करीत आहे[1]. महाराष्ट्रांत अशा प्रकारच्या मूर्ती आढळत नसल्या तरी कित्येक किल्ल्यांच्या दरवाजांवर चार किंवा त्यांहून जास्त, तीक्ष्ण नख्या असलेल्या पायांचा, विक्राळ तोंडाचा, दोन पंखांचा किंवा पंखविहीन आणि लांब शेपटीचा प्राणी काढलेला असतो तो शरभच असावा असें वाटतें.

सदाशिव व महासदाशिव

सदाशिव-उका (इहिइ २ बी १८७): पांढरा; बद्धपद्मासन; दहा हात व त्यांत अभय, प्रसाद, शक्ति, त्रिशूल, खट्वांग, भुजंग, अक्षमाला, डमरू, नीलकमल, ईडनिंबू, पांच तोंडें, प्रत्येक तोंडाला तीन डोळे, पिंगट जटाजूट, शशिकला, मत्तोन्मनी मुद्रा. **रूपा** (२७ अ): रंग?; पद्मासन; दहा हात व त्यांत अभय, शक्ति, शूल, खट्वांग, भुजंग, अक्षमाला, डमरु, मातुलुंग, दोन हातांनीं योगासन; पांच तोंडें, तीन डोळे. **बापु** (इइ ६२,) : रंग?; बैल; हात?; पण त्यांत कपाल, शूल, खट्वांग; पांच तोंडें, प्रत्येक तोंडाला तीन डोळे, चंद्रकला.

महासदाशिव-मासा (इहिइ २ बी १८८): पांढरा; वाहन?; पन्नास हात; पण त्यांत वरद, अभय; २५ तोंडें, ७५ डोळे, जटा, कुंडलें, भुजंगभूषणें.

राजशाही म्यूझियममधील सदाशिवाचीं तीन तोंडें दिसत असून दोन लुप्त आहेत. त्यास असलेल्या दहा हातांत वर, त्रिशूळ, खट्वांग, दंड, फळ, कमळ, डमरु, माला, नाग, परळ, या मुद्रा व वस्तू असून दोन्हीकडे गंगा व यमुना दासींच्या नात्यानें उभ्या आहेत. बैठकीवर नंदी दाखविला असल्यानें मूर्ती शिवप्रकाराची आहे याविषयीं शंका रहात नाही[2]. या म्यूझियममधील दुसरी एक व बंगीय साहित्य परिषदेच्या म्यूझियममधील एक अशा दोन्ही मूर्ती अशाच पण बाजूस गंगायमुनाऐवजीं पुरुष व्यक्ती असलेल्या आहेत[3].

---

१ इहिइ खंड २ पृ. १७४. २ ईइस्कूमिस्क पृ. १०९-१० प्रप ५४ जी; मूचि ४२. ३ सदर प्रप ५४ ए, ई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीनगर प्रदर्शनगृहांत एक सदाशिवाची मूर्ती आहे. ही उभी असून हिला तीन तोंडें व चार हात होते. पण हिच्या पायांचा खालचा भाग व तीन हात तुटून गेले आहेत. हिच्या सर्व मस्तकांवर जटामुकुट असून शाबूत डाव्या हातांत त्रिशूलाचा दांडा आहे. कान मात्र दोनच आहेत. शंकर एक धोतर नेसले असून अंगावर उपरणें आहे. डाव्या हातांवर दिसणाऱ्या मालेशिवाय कोणताही अलंकार अंगावर नाहीं[1]. याच प्रदर्शनगृहांत असेंच एक तीन मस्तकीं शंकराचें डोकें आहे. यांतही प्रत्येक डोक्यास जटामुकुट असून कान मात्र दोनच आहेत[2].

हरिहर

हरिहर रूप कसें तयार झालें याविषयीं विशिष्ट कथा नाहींत. परंतु ब्रह्मेशान-जनार्दन किंवा ब्रह्मेशानजनार्दनार्क हीं जशीं तीन किंवा चार देवतांचीं एकीकरणें तसे विष्णु व शिव या दोन देवांचें एकीकरण म्हणजेच हरिहर होय. अर्थात् इतराच्या मानानें हें बरेंच जुनें असलें पाहिजे. शिव व विष्णू यांचे दोन निरनिराळे पंथ झाल्यावर त्यांमध्यें पुष्कळ वेळां भांडणें उत्पन्न झालीं असतील. त्यांवर कायमची तोड म्हणून या मूर्तीची युक्ति काढली गेली असावी. हिचीं ग्रंथिक वर्णनें फार जुनीं नसलीं तरी प्रत्यक्ष शिल्पें सुमारें दोन हजार वर्षांपासूनचीं सांपडत असल्यानें असें वाटतें कीं, हें एकीकरण निदान दोन हजार वर्षांपूर्वीं झालें असलें पाहिजे. अर्धनारीश्वरा-प्रमाणें हाही जोड देव असल्यामुळें याचा उजवा अर्धा भाग शिवाचा तर डावा अर्धा भाग विष्णूचा असतो. अर्थात् त्या त्या भागावर शिव व विष्णू यांचीं लक्षणें दिसतात. असो. यांचीं ग्रंथिक वर्णनें अशीं—

अचि (३।१।७८५): शंकर—पांढरा; हात ?; पण त्यांत वरद, शूल; शशिकला, जटा, हस्तिचर्म, पायावर नाग. विष्णू—सावळा; हात ?; पण त्यांत शंख, चक्र, गदा; रत्नकिरीट, मकरकुंडल, पीतवस्त्र. **अपु** (४९।२५): रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत शूल, तलवार किंवा भाला किंवा डमरू, गदा, चक्र; गौरी व लक्ष्मी यांनीं युक्त; शंकर व विष्णु यांच्या लक्षणांनीं युक्त. **अभे** (७३): शंकर—तांबूस; हात ?; पण त्यांत अभय, परशु;

१ श्रीनगर—प्रतापसिंघ म्यूझियम पृ. ५३ Ac ८. २ कित्ता पृ. ५६ Ac ९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



५३ खिचिंग-ओडिसा भैरव

५४ खिचिंग-ओडिसा रुद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सूर्य

भुमरा–मध्यभारत

५५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जटा, उग्र दृष्टी. विष्णू–सावळा; हात ?; पण त्यांत शंख, कटक;मुकुट, शीतल दृष्टी. **उका** (इहिइ २ बी १६८): शिव–नेहमींप्रमाणें; विष्णू–दोन हात व त्यांत शंख, कटक; पीतवस्त्र. **पूका** (इहिइ २ बी १७१): शंकर–चद्रंशेखराप्रमाणें. विष्णू—हातांत शंख; पीतांबर, मुकूट, केयूर, कटक, मकर-कुंडल. **मपु** (२६०।२१), **रूपा** (२८ अ): शिव–रंग ?; हात ?; पण त्यांत वरद, त्रिशूल; जटा, इंदुकला, पायांत मणिरत्नें व नाग. विष्णू–काळा; दोन हात व त्यांत चक्र किंवा गदा, शंख; पीतवस्त्र, अलंकारयुक्त. [२] (२७ आ): शंकर–हात ?; पण त्यांत अक्षमाला, त्रिशूल; जटाभार, कुंडल. कृष्ण–हात ?; पण त्यांत चक्र, शंख. मुकूट, मकरकुंडल.[३](२९ अ) **रूम** (१० आ): विधप्रमाणें. **विध** (चचि २।१२६): शंकर–पांढरा; हातांत वर, त्रिशूल; मागें वृषभ. विष्णू–निळा; हातांत चक्र, कमल; मागें गरूड. **शिर** [१] (२५।७९): शंकर–पांढरा; हातांत त्रिशूल; कपाल; तीन डोळे, जटामुकुट, शशिकला, वाघाचें किंवा तरसाचें कातडें. विष्णू–सावळा; हातांत शंख, चक्र; पीतांबर. [२] (२२।१२५): सम पाय; हात ?; पण त्यांत अभय, परशु, शंख, कटक; हर–तांबूस; उग्र नेत्र, कपाळावर डोळा. हरि–सावळा; सौम्य. **सुभे** (इहिइ २ बी १६९): हर–जटा, व्याघ्रचर्म. विष्णु–सावळा; पीतवस्त्र, किरीट.

बदामी येथें हरिहराच्या दोन उभ्या मूर्ती आहेत. दोहोंच्याही चार हातांपैकीं वरच्या दोन हातांत अनुक्रमें नागाचा विळखा असलेला परशु व शंख या वस्तू आहेत. खालचा डावा हात मेखलेच्या पुढच्या पदरावर व कमरेवर ठेवला आहे. खालच्या उजव्या हातांत कोणती वस्तू आहे तें समजत नाहीं. मूर्तीच्या अंगावर चंद्रांकित जटा व किरीट असा जोड मुकूट, सर्प व मकर कुंडलें, उजव्या हातावर पडलेलें जानवें, जानवेवजा पण जवळजवळ घोट्याइतका लांब हार, मेखला व तिच्याखालीं दोन्हीकडे सोगे असलेलें वस्त्र, अंगद हे दागिने आहेत. दोहोंमध्यें फरकही पुष्कळच आहे. एकीच्या गळ्यांत एक कंठा व एक कडें, तर दुसरीच्या तीन कंठे व दोन कडीं आहेत. दुसरीच्या पोटावर उदरपट्ट व मेखलेंत नाग आहे. दुसरीचे दागिने कलाकुसरीचे, तर पहिलीचे अगदीं साधे आहेत. पहिलीचें तेजोवलय अगदीं साधें व वाटोळें तर दुसरीचें चुण्यांचें व लांबोडें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. अंगसौष्ठवांत पहिलीच जास्त चांगली आहे. दुसरी मूर्ती एकटीच आहे; तर पहिलीच्या उजव्याडाव्या अंगांस प्रथम त्रिशूलधारी नंदिकेश्वर व गरूड असून त्यांच्या पलीकडे उत्पल व कमलधारी स्त्रिया अर्थात् बहुधा पार्वती व लक्ष्मी उभ्या आहेत. पहिलीचा साधेपणा व सौष्ठव लक्षांत घेतां ती दुसऱ्या मूर्तीहून जुनी वाटते[1]. बहारमधील हरिहर मूर्तीच्या डोक्यास अर्धा जटा व किरीट मुकुट असून चार हातांत अनुक्रमें कपाल, त्रिशूल, शंख, चक्र, या वस्तू आहेत. हिच्या उजव्या अंगास एक पुरूष (स्त्री ? पार्वती?) आणि डाव्या बाजूस एक स्त्री (लक्ष्मी) व एक अपरिचित व्यक्ति असून शिवाय दोन्ही अंगांस अनुक्रमें बुद्ध व सूर्य दाखविले आहेत. बुद्धाचा एक हात अभयमुद्रेचा व दुसरा खालीं सोडलेला आहे. सूर्याच्या हातांत विकसित कमलें, पायांशीं अरुण व बैठकीवर अश्वमुखें आहेत. येथें बुद्ध व सूर्य यांना गौणस्थान असलें तरी सूर्यामुळें मूर्ती कोरविणाराचे मनांत बुद्धाविषयींच विशेष अनादर होता असें म्हणवत नाहीं[2].

---

४ सूर्य आणि ग्रह

प्रस्ताव

वैदिक धर्मीयांची शिव व विष्णु यानंतरची महत्त्वाची देवता सूर्य ही होय. हिलाच आदित्य वगैरे इतर नांवें आहेत. हिचे मुख्यतः दोन वर्ग होतात. पैकीं एका वर्गांत बारा आदित्य येतात व दुसऱ्या वर्गांत सूर्यादि नवग्रह पडतात. नवग्रहांना वैदिक वाङ्मयांत स्थान नसलें तरी आदित्यांची गोष्ट तशी नाहीं. द्वादशादित्य ही कल्पना वैदिक आहे येवढेंच नव्हे तर त्यांपैकीं कित्येकांना स्वतंत्र सूक्तेंही आहेत. प्रथम प्रथम प्रत्येक आदित्यास पृथक्त्व होतें. पण त्यांच्या साधर्म्यावरून त्यांचा एक गट करण्यांत आला. तेच हे बारा आदित्य. ही कल्पना कशी उत्क्रांत होत गेली याचें येथें थोडें दिग्दर्शन करतों.

---

१ मेआसइ नं. २५ पृ. ५ प्रप ३ बी, पृ. ३७ प्रप १८ बी. २ आसइऑरि १९३०–३४ प्रप १२७ डी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आदित्यः वेदांत स्वतंत्र सूक्तांनीं आदित्यांची स्तुति केली आहे. आदित्यांची संख्या व त्यांचीं नांवें हीं अनिश्चित आहेत. ऋग्वेदाच्या एका सूक्तांत त्यांची संख्या सहा व त्यांचीं नांवें मित्र, अर्यमन्, भग, वरुण, दक्ष व अंश अशीं सांगितलीं आहेत. यांतच सहा आदित्यांबरोबर कांहीं ठिकाणीं सूर्य हा सातवा आदित्य सांगितला आहे. भग, वरुण, मित्र व अर्यमन् या चार आदित्यांबरोबर सवितृ या पांचव्या आदित्याचीही एके ठिकाणीं गणना केली आहे. कांहीं ठिकाणीं सात व आठ अशी संख्या सांगितली आहे. अदितीनें देवांना प्रथम सात आदित्य दिले व आठवा मार्तण्ड मागाहून दिला असें विधान आहे. या सात आदित्यांचीं नावें तेथें सांगितलीं नाहींत. अथर्ववेदांत अदितीला आठ पुत्र असल्याचें म्हटलें आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत त्यांचीं नांवें मित्र, वरुण, अर्यमन्, अंश, भग, धातृ, इंद्र व विवस्वत् अशीं सांगितलीं आहेत. शतपथ ब्राह्मणांत त्यांची संख्या बारा सांगितली आहे आणि बारा महिन्यांशीं त्यांचें सादृश्य दाखविलें आहे. वेदोत्तर वाङ्मयांत त्यांची संख्या बारा ही निश्चित आहे व ते बारा महिन्यांचे प्रतिनिधि आहेत. विष्णु हा त्यांजपैकीं एक असून तो सर्वश्रेष्ठ आहे. **अर्यमन्ः** या आदित्याला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असें जवळजवळ नाहींच. अर्यमन् शब्दाचा अर्थ मित्र असा आहे. अर्यमन्ची कल्पना मित्र या आदित्याशीं फार जवळची आहे. अर्यमन् अवेस्त्यांतही आला आहे. **भगः** हा संपत्ति देतो असें वर्णन आहे. **अंशः** भग व अंश यांचे गुणविशेष एकच आहेत. **दक्षः** चलाख, शहाणा, असा दक्ष शब्दाचा अर्थ आहे. शतपथ ब्राह्मणांत दक्ष हा सृष्ट्युत्पादक प्रजापति असल्याचें सांगितलें आहे. **सूर्यः** याच्या सूक्तांमध्यें कांहीं ठिकाणीं सूर्य या शब्दानें प्रत्यक्ष त्याचा तेजोगोल अभिप्रेत असतो तर कांहीं ठिकाणीं देवतास्वरूप अभिप्रेत असतें. सूर्याचा एक रथ आहे आणि तो एका अगर असंख्य घोडयांकडून ओढला जातो. सूर्याचे घोडे सात आहेत असेंही म्हटलें आहे. त्याच्या किरणांवरून त्याच्या घोडयांची कल्पना केली आहे. **सवितृः** केवळ वेदांत आढळून येणारी ही देवता वेदोत्तर वाङ्मयांत लुप्त झाली आहे. सवितृ हा शब्द सू–प्रेरणा करणें या धातूपासून निर्माण झाला आहे. या देवतेच्या सर्व अंगोपांगांना हिरण्य हें विशेषण लावलेलें आढळतें. सवित्याचे पं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोखंडाचे आहेत, त्याचे केस पिवळे आहेत, तो एक लहानसें वस्त्र धारण करतो, त्याचा रथ सुवर्णमय आहे व तो दोन किंवा अधिक, सफेत पायांच्या, पिंगट वर्णाच्या, घोड्यांकडून ओढला जातो. सवितृ ही सूर्य-देवता आहे; तथापि तिचें स्वरूप भाववाचक आहे. सूर्याच्या दैवी शक्तीचें सविता हें मानवीकरण आहे. ब्राह्मणांच्या संध्येंतील प्रसिद्ध गायत्रीमंत्र या सवितृ देवतेला उद्देशूनच आहे. **पूषन्**: याला ऋग्वेदांत बरेंच महत्त्व आहे. परंतु इतर वेदांत आणि वेदोत्तर वाङ्मयांत याचें महत्त्व किंबहुना अस्तित्व क्रमाक्रमानें नाहींसें होत गेलें. पूषन् शब्द पुष्–पोषण करणें या धातूपासून निष्पन्न झाला आहे. पूषन्च्या रथाला घोड्यांऐवजीं बकरे जोडलेले असल्यामुळें अजाश्व असें त्याचें विशेषण नेहमीं येतें. मानव स्वरूपांत त्याचें वर्णन फारसें स्पष्टपणें केलेलें नाहीं. त्याचा पाय आणि उजवा हात, केसांची वेणी, हातांतील सोन्याचा भाला व अंकुश आणि रथ यांचा उल्लेख आला असून तो उत्तम सारथी असल्याचेंही म्हटलें आहे. पूषन् हा मार्गांचा स्वामी आहे. तो सर्व मार्ग जाणतो. त्यामुळें मार्गांतील सर्व प्रकारचीं संकटें दूर करण्याकरितां आणि निर्धास्तपणें घरीं पोंचण्याकरितां पूषन्ची प्रार्थना केली आहे. तो पशूंचें पालन करतो व वाट चुकलेल्या पशूंना घरीं आणून पोंचवितो. पूषन् हें सूर्याचेंच स्वरूप आहे. यास्कानें निरुक्तांत पूषन् हा आदित्य असल्याचें म्हटलें आहे. वेदोत्तर वाङ्मयांतही पूषन् हें सूर्याचेंच नांव आहे. **मित्रः** ही सूर्यदेवता आहे. या शब्दाची व्युत्पत्ति अनिश्चित आहे. पण मित्र शब्दाचा स्नेही असा अर्थ ऋग्वेदांतही आहे. मित्रदेवता दयाशील असल्याबद्दल ऋग्वेदांत वर्णन आहे. अवेस्त्यांत मित्र (मिथ्र) ही देवता विश्वासाचें रक्षण करणारी असल्याचें सांगितलें आहे. यावरून निसर्गांतील एक कल्याणकारक शक्ति या दृष्टीनें स्नेहवाचक मित्र असा शब्द सूर्यदेवतेला योजून मित्र ही देवता निर्माण झाली असावी. **विवस्वत्**: ऋग्वेदांत याजकरितां स्वतंत्र सूक्त नाहीं. इतर देवतांच्या सूक्तांतून याचा उल्लेख आला आहे. तो मानवजातीचा पूर्वज आणि मनुष्यां-चाही पिता असल्याचें वेदांत म्हटलें आहे. विवस्वत् हा शब्द वि + वस् या धातूपासून झाला असून त्याचा अर्थ प्रकाशणारा असा आहे. यजुर्वेदांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि ब्राह्मण ग्रंथांत विवस्वत् हा आदित्य असल्याचें सांगितलें आहे. वेदोत्तर वाङ्मयांत तें सूर्याचें एक नांव आहे. विवस्वत् ही इंडोइराणी देवता आहे. उदय पावणारा सूर्य हें विवस्वत्चें स्वरूप असावें.

वेदांत आदित्यांचीं अशीं थोडक्यांत वर्णनें आहेत. पुराणांत सूर्यास सर्व श्रेष्ठत्व आलें. त्यांत यास एक, दोन, तीन, चार अशा स्त्रिया सांगितल्या असून संज्ञा, राज्ञी, प्रभा, द्यौ, निक्षुभा, छाया, इत्यादि त्यांचीं नांवें दिलीं आहेत. यम, श्रुतश्रवस्, श्रुतकर्मा (शनि), अश्विनौ, रेवंत, वैवस्वत मनु, यमुना, तपती किंवा विष्टि, प्रभात, इलापति, पिंगलापति, हीं सूर्याचीं मुलें समजलीं जातात. याचा कमरेखालचा भाग कां दिसत नाहीं याविषयीं एक कथा आहे. पण मला वाटतें प्रथम परकी संस्कारामुळें पायांत उंच बूट घातलेली सूर्यमूर्ती तयार झाली व मग तिची उपपत्ति बसविण्यासाठीं कथा रचली गेली.

सूर्यदेवतेस अशा प्रकारें फार महत्त्व असल्यामुळें हिंदुस्थानांत फार पूर्वीपासून आजतागायत सर्वत्र तिची पूजा फार जोरानें चालू आहे. इराणी लोकांत मिश्र ही जवळजवळ सूर्यवाची देवता आहे व त्यांचा हिंदुस्थानाशीं संबंध आल्यामुळें या पूजेच्या प्रसारास मदतच झाली. हिंदुस्थानांत सर्वत्र सूर्याच्या मूर्ती व देवळें सांपडण्याचें कारण हेंच आहे. शैववैष्णवादि पंथाप्रमाणें त्याच्या भक्तांचा सौर नांवाचा एक पंथही विद्यमान आहे. बृहत्संहितेंत सूर्याची प्रतिष्ठा, पूजा, वगैरे क्रिया मगांनीं कराव्या असें सांगितलें आहे[1]. मग हे मूळचे इराणी लोक होते. यावरून सौरपंथांत इराण्यांचा संबंध किती महत्त्वाचा आहे हें ध्यानांत येईल

मध्ययुगांत अनेक ठिकाणीं सूर्याचीं मोठमोठीं स्वतंत्र देवळें होतीं. अशा देवळांत मुख्य स्थान सूर्यास असणार हें उघड आहे. पण इतर देवळांतही सूर्यास महत्त्वाचें स्थान आहे हें त्यास पंचायतनांत समाविष्ट केल्यावरून उघड होतें. सूर्याला स्त्री, गण, इत्यादि व ग्रह असे दोन परिवार सांगितले असून पहिला कमीजास्त प्रमाणांत प्रत्येक सूर्यमूर्तीच्या भोंवतीं खोदलेला आढळतो. या शिवाय चतुर्मुख लिंगांतही तो निश्चयानें आढळतो. ग्रह परिवाराच्या बाबतींत ग्रंथांतरीं सूर्याच्या देवळाचे प्राकारांत, मध्यें सूर्याचें देऊळ

१ अ. ६० श्लोक १९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि भोंवतीं पूर्वादि मुख्य दिशांस आणि आग्नेयादि उपदिशांस अनुक्रमें सोम, गुरू, शुक्र व बुध आणि मंगळ, राहू, केतू व शनि यांचीं प्रधान देवळाचे मानानें लहान देवळें बांधावीं असें सांगितलें आहे[1]. शिल्परत्नांत बुध, शुक्र, शनि, राहू, केतू यांस अनुक्रमें पश्चिम, उत्तर, नैऋत्य, वायव्य, ईशान्य या दिशा सांगितल्या आहेत[2]. बाकींचे वरच्या प्रमाणेंच ठेवावयाचे आहेत. देऊळ सूर्यपंचायतनाचें असल्यास मध्यें सूर्याचें आणि आग्नेयादि उपदिशांस गणेश, विष्णु, देवी आणि शिव यांचीं छोटी देवळें उभारतात. मध्ययुगाच्या शेवटीं सूर्याचें महत्त्व कमी होऊन लोकपालांप्रमाणें सूर्यादि ग्रहांना गौणत्व आलें असावें. कारण अलीकडच्या ६।७ शें वर्षांच्या काळांत त्याचीं स्वतंत्र देवळें उभारल्याचें फारसें आढळांत नाहीं. नवग्रहांचे शिलापट्ट कधीं नुसतेच सप्तमातृकापट्टाप्रमाणें खोदून ठेवलेले आढळतात. क्वचित् लोकपालांच्या शिलापट्टांप्रमाणें मंडपांच्या छतावर खोदलेले असतात. शिवपार्वतींचें लग्न, कृष्णजन्म इत्यादि देखाव्यांतही नवग्रहपट्ट सांपडतात.

इतर देवतांशीं आलेल्या संबंधामुळें सूर्य निरनिराळ्या वर्गांत पडत असला तरी केवळ ग्रंथिक वर्णनें व प्रत्यक्ष उदाहरणें याचा विचार केला तर त्याचे उत्तरी व दक्षिणी असे मुख्य दोन प्रकार असल्याचें आढळून येतें. उत्तरी पद्धतींत पुन्हा दोन भेद आहेत. पैकीं एक बृहत्संहितेमध्यें उल्लेखिलेला व दुसरा बोधगया, भुमरा, अफगाणिस्थान येथें सांपडलेला व ग्रीक सूर्यदेवतेचा परिणाम झालेला. दक्षिणी प्रकाराचा उगम मात्र येथेंच झाला असावा. दक्षिण हिंदुस्थानांत उत्तरी पद्धतीच्या मूर्ती सहसा आढळत नाहींत. उलट उत्तरेंत मात्र दक्षिणी पद्धतीच्या पुष्कळ मूर्ती आहेत. तसेंच उत्तरी पद्धतीच्या मूर्ती उत्तर हिंदुस्थानच्या वायव्य भागांतच मुख्यतः सांपडत असल्यानें असें वाटतें कीं, ज्यास सध्या दक्षिणी प्रकार म्हणतात तोच प्रथम सर्व भरतखंडभर चालू असावा. इराणांतून आलेल्या प्रकारानें हिंदुस्थानच्या वर सांगितलेल्या भागांत मात्र महत्त्वाचें स्थान पटकावलें.

सूर्याविषयीं येथवर सामान्य विवेचन केल्यानंतर द्वादशादित्यांचा थोडा अधिक विचार केला पाहिजे. यांचीं सुमारें पंधरा ग्रंथांत एकमेकांशीं मेळ

१ रूपा १३ अ; रूम ३ अ. २ अ. २५।१५३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नसणारीं अशीं अदमासें ५० नांवें आलीं आहेत. सामान्यतः द्वादशादित्य चैत्रादि बारा महिन्यांचे व मेषादि बारा राशींचे स्वामी समजले जातात; पण अग्निपुराणांत हे मार्गशीर्षादि बारा महिन्यांचे स्वामी सांगितले असून त्यांतच त्यांचे रंग व शक्ति वर्णिल्या आहेत. यांच्या स्वरूपाविषयीं मात्र थोडा घोटाळा आहे. हे दोन हातांचे व त्यांत कमळें असलेले, तांबड्या किंवा साध्या कमलावर बसलेले, तेजोमंडलयुक्त दाखवावे म्हणून अभे, सुभे व पूका यांत सांगितलें आहे. विशा व रूपा यांमधील वर्णनें सारखींच आहेत. त्यांत दोन हातांत निरनिराळीं आयुधें सांगितलीं असून शिवाय, पद्माभ्यां शोभितकरा, सपद्मैः पाणिपल्लवैः, पद्मव्यग्रकरद्वया, पद्महस्ता, पद्मरुद्धकरद्वया, अशा शब्दांनीं प्रत्येक मूर्तीच्या हातांशीं कमलांचा अतिशय निकटचा संबंध आणला आहे. तेव्हां त्यांचे मतानें आदित्यांना चार हात असावे असें वाटतें. तसें असल्यास सूर्याच्या बहुधा वरच्या दोन हातांत प्रत्येकीं एकेक कमळ दाखवून खालच्या दोन हातांत अनुक्रमें खालील कोष्टकांत दिलेल्या वस्तू द्याव्या असा अर्थ होईल. या वर्णनांत मित्रास तीन डोळे सांगितले असून पूषन् विषयीं 'द्विभुज' असा स्पष्ट निर्देश आहे आणि विष्णूच्या बाबतींत पद्माचा संबंध दाखविणारे विशेष शब्द नाहींत येवढ्या गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत.

धाता	कमलमाला	कमंडलु
मित्र	चंद्र	शूल
अर्यमन्	चक्र	गदा
रुद्र	अक्षमाला	चक्र
वरुण	चक्र	पाश
सूर्य	कमंडलु	अक्षमाला
भग	शूल	चक्र
विवस्वान्	शूल	पुष्पमाला
पूषन्	पद्म	पद्म
सवितृ	गदा	चक्र
त्वष्टा	माला	होमजकलिका
विष्णु	चक्र	पद्म

सूर्य, त्याचा परिवार, त्याचे बारा प्रकार व नवग्रह यांचीं वर्णनें मला मुख्यतः अग्निपुराण[1], अभिलषितार्थचिंतामणि[2], अंशुमद्भेदागम[3], पद्मपुराण[4], पूर्वकारणागम[5], बृहत्संहिता[6], मत्स्यपुराण[7],

१ अ ५१।१. २ प्रकरण ३।१।८५८. ३ पटल ४८. ४ पाताल खंड ७८।४४. ५ इहिइ १ सी ८९. ६ अ. ५८।४६. ७ अ. २६१।१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रूपावतार[1], विष्णुधर्मोत्तर[2], शिल्परत्न[3], सुप्रभेदागम[4], चतुर्वर्गचिंतामणि[5], श्रीतत्त्वनिधि[6], इत्यादि ग्रंथांतून केलेलें आढळलें. मात्र प्रत्येकांत सर्वच वर्णनें मिळतात असें नाहीं. उ. बृहत्संहितेंत फक्त सूर्याचेंच वर्णन आहे; तर द्वादशादित्यांचीं वर्णनें अभिलाषितार्थचिंतामणि, शिल्परत्न वगैरे ग्रंथांत आढळून येत नाहींत. रूपावतार व शिल्परत्न यांत प्रत्येकीं दोन दोन वर्णनें आलीं आहेत. पैकीं प्रत्येकांतील एकेक आणि चतुर्वर्गचिंतामणींतील वर्णनसमुदाय अभिलषितार्थचिंतामणिमधील वर्णनांशीं जुळत असल्यामुळें त्यांचा स्वतंत्र उल्लेख केला नाहीं. पण वर्णनगट भिन्न आहेत त्यांची नोंद अवश्य केली आहे[7]. शिल्परत्नांत दुसरें वर्णन सोमादि अष्टग्रहांच्या बाबतींत एकाच प्रकारचें म्हणजे–त्यांचा फक्त रंग सांगून वाहन न देतां बहुतेकांचें–उजवा हात अभयमुद्रेचा व डावा मांडीवर येवढेंच आहे.

ग्रंथिक वर्णनें

सूर्य–आचिः तांबडा; सात घोड्यांचा एकचाकी रथ; पाय तेजयुक्त (अस्पष्ट); कमलावर; दोन हात व त्यांत कमल, कमल; तांबडीं वस्त्रें, कुंडलें व किरीट, विजपायांचा सारथि, दोन्हीकडे ढालतलवार घेतलेले दंड व पिंगल, शिवाय लेखणी घेतलेला लेखक. **अपुः** [१] रंग ?; एकचाकी सात घोड्यांचा रथ किंवा नुसता घोडा; दोन हात व त्यांत कमलें; उवा दऊत व लेखणी घेतलेला दंड, डावा दंडधारी पिंगल, पाठीमागें चौरीधर राज्ञी व निक्षुभा. [२] रंग ?; घोड्यावर बसलेला; हात ?; पण त्यांत वरद व कमल, कमल. **अभेः** रक्तमंडल; रक्तपद्म; दोन हात व त्यांत कमळें; करंडमुकुट, तांबडीं वस्त्रें, छन्नवीर दागिना. **पपुः** रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत कमल. **पूकाः** डावा अर्धा भाग सावळा व नारीरूप; एकचाकी सात घोड्यांचा रथ किंवा नुसतें कमळ; दोन हात व त्यांत कमळें; प्रभामंडल, कंचुकयुक्त शरीर, तांबडें वस्त्र, खांद्यापर्यंत हात,

१ पान १२ अ ते १४ आ. २ अ. ६७ ते ६९. ३ अ. २५।८०, ८१ व १३८. ४ इहिइ १ सी ८३. ५ खं. १।८७३; २।१३२. ६ पृ. १२१. ७ अशीं वर्णनें म्हणजे रूपमंडनांत (पा. ४) आलेलीं ग्रहपरिवाराचीं व शिल्परत्न २५।१५३–१५६ मधील होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

५६ हांसी–हिसार सूर्य



५७ कोनारक–पुरा सूर्य

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५८ जोरा-बोग्रा सूर्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जानवें. **बृसः** गोरें तोंड; वाहन ?; दोन हात व त्यांत पद्मे; पायांपासून छातीपर्यंत आच्छादित, उत्तरीय पोशाख, कंचुक, कुंडलें, लांब हार, गणांनीं युक्त. **मपुः** [१] (चचि २।१४९): गौर; सप्ताश्वरथ; पद्मासन; दोन हात व त्यांत कमलें; नेहमीं चालणारा. [२] गौर; एकचाकी सात घोड्यांचा रथ; दोन हात व त्यांत कमलें; चोळणा, दोन वस्त्रें, बाजूस खड्गधारी दंडी व पिंगल, लेखणी घेतलेला धाता, अरुण. **रूम** (पा. ४ अ): रंग ?; वाहन ?; वाटोळ्या तेजोवलयांत; दोन हात व त्यांत पांढरीं कमलें; तांबडीं वस्त्रें. **विधः** तांबडा; एक चाकी सात घोड्यांच्या रथांत बसलेला; चार हात व त्यांपैकीं दोन हातांत लगाम; दोन हात दंड व पिंगल यांच्या डोक्यांवर; कवचयुक्त, शुभ्र दाढी, दंडाच्या हातांत ढाल व शूल, पिंगलाच्या हातांत लेखणी व पत्र, उबा पिंगल, डावा दंड व सिंह, पाठीमागें रेवंत, यम व दोन मनु असे चार मुलगे किंवा नव (अष्ट) ग्रह; पलीकडे राज्ञी, सवर्णा, छाया व सुवर्चसा अशा चार बायका; अरुण सारथि; **विशा** (चचि १।१७६): पांढरा; दोन हात व त्यांत कमल कमल; कमलासन. **शिरः** [१] रंग ?; वाहन ?; तेजोमंडलांत बसलेला; दोन हात व त्यांत तांबडें कमल, काळें कमल; तांबडीं वस्त्रें वगैरे.[२]लाल; लाल कमळ; चार हात व त्यांत तांबडीं कमळें, अभय, वर; तीन डोळे. **श्रीनि**[१](पृ. १२१): सोनेरी, पांढरा, तांबूस;हात?;पण त्यांत खट्वांग,पद्म, चक्र, शक्ति, पाश, अंकुश, अक्षमाला, कपाल; तीन डोळे, चार तोंडें. [२] (पृ. १२२) तांबडा; रक्त पद्मासन; हात?; पण त्यांत अभय, पद्म, वर; त्रिनेत्र'.

चंद्र–आचिः पांढरा; दहा पांढऱ्या घोड्यांचा रथ; दोन हात व त्यांत गदा, वर; पांढरीं वस्त्रें. **अपुः** रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत कमंडलु, अक्षमाला. **अभेः** पांढरा; सिंहासन; दोन हात व त्यांत कुमुद; उभा अथवा बसलेला, प्रभामंडल, सोन्याचें जानवें, पांढरीं वस्त्रें. **पूकाः** अभेप्रमाणें

---

१ सूर्याच्या गणांचे बाबतींत भविष्यपुराणांत स्कंद व अग्नि हेच दंडपिंगल असल्यानें ते किंवा स्कंद व हर, अश्विनीदेव, यम व गरूड, कुबेर व गजानन, रेवंत व रुद्र या जोड्यांपैकीं प्रत्येकीं एकेक सूर्याच्या डाव्या उजव्या बाजूस खोदावी अशी थोडी निराळी माहिती आहे (इहिइ १ सी ९८).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रंग, वाहन, हात व आयुधें; उभा किंवा बैठा, प्रभामंडल, उजवीकडे रोहिणी. **मपु**: पांढरा; पांढरा घोडा; दोन हात व त्यांत गदा, वरमुद्रा; पांढरीं वस्त्रें. **रूम**: पांढरा; दहा घोड्यांचा रथ; हात ?; पण त्यांत कमळ, कमळ; कानांत रत्नकुंडलें. **विध**: पांढरा; डावीकडे सिंहाचें लांछन; दुचाकी व दहा घोड्यांचा रथ; चार हात व त्यांत कुमुद, कुमुद, (१–४) बाण ?; पांढरीं वस्त्रें; कांति व शोभा या स्त्रिया. **शिर**: पांढरा. **श्रीनि**: पांढरा; दहा घोड्यांचा रथ; दोन हात व त्यांत गदा किंवा कमळ, वरद; पांढरे वस्त्रालंकार.

मंगळ–अचि: तांबडा; बकरा; चार हात व त्यांत वर, भाला, शूल, गदा. **अपु**: हात ?; पण त्यांत भाला, अक्षमाला. **मपु**: रंग ?; बकरा; चार हात व त्यांत शक्ति, शूल, गदा, वर; अंगावर तांबडीं पुष्पें व वस्त्रें. **रूपा**: अचिप्रमाणें. **रूम**: तांबडा; बकरा; हात ?; पण त्यांत दंड, कमंडलु. **विध**: तांबडा; आठ घोड्यांचा सोन्याचा रथ. **शिर**: [१] अचिप्रमाणें. [२] तांबडा; **श्रीनि**: तांबडा; बकरा किंवा तांबडें आठ बकरे जोडलेला रथ; चार हात व त्यांत शक्ति, शूल, गदा, खट्वांग किंवा वरद; तांबडीं वस्त्रें व माळ.

बुध—अचि: पिवळा; सिंह; चार हात व त्यांत वर, तरवार, ढाल, गदा; पिवळीं फुलें व वस्त्रें. **अपु**: रंग व वाहन ?; हात ?; पण त्यांत धनुष्य, अक्षमाला. **रूम**: पिवळा; सर्प; हात ?; पण त्यांत योगमुद्रा, योगमुद्रा. **विध**: रंग ?; मंगळाप्रमाणें रथ; इतर बाबतींत विष्णूप्रमाणें. **शिर**: पिवळा; **श्रीनि**: पिवळा; सिंह किंवा चार सिंहांचा रथ; चार हात व त्यांत अचिप्रो. पिवळें वस्त्र व माळ.

गुरु—अचि: पिवळा; वाहन ?; चार हात व त्यांत वरमुद्रा, अक्षमाला, कमंडलु, सोटा. **अपु**: रंग ?; वाहन ?; हात?; पण त्यांत कमंडलु, अक्षमाला. **रूम**: पिवळा; हंस; हात ?; पण त्यांत अक्षमाला, कमंडलु; **विध**: पिवळा; आठ घोड्यांचा सोन्याचा रथ; दोन हात व त्यांत पुस्तक, अक्षमाला; पिवळीं वस्त्रें. **शिर**: पांढरा; **श्रीनि**: पिवळा; आठ घोड्यांचा रथ; चार हात व त्यांत अचिप्रो; पिवळें वस्त्र व माळ.

शुक्र—अचि: पांढरा; वाहन ?; चार हात व त्यांत वर, अक्षमाला, कमंडलु, सोटा. **अपु**: रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत कमंडलु, अक्ष-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माला. **रूमः** पांढरा; मेक; हात ?; पण त्यांत अक्षमाला, कमंडलु. **विधः** पांढरा; दहा घोड्यांचा रुप्याचा रथ; दोन हात व त्यांत निधि, पुस्तक; पांढरीं फुलें व वस्त्रें. **शिरः** पांढरा; **श्रीनिः** पांढरा; पांढऱ्या आठ घोड्यांचा रथ; चार हात व त्यांत अचिप्रो. पांढरी फुलें व वस्त्रें;

शनि—अचिः निळा; गिधाड; चार हात व त्यांत वर, बाण, धनुष्य, शूल. **अपुः** रंग ?; वाहन ?; हात व त्यांत ?; कदाचित् क्षुद्र घंटांची माळा. **अभः** काळा; पद्मपीठावर उभा; दोन हात व त्यांत सोटा, वर; करंड-मुकुट, पांढरीं वस्त्रें, थोडा पंगु व खुजा. **रूमः** काळा; रेडा; हात ?; पण त्यांत सोटा, कमंडलु. **विधः** काळा; आठ घोड्यांचा लोखंडी रथ; दोन हात व त्यांत सोटा, अक्षमाला; काळीं वस्त्रें; **शिरः** काळा; **श्रीनिः** काळा, निळा; गिधाड, निळ्या आठ गिधाडांचा रथ; चार हात व त्यांत बाण, तलवार, धनुष्य, अभय किंवा वरद; निळीं वस्त्रें व फुलें.

राहू—अचिः रंग?; सिंहासन; हात ?; पण त्यांत वर, तलवार, ढाल, शूल; करालमुख. **अपुः** रंग ?; वाहन ?; हात व वस्तु ?; अर्धचंद्रधारी. **रूमः** काळा; अर्धा शरीराचा व कुंडामध्यें बसलेला अथवा उभा. **विधः** रंग ?; आठ घोड्यांचा चांदीचा रथ; हात ?; पण उहा मोकळा, डाहा कांवळें व पुस्तक; **शिरः** धुरकट; वाहन ?; हात ?; पण अंजलिहस्त; कुरूप तोंड. **श्रीनिः** काळा, निळा; निळा सिंह, तो जोडलेला रथ; चार हात व त्यांत अभेप्रो; भयंकर तोंड किंवा वाघाचें तोंड; काळीं वस्त्रें व फुलें; गोमेदाचे अलंकार.

केतु–अचिः धुरकट; गिधाड; दोन हात व त्यांत वर, गदा. **अपुः** रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत तलवार, दिवा. **रूमः** धुरकट; वाहन ?; हात व आयुधें ?; करपुट किंवा सर्पपुच्छाप्रमाणें. **विधः** रंग ?; दहा घोड्यांचा रथ; इतर बाबतींत मंगळाप्रमाणें. **शिरः** काळा. **श्रीनिः** धुरकट; पारवा, तो जोडलेला रथ; दोन हात व त्यांत गदा, वरद; विकृत तोंड; चित्रविचित्र रंगाच्या माळा व वैडूर्यमण्याचे अलंकार; डोक्यावर मुकूट.

उदाहरणें.

मथुरा म्यूझियममध्यें एक महत्त्वाची सूर्यमूर्ती आहे. ही चार धावत्या घोड्यांच्या रथांत ढुंगण व पायांचे तळवे जमिनीस टेकून बसली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिच्या डोक्यास लांब केस व त्यांवर पट्टा आहे. सूर्याचें पोट मोठें असून दोन हातांत कमळें आहेत. त्याचें वैशिष्ट्य म्हणजे खांद्यास गरुडाप्रमाणें पण आकारानें अगदीं लहान असे पंख आहेत. अशाच प्रकारची एक मूर्ती लखनौ म्यूझियममध्यें आहे, येवढेंच नव्हे तर बुद्धगया व गांधार या शिल्पांत अशा प्रकारच्या आणखीही मूर्ती आढळतात. ही मूर्ती कलेच्या दृष्टीनें भिकार आहे. पण तिचा संस्कृत कलेशीं असलेला संबंध उघड आहे. कारण हींत सूर्याच्या रथाला चारच घोडे दाखवीत असून सूर्यही उभा किंवा बसलेला काढतात. वेदांत सूर्यास गरुत्मन्, सुपर्ण हीं नांवें आलीं आहेत. तेव्हां त्यास गरुडासारखे पंख दाखविल्याचें कोठें आढळल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.' आक्यां व कार्ले या दोन फ्रेंच पुरातत्ववेत्त्यांनीं काबूलच्या वायव्येस ७॥ मैलांवर खैरखाना घाटामध्यें केलेल्या उत्खननांत एक चौथ्या पांचव्या शतकांतील देऊळ सांपडलें आहे. त्यांत एक सुंदर, पांढरी, संगमरवरी सूर्यमूर्ति मिळाली. ही दोन घोड्यांच्या व अरुण सारथी असलेल्या रथांत एका उंच आसनावर पाय जमीनीवर सोडून पण जमिनीस टेकवून बसली असून तिच्या डाव्याउजव्या अंगांस दण्ड व पिंगल हे सेवक उभे आहेत. मूर्तीच्या अंगावर दुसरा व तिसरा शापूर आणि दुसरा अर्दशीर यांप्रमाणें शिरोवस्त्र, अंगरखा वगैरे असल्यानें ती इ. स. च्या ५ व्या शतकांतली व इराणी धर्तीवर आहे याविषयीं शंका नाहीं. हिंदुस्थानांत इ. स. आरंभ किंवा त्यापूर्वीच्या सूर्यमूर्ती आहेत त्यांच्या बाजूस दंड व पिंगल येत नसून अंधकारवेधी, धनुर्धारी, आलीढप्रत्यालीढासनी, उषा व प्रत्युषा खोदलेल्या असतात. यांस शिल्पाच्या दृष्टीनें हिंदीग्रीक पंथामध्यें घालतात, पण ग्रीक पुराणांचा जसजसा जास्त परिचय झाला तसतशीं ॲझिझॉस व मॉनिमॉस (फॉस्फॉरॉस व हेस्पेरॉस) यांचीं प्रतिरूपें म्हणून दण्डपिंगल सूर्याच्या शिल्पांत खोदूं लागले. वरील ग्रीक सेवक एडेस्सा, दिओस्कुरि व कबिरी येथील सूर्य मूर्तीबरोबर असून त्या अशाच प्रकारच्या कोणत्याही हिंदी मूर्तीपेक्षां जुन्या आहेत असें वरील विद्वानांचें म्हणणें आहे. प्रस्तुत मूर्ती हिंदीअफगाण पंथाची आहे[२].

१ आसइॲरि १९०९–१० पृ. ७५ प्रप २८ सी. २ JRAS १९३७ आक्टोबर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



५९ डाक्का सूर्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० चिदंबरम्-दक्षिण अकार्ट सूर्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भुमरा (मध्य भारत) येथील सूर्यमूर्ती पिंगल व दंड यांसह उभी असून सूर्याच्या दोन हातांपैकीं उजवा भग्न व डावा कमलधारी आहे. पिंगलाच्या उजव्या हातांत कमल व डावा मोडला आहे. दंडाच्या हातांत दंड किंवा भाला आहे. तिन्हींचाही पोषाख जवळ जवळ सारखा म्हणजे डोक्यास सिथियन टोपी, अंगांत लांब जाड अंगरखा व त्यावर बंध, पायांत चुण्याची तुमान व बूट असा आहे. फक्त सूर्याच्या मुखाभोंवतीं लांबोडें तेजोवलय आणि गळ्यांत हार आहे. ही मूर्ती गुप्तकालीन सूर्याचें उत्तम उदाहरण आहे'. हांसी येथील सूर्यमूर्ती पायांत उंच बूट घालून व हातांत विकसित कमळें घेऊन उभी असून तिच्या डोक्यास मुलतानी टोपीसारखा मुकुट व दोन पायांमध्यें स्त्री आहे. दोन्ही बाजूंस अगदीं वर बैठे अग्नि व बहुधा यम, त्यांखालीं उषा व प्रत्युषा, त्यांखालीं पिंगल व दंड आणि त्यांचे बाजूस दोन स्त्रिया इतका परिवार आहे. पिंगलाची दाढी व दंडाचा दंड स्पष्ट आहे. डोक्याभोंवतीं सप्तदली तेजोवलय आहे[2]. कोनारक येथील उंच बूट घातलेल्या सूर्याच्या बाजूंस दंडधारी आणि ढालतलवार घेतलेले असे दोन पुरूष असून शिवाय दोन दाढीवाले पुरूष आहेत. सूर्याच्या पायांपाशीं खूप जोरानें रथाचे घोडे हाकणारा अरूणही काढला आहे[3]. जोरा (बोग्रा) येथील सूर्यमूर्तीहि उंच बूट घातलेली व कमलधारी असून कमरेस म्यानासह तलवार लटकावलेली आहे. हिच्या दोन्ही अंगांस मिळून पिंगल, दंड, उषा, प्रत्युषा व दोन चौरीधर स्त्रिया (बहुधा सूर्याच्या बायका ?) या व्यक्ति तर आहेतच; शिवाय दोन पायांमध्यें प्रथम उभी स्त्री असून तिजपुढें पागळा अरूण बसला आहे. बैठकीवर सात घोडे अर्धवट काढले आहेत[4]. डाक्का जिल्ह्यांतील सूर्यमूर्तीचे दोन्ही हात तुटले असले तरी त्यांतील कमळें स्पष्ट आहेत. हिच्या दोन्ही बाजूंस अनुक्रमें मोठ्या पोटाचा दऊतलेखणी घेतलेला दाढीवाला पिंगल व दंडधारी दंड असून त्यांच्या पलीकडे उषा व प्रत्युषा आणि अलीकडे दोन सूर्यपत्नी काढल्या

१ मेआसइ क्र. १६ पृ. १३ प्रप १४ ए; मूचि ५५. २ आसइऑरि १९२२–२३ पृ. ९३ प्रप ५ ए; मूचि ५६. ३ एमोबिओ चि. १६०; मूचि ५७. ४ आसइऑरि १९३०–३४ प्रा १५०।२; मूचि ५८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. बैठकीवर सात घोडेही आहेत. यामुळें मूर्ती सूर्याची असल्याविषयीं शंका राहात नाहीं. या मूर्तीस इतरांप्रमाणें सर्वसामान्य दागिने आहेतच; पण शिवाय चन्नवीरही आहे आणि जानवें व गुडघ्याइतका लांब हार हे नाहींत. मूर्ती मध्ययुगाच्या उत्तरार्धातील तरी खास आहे[1]. चिदंबरं येथील एका उभ्या सूर्यमूर्तीस कमींत कमी तीन तोंडें असून सहा हात आहेत. यांपैकीं उजव्या दोन हातांत पुस्तक व कमलकलिका या वस्तू असून तिसरा अभयमुद्रेचा आहे. डाव्या दोन हातांत पाश व कमलकलिका या वस्तू असून तिसरा वरदमुद्रेचा आहे[2]. मुलतान येथें एके वेळीं असलेल्या सूर्यमूर्तीचें वर्णन अल्बेरूणीनें आपल्या पुस्तकांत दिलें आहे. त्यावरून ती लाकडाची असून तांबड्या कातड्यानें मढविली होती व तिच्या डोळ्यांच्या ठिकाणीं दोन लाल बसविले होते असें दिसतें[3]. सूर्यमूर्तीचें फार मनोरंजक उदाहरण चाफळच्या (सातारा) रामाचें देतां येईल. तेथील मूर्ती रामाची आहे अशी अनेक लोकांची समजूत आहे; पण त्या मूर्तीच्या दोन हातांत दोन कमळें आहेत आणि तिच्या दोन्ही पायांमध्यें अरुणाचें ऊर्ध्वांग आहे. मूर्ती उभी आहे त्या आसनाच्या दर्शनी बाजूवर घोड्यांचीं सात तोंडें स्पष्ट दिसत आहेत. बाजूस एक पुरुष व एक स्त्री गण आहे. तेव्हां या मूर्तीच्या सूर्यत्वाविषयीं शंका राहात नाहीं[4].

आतां नवग्रहांचीं दोनतीन उदाहरणें नमूद करतों. गुर्गी येथील नवग्रहपट्टामध्यें मंगळविरहित सूर्यादि राहूपर्यंतचे ग्रह अनुक्रमें रथ, घोडा, सिंह, पक्षी, पक्षी, गिधाड, रथ, या वाहनांवर बसलेले आहेत. केतूचें वाहन अस्पष्ट आहे आणि मंगळाचा वर्णनांत उल्लेख नाहीं[5]. बरेन्द्र रीसर्च सोसायटीच्या म्यूझियममधील एका शिलापट्टावर नऊही ग्रह खोदलेले आहेत; पण त्यांत त्यांना वाहनें काढलेलीं नाहींत. केवळ कमलांवर बसलेले दाखविले आहेत[6].

---

१ ईइस्क्रमिस्क प्रप ५९ डी; मूचि ५९. २ साइइगॉगॉ पृ. २३८ चि. १४४; मूचि ६०. ३ सचौकृत अल्बेरूणीज् इंडिया पृ. ११६. ४ यावरील विस्तृत विवेचनासाठीं पहा भा. इ. सं. त्रैमासिक वर्ष १४ अंक १ पृष्ठ ५. ५ आसइवेस १९२०–२१ पृ. ८०. ६ बरीसोम्यूकॅ पृ. २५. एफ् (बी) १।५०; एफ् (बी) २।३२३ या नंबरची वस्तू नवग्रहपट्टच आहे; पण त्यांत नवग्रहांना वाहनें आहेत येवढेंच नमूद आहे. त्यांचीं नांवें दिलेलीं नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फ्रेंच इंडो चायनामध्यें एक नवग्रहांचा शिलापट्ट सांपडला आहे. यांत सूर्य दोन घोड्यांच्या रथांत आणि चंद्र, मंगळ, गुरू, शनि व केतू हे अनुक्रमें सिंहासन, बैल, हत्ती, एडका व सिंह यांवर बसलेले दाखविले असून बुध, शुक्र व राहू ह्यांचीं वाहनें कोणतीं होतीं तें शिलेच्या भग्नत्वामुळें ध्यानांत येत नाहीं'.

५ स्कंद

प्रस्ताव

देवतासप्तकापैकीं हा पांचवा देव आहे. आजला महाराष्ट्रांत सामान्यतः याचीं देवळें फार थोडीं आहेत आणि एका विशिष्ट कथेच्या संस्कारामुळें वैधव्य येण्याच्या भीतीनें महाराष्ट्रीय स्त्रिया याच्या दर्शनास जात नसल्या तरी पेशवाईच्या जवळजवळ अखेरपर्यंत तशी स्थिति नव्हती. तेव्हां बायकाही स्कंदाचें दर्शन घेत व पूजा करीत. दक्षिण हिंदुस्थानांत आजही तेंच चालू आहे. याचें त्या प्रदेशांतील रूढ नांव सुब्रह्मण्य असें आहे. ही देवता तिकडे इतकी लोकप्रिय आहे कीं, प्रत्येक गांव, शहर, बगीचा, डोंगर इत्यादि ठिकाणीं हिचीं देवालयें आढळतात. उत्तर हिंदुस्थानांत हिचीं इतकीं देवालयें नाहींत आणि बंगाल्यांत विशेष प्रसंगीं वेश्या या देवतेची पूजा करतात. अर्थात् तिकडे यास किंचित् हीन स्थान आलेलें दिसतें.

वैदिक वाङ्मयांत त्याचा फारसा कोठें उल्लेख नाहीं. त्याच्या गायत्री मंत्रांत त्याचीं कुमार, कार्त्तिकेय व स्कंद अशीं नांवें आलीं आहेत. पुराणांत त्याच्या शक्तीविषयीं व इतर कथा आहेत, त्यांवरून त्याचा व सूर्याचा संबंध असावासें वाटतें. त्याजविषयीं तो अग्नि व स्वाहा यांचा मुलगा आहे; अग्नि हें रुद्राचें एक नांव आहे, रुद्र म्हणजे शिव. पार्वतीनें स्वाहाचें रूप घेतलें होतें, म्हणून तो शिव व पार्वती यांचाही मुलगा झाला, शंकराचें स्खलित वीर्य कांहीं काल गंगेनें धारण केलें होतें, नंतर तें एका मृद्भांडांत ठेवलें गेलें, त्यापासून कुमार झाल्यानंतर सहा कृत्तिकांनीं त्याचें रक्षण केलें

१ आर्स एसियातिका व्हॉ. १६ प्रप ३५।२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व तो सहा तोंडांनीं त्यांचें दूध प्याला, त्यानें देवांचें सैनापत्य स्वीकारून त्यांसाठीं तारकासुरास मारलें व क्रौंचास फाडलें, इत्यादि अनेक प्रवाद प्रचलित आहेत. त्यांवरून त्यास स्कंद, कुमार, कार्त्तिकेय, षण्मुख, गुह, अग्निभू, सुब्रह्मण्य, गांगेय, शरजन्मा, देवसेनापति, तारकारि, महासेन, क्रौंच-दारण व इतर अनेक नावें मिळालीं आहेत.

पतंजलीच्या एका सूत्रांत पूज्य देवता सांगतांना शिव, स्कंद व विशाख अशीं तीन नावें एकत्र आलीं असल्यानें तत्पूर्वी त्यास देवत्व आल्याचें ठरतें. येथें विशाख स्कंदाहून कोणी निराळा असल्याचें दिसलें तरी पुढें विशाख हें स्कंदाचेंच नांव बनलें. कुषाण कनिष्क याच्या नाण्यांवर स्कंदाचीं स्कंद, महासेन, कुमार, विशाख अशीं चार नावें व त्यांचीं चित्रें थोड्या अपभ्रष्ट स्वरूपांत आलीं आहेत. अमरकोशावरून हीं सर्व नावें एकाच व्यक्तीचीं ठरतात. दक्षिणेंतील चालुक्य व त्यांच्या किंचित् पूर्वीचे कदंब व वाकाटक आपल्या लेखांतून स्वामी महासेनाचे आपण भक्त असल्याचें सांगतात. तेव्हां मध्ययुगांत याच्या भक्तीचा मोठा पसारा होता असें म्हणतां येतें. अर्थात् अनेक ठिकाणीं याचीं स्वतंत्र देवळें होतीं. इतर देवळांतूनहि याच्या मूर्ती सांपडतात. यास परिवार कोणता व कसा असावा याविषयीं ग्रंथांतरीं माहिती आली आहे; पण तीविषयीं आपणांस येथें फारसें विवेचन करावयाचें नाहीं.

ग्रंथिक वर्णनें

मला या देवतेचीं वर्णनें अग्निपुराण[1], अभिलषितार्थचिंतामणि[2], अंशुमद्भेदागम[3], उत्तरकामिकागम[4], कुमारतंत्र[4], पूर्वकारणागम[4], बृहत्संहिता[5], मत्स्यपुराण[6], रूपावतार[7] व रूपमंडन[7], विष्णुधर्मोत्तर[8], शिल्परत्न[9], श्रीतत्वनिधि[10], समरांगणसूत्रधार[11], इत्यादी ग्रंथांत आढळून आलीं आहेत.

१ अ. ५०।२७. २ प्रकरण ३।१।७९२. ३ पटल ४८. ४ इहिइ २ बी २०५. ५ अ. ५८।४१. ६ अ. २६०।४५. ७ पा. ४५ आ, १६ अ; यांतील कार्त्तिकेयाचें वर्णन हुबेहूब मत्स्यपुराणाप्रमाणें असल्यामुळें त्याचें स्वतंत्र सार पुढें दिलें नाहीं. ८ अ. ७१।६. ९ अ. २५।६४, १२८. १० पृ. ८३. ११ अ. ७७।२३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या ग्रंथांतील वर्णनें समजावून घेतांना २।३ ध्यानांत ठेवण्यासारखे मुद्दे आहेत ते असे— (१) वन, एकांत, खेडें, पेठ (खर्वट), गांव, पुर, नगर, राजधानी अशा ठिकाणीं याची मूर्ती बसवितांना तीस दोन ते बारा—फक्त दहा वर्ज्य—पर्यंत हात दाखवावे; येवढेंच नव्हे तर अशा ठिकाणीं त्याची बाल, कुमार, ब्रह्मचारी, विवाहित, इत्यादि निरनिराळ्या अवस्थेंतील मूर्ती बसवावी असें बहुतेकांनीं सांगितल्याचें दिसतें. यावरून त्याच्या मूर्तीविषयीं सामान्य जनतेंत आवड किती होती हें दिसून येईल. (२) स्कंदास २ पत्नी सांगितल्या आहेत याची महाराष्ट्रीयांस कल्पनाही नसेल. महाराष्ट्रांत असा पक्का समज आहे कीं, गुहानें स्त्री अजी वर्जिली होती; पण दक्षिणेकडे त्यास जास्तींत जास्त दोन स्त्रिया कल्पिल्या असून प्रसंगानुसार त्यांपैकीं एक किंवा दोघी जणीही दाखवावयास सांगितल्या आहेत. तसेंच त्यांचीं नांवेंही भिन्नभिन्न आहेत. (३) कुमारतंत्रामध्यें स्कंदाचे शक्तिधर, स्कंद, सेनापति, सुब्रह्मण्य, गजवाहन, शरवणभव, कार्त्तिकेय, कुमार, षण्मुख, तारकारि, सेनानी, ब्रह्मशास्ता, वल्लीकल्याणसुंदर, बालस्वामि, क्रौंचभेत्ता, शिखिवाहन, असे सोळा प्रकार दिले आहेत[1]. श्रीतत्त्व, निधीमध्यें शक्तिधर, सेनापति, सुब्रह्मण्य, गजवाहन, ब्रह्मशास्ता, वल्लीकल्याणसुंदर, बालस्वामि, हे गाळून त्याऐवजीं ज्ञानशक्ति, अग्निजात, सौरभेय, गांगेय, गुह, ब्रह्मचारि, देशिक, वेलायुध असे आठ निराळेच प्रकार सांगितले आहेत[2]. हे सर्व भेद आपणास समजून घेण्याची तादृश आवश्यकताही नाहीं व विस्तारही होईल. तेव्हां मी येथें फक्त कार्त्तिकेयाचीं सामान्य वर्णनें व इतरांचीं वैशिष्ट्यें देण्याचा प्रयत्न करतों.

अचिः शुभ्र; मयूर; एक किंवा सहा तोंडें. [१] घर किंवा खेडें यामध्यें: बारा हात व त्यांत वरद किंवा अभय, शक्ति, पाश, तलवार, बाण, शूल, पताका, धनुष्य, ढाल, बांधलेली मूठ, प्रसृत तर्जनी, कोंबडा. [२] पेठेंत: चार हात व त्यांत अभय किंवा वरद, खड्ग, शक्ति, पाश किंवा कोंबडा. [३] गांव किंवा वन यांत: दोन हात व त्यांत शक्ति, कोंबडा. अपु: रंग ?; मयूर; बालरूप. [१] अचि ३ प्रो; फक्त एक तोंड. [२] हात ?; पण त्यांत शक्ति, बाण, पाश, खड्ग, गदा,

१ इहिइ खंड २ पृ. ४३२. २ पृ. ८३–८६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर्जनी. [३] मोरपिसें, धनुष्य, ढाल, पताका, अभय, कोंबडा, कपाल, कात्री, शूल, पाश. **अभेः** [१] रंग ?; वाहन ?; बारा हात व त्यांत शक्ति, बाण, खड्ग, चक्र, उगारलेला भाला, पाश, पिसें, ढाल, कोंबडा, धनुष्य, दंड, नांगर. [२] रंग ?; वाहन ?; सहा हात व त्यांत अभय, खड्ग, शक्ति, ढाल, अक्षमाला, कोंबडा. [३] रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत अभय, शक्ति, कोंबडा, अक्षमाला. [४] रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत शक्ति, कुक्कुट. **उकाः** [१] गांवांतः रंग ?; वाहन ?; दोन हात व त्यांत कमल, लंबितहस्त. [२] पर्वत अथवा वन यांमध्येंः रंग ?; वाहन ?; दोन हात व त्यांत दंड, कट्यवलंबित; जानवें. [३] पुर व नगर यांमध्येंः रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत अक्षमाला, शक्ति, वरद, अभय; पत्रकुंडलें अथवा नक्रकुंडलें; शक्तिविरहित अथवा एक अथवा दोन शक्तींनीं युक्त; **शक्तिस्वरूपः** सावळा आणि तांबडा; दोन हात व त्यांत कमल, उत्पल; नावेंः गजा, गजवल्ली. [४] राजधानींतः रंग ?; वाहन ?; सहा हात व त्यांत शक्ति, अभय, तलवार, अक्षमाला, कोंबडा, ढाल; सहा तोंडें. [५] गांवाच्या किंवा वाड्याच्या आरंभीः शुभ्र; मोर; हात ?; पण त्यांत शक्ति, मुसळ, तलवार, चक्र, पाश, अभय, वज्र, धनुष्य, ढाल, मोराचा ध्वज, अंकूश, वरद. **कुतः** [१] आसीन; योग; सात्त्विक; दोन हात व त्यांत (अ) पद्म, कट्यवलंबित; (आ) अभय, कट्यवलंबित; (इ) दंड, कट्यवलंबित; (ई) शक्ति, वज्र; (उ) शक्ति, कुक्कुट. [२] स्थानक; भोग; राजस; चार हात व त्यांत (अ) अभय, वज्र, शक्ति, वर; (आ) अभय, अक्षमाला, कमंडलू, वरद; (इ) अभय, अक्षमाला, कमंडलू, कट्यवलंबित; (ई) अभय, शक्ति, कुक्कुट, वरद; (उ) अभय, शक्ति, कुक्कुट, अक्षमाला; (ऊ) अभय, शक्ति, कमंडलू, कट्यवलंबित; (ऋ) खड्ग, शक्ति, कोंबडा, ढाल. [३] यानक; (१) सहा हात व त्यांत अभय, खड्ग, शक्ति, कोंबडा, ढाल, माला; (२) आठ हात व त्यांत अभय, शर, शक्ति, खड्ग, खेट, वज्र, चाप, वरद; (३) तामस; बारा हात व त्यांत (अ) अभय, शक्ति, शर, खड्ग, गदा, ध्वज, शूल, वज्र, खेटक, धनुष्य, पद्म, वरद; (आ) शक्ति, बाण, खड्ग, चक्र, पाश, प्रसारित हस्त, नांगर, दंड, चक्र, शंख, धनुष्य, कोंबडा; (इ) अभय,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाश, चक्र, खड्ग, मुसळ, शक्ति, वज्र, धनुष्य, ढाल, ध्वज, अंकुश, वरद; (ई) अभय, बाण, खड्ग, ध्वज, शक्ति, प्रास, कमळ, दण्ड, टंक, कोंबडा, धनुष्य, वरद; (उ) अभय, वज्र, शक्ति, चक्र, दण्ड, गदा, पाश, चक्र, शूल, अंकूश, कमळ, वरद; (ऊ) अभय, तलवार, बाण, चक्र, शक्ति, शूल, ?, पाश, कोंबडा, धनुष्य, ढाल, वरद. **सर्वांस सामान्यः** (१) वर्णः पिवळा, तांबडा, सावळा; (२) वाहनः पद्मासन, मयूर, गज; (३) मुखें: एक किंवा सहा; प्रत्येकास तीन किंवा सहा मुखांस बारा डोळे; (४) अलंकारः जानवें, चन्नवीर, नूपुरें, कुंडलें, करंडमुकुट; (५) **शक्तिः** अभाव, एक किंवा दोन; (१) **महावल्लीः** सावळा; उपा मोकळा, डापा आखडलेला; दोन हात व त्यांत लांबविलेला, कमळ; (२) **देवसेनाः** तांबडा; डापा मोकळा, उपा आखडलेला; दोन हात व त्यांत उत्पल, लांबविलेला. **पुकाः** रक्त; मयूर. [१] **कुमारः** हात?; पण त्यांत शक्ति, खड्ग, चक्र, पाश, कोंबडा, ढाल, धनुष्य, पताका, मोरपिसें, तर्जनी मुद्रा. [२] **गुहः** बारा हात; पुरी, खेडें, नगर येथें. [३] सहा हात व त्यांत शक्ति, अभय, खड्ग, अक्षमाला, कोंबडा, ढाल. [४] चार हात व त्यांत खड्ग, ढाल, शक्ति, कोंबडा; एक तोंड. [५] दोन हात; पण त्यांत ?; वस्त्राचा मुकूट. **वृसः** रंग ?; मयूर; हात ?; पण त्यांत शक्ति; कुमाररूप. **मपुः** शुभ्र; मयूर. [१] नगरांतः बारा हात व त्यांत अचि १ प्रमाणें; फक्त वरद व अभय. [२] अचि ३ प्रो. [३] अचि २ प्रो; पण निश्चयानें पाश. **विधः** रंग ?; मयूर; हात ? ; पण त्यांत कोंबडा, घंटा, पताका, शक्ति, कुमार, मोराचीं पिसें; तांबडीं वस्त्रें; सहा तोंडें; गुह, विशाख व स्कंद यांना एकच तोंड. **शिरः** अचि १, २, ३ प्रमाणें; फक्त आयुधांचा तपशील नाहीं. [४] **गुहः** शेंदरी; वाहन?; हात?; पण त्यांत शक्ति, अभय. [५] **सुब्रह्मण्यः** (१) शेंदरी; वाहन ? ; हात? ; पण त्यांत पद्म, अभय, शक्ति, कोंबडा; रक्तवस्त्र. (२) केशरी; वाहन ? ; दोन हात व त्यांत शक्ति, वज्र अथवा कमरेवर; पीत वस्त्र. **ससूः** शुभ्र; मयूर; सहा किंवा एक तोंड, तांबडीं वस्त्रें. [१] नगरांमध्यें: बारा हात व त्यांत शक्ति, बाण, खड्ग, मुसुण्ठी, मोगरा, पसरलेला, धनुष्य, पताका, घंटा, ढाल,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोंबडा, अभय. [२] खेडयांतः सहा हात; पण त्यांत ?. [३] गावांतः दोन हात व त्यांत शक्ति, कोंबडा. **सुभेः** [१] दोन हात व त्यांत वज्र, शक्ति; बैठा. [२] चार हात व त्यांत वज्र, शक्ति, अभय, वरद; उभा. [३] आठ हात व त्यांत वज्र, शक्ति, अभय, वरद, खड्ग, खेटक, पाश, पद्म; चालता. **सर्वांना सामान्यः** तांबडा; हत्ती; जानवें, पद्मधारी व द्विभुज अशी शुभ्र विद्या व सावळी मेधा यांसह.

अग्निजातः श्रीनि–आठ हात; पळी, आज्यपात्र; दोन तोंडें. **कार्त्तिकेयः** कुत–सहा तोंडें व हात. श्रीनि–दहा हात. **कुमारः** कुत–चार हात; वल्ली पत्नी. श्रीनि-चार हात; बालरूप, करंडमुकुट, एक तोंड. **क्रौंचभेत्ताः** कुत–आठ हात; सहा तोंडें. श्रीनि–चार हात, फुलांचा बाण, उसाचें धनुष्य. **गजवाहनः** कुत–हत्ती; चार हात; तीन डोळे. **गांगेयः** श्रीनि–मकर; चार हात; परशु, पूर्ण कुंभ, अरणि; तीन डोळे, करंडमुकुट, कुक्कुटध्वज; निळें कमळ. **गुहः** श्रीनि–चार हात; तीन डोळे, किरीट, पांढरीं वस्त्रें, डावीकडे पत्नी. **ज्ञानशक्तिः** श्रीनि–चार हात; एक तोंड, जटामुकुट, पांढरें जानवें, पांढऱ्या रुद्रफुलांची माळ. **तारकारिः** कुत–बारा हात. श्रीनि–गज; सहा हात; तीन डोळे. **देशिकः** श्रीनि–करंडमुकुट, एक तोंड. **बालस्वामिः** कुत–दोन हात व डोळे. **ब्रह्मचारिः** श्रीनि-तांबडें पद्म; दोन हात. **ब्रह्मशास्ता** कुत–चार हात; एक तोंड; वल्ली नांवाची स्त्री. **वल्लीकल्याणसुंदरः** कुत–चार हात; होमकर्ता ब्रह्मा व उदकदाता विष्णु. **शक्तिधरः** दोन हात; एक तोंड. **शरवणभवः** कुत–बारा हात; सहा तोंडें, बारा डोळे. श्रीनि–सिंह; सहा हात; फुलांचा बाण, उसाचें धनुष्य; तीन डोळे. **शिखिवाहः** कुत–(१) चार हात. (२) चार हात; मकरकुंडलें, करंडमुकुट, महावल्ली व देवसेना या पत्नी. (३) बालवेष; चार हात. (४) बारा हात; सहा तोंडें. (५) बारा हात; सहा तोंडें, तीन डोळे (प्रत्येकीं), चंद्रमौळि. (६) चार हात. श्रीनि–इंद्रनील रथ; चार हात; तीन डोळे, ज्वालांचे केस. **षण्मुखः** कुत–बारा हात व डोळे; सहा तोंडें; मधूची मुलगी पत्नी. श्रीनि–बारा हात; सहा तोंडें; डावीउजवीकडे जया अथवा गजांबा, विजया अथवा वल्ली. **सुब्रह्मण्यः** कुत–(१) चार हात; तांबडीं वस्त्रें. (२) दोन हात; एक तोंड. **सेनानीः** कुत–बारा हात व डोळे. **सेनापतिः** कुत–बारा हात व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



६१ रणोद्-ग्वालेर कार्त्तिकेय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar



६२ परशलूर-तंजावर कार्त्तिकेय

६३ मद्रास म्यूझियम कार्त्तिकेय

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डोळे; सहा तोंडें, डावीकडे पद्महस्ती पत्नी. श्रीनि–चार हात; एक तोंड, पांढरें जानवें. **सौरभेयः** श्रीनि–कमलासन व ललितासन; आठ हात; फुलांचा बाण व उसाचें धनुष्य; चार तोंडें. **स्कंदः** कुत–दोन हात; एक तोंड, कौपीन. श्रीनि–पांढरें कमळ; चार हात.

उदाहरणें.

ऐहोळी येथील मूर्ती एकमुखी व मोरावर बसली असून कार्त्तिकेय एका हातानें शक्ति फेकीत आणि दुसऱ्या हातांत वज्र घेतलेला आहे. एक राक्षस खालीं पडला असून समोर दुसरा राक्षस असल्यानें या मूर्तीस तारकासुर म्हणावें असें वाटतें[1]. वेरूळ येथील मूर्ती एकमुखी, उभी व चतुर्भुज असून तिचा खालचा उजवा हात कमरेवर आहे. वरचा उजवा हात भग्न असला तरी त्यांत शक्ति होती असें वाटतें. वरचा डावा हात जवळच्या मोरावर असून डाव्या खालच्या हातांत कोंबडा आहे[2]. प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममधील मूर्ती सहा तोंडें व चार हात यांनीं युक्त आणि ललितासन घालून मोरावर बसली आहे. हिचा उजवा खालचा हात अभयमुद्रेचा असून उजव्या वरच्या हातांत पाश आहे. डाव्या वरच्या हातांत वज्र व खालच्या हातांत कांहीं फळ आहे[3]. रणोद (ग्वाल्हेर) येथील कार्त्तिकेय मोरावर उकिडवा बसला असून त्याचीं सहा तोंडें व बारा हात स्पष्ट दिसतात. डोक्यास पत्त्यावरील जॅकीप्रमाणें मुकुट असून त्याचा बंद हॅटप्रमाणें हनुवटीखालून गेला आहे. गळ्यांत कंठा, माला व नाग असून हात व घोटे यांवर एकेक कडें व वाळा, आणि दंडांत अंगद हे दागिने आहेत. हातांमधील वस्तूंपैकीं शंख, चक्र, मुद्गर, खड्ग, खट्वांग, या स्पष्ट दिसतात; बाकींच्या अस्पष्ट आहेत. याच्या नागपुडया फेंदारलेल्या व तोंडें आवळलेलीं असल्यानें मुद्रा उग्र दिसते. परशलूर (तंजावर) येथील स्कंद एक पाय कमळावर व एक मोरावर

१ इहिइ खंड २ पृ. ४४८ प्रप १२८ ए. २ क्रित्ता पृ. ४४५ प्रप १२४. ३ ए गाइड टू दि ब्रॅह्मॅनिकल गॅलरी ऑफ दि आर्किआलॉजिकल सेक्शन–प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम मुंबई प्रप १।२. ४ आसइॲरि १९१८–१९ भाग १ प्रप १३ डी; मूचि ६१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवून उभा असून त्याच्या चार हातांत कटक, टंक, कर्तरी, ?, या मुद्रा व वस्तू आहेत. अंगावर किरीटमुकुट, कुंडलें, कंठा, केयूर, अंगद, कडीं, जानवें, उदरबंध, सवस्त्र मेखला, वाळे, इत्यादि अलंकार आहेत. मूर्तीची घडण पाहतां ती निदान मध्ययुगाच्या शेवटीं तयार झाली असावी[1]. मद्रास म्यूझियममधील स्कंद वामावर्ती मोरावर सव्य ललितासनानें बसला असून त्याच्या चार हातांत अभय, टंक, वज्र, कटक या मुद्रा व वस्तू आहेत. याच्या अंगावर परशलूर मूर्तीप्रमाणेंच दागिने असले तरी याची घडण बऱ्याच मागाहूनच्या काळांतील असली पाहिजे असें वाटतें[2]. तोरेन म्यूझियममधील स्कंद बैठ्या मोरावर उभा असून त्याच्या मागें प्रभावळ व तिच्या मागें टेकणी आहे. याच्या उजव्या हातांत शक्ति असून तो छातीजवळ आणलेला आहे. डावा हात तीर्थंकराप्रमाणें सरळ खालीं सोडला आहे. डोक्यास जटामुकुट व अंगावर हार, केयूर, मणिबंध, कुंडलें, इत्यादी दागिने आहेत. कमरेस दुहेरी वस्त्र असून त्याचीं टोकें उजवीकडे व समोर आहेत. कपाळास टिळा आहे. याचा काल इ. स.चें सातवें शतक असावें[3]. मुसी गुमेमधील कार्त्तिकेय उभा, एकमुखी व चार हातांचा असून त्याचे पाठीमागें सव्यावर्ति मोर आहे. वरच्या हातांत अनुक्रमें टंक अथवा वज्र आणि टंक हीं आयुधें असून खालचे हात अभय व कटिहस्त मुद्रेचे आहेत[4].

६ गणेश[5]

प्रस्ताव

ऋग्वेदामध्यें गणपति हा शब्द दोनदां आला आहे. पैकीं दुसऱ्या मंडलांतील तेविसाव्या सूक्तापैकीं 'गणानां त्वा गणपतिं' या प्रसिद्ध ऋचेंत आलेला गणपति शब्द बृहस्पति देवतेला उद्देशून आहे. गण या शब्दाचा

१ मूचि ६२. २ मूचि ६३. ३ आर्स एसियातिका व्हॉ. ४ प्रप २४ व २५. ४ एशि. माय. पृ. १२९ चि. २१. ५ हा लेख माझ्या पुरुषार्थाच्या गणेश अंकांमध्यें प्रसिद्ध झालेल्या दोन लेखांत फेरफार करून तयार केला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाणी, स्तोत्र, गाथा किंवा स्तोता असा अर्थ केला तर गणपति शब्दाचा अर्थ स्तोत्यांचा पति, प्रार्थनेचा मालक, ज्याकडे प्रार्थना जावयाच्या तो, असा होईल. हा शब्द आलेली ऋचा ज्या सूक्तांत आहे तें ब्रह्मणस्पति किंवा बृहस्पति याला उद्देशून असल्यानें येथें गणपतिपदानें सूचित होणारी देवता बृहस्पति आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. दहाव्या मंडलांतील ११२ व्या सूक्तापैकीं ९ व्या ऋचेंत गणपति हा शब्द आलेला आहे. हें सूक्त इंद्राला उद्देशून असल्यामुळें गणपति शब्दाचा संबंध इंद्राशीं जोडावयाचा आहे. येथें गण शब्दाचा अर्थ सायणांनीं स्तोतृगणांचा पति असा केला आहे. येथेंही गणपतीचा संबंध नाहीं हें उघड आहे.

तात्पर्य, ऋग्वेदांतील गणपति शब्दानें हल्लीची गणपति देवता सूचित होत नाहीं हें खरें आहे; पण इतर संहिता व तदुत्तर ग्रंथ यांतून गणपति शब्दवाच्य देवतेचा उल्लेख आला आहे. उदाहरणार्थ, मैत्रायणी संहितेंत गाणपत्यांचा तर उल्लेख आहेच; पण त्याशिवाय गणपतिवाचक कराट, हस्तिमुख, दन्ती असे शब्द आले आहेत. तैत्तिरीय आरण्यक व नारायण किंवा महानारायण उपनिषत् यांत गणपतिवाचक पुरुष, वक्रतुंड आणि दन्ति असे उल्लेख आहेत. गणेश अथर्वशीर्षांत गणपतीच्या गायत्रींत एकदन्त, वक्रतुंड व दन्ती असे गणपतिवाचक शब्द आहेत. वरदतापनी उपनिषदांत 'वक्रतुंडाय हुं' इत्यादि बीजाक्षरयुक्त मंत्र आहे.

उलट बृहदारण्यकोपनिषदांत बृहस्पति अथवा ब्रह्मणस्पति यांची व्युत्पत्ति देतांना वाक् हीच बृहती किंवा ब्रह्म आहे आणि तिचा पति तो बृहस्पति अथवा ब्रह्मणस्पति होय असें सांगितलें आहे. याचेंच पर्यायनाम वाचस्पति असेंही आहे. वाणी हें ज्ञानाचें प्रतीक असल्यामुळें बृहस्पति ही ज्ञान किंवा विद्या हिची देवता उपनिषत् कालीं होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तसेंच निघंटूच्या पहिल्या अध्यायाचा अकरावा खंड वाणीविषयक पर्यायनामांचा आहे. त्यांमध्यें गण हा शब्द आहे. तेव्हां निघंटुकारांच्या मतें 'गणपति' म्हणजे वाक्पति अर्थात बृहस्पति. यावरून असें अनुमान होतें कीं, निघंटुकालीं बृहस्पति हीच वाणीची व पर्यायानें ज्ञानाची देवता होती.

मानवगृह्यसूत्रांत चार विनायक सांगितले असून त्यांचा मनुष्यामध्यें संचार झाला असतां, तो वेड्यासारखे आचार करूं लागतो, त्यास दुःस्वप्नें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडतात व आपला कोणी पाठलाग करीत आहे असें वाटतें, राजपुत्रांना राज्य व मुलींना नवरे मिळत नाहींत, बायकांस मुलें होत नाहींत, झालीं तर मरतात, गुरूस विद्या आठवत नाहीं, व्यापार व शेती यांत यश येत नाहीं, इत्यादि अनेक अंतराय घडतात. अशा तऱ्हेनें झपाटलेल्या मनुष्यास एका विशिष्ट तऱ्हेनें आघोळ घालून व त्याजवरून अनेक प्रकारचें अन्न ओवाळून तें चवाठ्यावर नेऊन टाकलें म्हणजे विनायकसंचारापासून तो मनुष्य मुक्त होतो असें विधान आहे.

बोधायन धर्मसूत्रांत किंवा शास्त्रांत गणपतीच्या तर्पणाचा विषय आला आहे. त्यांत गणपतीला विघ्न, विनायक, वीर, स्थूल, वरद, हस्तिमुख, वक्रतुंड, एकदन्त, लम्बोदर या नांवांनीं व त्याच्या स्त्रीपुरुष गणांना विघ्नपार्षदी व विघ्नपार्षद म्हणून तर्पण सांगितलें आहे. तसेंच बोधायन गृह्यसूत्रांत इतर अनेक देवताकल्पांबरोबर विनायककल्प आला आहे त्यांत गणपतीचीं विनायक, विघ्नेश किंवा विघ्नेश्वर, वीर, शूर, उग्र, भीम, हस्तिमुख, वरद अशीं व त्याच्या स्त्रीपुरुषगणांचीं विघ्नपार्षदी व विघ्न-पार्षद अशीं नांवें आलीं आहेत. दक्षिणामुख हस्तिमुख म्हणजे दक्षिणावर्ती सोंडेचा गणपति असा शब्दप्रयोगही सांपडतो. बोधायन गृह्यसूत्रांचा काळ त्याचे संपादक डॉ. शामशास्त्री यांचे मतें इ. स. पूर्वी सहाव्या शतका-च्याही अगोदरचा आहे.

याज्ञवल्क्य स्मृतीच्या पहिल्या अध्यायात गणपतिकल्प अथवा महा-गणपतिकल्प या नांवाचें एक प्रकरण आहे. त्यामध्यें विनायकाची गणांच्या अधिपतीच्या ठिकाणीं आणि कर्मामध्यें विघ्नें आणण्याच्या बाबतींत योजना सांगितली आहे. त्याच्या आईचें नांव अंबिका म्हणजे पार्वती; विनायकाचेंच दुसरें नांव महागणपति; तो विघ्नें आणूं लागला असतां कोणतीं संकटें येतात व कोणत्या वस्तु त्यास दिल्या असतां तो संतुष्ट होतो इत्यादि माहितीही आली आहे. तीवरून असें दिसतें कीं, याज्ञवल्क्य स्मृतीच्या रचनाकालीं किंवा फार तर ज्या कालांतील समाजाची परंपरा तीमध्यें आली आहे त्या कालच्या समाजांत विनायक किंवा गणपति ही मनुष्यांच्या कर्मामध्यें विघ्नें आणणारी अर्थात् विघ्नकर्त्री देवता होती व आपल्या कर्मामध्यें विघ्नें न यावीं एतदर्थ तत्कालीन समाजाला प्रिय अशा वस्तु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देऊन संतुष्ट करी. तसेंच तत्कालींही गणपति किंवा विनायक हा पार्वतीचा मुलगा ही समजूत प्रचलित होती इत्यादि गोष्टी कळून येतात.

वर मी उल्लेख दिले आहेत त्यांवरून माझी अशी कल्पना होते कीं वेदकालीं यज्ञमार्गी लोकांमध्यें दोन पंथ किंवा परंपरा होत्या. पैकीं ऋग्वेद, बृहदारण्यक, यास्क वगैरेंच्या एका पंथामध्यें गणपति देवतेला महत्त्व नव्हतें. उलट मैत्रायणी संहिता अथर्ववेद व त्यांचीं अंगें ह्यांना प्रमाण मानणाऱ्यांचा निराळा पंथ होता. या पंथांत वैदिक अथवा आर्य देवांना प्रामाण्य असे त्याप्रमाणें रुद्र व त्याच्या कुटुंबांतील स्कंद, गणेश, नंदी, दुर्गा, गौरी वगैरेंनाही प्रामाण्य व महत्त्व होतें. माझें स्वतःचें मत वेदकालीं, विशेषतः ऋग्वेदोत्तरकालीं मूर्तिपूजा प्रचारांत आली असल्यामुळें रुद्रादि देवतांप्रमाणें गणपतीच्या मूर्तीही बनविल्या असल्या पाहिजेत. सूत्रकालीं मूर्तिपूजेचा प्रचार चांगलाच जारी होता. बोधायन गृह्यसूत्रांत गणपती-प्रमाणें अनेक देवतांच्या मूर्तींचे उल्लेख आले आहेत. तेव्हां गण-पतीच्या मूर्तीही होत्या हें निश्चित.

अगदीं आरंभीं रुद्राप्रमाणेंच गणेश किंवा त्या वेळचें प्रचलित नांव म्हणजे विनायक हा दुष्ट देव होता. तो लोकांच्या कर्मांमध्यें विघ्नें आणी व त्यायोगें अंतराय किंवा लोप उत्पन्न करी; आणिक काय काय होई त्याचें वर्णन वर आलें आहे. यामुळें प्रथम प्रथम याचें पूजन होई तें त्यानें पुण्य-कर्म करणाऱ्यांवर रागावून संकट आणूं नये व कर्मलोप होऊं नये म्हणून होई; पण पुढें पुढें त्याचें दुष्टत्व नाहीसें होऊन इतर अनेक देवांप्रमाणें हाही भक्ताभिमानी देव बनला व त्याची पूजा, पुण्यकर्मांमध्यें इतर कोणीही विघ्न आणूं नये म्हणून होऊं लागली. म्हणजे त्याजविषयीं सामान्य लोकांची विघ्नकर्ता अशी भावना होती ती बदलून विघ्नहर्ता ही भावना दृढ झाली आणि आज तर हरेक मंगल किंवा पुण्य कार्याच्या आरंभीं त्याची पूजा होते. एवढेंच नव्हे तर जुनीं घरें, वाडे, देवळें वगैरे सर्व वस्तूंच्या सुरुवातीस म्हणजे दरवाजावर त्याची मूर्ती काढतात. जुन्या ग्रंथांत बहुधा प्रथम याला श्रीगणेशाय नमः म्हणून नमन करून मग ग्रंथास आरंभ करतात. फार काय कोणत्याही गोष्टीच्या आरंभालाच आपण हल्ली 'श्रीगणेशा' म्हणूं लागलों आहों. यांत आज जरी विघ्नहर्त्याचें स्मरण असलें, तरी पूर्वी तें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विघ्नकर्त्याचें होतें आणि म्हणून त्याला सूत्रग्रंथांमध्यें बलि देऊन संतुष्ट करण्याबद्दल सांगितलें आहे.

मनुष्य वंशेतिहासाच्या दृष्टीनें पाहिलें तर रुद्र, विनायक, स्कंद, वीरभद्र, नंदी, वगैरे यज्ञादि कर्म करणारे जे आर्य त्यांशीं शत्रुत्व असणाऱ्या जमातींचे देव तरी असले पाहिजेत किंवा पुढारी तरी असले पाहिजेत. प्रथम प्रथम हे देव अथवा जमाती यज्ञमार्गी लोकांना फार त्रास देत व त्यांच्या यज्ञादि कर्मांचा विध्वंस करीत; पण पुढें दोहोंमध्यें समेट झाला असावा. त्यांतील एक उपक्रम म्हणजे रुद्रादि देवतांना यज्ञमार्गीयांच्या कर्मांत स्थान मिळालें. यामुळें जो विनायक एक वेळीं कर्मविध्वंसी होता तो साभिमानी बनला. मात्र तो मूलतः विघ्नकर्ता होता ही कल्पना याज्ञवल्क्यस्मृतीच्या रचनाकालापर्यंत लोकांमध्यें जागृत होती आणि म्हणून त्याच्या संतुष्टतेसाठीं जें कर्म करावयाचें त्यास बलिकर्म म्हटलें आहे.

या देवतेचें अगदीं प्राचीन रूप कसें असेल त्याची नीट कल्पना येत नाहीं. मागें वैदिक उतारे दिले आहेत त्यांतील कराट, हस्तिमुख, दन्तिन् किंवा दन्ति, वक्रतुण्ड या शब्दांवरून त्याजविषयीं पुढील कल्पना होते. तो दिसावयास कराल म्हणजे भयंकर होता, त्याला हत्तीसारखें अगर हत्तीचें तोंड होतें व तेंही वाकडें होतें आणि त्याला अगदीं स्पष्ट दिसणारे अर्थात् पुढें आलेले दात होते. हत्तीचें तोंड असल्यावर त्याचे दात स्पष्ट दिसणार हें उघडच आहे; पण ते एक कीं अधिक होते हें स्पष्ट नाहीं. बोधायन धर्म व गृह्य सूत्रांत त्याचीं नांवें आलीं आहेत त्यांवरून तो स्थूल, एक हाताचा, वरद मुद्रा असलेला, हत्तीच्या व वाकड्या तोंडाचा, सोंडे दक्षिणेकडे वळलेला, एक दाताचा, मोठ्या पोटाचा, उग्र, भयंकर, बरोबर स्त्रीपुरुषगण असलेला होता असें दिसतें. या काळांत त्याचें लांछन कोणतें होतें याची कल्पना येत नाहीं.

सारांश वेदकालापासून गणपतीस वैदिक मतानुयायांत वाढतें महत्त्व आल्यामुळें त्याचा पंचायतनांत समावेश होऊन त्याच्या अनेक प्रकारच्या मूर्ती एकट्या किंवा इतर देवांसह स्थापिल्या गेल्या. देऊळ केवळ गणपतीचें असेल तर तेथें फक्त गणपतीच सांपडेल; पण देऊळ गणेशपंचायतनाचें असेल तर मध्यें गणपति व भोवतीं आग्नेयादि दिशांस देवी, विष्णू, शंकर, सूर्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांचीं देवळें उभारतात. इतर देवांच्या पंचायतनांतही याची मूर्ती आढळते. मातृकाशिलापट्टांत हा मातांच्या एका अंगास काढलेला सांपडतो. कधीं कधीं पार्वतीच्या एक अंगास अथवा एका हातांतही त्याची मूर्ती दिलेली आढळते.

बौद्ध मूर्तिप्रकरणांत गणपति फारच भयंकर विघ्न म्हणून समजला जातो. साधनमालेंत गणपतीचें परिगणन देवतांमध्यें केलें असतांही विघ्नान्तक नांवाच्या देवतेस गणपतीचें वाहन सांगितलें आहे.[१] पणशबरी विघ्नांना तुडवीत, मुष्टि-प्रहार करीत व भेडसावीत असल्याचें दाखवावें[२] आणि अपराजिता गणपतीस तुडविणारी खोदावी म्हणून सांगितलें आहे.[३] वर दिलेल्या आदेशानुसार खोदलेलीं शिल्पेंही सांपडतात. उ. या पुस्तकांत विक्रमपूर (ढाक्का) येथील पर्णशबरीचें चित्र दिलें असून त्यांत पर्णशबरीच्या बैठकीवर तिचें जणूं वाहन म्हणून गणपति दाखविला आहे.[४]

ग्रंथिक वर्णनें

या देवतेचीं वर्णनें अग्निपुराण,[५] अभिलषितार्थचिंतामणि,[६] आगमग्रंथ,[७] क्रियाक्रमोद्योत,[७] बृहत्संहिता,[८] मत्स्यपुराण,[९] मंत्रमहार्णव,[७] मंत्रमहोदधि,[७] मंत्ररत्नाकर,[७] मेरुतंत्र,[१०] रूपावतार,[११] रूपमंडन,[१२] विष्णुधर्मोत्तर[१३], शारदा-तिलक,[१४] शिल्परत्न,[१५] इत्यादी ग्रंथांत मला आढळलीं असून त्यांचा सारांश येथें देण्याचा प्रयत्न करतों. हें करतांना गणपतीचीं, हत्तीचें तोंड, मोठें पोट, मोठे व पडलेले कान, इत्यादी सामान्य लक्षणें गाळलीं आहेत.

अचि:शेंदरी; उंदीर; पद्म; चार हात व त्यांत भग्न दात, कमल, कुऱ्हाड, बेलफळ; नागाचें जानवें, त्रिनेत्र, भग्न दंत, बाजूस सिद्धि व बुद्धि. **अपु**: चार हात ?; पण त्यांत दंत, परशु, लाडू, उत्पल; जानवें. **अभे**: पद्मपीठ; हात ?; पण त्यांत अंकुश, दंत, कवट, पाश किंवा नाग किंवा अक्षमाला; सोंडेंत

१ बुइ पृ. १४२, १४३ प्रप ३९ बी. २ कित्ता पृ. ८४ प्रप २८ बी. ३ कित्ता पृ. १५३ प्रप ४१ सीडी, ४२ ए. ४ मूचि ९१. ५ अ. ५०।२३. ६ प्रकरण ३।१।७९९. ७ इहिइ १ सी १. ८ अ. ५८।५८. ९ अ. २६०।५२. १० इइ पृ. २४,२५ व टीपा. ११ पान ४४ अ. १२ पान १५ आ. १३ अ. ७१।१३. १४ पटल १३. १५ अ. २४।८४ व २५।३९–६३, ७४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोदक, त्रिनेत्र, नागयज्ञोपवीत, किरीटमुकुट. **उकाः** [१] निळा; पद्मासन; चार हात व त्यांत दन्त, परशु, लाडू, अक्षमाला किंवा उत्पल. [२] सावळा, सोनेरी; मूषक; पद्मस्थ; हात ?; पण त्यांत दंत, अंकूश, पाश, लाडू; तीन किंवा दोन डोळे. [३] सावळा; वाहन ?; चार हात व त्यांत पाश, अंकूश, उसाचा तुकडा, शक्तिगुह्यकमलस्पर्शी; त्रिनेत्र, मांडीवर देवी; दोन हात व त्यांत पाश, देवगुह्यस्पर्शी; दोघेही दिगंबर. [४] सरस्वती व श्री यांनीं युक्त. **वृसः** हात ?; पण त्यांत कुऱ्हाड, मूलककंद; सुनीलदलकंद ?, एकदंत. **मपुः** रंग ?; मूषक; चार हात व त्यांत दंत, उत्पल, मोदक, परशु; त्रिनेत्र, सर्पाचें जानवें, एकदंष्ट्र, ऋद्धि व बुद्धि यांनीं युक्त. **रूमः** रंग ?; मूषक; हात ?; पण त्यांत दंत, परशु, पद्म, मोदक. **विधः** रंग ?; वाहन ?; ललितासन; चार हात व त्यांत अंकूश आणि गजदंत, अक्षमाला, मोदकपूर्ण पात्र, परशु; फक्त उजवीकडे दात, सोंडेमध्यें मोदकपूर्ण पात्र, व्याघ्रचर्मधारी, सर्पयज्ञोपवीत. **शिरः** सोनेरी; वाहन ?; हात ?; पण त्यांत पाश, अंकूश, वर, भक्ष्य; सोंडेंत चषक, महाकाय, एकदंत, त्रिनेत्र, नागभूषण, लहान हातपाय. **सुभेः** तांबडा; पद्मपीठ; हात ?; पण त्यांत दांत किंवा बाणाचें टोक, पाश, अंकूश, दात; सोंडेंत लाडू, करंडमुकुट.

वर दिलेल्या गणपतीच्या सामान्य वर्णनांशिवाय रूपामध्यें उच्छिष्ट, गजानन, वक्रतुंड, हेरंब व क्षिप्र असे[1] आणि शिरमध्यें बाल, बीज, महा, शक्ति व हेरंब असे पांच प्रकार दिले आहेत[2]. इहिइमध्यें[3] निरनिराळ्या ग्रंथांचे आधारें २० आणि श्रीनिमध्यें[4] ३२ गणपतिप्रकार सांगितले आहेत. पैकीं उच्छिष्ट, ऊर्ध्व, तरुण, ध्वज(व्दिज), नृत्त, पिंगल (सिद्ध), बाल, बीज (एकाक्षर, क्षिप्रप्रसाद), भक्त, भुवनेश (विघ्न), महा, लक्ष्मी, विघ्न (विजय), वीर, शक्ति, हरिद्रा, हेरंब अशीं सतरा (अठरा) नांवें दोघांना सामान्य आहेत. याखेरीज इहिइमध्यें उन्मत्त, प्रसन्न, वक्रतुंड असे तीन प्रकार आले असून श्रीनिमध्यें उद्दंड, ऋणमोचक, एकदंत, ढुंढि, त्रिमुख, त्र्यक्षर, दुर्गा, द्विमुख, योग, वर, संकष्टहर, सिंह, सृष्टि, क्षिप्र, असे चौदा प्रकार आले आहेत. यांतील प्रत्येकांचीं निरनिराळ्या ग्रंथकारांनीं दिलेलीं वर्णनें देऊं लागलों तर फारच विस्तार होईल. तेव्हां येथें त्यांची वैशिष्ट्यें नमूद करतों.

१ पान ४४ अ. २ अ. २५. ३ इहिइ १ सी ६. ४ पृ. ७८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें करतांना ज्यांच्या वर्णनांत विशेष नाहींत व यामुळें ज्यांची ओळख पटणें सहज शक्य नाहीं ते गाळले आहेत. तसेंच क्रियाक्रमोद्योत व श्रीतत्त्वनिधि यांना साधारण वर्णन असल्यास क्रियो प्रमाण धरलें आहे.

उच्छिष्ट–क्रियोः भाताचें डिखळ, डाळिंब, वीणा. **मेतः** विवस्त्र पत्नी. **उद्दंड–श्रीनिः** बारा हात; उसाचें धनुष्य, फुलांचा बाण, भाताचें कणीस; देवीस आलिंगन. **ऊर्ध्व–क्रियोः** आठ हात; उद्दंडप्रो. **तरुण–क्रियोः** आठ हात; अनरसा, कवठ, जांभळ, तीळ, वेणू. **त्रिमुख–श्रीनिः** सहा हात; तीन तोंडें, अमृतकुंभ. **दुर्गा–श्रीनिः** आठ हात; जांभूळ, धनुष्य. **द्विमुख–श्रीनिः** दोन तोंडें. **ध्वज–क्रियोः** चार तोंडें. **नृत्त–क्रियोः** सहा हात; अनरसा, कल्पलता. **पिंगल–क्रियोः** आंबा, कल्पलता, ऊस, तिळगुळाचा लाडू, श्री व समृद्धि यांसह. **बाल–क्रियोः** केळ, आंबा, फणस, ऊस, कवठ. **शिरः** कल्पलता, सोंडेंत चषक, पार्वतीच्या मांडीवर. **भक्त–क्रियोः** नारळ, गुळाची खीर. **भुवनेश–क्रियोः** दहा हात; उसाचें धनुष्य, फुलांचा बाण, कमलमंजरी. **महा–क्रियोः** आठ हात; उसाचें धनुष्य, भाताचें कणीस; देवीस आलिंगन. **मेतः** बारा हात; महाळुंग. **शिरः** दहा हात; क्रियोप्रो. **योग–श्रीनिः** ऊस, योगदंड, योगपट्ट, योगारूढ. **लक्ष्मी–क्रियोः** आठ हात; पोपट, कल्पलता, बाणकलिका, लक्ष्मी. **वर–श्रीनिः** मधुयुक्त कपाल, पुष्टीस आलिंगन, एक हात तिच्या योनीवर. **विरंचि–मेतः** दहा हात; महाळुंग. **वीर–क्रियोः** सोळा हात; वेताळ, शक्ति, मोगरा. **शक्ति–क्रियोः** दोन हात; शक्तीस आलिंगन. **शिरः** हत्तीचें मुख, स्त्रीदेह, दहा हात. **संकष्टहर–श्रीनिः** पायसपात्र, मांडीवर देवी. **सिंह–श्रीनिः** आठ हात; वीणा, कल्पलता; सिंहाचें तोंड. **हेरंब–क्रियोः** सिंह; पांच तोंडें; दहा हात. **रूपाः** उंदीर किंवा सिंह. **शिरः** तुंबरगणयुक्त.

उदाहरणें.

पेड्डु मुडियम येथील संशोधनांत पुष्कळ प्राचीन वस्तु सांपडल्या आहेत. पैकीं एक देवतापंक्तीचा दगड होय. यावर ब्रह्मा, विष्णु, रुद्र, महिषमर्दिनी इत्यादि देवतांच्या शिल्पांबरोबर अगदीं उजव्या बाजूस गणपति खोदला आहे. यास बहुधा दोन हात असून सोंड दक्षिणावर्ति आहे. ही मूर्ति पद्म-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सनावर अधिष्ठित आहे. येथें सांपडलेल्या कित्येक वस्तूंचें नागार्जुनीकोंड येथें सांपडलेल्या वस्तूंशीं पुष्कळ साम्य आहे.[1] मात्र नागार्जुनीकोंड येथील वस्तूंची सफाई वगैरे गुण विचारांत घेतां या वस्तू उपरोक्त वस्तूंहून प्राचीन असाव्या असा माझा कयास आहे. निदान या वस्तूंचा काळ सामान्यत: इ. स. आरंभींचा समजण्यास हरकत नाहीं. पेरंबैर येथें ज्या कित्येक इतिहासपूर्वकालीन वस्तु उत्खननांत सांपडल्या, त्यांतही एक काळ्या दगडाची ओबडधोबड गणेशमूर्ति आहे. हिचाही काळ असाच फार जुना म्हणजे इ. स. च्या पूर्वीचा असला पाहिजे यांत शंका नाहीं.[2] मद्रास म्यूझियमधील गणपती एका विश्वपद्मावर उभा आणि त्याच्या चार हातांत अनुक्रमें कमळाची कळी, परशु, मोडका दात व मोदक असून सोंड त्या मोदकावर ठेवलेली दिसते. गणपतीचा खुजेपणा या चित्रांत चांगला प्रतीत होतो.[3] ग्वालेर संस्थानांतील गणपती नाचत असून त्यानें आपल्या आठ हातांपैकीं दोन हात दोन्हीकडील गणांच्या डोक्यांवर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. उजव्या दोन हातांनीं परशु धरला असून एका हातांतील मोदक तोंडांत घालीत आहे. डाव्या बाजूच्या दोन हातांत अनुक्रमें मोडका दात व एक अनोळखी वस्तू असून त्या बाजूचा एक हात कमरेवर ठेविला आहे. गणपतीची घडण पाहतां ही मूर्ति निदान मध्य युगाच्या मध्यभागांतील तरी असली पाहिजे असें वाटतें.[4] नृत्त गणपतीस ग्रंथांतरीं सहा हात सांगितले असले तरी कित्येक मूर्तींना आठ किंवा दहा हातही दाखविलेले आहेत. नेपाळमधील एक हेरंब मूर्ति ग्रंथिक उल्लेखाप्रमाणें पांच तोंडें व दहा हात यांनीं युक्त असून तिचे दोन पाय अनुक्रमें सिंह व उंदीर यांवर आहेत. तिच्या दहा हातांत नेमक्या कोणत्या वस्तू आहेत हें निश्चयानें सांगतां येत नसलें तरी बहुधा त्यांत मुळा, दात, पाश, मोदक, उत्पल, वर, आलिंगन इत्यादि वस्तू व मुद्रा असाव्या असें दिसतें. हिच्या डाव्या पायाजवळ शक्ति देहुडे पायांनीं उभी आहे. हीं मूर्ती प्राचीनही नाहीं किंवा शिल्पाचा उत्कृष्ट नमुनाही नाहीं. पण हेरंब म्हणून गणपतीचा प्रकार कसा असतो हें समजावें एतदर्थ या शिल्पाचें वर्णन दिलें आहे[5].

---

१ आसइऑरि १९०५–६ पृ. १३० प्रप ५२।२. २ आसइऑरि १९०८–९ पृ. ९७ प्रप ३३. ३ मूचि ६४. ४ मूचि ६५. ५ मूचि ६६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



६५ ग्वालेर-संस्थान नृत्य गणपति



६४ मद्रास म्यूझियम गणपति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



६६ नेपाळ हेरंब

६७ तुन-हुग-आंग-चीन गणपति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिमालयालगतच्या तिबेटांत तावो (Tabo, Thabo) म्हणून एक गांव असून तेथील एका बौद्ध मठाच्या मुख्य मंडपांत कित्येक बौद्धमूर्तींबरोबर पण थोडी एका बाजूस एक गणेशमूर्ती ठेविली आहे. ही एका आसनावर बसलेली असून मागें प्रभावळ आहे. हिचा डावा हात डाव्या मांडीवर असून त्यांत लड्डुकपात्र अथवा मोदकपात्र दाखविलें आहे. उजव्या हाताची मुद्रा नीट सांगतां येत नाहीं; पण त्याचा कोपरापुढील भाग उचलून भूमीशीं समांतर केला आहे. हातांत कोणतीच वस्तु नसावी असें वाटतें. याची सोंड उजव्या बाजूस वळलेली आहे. येथील एका मंडपाच्या गणेशपट्टीवर गणेश आहे हेंही लक्षांत घेण्यासारखें आहे. वरील मूर्ती मध्ययुगीन खास आहे आणि तीही अकराव्या शतकानंतरची असूं शकणार नाहीं'.

तिबेटप्रमाणें चिनी तुर्कस्थानांतही गणेशाचीं चित्रें पहावयास सांपडतात. अशा दोन गणेशांचीं वर्णनें सेरिंदिया (Serindia) नामक सर ऑरेल स्टीन यांच्या अत्यंत मूल्यवान् पुस्तकांत आलीं आहेत. दोन्ही खोतानपासून सुमारें ७५ मैल पूर्वेस असलेल्या खाडलिक गांवीं सांपडलीं आहेत. पैकीं पहिलें भिंतीवर काढलें असून दुसरें लाकडावर चितारलेलें आहे. त्यांचीं वर्णनें अशीं—(१) तपकिरी किनारीच्या व फिकट हिरव्या लंब वर्तुळांत रंगविलेलें अर्धवट चित्र; हीन कल्पनेची व हीन कौशल्याची गणेशाकृति; कृश, कान वेढब, चेहरा हीनसंकेतयुक्त, गळयांत मुक्ताहार; त्याचे तीन हात दिसत असून त्यांत अनुक्रमें पोटाजवळ धरलेलें मोदकपूर्ण पात्र, अंकूश व मुळा या तीन वस्तु; डावा वरचा हात लुप्त; तपकिरी रंगाचें धोतर व भोन्या रंगाचें उपरणें; कांति निमगोरी; बाह्यरेखा (Out-line) काळी व तपकिरी आहे.[२] (२) उशीसारख्या आसनावर सैल मांडी घालून बसलेला; डोक्यावर पाकळयांचा मुकुट; त्यांतून कपाळावर केस आले आहेत; नीलवर्ण डोकें, दोन सरळ दात, लहान दक्षिणावर्ति सोंड, धोतराच्या घड्यांप्रमाणें घड्या असलेले व खांद्यापर्यंत लोंबणारे कान; निळें धोतर व त्यावर पांढरा किंवा फिक्या पिंगट वर्णाचा पट्टा; चार हात व त्यांत अनुक्रमें हृदयापर्यंत आलेला मुळा, चक्रासारखा वाटोळा

१ ॲन्टिक्विटीज् ऑफ इंडियन तिबेट भाग १ पृ. ३८, ४२ प्रप १७.
२ व्हॉ. १ पृ. १६७, १७७ kha, i, c, 0095 प्रप ११.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जिन्नस व एक वाटोळी वस्तु हे पदार्थ असून डावा खालचा हात मांडीवर ठेवला आहे; खालच्या दोन हातांवर उपरणें; मनगटें व घोटे यांवर दागिने; कृश व नग्न शरीर; मस्तकाभोंवती प्रभावलय; डाव्या अंगास असलेल्या गंधर्वीकडे दृष्टी; गंधर्वीचा कमरेपासून वरचा भाग सुरूप स्त्रीचा व खालचा भाग लतापत्रविस्ताराचा; गंधर्वीची दृष्टी समुन्ख व हात जोडलेले.'

मध्य आशिया व खोतान यांमध्येंही गणेशाकृति सांपडल्या असून त्यांचीं वर्णनें पुढें देत आहे. खराखोटो येथें कागदावर काढलेली गणेशाची आकृति मिळाली आहे तींत गणेशाच्या डोक्यावर नेपाळी अथवा तिबेटी टोपी आहे. कानांत लहान बाळ्या व तोंडाच्या फक्त डाव्या भागांतच एकास एक मिडलेले दोन आखूड दात आहेत. तसेंच चेहऱ्यासमोर एक फूल दाखविलें आहे.[२] खोतान शहरांत ब्रांझ पॅनेलवर मिळालेलीं गणेशाकृति उत्फुल्ल कमलावर बसलेली आहे. तिच्या उचललेल्या उजव्या हातांत एक वस्तु असून ती उजव्या पायांवर आधारलेली आहे. कदाचित् तो अंकूश असावा. डाव्या हातांतही एक वाटोळी वस्तु असून हात डाव्या मांडीवर ठेवला आहे. या आकृतीचे कान मोठे व उघडलेल्या पंखांप्रमाणें आहेत.[३] दन्दान उइलिक येथें सांपडलेली गणेशाकृति एका चौकोनी लाकडी पट्टावर रंगविली आहे. यांत गणेश सोंगट्याच्या पटासारख्या दुरंगी जमिनीवर अथवा चटईवर बसला आहे. डोक्यास रत्नखचित मुकूट व मुखाभोंवती तेजोवलय आहे. चेहरा तीन हिस्से उजवीकडे तर सोंड मात्र डावीकडे वळल्याचें दाखविलें आहे. कमरेस पंचा असून बाकीचें बहुतेक अंग उघडें आहे. कदाचित् डाव्या ऊर्ध्वांगावर पातळ उपरणें असेल. डावा हात उचलून छातीपाशीं धरला आहे.[४] एन्देर येथील अवशेषांत आढळलेली गणेशाकृति एका पट्टावर रंगविली आहे. हींत गणेश साधी मांडी घालून बसला आहे. याच्या डोक्यावर पिंवळा मुकूट आहे. तोंड तीन हिस्से उजवीकडे व सोंड (कदाचित् दात) डावीकडे वळल्याचें दाखविलें आहे. गळ्यांत मोतीहार आहे. हात चार असून, दंडांत केयूर

१ कित्ता पृ. १८५, kha, ii, 4 प्रप १४. २ सर ऑरेल स्टीनकृत इनर मोस्ट एशिया पृ. ४९८ kk,२,०३१३ इ. ३ स्टीनकृत एन्शन्ट खोतान व्हॉ. १ पृ. २२२ kh, ००७. ४ कित्ता व्हॉ. १ पृ. २५१, २९२ डी २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६८ एन्देर-चिनी तुर्कस्थान गणपति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६९



पागन–ब्रह्मदेश



गणेश व गवांपति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व मनगटांवर कंकणें आहेत. उजवा खालचा हात मांडीवर ठेवला असून त्यांत टरबूज किंवा कलिंगड यासारखें कांहीं फळ आहे. उजवा वरचा हात तळवा वर होईल अशा तऱ्हेनें उचलला असून त्यांत बाणाचें किंवा भाल्याचें टोक आहे. डावा वरचा हातही असाच उचलला असून त्यांत परशू घेतला आहे. डाव्या खालच्या हातांत छोटी तलवार असून तो डाव्या स्तनापर्यंत आणला आहे. कमरेस धोतर व त्यावर व्याघ्रचर्म आहे. पायांत घट्ट पायजामा व घोट्यांवर वाळे आहेत. पादत्राण नाहीं. मांड्यां-खालीं उशा दिल्या आहेत.'

ब्रह्मदेशापैकीं पागन येथील गणेश पद्मासन घालून बसला असून त्याचें डोकें हत्ती सारखें आणि पोट व कान मोठे आहेत. त्यास असलेल्या चार हातांत अनुक्रमें अक्षमाला, शंख, त्रिशूल आणि बिल्व अथवा महाळुंग या वस्तु आहेत. या मूर्तीचें वैशिष्ट्य म्हणजे तिच्या बैठकीच्या समोरच्या दर्शनी भागावर मगर आणि उजव्या व डाव्या दर्शनी भागांवर अनुक्रमें कूर्म व मत्स्य यांच्या आकृति आहेत. गणपतीचें वाहन जें उंदीर त्याचा कोठेंच पत्ता नाहीं[2].

येथेंच गणेशाचें एक मनोरंजक शिल्प आहे. यांत गणेश डाव्या पायाची मांडी घालून व उजवा पाय उकिडवा ठेवून बसला असून त्यानें आपलें दोन हात कपाळास लाविले आहेत आणि सोंड सरळ खालीं मोकळी सोडली आहे. गणपतीनें दुसरे दोन हात गुह्यस्थानाखालीं बैठकीवर ठेविले आहेत आणि तिसरे दोन हात दोन्ही अंगास सोडले आहेत. याच्या थेट पाठीस चिकटलेली एक मूर्ती असून तिनें आपले दोन हात आपल्या डोक्या-जवळ नेऊन त्यांत कांहीं पदार्थ धरला आहे. या जोड मूर्तीस गणेश व गवांपति असें नांव असून हिचा चेटुकांत उपयोग करतात.[3]

चीनमधील तुन–हयु–आंग येथील गणपती उजव्या पायाची मांडी घालून व डावा पाय उकिडवा ठेऊन बसला असून त्याच्या दोन हातांत

१ कित्ता पृ. ४३१, ४४२ प्र ७८; ॲलिस गेटीकृत 'गणेश' पृ. ४१ प्रप ३५. २ ब्रॅगॉव पृ. ६७ प्रप २७ एबीसी. ३ आसइॲरि १९२९–३० प्रप ४१ डी; मूचि ६९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमें परशु व मोदक आणि मोडका दात दाखविले आहेत; सोंड उजव्या हातांतील मोदकापाशीं नेली आहे. याच्या गळ्यास उपरणें व कमरेस धोतर आहे. डोक्याभोंवती प्रभावलय असून छाती थिलथिलीत व सुटलेली दिसते[1].

जावा मधील एक गणपति खुजा व आठ मुंडांच्या आसनावर बसलेला असून त्याच्या कानांत कुंडलांऐवजीं कपालें आहेत. त्यास असलेल्या चार हातांत दात, अंकूश, माला व मोदकपात्र अशा चार वस्तु आहेत. सोंडेस सुरकुत्या असून ती मोदकपात्रांत ठेवलेली दाखविली आहे. गणपतीच्या डोक्यामागें टेकणी आहे[2]. क्रतों कसेपुहन (जावा) येथें सांपडलेल्या दोन आधुनिक गणेशमूर्ति फार मनोरंजक आहेत. पैकीं एक वामावर्ति व वामावर्ति हत्तीवर स्वार झाली असून तिच्या उजव्या दोन हातांतील भाल्याइतक्या लांबीचा अंकूश मारण्याच्या वेतानें उगारला आहे असें वाटतें. डाव्या दोन हातांत काय आहे तें नीट ध्यानांत येत नाहीं. पण डावा खालचा हात सोंडेजवळ आला असल्यानें त्यांत मोदक किंवा लड्डुकपात्र असण्याचा संभव आहे. दुसरी मूर्ति वामावर्ति पण सन्मुख अशा सिंहावर उभी राहिली असून मूर्तीही वामावर्तीच आहे. तिच्या दोन हातांत अनुक्रमें अंकूश व सुरा या वस्तु आहेत आणि सोंड उचललेली आहे. पायांस मात्र पक्ष्याप्रमाणें नख्या आहेत. या दोन्ही मूर्ति अतिशय कृश तर आहेतच; पण त्यांचा एक विशेष म्हणजे त्या अरबी धर्मवचनांच्या अक्षरांचे निरनिराळे अवयव कमी जास्त लांबवून, मुरड घालून किंवा अन्य तऱ्हेनें फरक करून त्यायोगें चितारलेल्या आहेत. मुसलमानी धर्मप्रसार सामान्यतः पूर्वसंस्कृतिविध्वंसक असला तरी जेथें विध्वंसाचें काम पद्धतशीरपणें चालत नाहीं तेथें मुसलमानी धर्माचा स्वीकार झाल्यानंतरही मूळ संस्कृति कशी शिल्लक राहते याचीं या मूर्ती चांगलीं उदाहरणें आहेत[3].



१ मूचि ६७. २ आर्स एसियातिका व्हॉ. ८ प्रप २७. ३ जावा खंड १२ अं. १ पृ. ८–१० व दोन प्रप.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ जोड देव

प्रस्ताव

उपासकांना आपल्या आराध्य देवतेचें ध्यान कसें असावें हें ठरविण्याचें स्वातंत्र्य असल्यानें त्यांनीं ज्याप्रमाणें एकाच मूर्तीस दोहोंपेक्षां अधिक हात व एकापेक्षां अधिक मुखें कल्पिलीं, तद्वत् अनेक पंथ व दैवतें यांचा समन्वय करण्याच्या हेतूनें एकाहून अधिक दैवतांचीं जोड रूपेंही कल्पिलीं. अर्धनारीश्वर, हरिहर, त्रिमूर्ती, चतुर्मुखलिंग, इत्यादि वरील प्रक्रियेचीं उदाहरणेंच होत. अर्धनारीश्वर, हरिहर, चतुर्मुखलिंग यांचा शिव प्रकरणांत सहज समावेश होऊं शकला. इतर मूर्तीविषयीं तसें करणें शक्य नसल्यामुळें त्यांना या प्रकरणांत अंतर्भूत केलें आहे.

त्रिमूर्ति

शिवमूर्तिप्रकरणांत आठ विद्येश्वरांचा उल्लेख येत असून त्यांत त्रिमूर्ति नांवाचा एक आहे. पण हे सर्व एक मुखाचे सांगितले[1] असल्यानें हा त्रिमूर्तीही एक तोंडाचाच असला पाहिजे. उत्तरकामिकागमांत त्रिमूर्तीचें वर्णन आलें आहे. त्यांत शंकरास मुख्य स्थान दिलें असल्यानें तद्वर्णित त्रिमूर्तीचा शिवप्रकरणांत समावेश व्हावयास पाहिजे कीं काय अशी शंका येते. पण विष्णूस मुख्य स्थान देणारीं त्रिमूर्तिशिल्पेंही आढळत असल्यामुळें ती शंका दृढ होऊं शकत नाहीं. म्हणून मी तें वर्णन येथेंच घेतलें आहे.

उकामि (इहिइ २ बी १९८) [१] तांबडा; हात ?; पण त्यांत अभय, परशु, मृग, वरद; एक पाय; कमरेवरील भागांत डाव्या व उजव्या बाजूस अनुक्रमें ब्रह्मा व विष्णू यांचीं ऊर्ध्वांगें: अंजलिहस्त; एक पाय. [२] शिवलिंगाच्या दोन बाजूस दोघे. [३] स्वतंत्रपणें तिघे. [४] एकाच प्राकारांत तीन देवळांत तिघे. रूपा (२८ आ), रूम (१० आ): रंग व वाहन ?; एका आसनावर; सहा हात व त्यांत अक्षमाला, त्रिशूल, गदा, चक्र, खट्वांग, कमंडलु; सहा तोंडें ?. शिर (२५।७३): सोनेरी,

१ विध (चचि २।१२६).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमलावर; हात?; पण त्यांत शंख, अक्षमाला, कमंडलु, चक्र, (१,६) अमृतघट; चंद्रकला, तीन डोळे, पिवळी वस्त्रें.

कै. गोपिनाथराव यांनीं आपल्या पुस्तकांत शिवप्रमुख व विष्णुप्रमुख अशा दोन्ही त्रिमूर्तींचीं चित्रें दिलीं आहेत. शिवप्रमुख मूर्तीत मध्यभागीं एकपाद व चतुर्भुज शिव असून उजव्याडाव्या बाजूस एकपाद, चतुर्भुज, अंजलिहस्त व विशिष्ट आयुधधारी, ब्रह्मा व विष्णू आहेत. विष्णुप्रमुख त्रिमूर्तीत मध्यभागीं द्विपाद व चतुर्हस्त विष्णू असून उजव्या व डाव्या बाजूस अनुक्रमें शिव व ब्रह्मा यांचीं चतुर्हस्त ऊर्ध्वांगें आहेत.[1]

मी या पुस्तकांत त्रिमूर्तींचें असेल या समजुतीनें एक चित्र दिलें आहे. यांतील मूर्तीस तीन तोंडें व बहुधा चार हात आहेत. पैकीं दोहोंत शूल व डमरू या वस्तू असून डाव्या खालच्या हातांत फूल व उजवा खालचा अभयमुद्रेचा असावा असें वाटतें. मधल्या डोक्यावर जटामुकुट असून बाकीच्या डोक्यांवरचे मुकूट अस्पष्ट आहेत. याच्या पाठीमागें फक्त नंदी आहे; हंस व गरूड नाहींत. तेव्हां हें शिल्प त्रिमूर्तींचें नसून महेशाचें असावें असा माझा कयास आहे. मात्र चित्रावरून मूर्तीची पूर्ण कल्पना येत नसल्यामुळें निश्चयानें कांहींच सांगतां येत नाहीं[2].

कृष्णकार्त्तिकेय

रूपा (२८ अ): रंग व वाहन ?; हात ?; पण त्यांत कमळ, शक्ति, ढाल, शख.

चंद्रार्कपितामह[3]

रूपा (२८ आ): रंग व वाहन ?; सहा हात व त्यांत अक्षमाला, कमंडलू, (२–५) कमळें; चार तोंडें.

ब्रह्मेशानजनार्दनार्क

रूपा (२८ आ): समोर सूर्य: कमळ. कमळ. उवा शिव: खट्वांग, त्रिशूल.

---

१ इहिइ खंड १ प्रप एफ्. २ आसइअॅरि १९१४–१५ भाग १ प्रप १६ डी; मूचि ७०. ३ हें जोड रूप दोन देवांचें कीं तीन तें नीट समजत नाहीं; पण त्यांत सूर्य व ब्रह्मा आहेत असें आयुधांवरून निश्चयानें म्हणतां येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७० पेशावर म्यूझियम त्रिमूर्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



७१ बदामी-विजापूर महिषमर्दिनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डाबा विष्णुः शंख, चक्र. पाठीमागें ब्रह्माः अक्षमाला, कमंडलु; चार तोंडें, आठ हात.

ओसिया येथील ब्रह्मेशानजनार्दनार्काच्या मूर्तीस मध्यां तीन तोंडें आहेत. पैकीं मधल्यास मुकूट व बाजूच्यांस जटाबंध आहेत. या मूर्तीचे सर्व हात भग्न झाले असले तरी आठ हातांच्या खुणा स्पष्ट असून वरच्या हातांतील कमल, त्रिशूल, कमल, चक्र, या वस्तू स्पष्ट दिसत आहेत. मधल्या मूर्तीच्या पायांत उंच बूट आहेत आणि नंदी, हंस व घोडा हीं तीन वाहनें सुव्यक्त आहेत. यामुळें या शिल्पांत ब्रह्मा, शिव व सूर्य यांचा मिलाफ तर निश्चयानें आहे. विष्णूचें अस्तित्व कमल व चक्र या वस्तूंवरून अनुमानावयाचें आहे[१]. दिलमाळ येथील लिंबोजी माता देवळाच्या भिंतीस असलेल्या एका कोनाड्यांत अशीच एक मूर्ती आहे. ही पायांत उंच बूट घालून एका उडत्या गरुडावर बसली असून हिच्या सहा हातांत वर, कमळ, त्रिशूल, नाग, कमंडलु, या वस्तू व मुद्रा आहेत. हिचीं तीन तोंडें सुव्यक्त आहेत. आयुधें, वाहन गरूड व बाजूस असलेले हंस व नंदी यांवरून या मूर्तीत ब्रह्मा, विष्णू, महेश व सूर्य हे एकत्र केले असल्याचें स्पष्ट दिसतें[२].

८ देवी

प्रस्ताव

देवतासप्तकांत व पंचायतनांत चंडी देवीचाही समावेश केला आहे. हिलाच कात्यायनी, महिषमर्दिनी इत्यादि नांवें आहेत. आज शैव, वैष्णव, सौर, गाणपत्य इत्यादि पंथांप्रमाणें शाक्त हाही एक स्वतंत्र पंथ बनला आहे. मात्र या पंथाचें आराध्य दैवत केवळ महिषमर्दिनीच आहे असें दिसत नाहीं. देवीची उपासना करणारे अनेक लोक या पंथांत मोडत असले तरी त्यांतही दक्षाचारी व वामाचारी असे दोन वर्ग पडतात. पैकीं दक्षाचारी पंथाचे

१ आसइॲरि १९०८–०९ पृ. १११. २ आसवेइ नार्दर्न गुजरात पृ. ८९ प्रप ६९ व ७१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार सामान्य नीतीस धरून असतात तर वामाचारी लोकांचे आचार रूढ नीतिकल्पनेच्या विरुद्ध असल्यानें ते गुप्तपणें केले जातात. अशा लोकांकडे समाज शंकित दृष्टीनें पहात असतो.

शक्तिपूजा प्रथमपासूनच स्वतंत्र तऱ्हेनें उत्पन्न होऊन चालत आली आहे कीं, प्रथम पुरुषदेवतांना बायका कल्पिण्यांत आल्या व त्यांचें महत्त्व वाढत जातां जातां त्यांना स्वतंत्र अस्तित्व आलें याचा निर्णय करणें कठीण आहे. पण कित्येक देवता शिवाशीं व कित्येक विष्णूशीं संलग्न असलेल्या दिसतात; तर कित्येकांचा या दोन्ही देवतांशीं संबंध जोडला असला तरी तो अगदीं असमाधानकारक वाटतो. उदाहरणार्थ पार्वती, गौरी यांचा शिवाशीं व लक्ष्मी, भू यांचा विष्णूशीं संबंध जोडला हें ठीक आहे; पण सरस्वतीचा ब्रह्मा, विष्णू व गणपती या तिघांशीं आणि दुर्गा व महिषमर्दिनी यांचा शिव, विष्णू व इतर सर्व देवांशीं संबंध जोडला जातो तो समाधानकारक वाटत नाहीं. महालक्ष्मीचें शिव व विष्णू या दोघांशीं नातें दाखवितात; पण तेंही पटण्यासारखें नाहीं. कांहीं शाक्त तर फार पुढें गेले असून त्यांनीं शक्ति हेंच जगाचें आदिकारण ठरवून तिला महालक्ष्मी म्हटलें व तिजपासून जग उत्पन्न करून दाखविलें आहे तें असें—



महालक्ष्मीनें स्वतःचे तीन भाग करून त्या प्रत्येकानें पुन्हा स्वतःचे एक स्त्री व दुसरा पुरुष असे दोन भाग केले, त्यांचीं एकमेकांशीं लग्नें लावून दिलीं व पुढें सृष्टिविस्तार झाला'.

१ इहिइ खंड १ पृ. ३३७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मला स्वतःला या सर्व प्रवृत्तींत असें दिसतें कीं, कांहीं देवता वैदिक, कांहीं द्राविडी तर कांहीं मुंड, शबर, पुलिंद इत्यादि द्रविडपूर्व लोकांच्या असून त्या त्या देवतेच्या उपासकानें तिला सर्वश्रेष्ठत्व देण्याचा, तर कित्येकांनीं त्यांना आपल्या शैववैष्णवादी पंथांत खेचण्याचा प्रयत्न केला. यामुळें त्यांचे बाबतींत पुष्कळ घोटाळा उत्पन्न झाला आहे. तो सर्व गुंता सोडवून त्यांचीं स्वरूपें विशद करणें हें मनोरंजक असलें तरी येथें त्यास अवकाश नाहीं. तेव्हां आपण एक एक देवता घेऊन तिजविषयीं विवेचन करूं या.

पार्वती

अमरकोशांत व त्याबरील क्षीरस्वामीच्या टीकेंत मिळून हिचीं २४ नावें दिलीं आहेत. पैकीं हैमवती, पार्वती, आर्या, दाक्षायणी, सती वगैरे नांवें तिची जन्मकथा सांगतात; तर शिवा, भवानी, रुद्राणी, मृडानी, इत्यादि ती शिवाची बायको असल्याचें दर्शवितात. उलट कात्यायनी, दुर्गा, चंडिका, अंबिका यासारखीं नांवें तिनें राक्षसांचा नाश करण्यासाठीं घेतलेल्या रूपांकडे लक्ष खेचतात. या रूपाचा स्वतंत्र विचार पुढें आला आहे. सध्या आपण येवढेंच लक्षांत ठेवावयाचें आहे कीं, अमरांत महिषमर्दिनी हें पार्वतीचेंच रूप आहे असें गृहीत धरलें आहे. वैदिक वाङ्मयांत पार्वतीचीं अंबिका, उमा, हैमवती व पार्वती हीं नांवें आलीं आहेत[1]; पण कोणत्याही ठिकाणीं ती शिवपत्नीवाचक नाहींत. मात्र पौराणिक वाङ्मयांत हीं व गौरी वगैरे आणखी कित्येक शिवपत्नीवाचक आहेत.

पार्वतीचीं स्वतंत्र देवळें उभारल्याचें आढळत नाहीं. बहुधा ती शंकराच्या संगतीनें आढळते. देऊळ शिवलिंगाचें असेल तर पार्वती कधीं कधीं गाभाऱ्याच्या मागील भिंतींत कोनाड्यांत बसविलेली असते. शिवानें निरनिराळ्या वेळीं भिन्न रूपें धारण केलीं असल्यानें त्याच्या बायकोच्या रूपांतही त्या त्या वेळीं कमी जास्त फरक पडला आहे. यामुळें ग्रंथांतरीं तिच्या रूपाचीं अनेक वर्णनें आलीं आहेत. पैकीं कांहीं शिव या प्रकरणांत आलीं असून बाकीचीं येथें दिलीं आहेत. हीं वर्णनें तपासतांना पार्वतीचा प्रांत सरून दुर्गेचा प्रदेश कोठें सुरू होतो हें नीट समजत नाहीं. मी सिंहवाहनी सर्व रूपांना दुर्गा सदरांत घातलें आहे. पण क्वचित् विपर्यय झाला असण्याचा संभव आहे.

१ हेंच पुस्तक पृ. ८२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपु (५२।१४): **गौरी**–रंग ?; दोन हात व त्यांत शूल, दर्पण; तीन डोळे. **अभे** (४८।९०): सांवळा; पद्मपीठ; हात ?; पण त्यांत तांबडें कमळ, अभय, वर, टंक, शूल; पिवळें वस्त्र, तीन डोळे, आजानु बाहु. **उकामि** (इहिइ १ सी १०४): सावळा, पांढरा, तांबडा; देवाच्या मांडीवर उभी, बैठी, ललितासन; सरळ, द्विभंग, देवासह, एकटी. [१] चार हात व त्यांत अभय, पाश, अंकूश, वर; तीन डोळे, करण्डमुकुट, रेशमी वस्त्र. [२] सोनेरी; दोन हात व त्यांत प्रलंबित, पद्म. [३] सहा हात व त्यांत शुक, उत्पल, शूल, पाश, शंख, चक्र. [४] **मनोन्मनी**–दहा हात, पांच तोंडें, विक्राळ दाढा. **देपु**: [१] (इइ ६३): **गौरी**–कमळ; हात ?; पण त्यांत अक्षमाला, कमंडलु. [२] (चचि २।९०): **शिवा**–रंग ?; बैल; हात ?; पण त्यांत अभय, सर्प, डमरू, त्रिशूल, वर; त्रिनेत्र. **पूका** (इहिइ १ सी १०५): सांवळा; वाहन ?; दोन हात व त्यांत कटक किंवा उत्पल, लांबवलेला; रेशमी वस्त्र, करंडमुकुट. **मासा** (अ. ५३ पृ. ७६): सांवळा; वाहन ?; दोन हात व त्यांत उत्पल, वर; पिवळें वस्त्र. **विशा** [१] (चचि २।८१): **अम्बा**–पांढरा; हात ?; पण त्यांत अभय, पाश, कमळ व कमंडलु. [२] (चचि २।८६): **उमा**–द्वादश गौरींतल्याप्रमाणें; पण वाहन ?. [३] (चचि २।८१): **गौरी**–रंग ?; कमलासन; दोन हात व त्यांत अभय, वर; कुमारिकारूप. [४] (चचि २।८६): **पार्वती**–द्वादश गौरींतल्याप्रमाणें; पण वाहन ?. **शिरः** [१] (२४।६०) तांबूस; तांबडें कमळ; हात ?; पण त्यांत अभय, अंकूश, पाश, कपाल; डोक्यावर चंद्रकोर, मत्त डोळे. [२] (२४।६१, ६२): तांबूस; सिंहासनावरील कमळ; हात ?; पण त्यांत अभय, पाश, कल्पकता, कपाल; तीन डोळे, समुद्रांतील वेटावर मंडपांत. **सुभे** (इहिइ १ सी १०४): सांवळा; वाहन ?; दोन हात व त्यांत कमळ, पसरलेला; किरीट.

शिवाय गौरी सदराखालीं रूपमंडनांत[1] हिचीं सहा व रूपावतारामध्यें[2] बारा रूपें सांगितलीं असून त्यांचीं सामान्य लक्षणें गोधासन, चार हात, तीन डोळे व आभरणें अशीं आहेत. फक्त रंभेस गजासन सांगितलें आहे. बारा प्रकारांचीं नांवें व आयुधें वगैरे तपशील असा–(१) **उमा**: अक्षसूत्र, कमल, दर्पण, कमंडलु. (२) **पार्वती**: अक्षमाला, शिव, गणपति, कमंडलु;

१ पा. १४ आ. २ पा. ४२ आ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन्ही बाजूंस अग्निकुंडें. (३) **गौरीः** अक्षसूत्र, अभय, पद्म, कमंडलु. (४) **ललिताः** अक्षमाला, वीणा, वीणा, कमंडलु. (५) **श्रियाः** अभय, अक्षमाला, पद्म, वर. (६) **कृष्णाः** अंजलि, अक्षमाला, कमंडलु, अंजलि; कुंडांत पंचाग्नि. (७) **हिमवंतीः** पद्म, दर्पण, ?, ?. (८) **रंभाः** अक्षमाला, वज्र, अंकुश, कमंडलु. (९) **सावित्रीः** अक्षमाला, पुस्तक, पद्म, कमंडलु; चार तोंडें. (१०) **त्रिखंडाः** अक्षमाला, वज्र, शक्ति, कमंडलु. (११) **तोतलाः** गोरी; शूल, अक्षमाला, दंड, चौरी. (१२) **त्रिपुराः** अभय, अंकुश, नागपाश किंवा पाश, वर.

पुणें येथील रे म्यूझियममधील पार्वती उभी असून तिच्या हातांत अनुक्रमें अक्षमाला, सयोनि लिंग, भद्रासनी गणपति व कमंडलु या वस्तू आहेत. तिच्या डोक्यास एक प्रकारची टोपी, कानांत कर्णफुलें, गळ्यांत माला, हातांत कंकणें, कमरेस लुगडें आणि घोट्यावर वाळे हे दागिने व वस्त्रें आहेत. हिचें वाहन मात्र सिंह दाखविलें आहे. ही मूर्ति जुनीहि नाहीं किंवा तीमध्यें शिल्पाचें सौन्दर्यहि नाहीं; पण द्वादश गौरीमधील पार्वतीचें स्वरूप कसें असतें हें समजावें एवढ्यासाठीं तिचें चित्र दिलें आहे.[1] महास्थान (बोग्रा) येथील पार्वतीचे बैठकीच्या दर्शनी भागांत तिचें वाहन घोरपड कोरलें असून बैठकीवरील विश्वपद्मावर गौरीचे पाय आहेत. मूर्तीचा वरचा भाग भग्न झाला आहे. हिच्या दोन बाजूंस अनुक्रमें सिंहवाहनी, द्विभुज, आंबा व भाला घेतलेला कार्त्तिकेय आणि अक्षमाला, कमल, मोदकपात्र व अंकुश घेतलेला चतुर्भुज, मुंगुसवाहनी गणपति उभे आहेत. हिला आर्किऑलॉजीच्या रिपोर्टांत चंडी म्हटलें आहे; पण तीस गौरी म्हटलें पाहिजे हें 'गोधासना भवेद्गौरी' या वचनावरून उघड होतें. शिल्पाची घडण मात्र उत्कृष्ट आहे[2].

भू

वास्तवीक भूदेवीला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. ती नेहमी विष्णूच्या बरोबर श्रीदेवी असेल तर खोदलेली असते. विष्णु नुसता किंवा केवळ श्री किंवा लक्ष्मी इजसह आढळेल; पण केवळ भूदेवीसह सहसा मिळणार नाहीं. हिचें कोणतेंही शिल्प घेतलें तरी त्यांत मध्यें विष्णु आणि त्याच्या उजव्याडाव्या

१ मूचि ७३. २ आसइअॅरि १९२८–२९ प्रप ४२ इ; मूचि ७४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंगास बहुधा अनुक्रमें श्री व भू आणि क्वचित् भू व श्री असतात. यावरून भूदेवीस विष्णूच्या कनिष्ठ पत्नीचें स्थान आहे हें उघड ठरतें. विष्णूकडे पृथ्वीच्या पालनाचें काम पुराणकर्त्यांनीं सोंपविलें तेव्हांपासून प्रथम ती त्याची तावेदारीण व पुढें त्याची बायको बनली. कदाचित् पृथूच्या कथेवरून तीस विष्णुपत्नी बनविलें असणें शक्य आहे. पण हें होण्याच्या पूर्वीच पुराणकर्त्यांनीं विष्णूस लक्ष्मी किंवा श्री नांवाची एक बायको कल्पिली होतीच. यामुळें भूदेवीस कनिष्ठ पत्नीचें स्थान मिळालें. ती विष्णूच्या उजव्या बाजूस असल्यास तेथें दुर्लक्ष, अज्ञान किंवा वादग्रस्तता संभवते. हिचीं कांहीं वर्णनें पुढें दिलीं असून अधिक वर्णनांसाठीं विष्णु, साधारण विष्णु, वराह, अनंत हीं सदरें पहावीं.

अभे (इहिइ १ सी १३८): निळा; पद्मासन; दोन हात; पण त्यांत पद्म किंवा उत्पल, ?; उभी किंवा बसलेली, करंडमुकुट, पिवळें वस्त्र. **पूका** (इहिइ १ सी १३९): सावळा; वाहन ?; दोन हात; पण त्यांत कमळ (उत्पल), ?; सोन्याचें जानवें, तांबडें वस्त्र, करंडमुकुट. **मासा** (अ. ५३ पृ. ७६) श्याम; वाहन ?; दोन हात व त्यांत उत्पल, वर; मकरकुंडलें. **विध** (अ.६१,६५,७९, ८५): [१] पोपटी, शुभ्र; दिग्गज; चार हात व त्यांत रत्नपात्र, धान्यपात्र, औषधीपात्र, कमळ; सौम्यमूर्ति, शुभ्र वस्त्र. [२] शेषाच्या मधल्या फणेवर. [३] रंग ?; वाहन ?; दोन हात; नमस्कार करणारी, शेषाच्या पाठीवरील वरहाच्या डाव्या हाताला धरणारी. [४] पिंगट; वाहन ?; हात ?; वासुदेवाच्या दोन्ही पायांमध्यें, त्रिवळी. **शिर** (२४।६८): श्याम; कमलासन; हात ?; पण त्यांत नीलोत्पल; चित्र वस्त्र, रत्नखचित मुकूट.

महालक्ष्मी

ह्या देवतेचा विष्णूशीं किंवा शिवाशीं किती संबंध आहे तें समजत नाहीं. हल्लीं ज्या मूर्ती सांपडतात किंवा ग्रंथिक वर्णनें मिळतात त्यांत दोन्ही लक्षणें आहेत. मला वाटतें ही शक्तिपंथांतील एक स्वतंत्र देवता आहे. पण तिच्या पूजकांनीं स्वमनःप्रवणतेमुळें तिच्या ठिकाणीं शैव किंवा वैष्णव चिन्हें कल्पिलीं. रूपावतारांत हिचा सरस्वतीच्या बारा व दुर्गेच्या नऊ प्रकारांत समावेश केलेला आहे. यावरूनही वरील गोष्टच सिद्ध होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar



७२ भुमरा–मध्य भारत महिषमर्दिनी



७३ रे म्यूझियम–पुणें पार्वती

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

महास्थान-बोग्रा चंडी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिचे मुख्य स्थान कोल्हापूर हें आहे. हिच्या विस्तृत विवेचनासाठीं सह्याद्री मासिक जानेवारी १९३६ चा अंक पहावा.

मापुः सोनेरी; वाहन ?; हात ?; पण त्यांत महालुंग, गदा, ढाल, पानपात्र. **मासा** (अ. ५३ पृ. ७५): सोनेरी; वाहन ?; चार हात व त्यांत पद्म किंवा अक्षमाला, अभय, डिंडिम, उत्पल किंवा पद्म. **रूपा** व **रूमः** विशाप्रमाणें. **विशा** (चचि २।७८): कोल्हापुरांत–रंग ?; वाहन ?; हात ?; पण त्यांत कंमडलु, गदा, ढाल, श्रीफल; डोक्यावर लिंग; इतरत्र–लक्ष्मी प्रमाणें. **स्तोत्रमुक्ताहारः** रंग ?; गरूड; हात ?; पण त्यांत शंख, चक्र, गदा[1].

कोल्हापूर येथील महालक्ष्मीच्या चार हातांत अनुक्रमें महालुंग, गदा. ढाल आणि कमंडलु या वस्तु असून तिच्या डोक्यावर योनीसह लिंग, आहे. देवीच्या मागें सिंह आहे असें म्हणतात; पण मला तो ओळखूं आला नाहीं. मिरज येथें मिरजा देवीच्या देवळांत एक महालक्ष्मीची मूर्ती आहे. तिच्या चार हातांत अनुक्रमें गदा, चक्र, शंख व करंडा या वस्तु आहेत. म्हैसूर संस्थानांतील गद्दवळळी गांवीं एक महालक्ष्मीचें देऊळ आहे. त्या मूर्तीच्या चार हातांत अभयमुद्रेसह अक्षमाला, शंख, चक्र व महालुंगासह गदा या वस्तू आहेत[2].

महिषमर्दिनी

देवतासप्तक किंवा देवतापंचायतन यांत हिचा समावेश केला आहे. अमरकोशाचे काळांत व त्या पंथाचे लोक ही पार्वतीचेंच एक रूप मानीत असें दिसतें. उलट महाभारताचें विराटपर्व व हरिवंश यांत ही कृष्णाची बहीण व यशोदेची मुलगी सांगितली आहे. अचिमध्यें हिला शिवनारायणात्मिका म्हटलें आहे. मपुमध्यें ही तिन्ही देवांची बनली असल्याचें नमूद आहे आणि मार्कंडेय पुराणांत तर ही सर्वच देवांच्या अंशांपासून तयार झाल्याचें विधान आहे. महाभारत, हरिवंश व मार्कंडेय पुराण यांत हिला दारू, मांस व पशु प्रिय असून ही मुंडमाला, व्याघ्रचर्म, खट्वांग इत्यादि धारण करते असें सांगितलें असल्यानें मला वाटतें कीं, ही प्रथम अनार्य देवता असावी.

---

१ याशिवाय श्रीनिमध्यें (पृ. २४) आठ महालक्ष्मीचीं रूपें सांगितलीं आहेत. पण तीं इतकीं महत्त्वाचीं नसल्यानें येथें दिलीं नाहींत.
२ सह्याद्रि मासिक १९३६ जानेवारी पृ.२४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण आर्यांनीं तिचा स्वीकार केल्यावर तिजकडे असुरवधाचें काम सोंपविलें जाऊन तिला महिष, चंड, मुंड, शुंभ, निशुंभ वगैरे राक्षस मारण्याचें श्रेयही मिळालें. पण याचा दुसरा परिणाम म्हणजे प्रत्येक पंथांतील लोक हिला आपल्याकडे ओढूं लागले आणि ती कोणत्या पंथाची असावी याबद्दल ग्रंथकारांत मतभेद उत्पन्न झाले. मला मात्र असें वाटतें कीं, हिचा स्वतंत्र पंथच कल्पिणें बरें.

आर्यांनीं हिचा स्वीकार नेमका केव्हां केला हें सांगणें कठीण आहे. वैदिक वाङ्मयांत हिचा उल्लेख नाहीं; पण बोधायनगृह्यशेषसूत्रांत दुर्गेचा कल्प सांगितला असल्यानें त्या वेळीं हिचा स्वीकार झाला होता हें उघड आहे. महाभारतापासून तर हिचे अनेक उल्लेख मिळतात. हिचें महत्त्वही तेव्हांपासून आज तागायत एकसारखें वाढतच आलें आहे.

हिच्या मूर्ती व त्यांवरील देवळें शेकडों ठिकाणीं स्वतंत्र तऱ्हेनें किंवा इतर देवतांच्या संगतीनें स्थापन केलेलीं आढळतील. पंचायतनांत प्राकारांत मध्यभागीं हिचें मोठें व आग्नेयादि चार दिशांस अनुक्रमें शंकर, गणेश, सूर्य व विष्णु यांचीं लहान देवळें उभारतात.

ग्रंथांतरीं हिला दुर्गा, चंडी, महिषमर्दिनी, कात्यायनी, इत्यादि अनेक नांवें दिलीं असून वर्णनेंही अनेक प्रकारचीं मिळतात. सोईच्या दृष्टीनें त्यांचे दोन गट करणें अगदीं आवश्यक आहे. पैकीं दुर्गेच्या गटांत मी तिचीं राक्षसवधास निघण्यापूर्वीचीं व वधानंतरचीं रूपें घातलीं आहेत. महिषमर्दिनी गटांत फक्त राक्षसवधप्रसंगाचीं वर्णनें टाकलीं आहेत.

अपु (५२।१५): **ललिता**—रंग व वाहन ?; पद्म; चार हात व त्यांत त्रिशूल, कमंडलु, कमंडलु, वर; बाजूस स्कंद व गणपति. **अभे** (४९): सावळा; पद्मपीठ; चार हात व त्यांत अभय, चक्र, शंख, कटक; तीन नेत्र, पिवळें वस्त्र. **पूका** (इहिइ १ सी १०६): वर्ण ?; महिषमस्तक; [१] आठ हात व त्यांत शूल, तलवार, बाण, चक्र, पाश, ढाल, धनुष्य, शंख. [२] चार हात व त्यांत अभय, चक्र, शंख, वर. **मदी** (चचि २।८९): **अंबिका**—रंग ?; सिंह; चार हात व त्यांत वर, खड्ग, ढाल, आरसा; तीन डोळे. **विशा**:[१](चचि २।८०) **दुर्गा**—वर्ण ?; सिंह; दहा हात व त्यांत शक्ति, बाण, शूल, तलवार, चक्र, चंद्रबिंब, ढाल, कपाल, शूल, चक्र. [२]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२।८१): **सर्वमंगला**–रंग?; सिंह; चार हात व त्यांत अक्षमाला, कमल, शूल, कमंडलु. **शिर** (२४।१,२): सावळा; सिंह; तीन डोळे, पिवळें वस्त्र. चार हात व त्यांत [१] चक्र, बाण, धनुष्य, वर. [२] अभय, चक्र, शंख आणि वर. **श्रीनि** (पृ. १४): **चंडिका**– शुभ्र; सिंह; हात?; पण त्यांत वर, शूल, कात्री, पाश, कमंडलु, अभय; तीन डोळे. **ससू** (७७।५४): रंग?; सिंह; हात?; पण त्यांत शूल, परिघ, पट्टिश, ध्वज, ढाल, कटयार, घंटा; पिवळीं वस्त्रें. **सुभे** (४६): सावळा; महिषमस्तक, कमल, सिंह; आठ किंवा चार हात व त्यांत चक्र, बाण, तलवार, शूल, पाश, ढाल, धनुष्य, शंख.

अग्निपुराण, भविष्यपुराण व विश्वकर्मशास्त्र यांत नऊ दुर्गा व त्यांचे रंग सांगितले आहेत ते असे[1]–(१) रुद्रचंडा (लाल), (२) प्रचंडा (तेजस्विनी), (३) चंडोग्रा (तांबूस), (४) चंडनायिका (पांढरा), (५) चंडा (निळा), (६) चंडवती (पांढरा), (७) चंडरूपा (धुरकट), (८) अतिचंडिका (पिवळा), (९) उग्रचंडा (पांढरा). यांचें वाहन महिष असून (विशा) यांपैकीं एकीला म्हणजे बहुधा पहिलीस अठरा हात व बाकीच्यांना सोळा हात सांगून त्यांतील आयुधें पुढीलप्रमाणें दिलीं आहेत–शक्ति, मुद्गर, शूल, वज्र, खड्ग किंवा शंख, बाण, अंकूश भाला, चक्र, पाश, डमरू, ध्वज, धनुष्य, तर्जनी मुद्रा, आरसा, घंटा, ढाल, राक्षसाचे केस. ज्यांना सोळा हात आहेत त्यांच्या जवळ भाला किंवा डमरू व बाण नाहींत असें समजावें. रूपमंडनांत महालक्ष्मी, क्षेमंकरी व हरसिद्धि अशा तीन व रूपावतारांत पुढील नऊ दुर्गा सांगून त्यांच्या हातांतील आयुधें दिलीं आहेत तीं अशीं[2]–(१) **महालक्ष्मी** (नीलकंठी): वर, त्रिशूल, ढाल, कमंडलु. (२) **नंदा**: अक्षमाला, खड्ग, ढाल, कमंडलु. (३) **क्षेमंकरी**: वर, त्रिशूल, पद्म, कमंडलु. (४) **सर्वती**: कमंडलु, चक्र, ढाल, कमंडलु. (५) **महारंडा**: तलवार, त्रिशूल, घंटा, कमंडलु. (६) **भ्रमणी**: तलवार, पाश, डमरू, ढाल. (७) **सर्वमंगला**: अक्षमाला, वज्र, घंटा,

१ अ. ५०; इहिइ १ सी ११५; चचि २।८४; भविष्यपुराण व विशामधील वर्णनें एकरूप आहेत. २ पा. १६ आ; ४६ अ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमंडलु. (८) रेवतीः दंड, त्रिशूल, खड्ग, कमंडलु. (९) हरसिद्धिः कमंडलु, तलवार, डमरू, कमंडलु.

याशिवाय श्री. गोपिनाथराव यांनीं आपल्या ग्रंथांत निराळ्या नऊ दुर्गा सांगून त्यांचीं वर्णनेंही दिलीं आहेत.[1] हीं त्यांस एकत्र मिळालीं कीं त्यांनीं एकत्र केलीं ? बहुधा एकत्र केलीं असावीं. कारण यांतील पहिलीं तीन नांवें रूपावतारांतील नवदुर्गांमध्यें आणि रूपमंडनांतील दुर्गात्रयांत आलीं आहेत. बाकीचीं सहा त्यांनीं श्रीतत्त्वनिधींतून स्पष्टपणें उचललेलीं दिसतात.[2] पहिल्या तिहींचीं वर्णनें वर येऊन गेलीं आहेत. श्रीनिमधील सहांचीं वर्णनें येथें देतों.

(४) रुद्रांशदुर्गाः सिंह; शूल, खड्ग, शंख, चक्र. (५) वनदुर्गाः चक्र, खड्ग; बाण, शूल, तर्जनी मुद्रा, धनुष्य, ढाल, शंख. (६) अग्निदुर्गाः चक्र, खड्ग, बाण, अंकुश, पाश, तर्जनी, ढाल, वर; त्रिनेत्र. (७) जयदुर्गाः सिंह; चक्र, खड्ग, त्रिशूल, शंख; त्रिनेत्र. (८) विंध्यवासिनी दुर्गाः सुवर्ण; कमलासन; अभय, चक्र, शंख, वर; त्रिनेत्र. (९) रिपुमारिणीदुर्गाः त्रिशूल, तर्जनी मुद्रा.

याखेरीज श्रीनिमध्यें (पृ. १४) नऊ अगदीं भिन्न श्यामवर्णी दुर्गा लक्षणांसह सांगितल्या आहेत त्या अशा– (१) शैलपुत्रीः बैल; शूल; अर्धचंद्र. (२) ब्रह्मचारिणीः अक्षमाला, कमंडलु. (३) चंडखंडः अंडजा(मासा, साप, सरड वगैरे) वर बसलेली. (४) स्कंदः सिंहासन; कमल, कमल. (५) कूष्मांडः रक्तानें माखलेला दारूचा कलश घेतलेली. (६) कात्यायनीः सिंह, बाण; तलवार. (७) कालरात्रि (८) महागौरीः पांढरा हत्ती; पांढरीं वस्त्रें. (९) सिद्धिदायिनी.

तिरुत्तनी येथील दुर्गा उभी असून तिच्या चार हातांत अनुक्रमें अभय, परशु, शंख, कटयवलंबित या वस्तु व मुद्रा आहेत. डोक्यावर मुकूट (गोट असलेली वासुदेवी टोपी), कानांत कुंडलें, गळ्यांत वाटोळे कंठे, बाजूवीर, दंडांत अंगद, मनगटांवर चार कंकणें, कमरेस लंगोटवजा वस्त्र व त्यावर थोडी सैल व एक पदर मांडीवर लोंबत असलेली मेखला, मेखलेचीं टोकें कमरेच्या दोन्ही बाजूस लोंबणारीं असा दागिन्यांचा प्रकार आहे.

१ इहिइ खंड १ पृ. ३४२, परिशिष्ट सी १०७. २ पहा पृ. १६, २४, २६, २७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चक्र काटकोनांत व शंख पोकळ भाग पुढें केलेला आहे.[१] मध्य आशियांत एका देवीचें एक रूप आढळलें असून तें दुर्गेचें असावें अशी शंका येते. यांत देवी एका वाममुखी मगरीवर बसली असून तिच्या डोकीचे केस खांद्यांवर पडले आहेत. ती एकावर एक दोन वस्त्रें नेसली असून तिच्या कमरेस पट्टा आहे. तिच्या डाव्या हातांत द्विपुच्छ पताका आहे. सर्पाचें स्वरूप सिंहासारखें असून त्याच्या उघड्या जबड्यांतून जिभेचा विस्तार बाहेर आला आहे. शेपटीलाही विस्तार असून जाडजूड आयाळ व पुढच्या पायांना नख्या आहेत.[२]

महिषमर्दिनी

अचि (३।१।८०३): अतसीपुष्पवर्ण; पायाखालीं महिष; दहा हात व त्यांत त्रिशूल, खड्ग, शक्ति, चक्र, धनुष्य, पाश, अंकूश, ढाल, घंटा, परशु. अपु: उपा: विच्छिन्न महिष, डापा: सिंह; [१] (५०।१): वीस हात व त्यांत शूल, तलवार, शक्ति, चक्र, पाश, ढाल, आयुध, अभय, डमरू, शक्ति, नागपाश, ढाल, परशु, अंकूश, पाश, घंटा, आयुध, गदा, आरसा, मुद्गर; तीन डोळे. [२] (५२।१६): सिंह; दहा हात व त्यांत तलवार, शूल, चक्र, शक्ति, नागपाश, ढाल, अंकूश, परशु, धनुष्य, ?. समोरील महिषाला शूल मारला आहे. चंडीकल्प (श्रीनि पृ. ३): महालक्ष्मी—तांबूस; कमल; हात ?; पण त्यांत अक्षमाला, परशु, गदा, बाण, वज्र, पद्म, धनुष्य, कमंडलु, दंड, शक्ति, खड्ग, ढाल, कमळ, घंटा, सुरापात्र, शूल, पाश, सुदर्शन; रेड्यास मारणारी. मपु (२६०।५५) व रूपा, रूम (५० आ, १७ अ): अचिप्रमाणें; फक्त आयुधक्रम भिन्न. रूपा (४९ अ): विशाप्रो. विशा (चचि २।७९): पिवळा; खालीं छिन्न महिष मस्तक; वीस हात व त्यांत शूल, खड्ग, शंख, चक्र, बाण, शक्ति, वज्र, अभय, डमरू, छत्र, नागपाश, अंकूश, ढाल, कुठार, धनुष्य, घंटा, ध्वज, गदा, आरसा, मुद्गर.

भुमरा (मध्य भारत) येथील महिषमर्दिनी उजवा पाय रेड्याच्या

---

१ मेंआसइ क्र. ४० प्रपं १९ बी. २ सेरिंदिया (Serindia) पृ. ५०, १०३; येथें देवीला एकंदर हात किती व त्या हातांत कोणत्या वस्तू आहेत याचा खुलासा नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मस्तकावर ठेवून प्रत्यालीढ पद्धतीनें उभी आहे. तिच्या चार हातांत रेड्यास मारलेला त्रिशूल, तलवार, ढाल आणि रेड्याचें शेपूट या वस्तु आहेत. तिच्या डोक्यास केंसांचा टोप, गळ्यांत कंठा, मनगटांवर कंकणें व कमरेस सवस्त्र मेखला हे दागिने आहेत आणि उजव्या बाजूस एक टोप घातलेला गण उभा आहे.[१] बदामीच्या गुहेंतील महिषमर्दिनी प्रत्यालीढ पद्धतीनें उजवा पाय महिषाच्या डोक्यावर देऊन उभी असून तिच्या चार हातांत अनुक्रमें त्रिशूलयुक्त भाला, सुरी, शंख व महिषाचें शेपूट या वस्तू आहेत. भाला महिषाच्या मानेंतून आरपार गेला आहे व शेपूट धरून महिषाचा मागचा भाग उचललेला आहे. देवीच्या अंगावर किरीट, कुंडलें, अंगद, मोती व सोनें यांचीं कंकणें, ३ कंठे, चन्नवीर, सवस्त्र मेखला हे दागिने आहेत. बदामी शिल्पांतील मूर्तीचे चेहरे सुंदर नसतात त्याप्रमाणें हिचाहि नाहीं. पण उभे राहण्याची, भाला मारण्याची व शेपटी धरण्याची ऐट बाखाणण्यासारखी आहे.[२]

श्री व लक्ष्मी

ही ऐश्वर्य, समृद्धि, सौंदर्य इत्यादींची देवता असल्याची समजूत आहे. हिच्या मूर्ती विष्णूच्या संगतीनें अथवा स्वतंत्र अशा दोन्ही तऱ्हेनें आढळतात. विष्णूबरोबर भूदेवी किंवा सरस्वती असल्यास ही अवश्य असते व तेव्हां हिला बहुधा श्री हें नांव देतात. विष्णूच्या संगतींत ही एकटीच असेल तेव्हां हिला लक्ष्मी असें म्हणतात. स्वतंत्र असेल तेव्हां हिला लक्ष्मी किंवा श्री या दोन्ही नांवांनीं संबोधीत असले तरी प्रत्येक नांवाच्या वेळीं तिचें रूप भिन्न असतें. पैकीं श्रीच्या मूर्ती अनेक सांपडतात तशा लक्ष्मीच्या मिळत नाहींत. त्या बऱ्याच दुर्मीळ आहेत. लक्ष्मी विष्णूची ज्येष्ठ पत्नी म्हणून प्रसिद्ध आहे. अर्थाच्या दृष्टीनें श्री व लक्ष्मी या एकच होत. मग त्यांच्या शिल्पांत फरक कां पडावा हें समजत नाहीं. श्रीशिल्पांत दोन प्रकार होतात. विष्णूबरोबर असल्या वेळचा प्रकार सामान्य आहे. पण स्वतंत्र प्रकारांत बरेंच वैशिष्ट्य आहे. या प्रकारांतील शिल्पाची उत्पत्ति व उत्क्रांति कशी झाली हा मोठा वादग्रस्त पण मनोरंजक प्रश्न आहे. डॉ.

१ मेआसइ क्र. १६ पृ. १३ प्रप १४ बी; मूचि ७२. २ मेआसइ क्र. २५ पृ. ४ प्रप २ बी; मूचि ७१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



७५ महाबलिपुरम्-चिंगलपुट श्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



७६ हावेरी-धारवाड सप्त माता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फूशे यांचें म्हणणें असें कीं, तें बुद्धजन्माच्या शिल्पांतून उत्पन्न झालें. मला वाटतें कीं, त्याची कल्पना वैदिक आहे व बौद्धांनीं ती उसनी घेतली. तें कांहींही असो. या परिस्थितीमुळें श्री किंवा लक्ष्मी हिचीं अनेक वर्णनें मिळतात येवढें खरें[1].

विष्णूसह लक्ष्मी–अपु (५०।१५): रंग ?; हात ?; पण त्यांत कमळ, श्रीफळ. **अभे** (४८।११७): सोनेरी; पद्मासन; दोन हात व त्यांत कमळ, श्रीफल; लाल डोळे, अलंकारयुक्त. **पुका** (इहिइ १ सी १३५): शुभ्र; पद्मासन; हात ?; पण त्यांत श्रीफल, कमळ; अलंकारयुक्त. **रूपा** (४९ आ): विध १ प्रमाणें. **विध** [१] (८२): गोरी; विष्णूजवळ; दोन हात; पण त्यांत कमल, ?; शुभ्रवस्त्र, अलंकारयुक्त. [२] (८५): रंग ?; विष्णूच्या डाव्या मांडीवर किंवा शेषावर; दोन हात व त्यांत कमळें; शुभ्र वस्त्र. [३] (८५): गरुडावर बसलेली किंवा डाव्या मांडीवर बसलेली. **ससू** (७७।५०): श्वेत; दोन हात व त्यांत कमळ, कमरेवर; श्वेतवस्त्र, प्रसन्नमुख, अलंकारयुक्त, युवती.

एकटी लक्ष्मी–अपु: [१] (४९।३०) रंग ?; वाहन ?; आठ हात व त्यांत धनुष्य, गदा, बाण, कमळ, चक्र, शंख, मुसळ, अंकूश. [२] (५०।२०) रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत चक्र, शंख, कमळ, गदा. **रूम** (१७ आ): रंग ?; सिंहासन, कमळ; विनायकाप्रमाणें बसलेली; चार हात व त्यांत महाळुंग, कमळ, कमळ, अमृतघट. **विध** (८२): [१] गोरी; कमलांत बसलेली; चार हात व त्यांत सनाल कमल, बिल्वफल, शंख, अमृतघट; मागें घटरहित दोन हत्ती, डोक्यावर कमळ. [२] गोरी; कमळावर उभी; दोन हात व त्यांत शंख, पद्म; डोक्याजवळ दोन्ही बाजूंस दोन उडते विद्याधर; त्यांचे उजवे हात त्यांच्या डोक्यावर व डाव्या हातांत खड्ग; तिच्या जवळ राजश्री, स्वर्गलक्ष्मी, ब्राह्मी लक्ष्मी व जयलक्ष्मी. **शिर** (२४।६३): गोरी; तांबडें कमलासन; हात ?; पण त्यांत कमल, वर, अभय, कमल; अलंकारयुक्त.

श्री–आचि (३।१।८३८): गोरी; पद्मासन; हात ?; पण त्यांत श्रीफल,

---

१ एतद्विषयक सविस्तर विवेचनासाठीं पहा भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष १५ पृष्ठ १०३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमल; श्वेत वस्त्र, कुंडलें, हार; मागें चामरधारी दोन स्त्रिया आणि घटांतील पाण्यानें स्नान घालणारे दोन हत्ती आहेत. **नयसंग्रह** (चचि २।७८): रंग ?; पद्म; हात ?; पण त्यांत पद्म; कमलाची माळा घातलेली, हत्ती आंघोळ घालीत असलेली, कालिकेप्रमाणें. **मपु** (२६१।४०): तप्तकांचनवर्ण; पद्मासन; दोन हात व त्यांत श्रीफल, पद्म; आभरणयुक्त, तांबडे ओठ, वाटोळे तोंड, केसांचा भांग, मागें चामरधारी स्त्रिया, सुवर्णपात्रांनीं स्नान घालणारे दोन हत्ती, स्तुति करणारे गंधर्व व गुह्यक. **मासा** (अ.५३ पृ. ७५): रंग ?; वाहन ?; दोन हात व त्यांत रक्त पद्म,रक्त पद्म;वाजूस दोन हत्ती. **शिर**(२४।९): सोनेरी; तांबडें कमलासन; हात ?; पण त्यांत वर, अभय, पद्म, पद्म; घटांतून रत्नाभिषेक करणारे चार पांढरे हत्ती.

मथुरा शिलापट्टावरील श्रीस दोन हात असून त्यांपैकीं उजवा अभय मुद्रेचा आणि डावा कमरेवर व सनाल उत्फुल्ल कमलधारी आहे. कमल आतपत्राप्रमाणेंच वाटतें. कुषाणकालीन इतर मूर्तींप्रमाणें हिजवर फणा आहे. हिचें हारीतीशीं सर्वप्रकारें साम्य आहे. पण दोहोंमधील अंतर दाखविण्यासाठीं फण्यावर समोरासमोर तोंडें केलेले दोन हत्ती कोरलेले आहेत. लक्ष्मीच्या डाव्या अंगास वाहनादाखल लहानसा हत्ती आहे[1], महाबलिपुरं (चिंगलपुट) येथील श्री एका कमलावर भद्रासनानें बसली असून तिच्या दोन हातांत जणूं कमळें असल्याचें दाखविलें आहे. तिच्या डोक्यास गोटाची वासुदेवी टोपी, गळ्यांत कंठा व चन्नवीर, मनगटांवर कंकणें, कानांत पत्रकुंडलें, पायांत वाळे आणि कपाळावर चौकोनी तिलक आहे. हिच्या दोन वाजूस प्रत्येकीं दोन दासी असून किंचित् मागच्या वाजूस स्नान घालणारा ऊर्ध्वशुंड व अधःशुंड असे दोन हत्ती आहेत. हत्ती, कमलासन व हातांत कमलें असणें यांवरून ही मूर्ति श्रीची आहे हें उघड ठरतें.[2] हिंदी तिबेटांत श्रीच्या दोन आकृति आढळल्या आहेत. पैकीं एक एका खेचरावर स्वार झाल्याचें दाखविलें असून दुसरी मनुष्यवाहिनी असल्याचें नमूद आहे[3]. जावामध्यें मिळालेली एक श्रीची मूर्ति एका वाटोळ्या बैठकीवर उभी व

१ जर्नल ऑफ दि यू. पी. हिस्टॉरिकल सोसायटी व्हॉ. १० अंक २. २ मेआसइ क्र. ३३ प्रप २१ सी; मूचि ७५. ३ ॲटिक्विटीज ऑफ इंडियन तिबेट व्हॉ. १ पृ. ९७,१०३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन हातांची आहे. पैकीं उजवा हात कमरेपर्यंत लांबवलेला व उताणा असून, डावा हात आखडलेला व कांहीं तरी वस्तू घेतलेला आहे. डोक्यास मुकूट व अंगावर भरपूर दागिने असले तरी पावलें मात्र बैठकींत लुप्त झालीं आहेत[1]. येथलीच श्रीची दुसरी मूर्ति वज्रासन घातलेली व दोन हातांची आहे. पैकीं उजवा हात वरद मुद्रेचा पण गुडघ्यावर ठेवला आहे. डाव्या हातांत बहुधा धान्याच्या कणसाचा दांडा घेतला आहे. पाठीमागें डोक्या-पुरती प्रभावळ असून तीवर छत्र आहे व डोक्यावर मुकूट चढविला आहे[2].

सरस्वती

ही ब्रह्मदेव, विष्णु व गणपती या तिघांची पत्नी असतांना त्यांच्या साहचर्यानें व कांहीं वेळां स्वातंत्र्यानें खोदलेली आढळते. पहिल्या प्रकारांत ती बहुधा पुरुषदेवतेच्या डाव्या अंगास उभी व वीणा घेतलेली अशी सांपडते. दुसऱ्या प्रकारांत बहुधा ती बसलेली असते. गणपती विद्येची देवता झाल्या वेळेपासून त्याच्या बायकोसही हळूहळू तो मान मिळूं लागला. त्या मानाचा विस्तार होऊन सध्यां ती वाणी व विद्या किंवा ज्ञान या दोहोंचीही व स्वतंत्र अशी देवता बनली आहे. पहिल्या प्रकारांत तिला गौण स्थान आहे; येवढेंच नव्हे तर त्या प्रकारांत प्रत्येक ठिकाणीं तीस डाव्या बाजूस स्थान दिलें आहे. विष्णू व ब्रह्मदेव यांच्या उजव्या बाजूस अनुक्रमें श्री व सावित्री या स्त्रिया शिवाय असतात. अर्थात् सरस्वतीस कनिष्ठ पत्नीचें स्थान असतें हें उघड आहे. गणपती सपत्नीक खोदतात तेव्हां प्रत्येक प्रसंगीं सरस्वतीच काढलेली असते असें नाहीं. त्यास इतरही एक किंवा दोन बायका सांगितलेल्या आढळतात. थोड्या निराळ्या रूपांत ही जैन व बौद्ध मूर्तिकांडांतही अंतर्भूत झालेली दिसते. ब्रह्मदेवाच्या पत्नीत्वामुळें अनेक ठिकाणीं तिचें वाहन हंस दाखविलेलें असतें; तर हल्ली सरस्वतीचें वाहन मोर समजतात. उलट पुढें दिलेल्या ग्रंथिक वर्णनांत सरस्वतीस कोणतेंच वाहन सांगितल्याचें आढळत नाहीं.

सरस्वतीस अशा तऱ्हेनें महत्त्व असल्यानें तिचीं ग्रंथिक वर्णनें अनेक

---

१ जावा खंड १७ अं. १ व २ पृ. ७१, ए ४१, आ. १२. २ आर्स एसियातिका व्हॉ. ८ प्रप २०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकाणीं आलीं असणें शक्य आहे. पैकीं अग्निपुराण[1], अंशुमद्भेदागम[2], चतुर्वर्गचिंतामणि[3], पूर्वकारणागम[4], मंत्ररत्नमहोदधि[5], मानसार[6], रूपावतार[7], रूपमंडन[8], विष्णुधर्मोत्तर[9], शिल्परत्न[10] व स्कंदपुराण[4] यांतील वर्णनांचें सार येथें देतों.

अपुः [१] रंग ?; वाहन ?; आठ हात व त्यांत धनुष्य, गदा, पाश, वीणा, चक्र, शंख, मुसळ, अंकुश. [२] श्वेत; वाहन ?; हात ?; पण त्यांत पुस्तक, अक्षमाला, वीणा, कमल. **अभेः** शुभ्र; पिवळें कमळ; चार हात व त्यांत व्याख्यान, अक्षसूत्र, पुस्तक, पुण्डरीक; तीन डोळे, यज्ञोपवीत, रत्नकुण्डलें. **चचिः** रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत पुस्तक, अक्षमाला, वीणा, कमण्डलु; उभी, दोन समान पाय. **पूकाः** शुभ्र; श्वेत पद्म; चार हात व त्यांत सुदंड, अक्षमाला, पुस्तक, करक; यज्ञोपवीत, मोत्याचे दागिने, रेशमी वस्त्र, जटामुकुट, तीन डोळे. **मरः** तांबडा; पद्म; हात ?; पण त्यांत अभय, वर, पाश, अंकुश; ज्योतिर्माला, तीन डोळे, चंद्रखंड, अलंकार. **मासाः** [१] शुभ्र; कमल; चार हात व त्यांत संदर्शमुद्रा, अक्षमाला, पुस्तक, कमंडलु; मकरकुंडलें. [२] रंग ?; वाहन ?; दोन हात; पण त्यांत ?; मकरकुंडलें. **रूमः** रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत अक्षमाला, कमळ, वीणा, पुस्तक; किंवा वरद, अक्षमाला, कमळ, पुस्तक; कुंडलें, मुकूट, एक तोंड. **विधः** रंग ?; वाहन ?; चार हात व त्यांत पुस्तक, अक्षमाला, कमंडलु, ? किंवा त्रिशूल; उभी, चंद्रमुखी, अलंकार. **शिरः** [१] तांबडा; पद्मासन; हात ?; पण त्यांत अक्षमाला, पाश, अंकुश, अभय; हार, बांगड्या इ. अलंकार, डोक्यावर चंद्रकला. [२] शुभ्र; पद्मासन; हात ?; पण त्यांत चक्र, शंख, कपाल, पाश, परशु, सुधाकुंभ, वेद, अक्षमाला, विद्या, पद्म; पांच तोंडें; त्यांचें वर्ण—मोती, विद्युत्, ढग, स्फटिक, तांबूस; तीन डोळे. [३] शुभ्र; पांढरें कमळ; हात ?; पण त्यांत मृगपोत, पुस्तक, अक्षमाला, परशु; शुभ्र अलंकार. [४] शुभ्र; वाहन ?; हात ?; पण त्यांत लेखणी, पुस्तक; तीन डोळे, तेजस्वी जटा. **स्कंपुः** निळसर; कमळ; हात ?; तीन डोळे, जटाभार.

---

१ अ. ४९।२०;५०।१६. २ पटल ४८।११४. ३ व्हॉ. १।७२५; २।७७. ४ इहिइ १ सी. १३८. ५ इहिइ १ सी. १३२. ६ अ. ५३ पृ. ७५. ७ पा.४८ अ. ८ पा. १८ अ. ९ अ. ६४; ७३. १० अ. २४।४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याशिवाय रूपावतारांत दिलेल्या सरस्वतीच्या बारा प्रकारांचें, एक तोंड, चार हात, मुकुट, प्रभामंडल, कुंडलें हें सामान्य वर्णन असून त्यांचीं बारा नांवें व आयुधप्रकार पुढीलप्रमाणें आहे—(१) **महाविद्याः** अक्षमाला, पद्म, वीणा, पुस्तक. (२) **महावाणीः** अक्षमाला, पुस्तक, वीणा, पद्म. (३) **भारतीः** वर, अक्षमाला, पद्म, पुस्तक. (४) **सरस्वतीः** वर, कमल, अक्षमाला, पुस्तक. (५) **आर्याः** वर, अक्षमाला, पुस्तक, पद्म. (६) **ब्रह्माणीः** वर, पुस्तक, अक्षमाला, पद्म. (७) **महाधेनुः** वर, पद्म, वीणा, पुस्तक. (८) **वेदगर्भाः** वर, पुस्तक, वीणा, कमल. (९) **ईश्वरीः** अक्षमाला, अभय, पद्म, पुस्तक. (१०) **महालक्ष्मीः** अक्षमाला, अभय, पुस्तक, कमल. (११) **महाकालीः** अक्षमाला, कमल, पुस्तक, अभय. (१२) **महासरस्वतीः** अक्षमाला, पुस्तक, अभय, पद्म.

डाक्का म्यूझियममधील सरस्वती ललितासनी असून तिच्या चार हातांपैकीं खालच्या दोन हातांत वीणा आणि वरच्या दोन हातांत अनुक्रमें माला व पुस्तक या वस्तू आहेत. वीणेवरूनच ही सरस्वती आहे हें ओळखावयाचें आहे. मूर्तीची घडण पाहतां ही मध्ययुगाच्या तृतीय पादांत बसावयास हरकत नाहीं.[1] महाराष्ट्र व कर्नाटक या भागांत वीणाधारी सरस्वतीचें शिल्प क्वचित् मिळतें. इकडील सरस्वतीच्या चार हातांत बहुधा अक्षमाला, अंकुश, पाश व पुस्तक या वस्तू आणि हंस किंवा मोर वाहन दाखवितात. गदग व नारगोळ (धारवाड) आणि पूर्वीचा मुंबईचा टाऊन हॉल येथें अशीं शिल्पें आहेत व होतीं[2].

९ माता

प्रस्ताव

या कशा अस्तित्वांत आल्या याविषयीं मतभेद दिसतो. सुप्रभेदागमांत नैऋताचा वध करण्यासाठीं ब्रह्मदेवानें यांस उत्पन्न केलें असें सांगितलें आहे; तर मार्कंडेय पुराणांत या ब्रह्मा, विष्णु, शिव, स्कंद व इंद्र यांच्या

१ ईइस्क्रमिस्क प्रप ६३ इ. २ चाआ पृ. २५; आर्किऑलॉजी खात्याच्या वेस्टर्न सर्कलमधील फोटोग्राफ क्र. ४१०८ व ३२२६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंशापासून शुंभनिशुंभ किंवा चंडमुंड यांच्या वधाचे वेळीं उत्पन्न झाल्या असें म्हटलें आहे. उलट अन्धकासुरकथेंत त्याच्या जमिनीवर पडणाऱ्या रक्तापासून नवीन असुर उत्पन्न होऊं नयेत म्हणून देवांनीं या उत्पन्न केल्या असें म्हटलें आहे. कथा कोणतीही असो; त्या व त्यांचीं वर्णनें यांमध्यें अनार्य संस्कृतीचा बराच भाग असावा आणि त्या शैव पंथांत समाविष्ट केल्या पाहिजेत असें दाखवितात. वाराही, वैष्णवी, ऐंद्री, वामनी, नारसिंही या वैदिक अंश दाखविणाऱ्या तर गणेश, वीरभद्र, भैरव हे व माहेश्वरी, कौमारी, चामुंडा या अनार्य अंश सुचवितात. कांहीं असलें तरी त्या फार पूर्वीपासून समाजांत प्रिय झाल्या होत्या असें स्पष्ट दिसतें. बदामीचे चालुक्य स्वतःला सात मातांकडून रक्षिलेले असें म्हणवितात. नारसिंही देवगिरी यादवांची कुलदेवता होती आणि चामुंडी आजही म्हैसूरच्या वोडेयरांची आहे.

कुलदेवता बनल्यावर तिजवर देऊळ बांधलें जाणें साहजीक असलें तरी सामान्यतः यांचीं देवळें नसतात; यांचे पट्ट इतरांच्या देवळांत कोठें तरी बसविलेले आढळतात; पण सामान्य लोकांस हे ओळखतां येत नसल्यानें त्यांस भलतेंच नांव मिळालेलें असतें. उ. पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरांत असा एक पट्ट असून त्यास नांव मात्र नवग्रह दिलेलें आहे.

माता सामान्यतः सात समजत असले तरी ही संख्या आणि ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही व ऐंद्री यांखेरीज इतरांचीं नांवें यांविषयीं मतभेद आहे. उ. बहुधा चामुंडा ही सातवी माता समजली जाते तरी अचि व मापु यांत नारसिंही सातवी माता सांगितली आहे. अमराचा टीकाकार क्षीरस्वामी, सुभे, निर्णयसिंधू, रूपा आणि श्रीनि यांनीं आठवी माता म्हणून अनुक्रमें कालसंकर्षणी, वामनी, वैनायकी, चंडिका, महालक्ष्मी व चंडिका अशीं नांवें दिलीं आहेत. या मातांच्या दोन्ही बाजूंस गणेश व वीरभद्र खोदावे म्हणून बहुतेक ग्रंथांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विधान असून रूपावतारांत भैरवहि दाखवावा असें सांगितलें आहे.

यांचीं रूपें ग्रंथांतरीं वर्णिलीं असून त्यांपैकीं सामान्य सप्तमातांचीं विशेष वर्णनें पुढें विस्तारानें दिलीं आहेत; येथें त्यांच्या सामान्य रूपाविषयीं सांगतों. अचि, वृस, श्रीनि व सुभे यांत या मातांस त्या ज्या देवांपासून निघाल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांप्रमाणें आयुधें, वाहन इत्यादि बाबतींत बनवावें असें सामान्य विधान असलें[१] तरी, विधमध्यें माता रक्तपूर्ण पात्र व मांस धारण करणाऱ्या, त्या त्या देवांचीं नांवें व चिन्हें असलेल्या व नाचणाऱ्या अशा खोदाव्या म्हणून सांगितलें आहे.[२] श्रीनिमध्यें त्यांचा रंग व वस्त्रें लाल आणि त्यांस कपाल व कमल धारी दोन हात असावे असें सांगितलें असून सुभेमध्यें या सर्व कमलावर बसलेल्या, चार हात आणि त्यांत अभय, वर व त्या त्या देवांचीं आयुधें असलेल्या दाखवाव्या म्हणून विधान आहे. फक्त चामुंडीच्या हातांत कमल व शूल हीं आयुधें सांगितलीं आहेत. कालसंकर्षणीचें वर्णन मला कोठें आढळलें नाहीं. वामनीचें हलायुधा येवढेंच वर्णन मिळतें. वैनायकी बहुधा गणपतीप्रमाणें खोदत असावे. रूपावतारांत चंडिकेचें वर्णन बैलावर बसलेली, सहा हात व त्यांत यमटंक, वर, शूल, कात्री, पाश व पात्र धारण करणारी असें आलें आहे. श्रीनिमध्यें अष्टमातांतील महालक्ष्मीचें वर्णन आलेलें नाहीं आणि चंडिकेचीं लक्षणें पांढरी, सिंहवाहनी, हातांत वर, शूल, कात्री, पाश, पात्र व अभय घेणारी, तीन डोळ्यांची, जटाधारी, अशीं सांगितलीं आहेत. रूपावतारांत भैरवाचें रूप नाचतें व हातांत वीणा घेतलेलें असावें असें विधान आहे.

ग्रंथिक वर्णनें

या मातांचीं विशेष वर्णनें मला अग्निपुराण,[३] अंशुमद्भेदागम,[४] देवीपुराण,[५] पूर्वकारणागम,[६] मत्स्यपुराण,[७] मार्कंडेयपुराण,[८] रूपावतार,[९] रूपमंडन,[१०] विश्वकर्मशास्त्र,[११] श्रीतत्त्वनिधि,[१२] इत्यादि ग्रंथांत आढळल्यानें त्यांचें सार येथें देण्याचा यत्न करतों. इहिइमध्यें विष्णुधर्मोत्तरांतील म्हणून ध्यानें दिलीं आहेत तीं वस्तुतः चतुर्वर्गचिंतामणींतून घेतलीं असून पाहण्यांत चूक झाल्यामुळें विष्णुधर्मोत्तरांतील म्हणून सांगितलीं गेलीं.

---

१ प्रकरण ३।१।८३५; अ. ५८।५६; पृ. ४; इहिइ १ सी १४३. २ अ. ७३।३२. ३ अ. ५०।१७; ५२।१४. ४ पटल ४६।६७. ५ इहिइ १सी १४३. ६ अ. २६१।२४. ७ अ. ८८।१२. ८ पा. ४७ अ; रूपावतारांतील पहिल्या सात मातांचीं वर्णनें विशाप्रमाणें आहेत; म्हणून त्यांचें स्वतंत्र वर्णन दिलें नाहीं. ९ पा. १८ अ. १० चचि २।८२. ११ अ. २४।७६. १२ पृ. ४ व १२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्माणी[1]**–अपुः** चार हात व त्यांत अक्षमाला, पळी, कमंडलु, कमंडलु; चार तोंडें. **अभेः** चार हात आणि त्यांत अभय, शूल, अक्षमाला, वर; चार तोंडें. **पूकाः** चार हात आणि त्यांत वर, कमंडलु, अक्षमाला, अभय. **मपुः** चार हात; पण त्यांत अक्षसूत्र, कमंडलु. **मापुः** हात ?; पण त्यांत अक्षसूत्र, कमंडलु. **रूमः** चार हात व त्यांतील खालच्या हातांत अक्षसूत्र, पळी आणि वरच्या हातांत पळी, अक्षसूत्र. **विशाः** सहा हात व त्यांत वर, अक्षसूत्र, पळी ,पुस्तक, कमंडलु, अभय; चार तोंडें. **शिरः** सोनेरी; चार हात व त्यांत दंड, कमंडलु, अक्षसूत्र, अंकुश; कृष्णाजिन. **श्रीनिः** विशाप्रमाणें.

माहेश्वरी–अपुः चार हात व त्यांत बाण, धनुष्य, चक्र, धनुष्य. **अभेः** चार हात व त्यांत शूल, अभय, वर, जपमाला; त्रिनेत्र, जटामुकुट. **पूकाः** चार हात व त्यांत शूल, वर, अभय, अक्षमाला; त्रिनेत्र. **मपुः** चार हात व त्यांत कपाल, शूल, खट्वांग, वर; जटामुकुट, चंद्रशेखर. **मापुः** हात?; पण त्यांत त्रिशूल, वर; अहिवलय, चंद्रशेखर. **रूमः** चार हात व त्यांत कपाल, शूल, खट्वांग, वर. **विशाः** पांढरा; सहा हात व त्यांत वर, माला, डमरू, शूल, घंटा अभय; त्रिनेत्र, पांच तोंडें, चंद्रकला, जटाजूट. **शिरः** शुभ्र; चार हात व त्यांत शूल, परशु, क्षुद्र दुंदुभि, कपाल. **श्रीनिः** पांढरा; दहा हात व त्यांत तलवार, वज्र, त्रिशूल, परशु, अभय, वर, पाश, घंटा, नाग, अंकुश; पांच तोंडें; तीन डोळे; चंद्ररेखा.

कौमारी—अपुः दोन हात व त्यांत शक्ति, शक्ति ?. **अभेः** चार हात व त्यांत वर, शक्ति, कुक्कुट, अभय. **देपुः** हात ?; पण त्यांत शक्ति, त्रिदंड' कुक्कुट?, कुक्कुट; रक्तपुष्पें. **पूकाः** हात ?; पण त्यांत वर, शक्ति, अंकुश' अभय. **मपुः** हात ?; पण त्यांत शूल, शक्ति, कुक्कुट, कुक्कुट (कुकवाकु)' **मापुः** अपुप्रमाणें. **रूमः** हात?; पण त्यांत शूल, शक्ति, गदा, ?. **विशा**' तांबडा; बारा हात व त्यांत वर, शक्ति, पताका, दंड, पात्र, बाण, धनुष्य'

---

१ येथून पुढील मातांच्या ग्रंथिक वर्णनांत वाहनांचा उल्लेख केलेला नाहीं. ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, ऐंद्री, चामुंडा यांचीं हंस, बैल, मोर, गरूड, रेडा, हत्ती व प्रेत हीं वाहनें ठरलेलीं आहेत. जेथें यांखेरीज इतर वाहन सांगितलें आहे तेथें मात्र तें नमूद केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

७७ मद्रास म्यूझियम माहेश्वरी



७८ जाजपूर-कटक वाराही

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar



७९ जाजपूर-कटक इंद्राणी



८० जाजपुर-कटक चामुंडा

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घंटा, कमल, कुक्कुट, परशु, अभय; सहा तोंडें. **शिरः** सिंदूरवर्ण; हात? पण त्यांत अंकुश, पाश, खट्वांग, ?. **श्रीनिः** विशाप्रो.

वैष्णवी—अपुः चार हात व त्यांत चक्र, शंख, गदा, कमल. **अभेः** हात ?; पण त्यांत वर, शंख, चक्र अभय. **देपुः** हात ?; पण त्यांत शंख, चक्र, गदा, पद्म. **पूकाः** चार हात व त्यांत शंख, चक्र, गदा, पद्म. **मपुः** चार हात व त्यांत वर, शंख, चक्र, गदा; बालकासह. **मापुः** हात ?; पण त्यांत शंख, चक्र, गदा, शार्ङ्ग, खड्ग, ?. **रूमः** हात ?; पण त्यांत वर, शंख, चक्र, गदा. **विशाः** सावळा; सहा हात व त्यांत वर, गदा, कमलमाला, शंख, चक्र, अभय. **शिरः** श्यामवर्ण; चार हात व त्यांत चक्र, शंख, पताका किंवा कपाल, ?; शृंखला, पीतवस्त्र. **श्रीनिः** विशाप्रमाणें.

वाराही[1]—अपुः हात ?; दंड, शंख, चक्र, गदा. **अभेः** हात ?; नांगर, वर, अभय, शक्ति; गजवाहनी ?. **देपुः** हात ?; रक्तयुक्त कपाल, दंड. **पूकाः** हात ?; शार्ङ्ग, अभय, हल, मुशल, वर. **मपुः** हात ?; घंटा, चामर, गदा, चक्र; दानवेंद्रविनाशिनी. **मापुः** यज्ञवाराहरूपधारी. **रूमः** हात ?; घंटा, चामर, गदा, चक्र. **विशाः** काळा; हात ?; वर, दंड, खड्ग, खेट, पाश, अभय; वराहमुख. **शिरः** कमलवर्ण; हात?; पण त्यांत मुसळ, तलवार, घंटा, नांगर. **श्रीनिः** विशाप्रमाणें

इंद्राणी—अपुः हात?; वज्र, वज्र; सहस्राक्षी. **अभेः** चार हात व त्यांत वर, शक्ति, वज्र, अभय; त्रिनेत्र. **देपुः** हात ?; पण त्यांत वज्र, अंकुश. **पूकाः** हात ?; वज्र, वर, अभय, शक्ति; दोन डोळे. **मपुः** हात?; वज्र, शूल, गदा, खड्ग ?; बहुलोचनी. **मापुः** हात ?; वज्र,?; सहस्राक्षी. **रूमः** हात?; पण त्यांत वज्र, शूल, गदा,?; बहुलोचनी. **विशाः** सोनेरी; हात?; पण त्यांत वर, अक्षसूत्र, वज्र, कलश, पात्र, अभय; सहस्राक्षी. **शिरः** इंद्रनीलवर्ण; हात ?; अंकुश, तोमर, वज्र, चक्र; **श्रीनिः** विशाप्रमाणें.

चामुंडा—अपुः हात ?; शूल, कात्री, कपाल, पट्टिश. **अभेः** चार हात व त्यांत वर, कपाल, शूल, अभय; त्रिनेत्रा, शिरोमालिनी, ऊर्ध्वकेशी.

---

१ वाराही, इंद्राणी व चामुंडा यांच्या हातांची संख्या बहुतेक ग्रंथांत सांगितलेली नाहीं. तेव्हां येथें हात शब्दापुढें प्रश्नचिन्ह घालून लागलीच बहुधा हातांतील आयुधें दिलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूका: हात?; शूल, सर्प, मांसपूर्ण कपाल, वन्हि; व्याघ्रचर्मिणी. **मपु:**[1] गिधाड, कावळा; हात?; शक्ति किंवा सकेश मुंड, कपाल. **रूम, विशा:** काळा; दहा हात व त्यांत मुसळ, कवच, बाण, अंकुश, खड्ग, ढाल, पाश, धनुष्य, दण्ड, कुन्हाड; कृशोदरी, गर्ताक्षी, सर्पभूषणी, दंष्ट्रेग्रा. **शिर:** हात?; शूल, खड्ग, मुंड, कपाल; नररुंडमाला. **श्रीनि:** विशाप्रमाणें. **सुभे:** कमलासनस्थ; चार हात व त्यांत वर, कपाल, शूल, अभय.

उदाहरणें

हावेरी (धारवाड) येथील मातृकापट्टांत अनुक्रमें वीरभद्र, ब्राह्मी, माहेश्वरी, वैष्णवी, कौमारी, वाराही, इंद्राणी, चामुंडा आणि गणपति या देवता सव्य ललितासनानें बसल्या असून त्यांच्या बैठकींखालीं अनुक्रमें, नंदी, हंस, नंदी, गरूड, मोर, रेडा, हत्ती, कुत्रा व उंदीर हीं वाहनें दाखविलीं आहेत. येथें वाराही वराहमुखी आणि चामुंडा अतिशय कृश अशा आहेत आणि चामुंडेचें वाहन कुत्रा आहे हेंही लक्षांत घेण्यासारखें आहे.[2]

वरेंद्र रीसर्च सोसायटीच्या कॅटलॉगमध्यें नवमातृकाशिलेचा उल्लेख असून मातृकांचा क्रम ब्रह्माणी, रौद्री, कौमारी, वैष्णवी, महिषमर्दिनी, वाराही, इंद्राणी, चामुंडा, सिंहवाहिनी असा आहे. यांत गणेश व वीरभद्र दोन्ही नाहींत हें ध्यानांत धरण्याजोगें आहे.[3] आर्किऑलॉजीच्या वेस्टर्न सर्कलचे १९०६–७ च्या रिपोर्टांत एक अष्टमातृकाशिला उल्लिखित आहे. तिजमध्यें आठ माता व नववा गणपती आहे[4]. नेमाड येथील सिद्धनाथाच्या देवळांत मातृशिला आहे. तीमध्यें क्रमानें ब्रह्माणी, माहेश्वरी, कार्त्तिकेयी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुंडा व महादेवी (?) अशा आठ माता आहेत.[5]

---

१. यामध्यें हें वर्णन योगेश्वरीचें म्हणून दिलें आहे. याशिवाय चामुंडेचें 'बद्धघंटा वा द्वीपिचर्मधरा शुभा' असें व कालिकेचें 'दिग्वासा: कालिका तद्वत्रासभस्था कपालिनी वर्धनीध्वजसंयुक्ता' असें वर्णन आहे. मला वाटतें योगेश्वरी व कालिका हीं नांवें चामुंडेस उद्देशूनच वापरलीं असावीं. विशेषत: योगेश्वरीचें वर्णन इतर ग्रंथांतील चामुंडावर्णनांशीं जुळतें असल्यानें मी योगेश्वरीचें वर्णनच चामुंडेच्या नांवावर घातलें आहे. २ चाआ चित्र २८; मूचि ७६. ३ पृ. १६ डी (९) १।७. ४ पृ. ३३. ५ वेस्टर्न सर्कल आर्किऑलॉजी रिपोर्ट इ. १९२०–२१ पृ. १०१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मद्रास म्यूझियममधील माहेश्वरीची मूर्ती सव्य ललितासनानें बसली असून तिच्या चार हातांत अभय, परशु, मृग व कटक या मुद्रा व वस्तू आहेत. तिच्या तोंडामागें बदामी आकाराचें तेजोवलय आहे. आयुधांवरून ही मूर्ति माहेश्वरी ठरते[1]. जाजपूर (कटक) येथील वाराही बैठकीवर सव्य ललितासनानें आणि उजवा पाय रेडा या वाहनावर ठेवून बसली असून तिच्या डाव्या मांडीवर बहुधा तिचें मूल असावें. हिचे बहुतेक हात तुटले असले तरी वराहाचें तोंड व रेडा हें वाहन यांवरून ही मूर्ति वाराहीची ठरते. येथेंच असलेली इंद्राणी बैठकीवर वाम ललितासनानें पण डावा पाय हत्तीच्या डोक्यावर ठेवून बसली आहे. हिचेही हात मोडले आहेत; तरी वाहनावरून ती इंद्राणी ठरते. याच ठिकाणची चामुंडा वाम ललितासनानें पण डावा पाय प्रेतावर ठेवून बसली आहे. हिचेहि हात मोडले आहेत. पण तिचें अस्थिपंजरमय शरीर व प्रेताचें वाहन यांवरून ती चामुंडा आहे याविषयीं शंका उरत नाहीं[2].

१० दिक्पाल

प्रस्ताव

इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, कुबेर आणि ईशान हे पूर्वादि आठ दिशोपदिशांचे पालक समजले जातात. यांपैकीं उपदिशांचीं नांवें अग्नि, निर्ऋति, वायु व ईशान यांजवरून पडलेलीं आहेत. क्वचित् दिशांनाही पालकांवरून संबोधिलेलें दिसतें. उ. याम्य दिशा. प्राणिजातांचा मित्र सूर्य पूर्वेस उगवतो म्हणून ती देवांची दिशा समजली गेली आणि त्यांचा मुख्य इंद्र तिचा पालक बनला. दक्षिणेस जाणें अत्यंत अशुभ समजलें जाई. मरण ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. तेव्हां मरणाचा नियंता यम त्या दिशेचा पालक झाला. देशाची पश्चिम मर्यादा समुद्र अशी कल्पना होती. जलदेवता वरूण असल्यामुळें त्यास त्या दिशेचा पालक केलें. यक्ष रक्षस् हे उत्तरेला राहतात अशी समजूत. तेव्हां त्यांचा मुख्य कुबेर उत्तरेचा

१ मूचि ७७. २ ऐमोबिओ चि. १३२–३४; मूचि ७८–८०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पालक बनला. अशा तऱ्हेनें बहुधा आठ दिशा व त्यांचे पालक तयार झाले. यांपैकीं इंद्र, अग्नि, यम, वरुण, वायु, ईशान या वैदिक देवता आहेत. मात्र ईशाना(शंकरा)शिवाय बाकी सर्व देवता आज मागें पडल्या आहेत.

येवढी सामान्य माहिती दिल्यानंतर आतां प्रत्येकाविषयीं थोडी जास्त माहिती देण्याचा प्रयत्न करतों. **इंद्रः** हा वैदिक वाङ्मयांतील अत्यंत प्रिय देव आहे. त्यांत याचा रंग पिंगट, सोनेरी किंवा लोखंडासारखा आहे; तो हातांत बहुकोणी व शेंकडों टोकांचें वज्र किंवा धनुष्यबाण किंवा अंकूश धारण करतो; त्याचा रथ सोन्याचा व अनेक घोड्यांकडून ओढला जाई व त्यांसाठीं त्याजपाशीं चाबूकही होता; एके ठिकाणीं त्यास इंद्राणी नांवाची एकच तर दुसऱ्या ठिकाणीं प्रासहा व सेना अशा दोन स्त्रिया होत्या इत्यादि माहिती आली आहे. इंद्राच्या शचीपति नांवाचा मूळ अर्थ बलवान् असा असला तरी पुढें पुराणांत शची ही इंद्राची बायको समजली गेली. इंद्राचें मुख्य कार्य त्यानें पर्वतांचे पंख तोडले व वृत्राला मारलें हें होय. पुराणांत त्याच्या हातांत वज्र व अंकूश हीं दोनच आयुधें राहिलीं; इंद्राणी व शची एकरूप बनल्या; प्रासहा व सेना लुप्त झाल्या आणि समुद्रमंथनांतून निघालेला ऐरावत त्याचें वाहन बनला. भागवतांत गोवर्धनोद्धरणाची कथा आली आहे तीवरून इंद्रास विष्णूनें कसें मागें टाकलें तें आपणास समजतें. तरीही दहाव्या शतकापर्यंत इंद्राचा वार्षिक उत्सव होई असें तमिळ वाङ्मयावरून म्हणतां येतें. **अग्निः** ही वैदिक वाङ्मयांतील फार महत्त्वाची देवता आहे. रोजच्या व्यवहारांत होणारा त्याचा उपयोग, त्यापासून शत्रूस करतां येण्यासारखा त्रास आणि देवांस अर्पण करावयाचे जिन्नस त्यांस पोचविणारा मध्यस्थ यांमुळें त्यास हें महत्त्व प्राप्त झालें असलें पाहिजे. वीज व सूर्य हीं अग्नीचींच आंतरिक्ष व दिव्य रूपें समजलीं जातात. त्याला पुष्कळ वेळां रुद्राशीं एकरूप बनविलें गेलें आहे. यामुळें तो स्कंदाचा पिता समजला जातो. वैदिक वाङ्मयांत याचें अनेक तऱ्हेचें वर्णन आलें असलें तरी चार शिंगें, तीन पाय, दोन डोकीं, सात जिव्हा व हात असें जें त्याचें वर्णन ' चत्वारि श्रृंगा ' या ऋचेमध्यें आलें आहे तें सर्वांत जास्त प्रिय झालेलें दिसतें. हें वर्णन अलंकारिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. दक्षिण, गार्हपत्य व आहवनीय हे तीन प्रकार त्याचे तीन पाय असावे. पांढऱ्या प्रकाशांतील सप्तरंग हे त्याचे हस्त (कर-किरण) समजले जातात. काली, कराली सुधूम्रवर्णा, वगैरे ज्वालांचे सात प्रकार त्याच्या सात जिव्हा सांगितल्या जातात. हें वर्णन असें अलंकारिक असूनही इतकें प्रिय झालें आहे कीं, तशा स्वरूपाच्या शेकडों मूर्तीही सापडतात. यास स्वाहा व स्वधा किंवा एकटीच स्वाहा अशा बायका सांगितल्या आहेत. बोकडाचें हवन व अग्नि यांभोंवतीं सर्व यज्ञविधि जमलेले असल्यानें बोकड हें त्याचें लांछन किंवा वाहन बनविलें गेलें. **यमः** हा वैदिक वाङ्मयांत आढळत असला तरी त्यास इतकें महत्त्व नव्हतें. हा विवस्वानाचा मुलगा व यमीचा जुळा भाऊ आहे. यमयमींचा संवाद प्रसिद्ध आहे. मरणारा आद्य मानव हाच या समजुतीनें यास पितृराज म्हणूं लागले. या समजुतींत वाढ होऊन तो प्राण्यांच्या आयुष्याचा नियंता, त्यांना मरण आणणारा व मेल्यानंतर पापाबद्दल योग्य ती शिक्षा करणारा आज बनलेला दिसतो. यासाठींच त्याच्या हातांत पाश व दंड यांची योजना केलेली आहे. **निर्ऋतिः** याचा राक्षस म्हणून वेदांत उल्लेख येतो. त्यास दिशारक्षणाचें काम कसें मिळालें तें नीट ध्यानांत येत नाहीं. **वरुणः** वैदिक वाङ्मयांत यास सर्वश्रेष्ठ असें महत्त्व होतें. आजच्या ईश्वराप्रमाणेंच त्याची वेदांत कल्पना केलेली दिसते. पण यामुळें त्याजभोंवतीं विविध कथाचें जाळें उत्पन्न होऊं शकलें नाहीं व त्याचें महत्त्व कमी होत जाऊन प्रथम तो फक्त दिव्य व आकाशस्थ जलांचा व नंतर पार्थिव पाणी व त्यांतील जनावरें यांचा स्वामी बनला. **वायुः** वैदिक वाङ्मयांत यास महत्त्वाचें स्थान नव्हतें. इतर देवांच्या संगतीनें त्याचा उल्लेख येतो. **कुबेरः** यास मुख्यतः वेदोत्तर वाङ्मयांत महत्त्वाचें स्थान मिळालें आहे. बौद्ध पुराणें व मूर्तिकांड यांतही यास फार महत्त्वाचें स्थान असल्यामुळें असें वाटतें कीं, कदाचित् हा परकीय असणेंही शक्य आहे. **ईशानः** हें शिवाचेंच नांव आहे. यास येथें महत्त्वाचें स्थान नसलें तरी एकंदर हिंदू समाजांत फार महत्त्व आहे.

हे बहुधा देवळामध्यें मंडपाच्या छतावर कोरलेले असतात. देवळाचा प्राकार मोठा असल्यास क्वचित् यांचीं स्वतंत्र छोटी देवळेंही सांपडतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पश्चिम

निर्ऋति	वरुण	वायु
यम		कुबेर
अग्नि	इंद्र	ईशान

पूर्व

पण कोठेंही असले तरी त्यांचीं स्थानें बाजूस दाखविलेल्या आकृतीप्रमाणें असतात. मधला खण क्वचित् मोकळाच राहिलेला आढळला तरी बहुधा त्यांत शिव किंवा विष्णू यांचें गजासुरमर्दन, वेणुगोपाल, यांसारखें एखादें लीलारूप खोदलेलें आढळेल.

ग्रंथिक वर्णनें

दिक्पालांचीं वर्णनें मला अग्निपुराण[१], अभिलषितार्थचिंतामणि,[२] अंशुमद्भेदागम[३], बृहत्संहिता[४], मत्स्यपुराण[५], रूपावतार व रूपमंडन[६], विष्णुधर्मोत्तर[७], शिल्परत्न[८], श्रीतत्त्वनिधि[९], समरांगणसूत्रधार[१०], सुप्रभेदागम[११] इत्यादी ग्रंथांत आढळलीं असून त्यांचा सारांश देण्याचा येथें प्रयत्न करतों.

इंद्र–अचिः रंग ?; गज; दोन हात व त्यांत वज्र, कमल; डावीकडे उत्पलासह शची. **अपुः** रंग ?; गज; दोन हात; पण त्यांत वज्र,?; छत्रचामरें. **अभेः** सावळा; गज; सिंहासन; दोन हात व त्यांत शक्ति, अंकूश; डावीकडे शची; तांबडीं वस्त्रें. **वृसः** रंग ?; चतुर्दंत गज; हात ?; पण त्यांत वज्र,?; तीन डोळे; पण कपाळावरील तिरका. **मपुः** अचिप्रमाणें. **रूपाः** रंग ?; चार हात व त्यांत वर, अंकुश, कमंडलु, वर; सहस्राक्ष. **विधः** पांढरा; चतुर्दंत गज; चार हात व त्यांत वज्र, अंकुश, पद्म, शचीपृष्ठगत; कपाळावरील डोळा तिरका. **शिरः** [१] सिंहासन; गज; सोन्याच्या प्याल्यांतून द्रव्य देणारा; देवतरूखालीं देवयुक्त. [२] पांढरा; पांढरें कमळ; भोवतालीं देव, अमृत-जलानें स्नान करणारा. **श्रीनिः** पिवळा; ऐरावत गज; चार हात व त्यांत अभय, वज्र, अंकुश, वर; हजार डोळे, रत्नालंकार, कुंडलें, यज्ञोपवीत. **सुभेः** श्याम; दोन हात व त्यांत वज्र, अंकुश.

अग्नि–अचिः [१] सोनेरी; बोकड; अर्धचंद्रासन; दोन हात व

१ अ. ५२।१४. २ प्र. ३।१।८११. ३ पटल ४६।६२; ४८।२२,३८, ४६, ५२, ५९, ७७, १२६. ४ अ. ५८।४२,४३,५७. ५ अ. २६०।६६; २६१।९. ६ रूपा १४ आ, रूम ५ आ. ७ अ. ५०–५८. ८ अ. २५।१. ९ पृ. १०५. १० अ. ७७।४२. ११ इहिइ २ बी २५१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत अक्षसूत्र, कमंडलु; स्वाहा देवी. [२] कुंडस्थ; सात डोकीं व ज्वाला. **अपुः** रंग ?; दोन हात; पण त्यांत शक्ति, ?. **पूकाः** पिवळा, पिंगल; बोकड; कुंडस्थ, अर्धचंद्रासन; दोन हात व त्यांत अक्षमाला, शक्ति; पिंगलोचन, सोनेरी केस, तांबडीं वस्त्रें, पाठीमागें अंशुमंडल, उजवीकडे स्वाहा. **मपुः** अचिप्रमाणें. **रूपाः** तांबडा; हात ?; पण त्यांत वर, शक्ति, कमल, कमंडलु. **विधः** तांबडा; चार पोवटांचा करडया रंगाचा रथ; चार हात व त्यांत ज्वाला, त्रिशूल, पत्नीपृष्ठगत, अक्षमाला; जटाधर, धूम्रवस्त्र, ज्वालायुक्त, त्रिनेत्र, श्मश्रुधारी, चार दाढा, डाव्या मांडीवर स्वाहा, वायू सारथी. **वैन-यज्ञ** (इहिइ १ सी ५५): पिवळा; सात हात व त्यांत शंख, चक्र, तुपाचें भांडें, स्रुक्, स्रुव, आहुती देण्याची पळी,?; चार शिंगें; दोन डोकीं; तीन पाय; तांबडीं वस्त्रें; स्वाहा व स्वधा यांनीं युक्त. **शिरः** [१] उरुतप्त, अरुण; कमलासन; हात ?; पण त्यांत वर, शक्ति, स्वस्तिकमुद्रा, अभय; शुक्लांबर, त्रिनयन, जटाजूट. [२] **संवादाग्निः** पांढरा; पांढऱ्या कमळा-सह चंद्र; त्रिनेत्र; हात ?; पण त्यांत अभय, अंकुश, पाश, वरद. [३] **समर्द्धिः** (१) अश्वाकृति, ज्वालायुक्त, रोमविवरें, धनधान्यरत्नें वर्षणारा. (२) हात ?; पण त्यांत अभय, वर, शक्ति, स्वस्तिक, दर्भ, अक्षमाला, स्रुव, स्रुक्. [४] **रक्षोहाः** हात ?; पण त्यांत त्रिशूल, परशु, डमरु, कपाल; त्रिनेत्र, चंद्रशेखर, दंष्ट्राकराल, भूतप्रेतादिभक्षी. **श्रीनिः** तांबडा; बोकड; सात हात व त्यांत शक्ति, अन्न, स्रुक्, स्रुव, तोमर, पंखा व घृतपात्र. चार शिंगें, सात जिभा, दोन डोकीं, तीन पाय, तांबडे डोळे, उजव्या मांडीवर स्वाहा व डावीवर स्वधा. **सुभेः** [१] तांबडा; वाहन ?; चार हात व त्यांत अभय, स्रुक्, शक्ति, वर; एक तोंड, तीन डोळे, तांबडे ऊर्ध्वकेश, [२] तांबडा; बोकड; दोन हात व त्यांत शक्ति, स्रुव; लाल डोळे, वर जाणाऱ्या ज्वाला.

यम-अचिः निळा; मोठा रेडा, सिंहासन; दोन हात व त्यांत दंड, पाश; लाल डोळे, पाठीमागें मृत्यु व चित्रगुप्त. **अपुः** रंग ?; रेडा; दोन हात; पण त्यांत दंड,?. **अभेः** काळा; रेडा, सिंहासन; दोन हात व त्यांत खड्ग, खेटक; भयंकर दाढा; फुलें, गंध, वस्त्रें व डोळे तांबड्या रंगाचे; बाजूस तमिस्र, उग्रवक्त्र; दारांवर चित्रगुप्त, कलि; बैठकीच्या बाजूस मृत्यु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व उग्रतेजस्. **पूकाः** काळा; मोठी म्हैस; हात ?; पण त्यांत दंड; लाल डोळे. **वृसः** रंग ?; रेडा; हात ?; पण त्यांत दंड. **मपुः** अचिप्रो. **रूपाः** काळा; मोठा रेडा; चार हात व त्यांत लेखणी, पुस्तक, कोंबडा, दंड. **विधः** काळा; रेडा; चार हात व त्यांत मुखयुक्त दंड, खड्ग, त्रिशूल, ज्वाला, अक्षमाला; डाव्या मांडीवर धूमोर्णा; बाजूस चित्रगुप्त व कलि. **शिरः** अभेप्रो. **श्रीनिः** काळा किंवा तांबडा; भयंकर रेडा; हात ?; पण त्यांत दंड व पाश. **सुभेः** काळा; रेडा; दोन हात व त्यांत दंड, फलपल्लव; भयंकर.

निर्ऋति—अचिः काळा; नर[1]; पिवळें वस्त्र, सोन्याचे दागिने. **अपुः** रंग ?; नर[1]. **अभेः** निळा; भद्रपीठ[1]; पिवळें वस्त्र, करालास्य, दंष्ट्रिन्, सात अप्सरायुक्त. **पूकाः** गोरा; शव; हात ?; पण त्यांत खड्ग, ?; पिवळें वस्त्र. **मः** अचिप्रमाणें. **रूपाः** रंग ?; श्वान; चार हात व त्यांत खड्ग, खेटक, कात्री, वैरिमस्तक; भयंकर दाढायुक्त तोंड. **विधः** काळातांबडा; खर, उंट; दोन हात व त्यांत दंड, लगाम; ऊर्ध्वकेश, काळें वस्त्र, निर्ऋति भार्या. **शिर[1]:** भयंकर तोंड. **श्रीनिः** निळा; मनुष्य[1]; उभे केस, विरूप डोळे; भयंकर. **सुभेः** सावळा; सिंह[1]; भयंकर व विकृत आकार.

वरुण—अचिः पांढरा; मकर; दोन हात व त्यांत पाश, कमळ; रत्न-किरीट, हार. **अपुः** रंग ?; मकर; दोन हात; पण त्यांत पाश, ?. **अभेः** पांढरा; मकर; दोन हात; पण त्यांत पाश, ?; करंडमुकूट, पिवळें वस्त्र, जानवें. **पूकाः** पांढरा; मकरावर उभा किंवा बैठा; हात ?; पण त्यांत पाश; पिवळें वस्त्र. **वृसः** रंग ?; हंस; हात ?; पण त्यांत पाश. **मपुः** शंखस्फटिक; नक्र; हात ?; पण त्यांत पाश. **रूपाः** रंग ?; नक्र; हात ?; पण त्यांत वर, पाश, सर्प, कमंडलु. **विधः** तांबूस; रुतहंसरथ; चार हात व त्यांत पद्म, पाश, शंख, रत्नपात्र; पांढरीं वस्त्रें, लांब पोट, डावीकडे मकरध्वज, डोक्या-वर शुभ्र छत्र, डावीकडे यमुना व उजवीकडे गंगा; डाव्या मांडीवर गौरी भार्या. **शिरः** अभेप्रो. **श्रीनिः** पिवळा; मकर; हात ?; पण त्यांत नागपाश; तांबडे अलंकार. **सुभेः** पांढरा; वाहन ?; दोन हात व त्यांत पाश, वर.

---

१ दोन हात व त्यांत तलवार, ढाल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वायु--**अचि**:धुरकट; मृग; दोन हात व त्यांत वरद, पताका; चित्र-वस्त्र, रत्नकिरीट, कुंडलें. **अपु**:रंग?; मृग; दोन हात; पण त्यांत ?, वज्र. **अभे**:धुरकट; सिंहासन; दोन हात व त्यांत ध्वज, दंड; पांढरीं वस्त्रें, तांबडे डोळे; सकेश. **पूका**: धुरकट; मृग; हात ?; पण त्यांत अंकुश,?; पांढरीं वस्त्रें. **मपु**:अचिप्रमाणें; पण वरद ऐवजीं ध्वज. **रूपा**:पिवळा; मृग; हात ?; पण त्यांत वर, ध्वज किंवा दंड, पताका, कमंडलु. **विधः** निळा; वाहन ?; दोन हात व त्यांत चक्र, डावीकडे शिवा. **शिरः** रंग?; सिंहासन; हात ?; पांढरीं वस्त्रें, सकेश. **श्रीनिः** काळा; कृष्णमृग; हात ?; पण त्यांत सोन्याचा दंड व ध्वज. **सुभे**:श्याम, धुरकट; मृग; हात ?; पण त्यांत अंकुश, ध्वज.

कुबेर--**अचि**:गोरा; नरयुक्त विमान; दोन हात व त्यांत गदा, वरद; मोठें पोट, आठ निधींनीं युक्त, गुह्यकयुक्त. **अपु**:रंग ?; बकरा; दोन हात; पण त्यांत गदा,?. **अभे**:तप्तकांचन; बकरा; दोन हात व त्यांत ?, वरद, अभय, गदा; करंडमुकुट; डावीकडे देवी; वाजूस शंखनिधी व पद्मनिधी. **पूका**: सोनेरी; नर; हात ?; पण त्यांत गदा; मुकूट. **वृस**:रंग ?; नर; हात?; मोठें पोट, डावीकडे झुकती मान. **मपु**:अचिप्रो. **रूपा**:रंग ?; गज; हात ?; पण त्यांत गदा, निधि, ईडनिंबू, कमंडलु. **विधः**सोनेरी; शिविका; चार हात; पण त्यांत गदा, शक्ति; लंबोदर, पिंगट डोळे, कवच, दोन दाढा, श्मश्रू, डोकें डावीकडे झुकलेलें, डावीकडे ऋद्धि, शंखपद्मनिधि; सिंह व सूर्य यांचा ध्वज. **श्रीनिः** पिवळा; घोडा; हात ?; पण त्यांत भाला. **सभे**:श्याम;वाहन ?: दोन हात; पण त्यांत गदा, ?; तांबडे हात, डोळे व वस्त्रें.

ईशान--**अचि**: पांढरा; पांढरा बैल; दोन हात व त्यांत त्रिशूल, वरद; चंद्रकला, त्रिनेत्र, व्याघ्रचर्म, नागयज्ञोपवीत, सर्पकुंडलें. **अपु**: रंग ?; बैल; दोन हात; पण त्यांत ?. **अभे**: पांढरा; पांढरें कमळ; दोन हात व त्यांत शूल, कपाल; जटामुकुट, पांढरें वस्त्र व जानवें. **पूका**: पांढरा बैल; हात ?; पण त्यांत त्रिशूल; पिंगट त्रिनेत्र. **वृसः** साधारण शिवाप्रमाणें. **मपु**: पूका-प्रमाणें; फक्त पांढरे डोळे. **रूपा**: पांढरा; बैल; हात ?; पण त्यांत वरद, त्रिशूल, नागेंद्र, बीजपूरक. **शिरः**[1] [१] पांढरा; पांढरीं रेशमी वस्त्रें. [२]

१ यामध्यें ईशानाऐवजीं सोमाचीं दोन वर्णनें आहेत. तेव्हां शिरमतें ईशान्येचा स्वामी सोम तर नाहीं ना ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांढरा; कमलासन; हात ?; पण त्यांत वरद, कुमुद. **श्रीनिः** पांढरा; बैल; हात; पण त्यांत वरद, अभय, शूल व अक्षमाला. **सुभेः** रंग ?; बैल; चार हात व त्यांत शूल, वरद, अभय, ?; जटायुक्त.

उदाहरणें

बदामीच्या गुहांतील छतें अभ्यासण्यासारखीं आहेत. त्यांवर कोठें नुसतेंच चक्र, कोठें नुसताच गरुडावर बसलेला विष्णु, कोठें चार उप किंवा मुख्य दिशांस नंद्यावर्त आकृति, गंधर्वयुग्में किंवा किन्नरमिथुनें काढलेलीं आढळतात. त्यांतल्या त्यांत २।३ छतें फार मजेदार असल्यामुळें त्यांचें वर्णन येथें देतों. (१) हें चौथ्या गुहेंत आहे. याचें एक मोठें वर्तुळ व त्यांत मधोमध लहान वर्तुळ आहे. दोन्ही वर्तुळांमधील जागेंत ८ लहान वर्तुळें आहेत. मधल्या वर्तुळांत वाम ललितासनी आणि बहुधा श्री व भू या देवींसह विष्णू बसला असून बाजूंच्या वर्तुळांत पूर्वादि अष्टदिशांच्या क्रमानें इंद्र (ऐरावत), ब्रह्मा (कमल), यम (रेडा), शिव (नंदी), वरुण (मकर), कुबेर (घोडा), बुध (सिंह), अग्नि (एडका), यांच्या आकृति वाहनांसह काढल्या आहेत. (२) हें याच गुहेंत आहे. यांत मध्यें सव्य ललितासनी ब्रह्मा बसला असून बाजूच्या चार मुख्य दिशांच्या वर्तुळांत इंद्र, यम, वरुण, बुध किंवा कुबेर आपल्या वाहनांसह खोदले आहेत. आणि उपदिशांच्या वर्तुळांत किन्नरमिथुनें आहेत. (३) या छताच्या मधल्या वर्तुळांत वृषवाहन काढला असून फक्त मुख्य दिशांच्या वर्तुळांपैकीं तिहींत गणांच्या जोड्या व चौथ्यांत गणपती खोदला आहे. (४) या छतावर मधल्या वर्तुळांत बैठा वरुण असून बाजूंच्या आठ वर्तुळांत फक्त गंधर्वमिथुनें आहेत. (५) यांत मध्यें इंद्र असून बाजूंस गाण्याबजाबण्यानृत्याचीं दृश्यें आहेत. या सर्वांवरून असें दिसतें कीं, सहाव्या शतकापर्यंत दक्षिणेंतील शिल्प्यांना अष्टदिशांचे नेमके स्वामी कोण हें तरी माहीत नसावें किंवा तेच छतावर व क्रमानेंच काढिले पाहिजेत असा त्यांमध्यें नियम बनलेला नसावा. एरवीं एकाच ठिकाणच्या गुहांमध्यें इतकी विविधता न आढळावी.[1]

गंजिगट्टि (धारवाड) येथील शाळेजवळ एक मोठा दिक्पालपट्ट उभा करून ठेविला आहे. त्यांत आठ दिशांस आठ लोकपाल असून मध्यें गजा

१ मेआसइ क्र. २५ पृ. ५६,५७ प्रप १३,२६,२७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गंजिगट्टि–धारवाड

अष्ट दिक्पाल

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



८२ राजगृह-पाटणा ऋषभनाथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



८३ राजगृह-पाटणा ऋषभनाथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरमर्दनाची मूर्ती आहे. प्रत्येक मूर्तीस चार हात आहेत व प्रत्येकाबरोबर त्याची शक्तीही दाखविली आहे.[१] बळगांवे येथील पट्टांत बहुतेक दिक्पालांना दोन हात असून बरोबर शक्तीही आहे. मध्यें काढलेल्या शंकरमूर्तीस सोळा हात असून त्याच्या उजव्या बाजूस गणपति व नंदी आणि डाव्या बाजूस पार्वती व कार्त्तिकेय खोदलेले दिसतात[२]. कित्येक ठिकाणीं नऊ चौकोनांपैकीं आठ चौकोनांत अष्ट दिक्पाल काढून नववा मोकळाच सोडलेला असतो. उ. नाशिक जिल्ह्यापैकीं सिन्नर येथील ऐश्वराच्या देवळांत छतावर काढलेले दिक्पाल पहा. त्यांत असेंच केलेलें आहे.[३]

मुसी-गुमे मधील अग्निमूर्ति वामावर्ति पण सन्मुख अशा एडक्यावर बसली असून तीस दोन तोंडें, चार हात आणि त्यांत अनुक्रमें अग्नि, पंखा, पळी व घृतपात्र ? या चार वस्तू आहेत. पण पुस्तकांतील वर्णनांत सांगितल्याप्रमाणें कुऱ्हाड कोणत्याच हातांत दिसत नाहीं. मूर्ती मात्र फार प्रेक्षणीय आहे.[४] ओसिया येथील निर्ऋति घोड्यावर तर वरूण मोरावर बसला आहे.[५] येथेंच असलेलीं आणखी एक निर्ऋतिमूर्ति नग्न, कमरेभोंवतीं सर्प असलेली व चार हातांची असून त्यांत अनुक्रमें खड्ग, वज्र, प्याला व कपाल या वस्तू आहेत[६]. ओसिया येथील उल्लेखनीय अशा दोन कुबेरमूर्तींपैकीं एकीस चार हात असून त्यांतील एक भग्न व उरलेल्या तीन हातांत कमळ, दारूची सुरई व दारूचा प्याला अशा वस्तू आहेत. ही बैलावर बसल्याचें दाखविलें आहे. दुसऱ्या मूर्तीसही चार हात आहेत; पण दोन हातांविषयीं माहिती दिलेली नाहीं व दोन हातांनीं पैशाची पिशवी गळ्यापाशीं धरली आहे. हिचें वाहन एडका आहे. राजपुतान्यांत आणखी कमींत कमी तीन जागीं कुबेरास एडका हें वाहन दाखविल्याचें आढळलें आहे.[७] मूसी-गुमेमधील कुबेर विश्वपद्मावर सव्य ललितासन घालून बसला असून त्याच्या चार हातांत वर, चक्र, ?, पिशवी या वस्तू आहेत. आयुधांमुळें त्यास विष्णु-कुबेर हें नांव दिलें आहे.[८]

---

१ चाआ प्रप १५९; मूचि ८१. २ चाआ प्रप ११४; ३ मिटेडे प्रप ४९. ४ एशियाटिक मायथॉलॉजी पृ. ११२ चि.६. ५ आसइॲरि १९०८-९ पृ. १०२. ६ कित्ता पृ. १११; ही मूर्ती कदाचित् ईशानाची असेल. ७आसइॲरि१९०८-९पृ.१०९,१११,११५. ८एशि.माय.पृ.२३३चि.३९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११ चोवीस तीर्थंकर

प्रस्ताव

हिंदुस्थानांत आज जे धर्म प्रचलित आहेत त्यांत जैन धर्मास बरेंच महत्त्वाचें स्थान आहे. बौद्ध धर्माप्रमाणें तो प्राचीन असून आजपर्यंत टिकून राहिला आहे. आरंभींच्या काळीं या धर्मांत मूर्तिपूजेस स्थान नव्हतें. पण पुढें वैदिक किंवा बौद्ध धर्माप्रमाणेंच याही धर्मांत मूर्तिपूजेचा शिरकाव होऊन आज तर तीस महत्त्वाचें स्थान मिळालें आहे; एवढेंच नव्हे तर या धर्मांतील दिगंबर व श्वेतांबर अशा दोन्ही पंथांत ती जारी आहे.

असें असलें तरी वैदिक किंवा बौद्ध धर्मांत मूर्तींमध्यें जितकें वैविध्य आहे तितकें यांत खात्रीनें नाहीं. या धर्मांतील मुख्य मूर्ती म्हटल्या म्हणजे चोवीस तीर्थंकर, त्यांचे २४ यक्ष व २४ यक्षी, १६ विद्यादेवता आणि बाहुबलि व भरत. पैकीं बाहुबलि व भरत या फक्त दिगंबरपंथातच आहेत आणि क्वचितच आढळतात[1]. १६ विद्यादेवता व २४ यक्षी या बाह्यतः जरी निराळ्या असल्या तरी बहुतेक विद्यादेवता यक्षींमध्यें अंतर्भूत झालेल्या आहेत. यामुळें तत्वतः त्यांचा निराळेपणा शिल्लक रहात नाहीं. पण या सर्वांत २४ तीर्थंकरांना विशेष महत्व असून त्यांच्याच मूर्ती हिंदुस्थानाच्या दोन्ही भागांत फार मोठ्या प्रमाणांत सांपडतात. पूर्वीपासून श्वेतांबर पंथाचें प्राबल्य उत्तरेंत तर दिगंबरपंथाचा प्रसार दक्षिणेंत विशेष असल्यामुळें त्या त्या पंथांच्या मूर्ती त्या त्या प्रदेशांत जास्त प्रमाणांत सांपडतात.

या दोन पंथांच्या मूर्तींत मोठा फरक आहे. पहिल्याच्या सवस्त्र व सालंकार, तर दुसऱ्याच्या मूर्ती विवस्त्र व निरलंकार असतात. याशिवाय तीर्थंकराचें लांछन, त्याचे बरोबर असणारे यक्ष व यक्षी, त्यांचीं नांवें व रूपें यांतही फरक आहे. या फरकावरून विशिष्ट मूर्ती कोणत्या तीर्थंकराची आहे हें तर समजतेंच; पण ती कोणत्या पंथाची आहे हेंही ठरवितां येतें. या मूर्ती बैठ्या असतात तेव्हां ध्यानासनी व उभ्या असतांना कायोत्सर्ग पद्धतीच्या म्हणजे सरळ उभ्या, पाय जोडलेले आणि हात खालीं सोडून

१ बाहुबलि नग्न व बहुधा वेलींनीं गुरफटलेला दाखवितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांड्यांस चिकटविलेले अशा असतात. वैदिक मूर्तींप्रमाणें या मूर्तींवर देवळें उभारलीं असल्याचें दिसून येतें. जैन समाजांत शेकडों वर्षांपासून व्यापाऱ्यांचा भरणा फार मोठा असल्यामुळें त्यांचीं देवळें बहुधा भव्य व कलाकुसरीनें नटलेलीं असतात. दक्षिणेंत भव्य देवळें नसलीं तरी इकडील मूर्ती फार मोठ्या आहेत. अबू, गिरनार, पालिटाणा येथील देवळें आणि श्रवण बेळगोळ येथील गोम्मट (बाहुबलि) व हळेबीड्र येथील तीर्थंकर यांच्या मूर्ती वरील विधानांस साक्ष आहेत.

ग्रंथिक वर्णनें

या मूर्ती कशा ओळखाव्या हें समजण्यासाठीं येथें एक तक्ता देतों[1]. या तक्त्यांत प्रथम तीर्थंकराचें नांव देऊन त्यापुढें त्याचा रंग, लांछन, त्याचा यक्ष, यक्षाचें वाहन, त्याची यक्षी, यक्षीचें वाहन असा तपशील दिला आहे. हा तपशील देतांना श्वेतांबर व दिगंबर यांचा मतभेद असेल ती बाब, प्रथम श्वेतांबर व पुढें कंसांत दिगंबर मत देऊन दाखविली आहे. लांछन, यक्षयक्षी व त्यांचीं वाहनें यांच्या बाबतींत मतांतरें असल्यास तीं नमूद करण्याची थोडीशी खटपट केली आहे. पण ती अपूर्ण आहे. यक्षयक्षींच्या हातांची संख्या व त्यांतील आयुधें यांविषयीं फारच मतभेद असल्यानें त्या बाबी येथें नमूद केल्या नाहींत. त्यांचा मूर्ती ओळखण्याच्या कामीं कांहींसा उपयोग असला तरी सामान्य वाचकांचा त्यामुळें घोटाळा उडण्याचा संभव आहे. तीर्थंकरांचीं लांछनें अथवा यक्षयक्षींचीं वाहनें हीं नेहमीं मूर्तींच्या बैठकीवरच खोदलेलीं असतात. सुपार्श्वनाथ किंवा पार्श्वनाथ यांचीं लांछनें (पांच किंवा सात फण्यांचा नाग) मात्र त्यांच्या डोक्यांच्या पाठीमागें प्रभावळीप्रमाणें दाखवितात. त्यांच्या बैठकीवर नागाचें चित्र क्वचित्च काढतात.

---

१ हा तक्ता मी रूपावतार (३७ आ–४१ आ), रूपमंडन (१९ आ–२० आ), निर्वाणकलिका (पा. ३४ आ–३८ अ), स्तुतिचतुर्विंशतिका, चतुर्विंशतिजिनानंदस्तुति, इंडियन ॲंटिक्वेरी व्हॉ. ३२, इत्यादींवरून तयार केला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

क्रमांक	तीर्थंकराचें नांव	वर्ण	लांछन	यक्ष	वाहन	यक्षी	वाहन
१	ऋषभ, आदि	सोनेरी	बैल	गोमुख	बैल (हत्ती)	चक्रेश्वरी	गरूड
२	अजित	,,	हत्ती	महायक्ष	हत्ती	अजितबला–अपराजिता (रोहिणी)	घोरपड (घडवंची)
३	संभव	,,	घोडा	त्रिमुख	मोर	दुरितारि (प्रज्ञप्ति)	रेडा, मयूर ? (हंस, बदक)
४	अभिनंदन	,,	वानर	नायकईश्वर (यक्षेश्वर)	हत्ती	कालिका (वज्रशृंखला)	कमळ (हंस)
५	सुमति	तांबडा	क्रौंच (धर्मचक्र[1])	तुंबुरु	गरूड	महाकाली (पुरुषदत्ता)	कमळ (हत्ती, म्हैस ?)
६	पद्मप्रभ	,,	कमल(कमलकलिका)	कुसुम	हरिण (बैल)	श्यामा (मनो-वेगा-गुप्ती)	नर, घोडा[2] ? (घोडा)
७	सुपार्श्व	सोनेरी	स्वस्तिक (५फण्यांचा नाग)	मातंग(वरनंदि)	हत्ती (सिंह)	शांता (काली)	हत्ती (बैल, कमळ)

१ एक प्रकारचें पवित्र चाक. २ नर, शिखिन्, मकर इत्यादि शब्दांना अनेक अर्थ असल्यामुळें मुळांत एकच शब्द असतांना वाहनभेद झालेला दिसतो.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

क्रमांक	तीर्थंकराचें नांव	वर्ण	लांछन	यक्ष	वाहन	यक्षी	वाहन
८	चंद्रप्रभ	पांढरा	चंद्र	विजय (श्याम, विजय)	हंस	भृकुटी (ज्वाला–ज्वालामालिनी)	सिंह (बैल, मांजर)
९	पुष्पदंत, सुविधि	,,	मकर (खेकडा)	अजित	कासव	सुतारका(महाकाली, अजिता)	बैल (?)
१०	शीतल	सोनेरी	श्रीवत्स (श्रीवृक्ष, धर्मचक्र)	ब्रह्मा (ब्रह्मेश्वर)	कमळ (कमळाची कळी)	अशोका (मानवी)	कमळ (?)
११	श्रेयांस	,,	गेंडा (हरिण)	यक्ष-क्षेट(ईश्वर)	बैल	मानवी (गौरी)	सिंह (बैल, घोरपड)
१२	वासुपूज्य	तांबडा	रेडा (बैल)	कुमार	हंस (मोर)	चंडा=प्रचंडा (गांधारी)	घोडा (सर्प)
१३	विमल	सोनेरी	डुक्कर	षण्मुख	मोर (कोंबडा)	विदिता (वैरोटी–ट्या)	कमळ (सर्प)
१४	अनंत	,,	ससाणा (अस्वल)	पाताल	मकर(नक्र)	अंकुशा–शी(अनंतमती)	कमळ (हंस)
१५	धर्म	,,	वज्र	किन्नर	कासव (मासा)	कंदर्पा (मानसी)	घोडा (सिंह, हंस)
१६	शांति	,,	हरिण (कासव)	गरूड (किं–पुरुष)	डुक्कर (बैल)	निर्वाणी (महामानसी)	कमळ (मोर,सिंह)

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

क्रमांक	तीर्थंकराचें नांव	वर्ण	लांछन	यक्ष	वाहन	यक्षी	वाहन
१७	कुंथु	सोनेरी	बकरा	गंधर्व	हंस (हरिण)	बला (जया–विजया)	मोर
१८	अर	,,	नंद्यावर्त (हरिण)	यक्षेट (केंद्र)	शंख (मोर)	धना, धारिणी (अजिता)	कमळ (हंस, लोहपीठ)
१९	मल्लि	निळा	घट	कुबेर	हत्ती	धरणीप्रिया (अपराजिता)	कमळ (हंस)
२०	मुनिसुव्रत	काळा	कासव	वरुण	बैल (?)	नरदत्ता (बहुरूपिणी)	सिंह (सर्प)
२१	नमि	सोनेरी	नीलकमल (अशोक-वृक्ष)	भृकुटी	तुप ? (बैल)	गंधारी–सुगंधारी (चामुंडा–डी)	हंस ? (सुसर)
२२	नेमि	काळा	शंख	गोमेध (सर्वाह्न)	नर, घोडा ? (देवालय)	अंबिका (कूष्मांडिणी)	सिंह
२३	पार्श्व	निळा	सर्प, ७ फ-ण्यांचा नाग	पार्श्वयक्ष–धरणेंद्र	कासव	पद्मावती (पद्मावती, वैरोटी)	कोंबडा (हंस)
२४	महावीर, वर्धमान	सोनेरी	सिंह	मातंग	हत्ती	सिद्धायिका–नी	सिंह (हंस)

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

CC-0. In Public Domain. Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८४ राजगृह-पाटणा नेमिनाथ



८५ अनकाई-नाशिक :तीर्थंकर

८६ खंडगिरी-पुरी बाराभुजी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८७ देऊळभिडा-बांकुरा पार्श्वनाथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदाहरणें

कै. राखालदास बानर्जी यांचें 'ईस्टर्न इंडियन स्कूल ऑफ मिडीव्हल स्कल्प्चर्स' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. या पुस्तकांत जैन मूर्तींवर दोन पानें मजकूर आहे[1]. त्यांत कांहीं मूर्तींचें वर्णन आहे. पैकीं प्रप ७६ ए मध्यें चित्राच्या डाव्या भागांत असलेली मूर्ती शांतिनाथ तीर्थंकराची आहे असें पुस्तकांत नमूद आहे; पण ती मूर्ती चंद्रप्रभ या तीर्थंकराची आहे हें मूर्तीच्या पायाखालीं बैठकीवर अर्धचंद्र आहे त्यावरून स्पष्ट होतें. दिगंबर व श्वेतांबर या दोन्ही मतांनीं चंद्र हें लांछन चंद्रप्रभ या तीर्थंकराचें असून शांतिनाथाचें लांछन श्वेतांबरमतें हरिण व दिगंबरमतें कूर्म आहे. तेव्हां चंद्र हें लांछन असणारी मूर्ती चंद्रप्रभाचीच असली पाहिजे. म्हणजे कै. बानर्जी यांचें विधान चूक दिसतें. वैभारगिरी (राजगृह) येथें मिळालेल्या नेमिनाथ, ऋषभनाथ व पार्श्वनाथ, त्याचप्रमाणें देऊळभिडा (बांकुरा) येथें मिळालेली पार्श्वनाथ, अशा सर्व मूर्ती सामान्य जैन तीर्थंकर-मूर्तींप्रमाणें ध्यानासनी व ध्यानमुद्रेच्या असून नेमिनाथ व ऋषभनाथ यांच्या बैठकीवर असलेलीं शंख व धर्मचक्रमध्य वृषभद्वय किंवा नुसता बैल हीं लांछनें त्या मूर्ती उपर्युक्त तीर्थंकरांच्या आहेत असें दाखवीत असून डोक्यावरील सात फणांच्या नागाचे छत्रामुळें वैभारगिरी व देऊळभिडा येथील मूर्ती पार्श्वनाथ तीर्थंकराच्या आहेत हें स्पष्ट होतें. यांपैकीं पहिली पांचव्या शतकाच्या आरंभीची, दुसरी आठव्या शतकांतील, तिसरी ९ व्या शतकांतील, चौथी १५ व्या शतकाच्या मध्यांतील व पांचवी मध्ययुगाच्या शेवटची आहे[2]. अनकाई (नाशिक) येथील तीर्थंकर नग्न व उभा असून त्याच्या दोन्ही बाजूंस पुन्हा दोन नग्न तीर्थंकर आहेत. यास कोणतेंच लांछन दाखविलेलें नाहीं व याच्या बैठकीवरील लेख स्पष्ट नाहीं. यामुळें मूर्ती कोणत्या तीर्थंकराची आहे हें समजत नाहीं. वैदिक व बौद्ध धर्मांतील प्रसिद्ध व आवडतें श्रीशिल्प याच्या डोक्यावर खोदलें आहे हें या मूर्तीचें वैशिष्ट्य आहे[3]. खंडगिरी (पुरी) येथील बाराभुजीचें वाहन स्पष्ट होत

१ पृ. १४४–१४६. २ आसइऑरि १९२५–२६ पृ. १२५, १२६, १२७, १५३; प्रप ५६ बीडीई, ५७ डी व ६० ई; मूचि ८४, ८२, ८३, ८७. ३ आसइऑरि १९२९–३० प्रप ६ एफ; मूचि ८५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. पण हात व त्यांतील आयुधें यांवरून ती ज्वालामालिनी यक्षीची मूर्ति असावी असा कयास होतो. खंडगिरी येथील जैन मूर्तीबरोबरच हिची प्राप्ति झाली असल्यानें हिच्या जैनत्वाविषयीं शंका नाहीं[१].

यक्ष व यक्षी यांजमुळें मुख्य मूर्ति कशी ओळखतां येते हें भा. इ. सं. मंडळांतील एका मूर्तीचें उदाहरण घेऊन सांगतों. तेथें एक चंद्रप्रभ जिनाची मूर्ती आहे. पण तिचें लांछन जो चंद्र तो या मूर्तीच्या बाबतींत अस्पष्ट झाला असल्यानें मूर्ती कोणाची याचा नीट पत्ता लागेना. पण त्याजबरोबर काढलेल्या यक्षयक्षींपैकीं यक्षीचें वाहन मांजर स्पष्ट दिसत होतें. निदान त्या वाहनास मांजराशिवाय दुसरें नांव देणें अशक्य होतें. तें वाहन कोणाचें आहे हें पाहिलें तेव्हां तें ज्वालामालिनी नांवाच्या यक्षीचें निघालें. ज्वाला किंवा ज्वालामालिनी ही चंद्रप्रभ या आठव्या तीर्थंकराची यक्षी आहे. म्हणून मी मुख्य मूर्ती चंद्रप्रभाची आहे असा तर्क केला. नंतर ती खालीं चंद्र दिसतो कीं काय हें पाहिलें. तेव्हां मात्र चंद्र स्पष्ट दिसूं लागला. निदान चंद्राशिवाय इतर लांछनाची कल्पना येत नाहीं. यामुळें ती मूर्ती चंद्रप्रभाची आहे हें निश्चित ठरवितां आलें. तसेंच ज्वालमालिनी ही दिगंबर पंथीयांच्या मतें चंद्रप्रभाची यक्षी असल्यानें मूर्ती थोडी अस्पष्ट असली तरी ती दिगंबरपंथी आहे हें निश्चित झालें. श्वेतांबरपंथी चंद्रप्रभाची यक्षी भृकुटी म्हणून सांगतात व तिचें वाहन त्यांच्या मतें सिंह हें आहे. येथें सिंह तर दिसत नाहीं. तेव्हां ही मूर्ती दिगंबरपंथीयांची आहे हें उघड होतें[२].

प्राचीन जैन अवशेषांत जैन मूर्ती किंवा त्यांच्या बैठकी सांपडूनही त्या कोणत्या तीर्थंकरांच्या आहेत, तें समजण्यास कशी अडचण पडते हें मथुरेतील जैन अवशेषांचीं एक दोन उदाहरणें घेऊन दाखवितों. 'जैन स्तूप अँड अदर अँटिक्विटीज ऑफ् मथुरा' या पुस्तकांत या अवशेषांची प्रतिमांसह माहिती आली आहे. पैकीं सहावी प्रतिमा नंद्यावर्त लांछन असलेल्या तीर्थंकराची म्हणजे अरनाथाची बैठक आहे हें तीवरील लेखावरूनच सिद्ध होतें. पण प्रतिमेंत जेथें अरनाथाचें लांछन नंद्यावर्त असावयास पाहिजे तेथें धर्मचक्र काढलें आहे. धर्मचक्र हें दिगंबरमतें सुमति किंवा शीतल या तीर्थंकरांचें लांछन आहे. श्वेतांबर मतांत धर्मचक्र कोणत्याच

१ एमोब्रिओ चि. १५४; मूचि ८६. २ भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष १४, अं. २।१६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



८८ मथुरा म्यूझियम चतुर्मुख जिन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८९ पागन–ब्रह्मदेश बुद्ध

९० नालंदा–विहार त्रैलोक्यविजय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीर्थंकराचें लांछन नाहीं. तेव्हां ही बैठक दिगंबरपंथीयांची आहे असें म्हणावें लागेल. पण या अनुमानाचा प्रत्यक्ष लेखाशीं विरोध येतो. प्रतिमा पत्रें ७ व ९ यांतील मूर्तींना लांछनेंच नाहींत. प्रतिमापत्र ९८ मधील मूर्ति ऋषभनाथाची आहे असें वरील पुस्तकाचे लेखक म्हणतात व त्याचें कारण बैठकीवर मधोमध असलेला बैल हें लांछन असें देतात. मग याच न्यायानें प्रतिमापत्र ९२ मधील मूर्ती सुमति किंवा शीतल या तीर्थंकराची कां म्हणूं नये ? कारण या प्रतिमापत्रांतील मूर्तींच्या बैठकीवर बरोबर मध्यें धर्म चक्र दाखविलें आहे व तें वरील तीर्थंकराचें लांछन आहे. शिवाय प्रतिमापत्र ९८ मधील मूर्तींच्या दोन्ही बाजूंस यक्षयक्षी दाखविलीं असून त्यांच्या आकृती मुख्य मूर्ती नेमिनाथ या तीर्थंकराची आहे असें सिद्ध करतील. मथुरा म्यूझियमच्या कॅटलॉगमध्यें बी ४ या मूर्तींच्या बैठकीवर धर्मचक्र आहे; पण तिजवरील लेखांत मात्र तिचें नांव ऋषभ आलें आहे. तात्पर्य प्राचीन काळीं जेव्हां जैनधर्मामध्यें मूर्तिपूजा शिरली तेव्हां लांछन, यक्ष, यक्षी, त्यांचीं वाहनें वगैरे तपशील उत्पन्न झाला नसावा व थोडा उत्पन्न झाला असल्यास हल्लीच्या तपशीलाशीं जुळणारा नसावा असें दिसतें.

वैदिक मूर्तींमध्यें चतुर्मुख लिंगें झालीं त्याप्रमाणें जैनांत चतुर्मुख जिनही झाल्याचें दिसतें. उ. मथुरा म्यूझियममध्यें एक चौकोनी उंच ठोकळा व त्याच्या चारी बाजूंस चार नग्न जिनमूर्ति काढलेलीं अनेक शिल्पें आहेत. पैकीं एकांत तीन मूर्तींच्या तोंडाभोंवतीं तेजोवलयें असून चौथीच्या डोक्यांवर सात फण्यांचा नाग आहे. त्याजवरील लेख व त्याची घडणी यांवरून तें पुष्कळ जुनें असावें असें वाटतें; पण त्यांत तीर्थंकरांना लांछनें नसल्यानें अशा वेळीं तीर्थंकरांपैकीं कोणतें त्रिकूट येथें आहे हें समजण्यास मार्ग नाहीं. मूर्ती नग्न असल्यामुळें त्यांचा पंथ मात्र निश्चित होतो[1]. अष्टोत्तर शत व सहस्र लिंगांप्रमाणें जिनपट्टही होते कीं काय अशी शंका येते. कारण ऐनापूर (बेळगांव) येथें असलेल्या बहुकोनी जिनशिलेच्या सर्वभर जिनमूर्ती काढलेल्या असून त्यास जिनसहस्रबिंब असें म्हणतात. याच्या फोटोंत दिसणाऱ्या भागांतच दीडशेंहून अधिक जिनमूर्ती आहेत.

---

१ आसइअरि १९३०–३४ प्रप १२२ बी; मूचि ८८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२ आसनें, मुद्रा, आयुधें, अलंकार, इत्यादि

आसनें

अर्धपयक (बुइ १८९; मूचि ६, ८, २२): दोन्ही पायांची साधी मांडी घालून एक पाय कशाचें तरी उसें देऊन थोडा उचलणें. **आलीढ** (बुइ १८९; मूचि ५, १०): डावा पाय गुडघ्यांत वाकवून पुढें आणि उजवा पाय ताठ पण तिरका व मागें घेणें; पहिलवानाचा किंवा मारुतीचा पवित्रा असा असतो. **उत्कुटिक** (इहिइ १।१९; मूचि ६१): नडग्या सरळ उभ्या ठेवून किंवा त्यांस तिढी घालून ढुंगणावर उकिडवें बसणें. **कूर्म** (इहिइ १ । १८): दोन्ही पायांच्या टाचा ढुंगणास चिकटलेल्या राहतील अशा तऱ्हेनें साधी किंवा तिढयाची मांडी घालणें. **ध्यान** (मूचि २३, ९३।१०): ध्यानमुद्रा आणि पद्मासन; योगासन. **पद्म** (इहिइ ४८; मूचि ४२, ८२–८४, ८७): टाचा उलट बाजूच्या जांघांमध्यें बसतील अशा तऱ्हेनें मांडी घालणें. **पर्यंक** (बुइ १९२; मूचि ४०, ६८): साधी मांडी घालून बसणें. **प्रत्यालीढ** (बुइ १८९; मूचि ७१, ७२, ९०, ९१): आलीढासनाच्या उलट स्थिति. **भद्र** [१] (बुइ १८९; मूचि ९, ७५): दोन्ही पाय लोंबते सोडून उंच जागेवर बसणें. [२] (इहिइ १।१८): कूर्मासन घालून पायांचे आंगठे हातांनीं धरणें. **महाराजलील** (बुइ १८९): अर्धपर्यंक. **योग** (इइ ४९): पद्मासन आणि ध्यानमुद्रा. **ललित** (बुइ १८९ ; मूचि १, ३८, ६३, ७६–७८, ८६,९२;३९,७९,८०): उंच जागेवर बसून एका पायाची मांडी घालणें व दुसरा खालीं सोडणें. डाव्या पायाची मांडी व उजवा लोंबता असल्यास तें सव्य ललितासन आणि उजव्या पायाची मांडी व डावा खालीं सोडल्यास तें वाम ललितासन समजावें. **वज्र** (बुइ १९२; इइ ५०): पायांचे तळ उलट बाजूच्या मांडयांवर येतील अशी मांडी घालून तळहात गुडघ्यावर पालथे ठेवणें. **वीर** (इइ ४९): [१] एका पायाची खुरमांडी घालून किंवा लोंबता ठेवून त्याच्या मांडीवरून पलीकडे दुसरा पाय टाकणें. [२] एका पायाची खुरमांडी घालून दुसरा पाय जमिनीशीं लंबरूपांत व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९१ विक्रमपूर–डाक्का पर्णशबरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तळपाय जमिनीस टेकून ठेवणें. **सिंह** (इहिइ १।१८): कूर्मासन घालून तळहात बोटें फाकून गुडघ्यावर बहिर्मुख ठेवणें आणि डोळे मिटून तोंड उघडें करणें. **सुख** (बुइ १९२): आराम वाटेल अशा कोणत्याही तऱ्हेनें बसणें. **सोपाश्रय** (इइ ५०): सैल मांडी घालून तळपायांची तिढी पुढें असलेल्या आधारावर ठेवणें. **स्वस्तिक** (इइ ४९): प्रत्येक पायाचीं बोटें उलट बाजूच्या गुडघ्याचे लवणींत बसतील अशा तऱ्हेनें मांडी घालणें.

विशिष्ट आसनांचें वर्णन वर दिलें आहे. या शिवाय आसन शब्दाचा बैठक असा सामान्य अर्थ असून भिन्न भिन्न मूर्तींस निरनिराळ्या प्रसंगीं हीं विविध आकारांचीं दाखविलेलीं असतात. त्यांपैकीं महत्त्वाचीं पुढें देतों.

अनंतासन: तिकोनी; खेळ पाहण्याच्या वेळीं. **कूर्मासन** : वर्तुळाकार. **पद्मासन** : वर्तुळाकार; पूजेच्या वेळीं. **प्रेतासन**: हात लांब करून पण शरीरास जोडून उताणे पडणें. **भद्रपीठ**: चौकोनी किंवा वाटोळें. **योगासन**: अष्टकोनी; प्रार्थनेच्या वेळीं. **विमलासन**: षट्कोनी; नैवेद्य अर्पण करते वेळीं; **विश्वपद्मासन**: पालथ्या बहुदळी कमळावर उताणें बहुदळी कमळ ठेवण्यानें होणारें. **सिंहासन**: चौकोनी; स्नान घालतांना.

मुद्रा

अंजलि (बुइ १८९): दोन्ही हात नमस्कार मुद्रेप्रमाणें जोडून त्यांमध्यें फुगवटी व हाताचा मनगटापासून पुढील भाग जमिनीशीं समांतर रेषेंत आणणें. **अभय** (बुइ १८९; मूचि ९३।१): कोपरापासून पुढील हाताचा भाग उभा करणें. जवळच्या मनुष्यास थांब म्हणण्यासाठीं ही मुद्रा आपण नेहमीं करतों. **आश्चर्य–विस्मय** (इहिइ १।१६; मूचि ९३।६): आश्चर्यचकित होऊन प्रश्न विचारतांना होणारी उजव्या हाताची विशिष्ट ठेवण. **कटक–सिंहकर्ण** (इहिइ १।१५; मूचि ९३।४): आंगठ्याच्या टोकास चारी बोटांचीं टोकें लावून तळहाताचें एक कडें तयार करणें. **कट्यवलंबित** (मूचि ३४): हात कमरेवर ठेवणें. **करण–सिंहमुख** (बुइ १९३; मूचि ९३।१३): तर्जनी व करंगळी हीं बोटें उघडीं ठेवून मधलें बोट व अनामिका हीं आंगठ्यानें तळहाताशीं दाबणें व हात लांब करणें. **कर्तरीहस्त** (मूचि ९३।१५): तळहात विमुख करून खांद्याच्या रेषेंत आणणें. आंगठा व अनामिका ह्यांचें कडें करून तर्जनी व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधलें हीं बोटें हरणाच्या शिंगांप्रमाणें उभी केली असतां ही मुद्रा होते. **गजहस्त–दंडहस्त** (इहिइ १।१६; मूचि ९३।८) : हात किंचित् वर उचलून हत्तीच्या सोंडेप्रमाणें करणें. **चपेटदान** (बुइ१८९): थप्पड किंवा चापटी मारण्यासाठीं हात उगारला असतां होणारी हाताची स्थिति. मारुतीचा एक हात नेहमीं या मुद्रेचा असतो. **ज्ञानमुद्रा** (इहिइ १।१७ मूचि ९३।९) : आंगठा आणि तर्जनी किंवा मधलें बोट यांचीं टोकें कडें होईल अशा रीतीनें एकमेकांस चिकटवून बाकीचीं बोटें मोकळी ठेवणें आणि तळहात छातीपाशीं आणणें. **तर्जनी** (बुइ १९७ मूचि ९३।२) : तर्जनी उभी करून व वगळून बाकीच्या बोटांची मूठ मिटून आंगठ्यानें दाबणें. हिचा उपयोग भय दाखविण्यासाठीं किंवा चूप रहा म्हणून सांगण्यासाठीं व्यवहारांत करतात. **तर्पण** (बुइ १९७) : दोन्ही हातांची ओंजळ करून ती दोन्ही खांद्यांच्या पातळींत येईल अशी धरणें. **ध्यान–समाधि** (बुइ १९२; मूचि ९३।१०): मांडी घालून तीवर दोन्ही तळ-हात एकावर एक पण उताणे ठेवणें व डोळे मिटणें. **नमस्कार** (बुइ १९४) : दोन्ही हात जोडून जमिनीशीं लंबरूपांत धरणें. **भूमिस्पर्श** (बुइ १९०; मूचि १२) : मांडी घालून बसणें व एक हात गुढघ्यावरून खालीं आणून बोटें जमिनीस स्पर्श करीत आहेत असा ठेवणें. **वर** (बुइ १९८; इइ ४७; मूचि ९३।५) : दानाचें उदक सोडते वेळीं होणारी हाताची स्थिति; किंवा आशीर्वाद देतांना डोक्यावर हात ठेवण्याची पद्धत. **व्याख्यान–धर्मचक्र–वितर्क–चित्–संदर्शन** (बुइ १९२; मूचि ९३।७ आंगठा आणि तर्जनी किंवा अनामिका हीं एकमेकांस कडें होईल अशा रीतींनें चिकटविणें, बाकीचीं बोटें उघडीं व सुटी ठेवणें आणि तळहात विमुख करणें. **समाधि**: ध्यानमुद्रा. **सूची** (बुइ १९७; इहिइ १।१५; मूचि ९३।३) : पाचही बोटांचीं टोकें एकमेकांस चिकटवून त्यांमध्यें निमुळती होत गेलेली पोकळी उत्पन्न करणें किंवा तर्जनी उघडी ठेवून बाकीच्या बोटांची मूठ मिटून तर्जनीनें एकाद्या वस्तूस लक्ष्य बनविणें. **स्तुति**: मूचि ९३।११ प्रमाणें. **हरिण** (मूचि ९३।१४) : अनामिका व मधलें बोट वाकवून त्यांखालीं आंगठा लावणें. करंगळी व तर्जनी ताठ उभी करणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



१३ मुद्रा व मुकुट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुधें, अलंकार, इत्यादि

अक्षमाला–सूत्र, जपमाला : रुद्राक्ष, कमलाक्ष, स्फटिक वगैरे मण्यांची जपमाळ. **अग्नि** (मूचि ९४।४२,४३,४७) : एका भांड्यांत ज्वालायुक्त अग्नि घेणें किंवा एकाद्या दांड्यास ज्वालायुक्त अग्नि असणें. **अंकुशः** मूचि ९४।२०. **अंगदः** कोपरावरील एक दागिना. **उत्पल** (मूचि ९४।२७) : लांबोडें कमळ. **कपाल** : मनुष्याच्या डोक्याची कवची; अर्धें मडकें; वाटोळा किंवा लांबोडा परळ. **कुंडल** (मूचि ९४।२६,२८ ३५,३७,३९) : कानाचा लोंबता दागिना; हीं अनेक प्रकारचीं आहेत; माशाच्या आकाराचीं तीं मकरकुंडलें; पानासारखीं नुसतीं पातळ पट्टीचीं तीं पत्रकुंडलें; सुसरीच्या आकाराचीं तीं नक्रकुंडलें; शंखाच्या आडव्या कापाच्या आकाराचीं तीं शंखपत्रकुंडलें; सर्पाच्या आकाराचीं तीं सर्प-कुंडलें; रत्नजडित तीं रत्नकुंडलें. **कुंडिका** (मूचि ९४।३६) : परळ; पाणी पिण्याचें उथळ भांडें. कोशांमध्यें कुंडिकेला कमंडलु असा पर्याय शब्द दिला असला तरी तो अर्थ अगदीं थोड्या ठिकाणीं संभवतो. **केयूर** : अंगद ?. **खट्वांग** (मूचि ९४।२५,४१) मनुष्याचें मुंड टोकास असलेली गदा; हिचा दांडा कधीं हाडाचाही असतो. **खेटक, चर्म, ढाल** : ही लाकूड, कातडें किंवा धातू यांची असते. कातड्याची असल्यास तीस चर्म म्हणतात. **चन्नवीर** : (मूचि ५९;७१) सव्य व अपसव्य अशा जोड जानव्यासारखा अलंकार. **टंक** (मूचि ९४।३४) टाकी. **डमरु** : मूचि ९४।२१. **त्रिशूल** : तीन शूलांचें एकत्रीकरण. **नंद्यावर्त** : (मूचि ९४।२४ स्वस्तिकाच्या जातीची एक आकृति. **पट्टिश** : तीक्ष्ण धारेचा लोहदंड; कदाचित् पट्टा. **पानपात्रः** कुंडिका. **पाश** (मूचि ९४।१९,३०) : एक किंवा अनेक दोऱ्यांचा फास. **मुकुट** : हे अनेक प्रकारचे आहेत. डोक्याचे जटांच्या मुकुटासारख्या रचनेचें नांव जटामुकुट (मूचि ९३।१६). फेझ टोपीच्या धर्तीवर पण वर-कळस असलेला तो किरीटमुकुट (मूचि ९३। १७). करंड्याप्रमाणें किंवा वाण्याच्या दुकानांतील वजनांच्या संचाप्रमाणें एकावर एक पण लहान लहान होत गेलेल्या वर्तुळांनीं बनणारा तो करंड-मुकुट (मूचि ९३।१८). उभ्या नळ्यांनीं बनलेला तो नलिकामुकुट. पानांनीं बनविलेला तो पत्रमुकुट. **लड्डुक** : लाडू. **वज्र** (मूचि ९४।२३) :

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें धरण्यासाठीं मूठ व दोन्ही बाजूस त्रिशूलाचीं फळें असणारें हत्यार. **वल्लकी** : वीणा. **शक्ति** (मूचि ९४।२९,३३) : भाला. **शूल** : एकच पण लांब निमुळतें होत गेलेलें टोंक असलेला भाला. **श्रीफल** : बेलफळ, पोफळ, क्वचित् नारळ. **श्रीवत्स** (मूचि ९४।४०,४६) : छातीवरील एक दागिना. **स्रुक्** : (मूचि ९४।२२,३२) दांड्यास वर्तुळाकार टवळें असलेली यज्ञीय पळी. **स्रुव्** (मूचि ९४।३१) चमच्याप्रमाणें लांबोडें टवळें असलेली यज्ञीय पळी. **स्वस्तिक** (मूचि ९४।४५) : एक पवित्र आकृति.

समाप्त



पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar